MATERIALS FOR THE HISTORY OF THE MARATHAS

RAJWADE
VOL. 21

B. B. R. A. S.

सत्कार्योत्तेजक सभा—धुळें

श्री

इतिहास आणि ऐतिहासिक

भाग दुसरा

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें

खंड २१ वा

शिवकालीन घराणीं

१	प्रभानवल्ली—सरदेसाई	संपादक:—	१—७६
२	देवरुख—देसाई	वि. का. राजवाडे.	७७—८३
३	कऱ्हाड—गिजरे	(संपादक—भा. वा. भट)	८४–१६०

हा ग्रन्थ शंकर श्रीकृष्ण देव यांनीं धुळें येथें आपल्या श्रीआत्माराम छापखान्यांत छापून धुळें येथें प्रसिद्ध केला.

१८४० कार्तिक शु. १

किंमत तीन रुपये

श्री

इतिहास आणि ऐतिहासिक

भाग दुसरा

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें

खंड २१ वा

शिवकालीन घराणीं

(१) प्रभानवल्ली-सरदेसाई

लेखांक १] [१५८१ कार्तिक शुद्ध ४

हु

फर्मान हुमायून शरफ सुदुर याफ्त बज्यानेब इजरी बसु········अत दस्तगाः मुजानीब जकार आगा अहुंदेय उजुराय उज्जाम मशारनुले: किराम निहंग दर्यायमर्दी व मर्दानगी गऱ्हर फेरोजबंदी व फर्थनगी फारीस मुजमार सुज्याअत····महजरम बशाहामत् शाइस्त·······अतीफत खत हसीन सजावर परगणें रुऱ्हामत वा फीरीखान अलीशान इखबालनिशान फरजंद रसीद सुभा दारंद दरांगर अर्ज कुनदसी देहर अमीन फजली फदला व फजली अफजल खुलासे नेखावांबं मुल्क गीर कीस्वर सीतां अफजलखान महमदशाही सरहवालदार व इजत व रफअत दस्तगाह अबुल कादीर सरवरखां रखवालदार व कारकूनानी हाल व इस्तकबाल मामले मुजफराबाद आंकी अज सुहूरसन सितीन व अलफ दरीविला मशहुरुल अनाम केसो नायक व रंगबा नायक फरजंद ओ सरदेसाई मामले मजकूर व बंदर मैमून मुस्तफाबाद बदर्गा मुअला इलतमास नमूदा की खुद बमसलीहत्

पादशाही बमा फर्जंदानी व बिरादर जादगां मशगुल शुदां खिजमत बतकदीम मेरसानेम व बिशियार अहवाल दिरेशा नेक खुदरा इनाम मुजारेआ कुली कर्यात मुतकवाना मामले मजकूर दरवज्याह इनाम बुजरगांनी खुद कुरसी दर कुरसी माअेकुल बाब ज्यांरी बूद दरींइसना मुजारेआं मजबूर दरवज्यह मुकासाये अबदुल नबी फर्जंद फरवरुदीन ठाणेदार खानस्त नजर इनायत फरमूदा मुजारी आ मजकूर बरहुकुम साबीक मुकरर व मऱ्हामत फर्मायंद बिनाबरां इलतमास नायक मशारनुले बरवातर मुबारक आला आउर्दा खुसरवान ये मुनारे आ कुली कर्यात मुतकवाना मामले मजकूर बाबत अबदुल नबी मोमील ये केशव नायक व रंगबा नायक मामले बंदर मजकूर माकुलबाब माहासूल व नकदियात व जमाअ लवाजिमात भेट व बेगार व फरमाइश व खानगी व पापोश मीजवानी व नवसीलमहल व व्यंग बेटी व बेकसी व हम सिके हुमायून व कार इमारत बेठ मनउसूरूर कुल बाब व कुल ज्यादात व साही कानुनात इसमी व रसमी व कलमी व कदीमी व नकदी व जिनसी आचे दर दफ्तरे आला साबित सत्र पेस्तर जिकर नओखाहद शूद मुकरर व मऱ्हामत् व फर्मूदादे बनीदा सूदास्त मेबायद की मुजारे बाब बायेदाखील मानसूत व तंगानात व दरक्तानी नारगील व जंगल ताल खगा व देहानी वगैर दुम्हाला सरदेसाई मशारनुले साजन बद अवलाया व अतफाल ए बदसदा ज्यारी दारंद व हरसाल फर्मान मउयदीदान तलबंद दारद. मिफर्मान रवां दारंद तालीक निविस्ता गिरिफ्ता असल फर्मान बाज गुजारंद ता दानंद बर हुकूम फर्मान तकदुस अशरफ खद तहरीर दफी तारीख दुयेम माहे सफर बिल मुजफर सन एक हजार सात परवानगी हुजूर खुरसैद जु..................................अशरफ हुमायून अला*

---

* मूळ फारशी सनदेचे मराठी उच्चार कोणीं स्मरणार्थ लिहिले असावे.

लेखांक २] [१५८३ श्रावण वद्य ५

श्री

॥ ⸙ मशरुळ रा हवालदार व कारकुनानी व देशमुखानी व देशपांडियेयानी व मोकदमांनी व सेटियें व माहाजनानी व बाजे रयानि माहालानिहाय मामलें प्रभावली यासि पिलाजी नीलकंठराव सुभेदार नामजाद मा मा सूरसन इसने सितैन अलफ नरसोवा नाईक बिन कान्होवा नाईक मावलंगकर गुमस्ते सरदेसाई मामले मा याही राजगडच्या मुा हुजूर जाऊन माहाराज रा साहेबांची सनद घेऊन सुभां मां आले रा छ २ माहे जिलकाद पौ छ १७ माहे मा तेथे हुकूम जे नरसो नाइक बिन कान्हो नाइक मावलंगकर गुमस्ते सरदेसाई मामळे प्रभावळीं यार्णी किले राजगडच्या मुा हुजूर येऊन अर्ज केला जे रंगो नाइक बिन केसो नाइक मावलंगकर सरदेसाई मा मा हे पेसजी किलें मा साहेबांचे भेटीस आलें होते तेन्हां अर्ज केला जे सद-

निळकं
ट शरण
पिलाजी

रहू देशमुखीचे वतन आपलें पिढी दर पिढी मातकदम इस्तकबिलपासून ता साल गुां पावेतों चालत आले हालीं तळकोकण साहे-बास अर्जानि जाहालेंया वरि साहेबीं सेवकावरी मेहरवान होऊन कौल सादर केलिया वरीं आपण वतनाचे बाबे खिजमतीस हार्जार जाहालिया वरि दिवा-णातून सारी च वतने अमानत जाहाली आपलें कदीम हक व लवाजिमा व इनामती दिवाणातून अमानत जाहाल्यां आपण तों साहेबांचे खिजमतीस येकसान असो साहेबीं मेहरवान होऊन कुटुंबास अन्न देऊन सेवकाची उस्तवारी केलियां उमेद धरून येकसान चाकरी करू त्या वरीं साहेब मेहरवान होऊन सेवकास पटी पछयोडी लाहारी २००० दोन हजार मामले मा जमाबंदी वरी रयत निसबत सीस्त करून द्यावी ह्मणोन सुभा मा सनद सादर केली ते घेऊन सुभा आले सदरहू प्रा सीस्त करून घ्यावी तो रा सुभेदार हुजूर आले सेवकास कांहीं पावलें नाहीं

अलफ सालगुदस्तां तळकोंकण मुलकाची कबजादत बदल खासास्वारी तळकोंकणात होउनु मुल्क कबज़ जाहाला ते वक्ती शृंगारपूरकर सुर्वे व कोंकणातील पातशाई अमलदार याणी बेमानी केली ते नतीजा पोहचोन उधलोन गेले मुल्कातील रयतीस सरंजामा बदल वतनदार व रयत यांस सरकारांतून कौल सादर जाहाले वर केसो नायक बिन रावो नाईक मावलंगकर व सारे वतनदार मामले मजकूर सरकारी खिजमतीस हाजीर जाहाले सालमजकुरी रंगो नाईक बिन केसो नाईक मावलंगकर सरदेसाई मामले मा। याणी किले राजगडच्या मुकामी हुजूर येऊन अर्ज केला जे आपलें सरदेशमुखीचे वतन मामले मा। व मामले दाभोल पिढी दर पिढी मातकदम इस्तकबिल पासून तां। सालगुदस्ता पावे तों चालत आले हाली तळकोक(ण) साहेबांस अर्जानी जाले वर साहेबीं सेवका वर मेहरवान होऊन कौल सादर केले या वर आ++ वतनाचे बाबे खिजमतीस हाजीर जाहालो हाली दिवाणातून सारी वतने दिवाणातून अमानत जाली आपले कबिजा हक व लवाजिमा व इनामती अमानत जाल्या आपण तों साहेबाचे खिजमतीस एकसान असो साहेबीं मेहरवान होऊन सेवकाची वतना वर स्थापना केलिया व कुटुंबास अंन देऊन उस्तवारी केलिया उमेद धरून एकसांन चाकरी करूं व ये बाबे तुह्मीं इलतिमास लिहिली बा। इलतिमास खातेरेस आणून व रयत मामुरी वर नदर देऊन बेकदीम वतनदार याबदल नायक मा। यांस दोनी मामले मा। सरदेशमुखी वंशपरंपरेंने करार करून नाईक मा। यांस मामले प्रभावलीचे जमाबंदीवर पटी पछोडी हक लारी २००० दोन हजार रयतनिसबत करार केली असे तरी तुह्मीं मा। मा। जमाबंधी वर रयतनिसबत सदहू लारी २००० दोन हजारची सीस्त बसऊन दर साल नाईक मा। देवीत जाणे दर साल ताजा सनदेचा उजूर न धरणे मामले दाभोलची पटी पछोडी हक याची सीस्त होणे त्यास मा। माचे अमलदार व वतनदार हुजूर आणविले आहेत ते आ॰

या मुळे सेवक हइरान आहे पेस्तर सेवकास पोटभर अन्न देऊन उस्तवारी करणार साहेब धनी आहेत बराय इलतिमास खातरेस आणून रयत मामुरी वरी नदर देऊन सरदेसाई मा यासि हक व लवाजिमा पटी पछयोडी लारी ३००० तीन हजार व इनामत बागाइत मौजे कोलबे ता पावस मा मा या प्रमाणे करार करून देऊन हे सनद सुभां सादर केली असे सदरहू लारी ३००० तीन हजार मामलें मांचे जमाबंदी वरीं रयत निसबत सीस्त करून सरदेसाई मा यासि देत जाणे व बाग माची बागाईत व जिराईत जमाबंदी होईल ते सरदेसाई मा याजकडेस इनामत खर्च साल दर साल लिहीत जाणे दर साल ताजा सनदेचा उजूर न धरणे या पत्राची नकल घेऊन असलपत्र सरदेसाई माजवल देणे ऐसे पत्र घेऊन सुभा आलिया वरी मामलें मजकूरचे व माहालानिहाय मा मा वतनदार सुभां आणून याच्या हुजूर ऐन जमाबंदी वरी लारी ३००० तीन हजाराची रयतनिसबत सीस्त करून गावगना पटी बसऊन सुभाहून दर माहालास सनदा आलाहिदा सादर केल्या आहेत त्याप्रा हक व लवाजिमा व इनामत दर साल सरदेसाई मायास तुह्मी बिलाकुसूर देत जाणे जाणिजे छ १७ माहे जिल्हेज

लेखांक २] [१५८४ वैशाख शुद्ध १४

श्री शिवन
रपति हर्ष
निदान साम
राज मतिम
त प्रधान

श्री

मसुरुलहजरत राजश्री पिलाजी नीळकंठराव सुभेदार नामजाद मामले प्रभावली यांसी सिवाजी राजे दंडवत सुहुरसन इसने सितैन

ठेया वर होईल या पत्राची नकल घेऊन असल नाईक माजवळ मर-
तून देणे जाणिजे मोर्तब सूद

मर्या
देयं विरा-
जते

तेरीक १२ माहे रमजान सुरु सूद

लेखांक ४] [१५९७ श्रावण वद्य ६

श्री तालीक

सिवाजी राजे आनाजी पंडीत सुरनीसी

सिका

कौलनामा अज दिवाण ठाणे तपे संगमेस्वर मामले प्रभांवली तां। वेदमुहूर्ती नीलकंठभट बिा। सोमनाथभट कात्रे वस्ती कसबा तर्पे मजकूर सुहूर सन सीत सबैन अलफ दादे कौलनामा ऐसा जे तुह्मी येऊन मालूम केले की आपला कसबा घरठाव पुरातन आहे त्यास रामभट सफर्रे बिढरी ठेविले होते ते हाली कथला कीरतांती याचा निवाडा केला पाहिजे घरठाव याची हकीकत तरी आपलें पिते सोमनाथभट हे पूरवी गोमांतकांत वैद्यपणाचा वेवसाव करीत असतां राजश्री सोमनाईक बिन विठल नाईक सरदेसाई मामले प्रभावली हे दिवाणकार्या निमित्यं फोंडियास गेले तेथे त्याचे शरीरी आसवस्त जाहाले त्यास वैद्य पाहिजे ऐसा जाहाला त्या वरून सोंमनाथभट यास यत्न करून फोंडियास गोमांतकाहून आणिले उशदउपच्यार करितां वैद्यपणाची साक्षता कळों आली त्यावरून तेहि सोमनाथभटास आग्रह केला कीं तुह्मी गोमांतकी राहोन आधीक काय केले ठावे आहे संगमेस्वरास तुह्मी येणे जे कायं येथे उत्पन असेल ते देऊन ऐसे कितेंक प्रकारे बोलोन परिवारां निसी आपणा समागमे आणून संगमे-स्वरी ठेविलें काही दिवस हरिभट पित्रे याच्या घरी बिढरे होतें त्या

घरीं काही दिवस देशमुखाच्यां वाड्यांत होतें त्या वरी सोमनाथभटी देशमुखां पासी विनंति केली आपल्यास श्नानसंध्या कारणे सचंतर जागां दिला पाहिजे त्या वरी बरा जागां पाहांता एक सोनारं आपले घरं जागां विकंत होतां तों त्याच्या राजीनामा[1] + + + + + + राजीपणाचा घेतला की लक्षुमबाई सांगेल त्यास उभयता मान्यं त्या वरून तीस लिहून पत्रं आणंवितां तिचं सांक्षपत्र दिले की सोमनाइकी सोमनाथभटास स्थल दिलें हे खरे हे साक्ष हरीभट वझे वस्ती कसबा यास हि ठावकी आहे ह्मणौन पत्र लिहिलें त्यांवरून हरीभट वझे आणून सांगितले की तुह्मी सकळ भलें वित्पत्रं बैसोन निवाडां करून देणे यास आनीथा करील तो गोंब्राह्मणद्रोही त्यावरी ब्राह्मण बैसोन केला बिा

हरीभट वझे नारो पाध्ये धर्माधिकरणी गोविंद जोसी हरिभट पित्रे वासदेवभट देव

हे सर्व ब्राह्मणांही निवाडा केलां की सोमनाइकी व सोमनाथभटी घरठा रामेश्वरभट सफरे यास दिलाहां नाही भोगवट्यानिमित्यं रामभटे घर बांधिले आहे तें रामभटाचे रामभटास द्यावें भूम सोमनाइकी सोमनाथभट यास दिली हे खरें ह्मणौन त्यासी द्यांवी ऐसा निवाडा वेदमूर्ती नीळकंठभट व रामेश्वरभट सफरे या उभयताचा जाहालां यां वरी तुमास कौल सादरं केलां आहे भूम ठाव देखील झाडे परसू व तुह्मी आपली कमावीस करणे जुने काजाणु आहे तें रामभटांचे रामभटास देणे तुह्मी नवे बांधोन सुखरूप आसणें पुत्रंपौ तुह्मास जागां मुकररं आहे सुखे आसणे दरीबाब कौल आसे छ १९ माहे जावल मार्तब सूद मार्तब आसे

लेखांक ५] [१६०६ श्रावण शुद्ध १

श्री

स्वस्ति श्रीशके १६०६ रक्ताक्षिनामसंवत्सरे श्रावणसुधप्रतिपदा

---

१ ह्या दस्तऐवजाचा दुसरा बंद “ राजीनामा ” या शब्दापासून “ राजीपणाचा ” या शब्दापर्यंत गहाळ झाला आहे.

सौम्यवासरे तादिने रंगोबा नायक वे नरसोबा नायक व सोमाजी नायक मावळंकर यांणी मातुश्री कृष्णाबाई व विसणुभट सफरे व वासुदेवभट सफरे पुरोहित यांसी पुसिले जे देशमुखी व सरदेशमुखी संगमेश्वर माहालची व मामले प्रभावली व मामले दाभोळ या वतनाची वडिलां मध्ये अर्जक कोण पुरुष त्या पासून वंशावलि कैसी चालिली त्या वरून कृष्णाबाई याणी व उभयता भटगोसावी यांणी सांगितले जे पूर्वील वंशावळी वडिलांचे वेळेची सोमोबा नायक यांणीं लिहिली होती ती वंशावली सेतवडेकर सोमाजी नायक यां कडेस आहे ते आणवणें त्या वरून सोमाजी नायक यां कडील वंशावळीपत्र आणिले मग त्या पत्राचा उधारा वरून व कृष्णाबाई व उभयता भटगोसावी यांणी सांगितले त्या बरून वंशपरंपरा ऐसी आहे जे पूर्वी नरसींभट सत्यवादी गोदातीरीं नृसिंहभक्त होते ते देशाठणप्रसंगें तलकोकणांत धवमापूर समीप मावलंगे नायक गांवास सहकुटुंब आले येथे श्रीनृसिंहाची मुहूर्त बहुत ज्यागृत पाहोन देवासंनिध राहोन देवताराधन त्याणीं बहुत काळ केलें त्यांचे पुत्र गोविंदभट त्याणी हि देवताराधन फार केले त्याचे पुत्र मागती नृसिंहभट ते हि देवताराधन बहुत करीत असतां त्यांस स्वप्न जाहाले जे तू नीरानरसीपुरास जाऊन माझें भजन करणे तेणेकरुन माहा सिधी पावसील मग नरसीभट नीरानरसीपुरास जाऊन पंध्रा वर्षे तेथें राहोन सामराज मंत्रोपासना बहुत केली या वर त्यांस स्वप्न जाहाला जे तू सेवा केलीस ते संपूर्ण करणे या उपरी तुज देव साध्य आहे त्ये काळीं राजा कोलापुरीं विजय नामक धर्मात्मा होता त्याचे राज्य तुंगभद्रेपासून गोदातीर व समुद्रकुलपर्यंत होते तो राजा कौतुकास्तव संनिध सिंगणापुरीं राहोन नरसींभटी शिंगणापुरास जाऊन दानाध्यक्षानुमते राजदर्शन घेतले राज्याने ब्राह्मणाची शिष्टता देखोन तलकोकणांत संगमेश्वर ग्राम निधिनिक्षेप ज्यलतरुपर्वतारण्यसमेत उदकपूर्वक दान दिला मग नरसींभट संगमेश्वरास आले गांवींची स्थित पाहातां संगमेश्वरी धर्मात्मा कर्णराज व सोमाजी प्रधान व इतर कार्यपुरुष धर्मात्मे होते

त्यांणीं आपल्या नावें देवस्थापना केल्या त्याच्या वंशपरंपरेने राजे राज्य करीत असतां पनालयाच्या राज्याचे सेनाचक्र येऊन कर्णवंशज्याचे राज्य घेतले गांव उछिन च बहुत दिवस होता मग यवनानी वस्ती बहुत दिवस केली कालेकरून ते हि उछिन जाहाले कांहीं यवन नदीवर राहिले होते नरसींभटी येऊन राजाज्ञेप्रमाणें गांवी सता केली वीस टके वार्षिक कर घेत नृसिंहभटास पुत्र कृष्णाजी बहुत पराक्रमी जाहाला त्ये कालीं सिंगणापुरींच्या राज्याचा वलीबेग— नामक सहस्र अश्वाचा सरदार होता त्यास राज्याने गडनदीपासून बावंन नदीपावेतो सतर गांव मोकासा दिले यवन सता जाहाली मग नरसींहभट पुत्र कृष्णाजीने वलीबेगाची सेवा करून सतर गांवचा इजारा केला आपली च सत्ता केली संगमेश्वरची रचना करून गावांत ब्राह्मणादि सर्व जाती आणिल्या हाट बाजार रचून पान मान मर्यादा केली मावलंगेयात श्रीवर देवालय बांधिले राजपुरुष वश्य करून सतर गांवची देशमुखी व सरदेशमुखी वतन साधिलें मावलंगे गाव इनाम घेऊन मावलंगकर उपनामक व कृष्णाजी नायक हे नाम प्रसिध केले कृष्णाजीस पुत्र दोघे गोविंद एक व विठल एक विठलास पुत्र नाही गोविंद नायकास पुत्र नृसिंह नायक नृसिंह नायकास पुत्र तीन १ केशव १ वामन १ कृष्ण वामन राजसेवक जाहाला कृष्णाजी मावलंगेयांत राहिला केशव नायक देशमुखी करीत असतां विद्यानगरीचा राजा बुकण याची चढाई कोलापुरीचे राज्यावर होऊन राज्य घेतलें सिंगणापूर उछिन जाहाले नर्मदेपर्यंत सर्व देश विद्यानगरकरांहीं आक्रांत केला मग केशव नायकीं विद्यानगरास जाऊन राजदर्शन घेतले तलकोकणांत सात शत गांवींची राजसता केली तीमापा ब्राह्मण खारेपाटणास आणिल. खारेपाटणी कारभार होय या देशाचे पाटण देश नाव जाहाले केशव नायकांचा पुत्र रंगोबा तो देशमुखी करीत असतां धर्मोजी चवाण मवास त्याणे धामापुरी दुर्ग बांधोन देशास उपद्रव करी राज-

रामराव कानडा यास यवनाही मारिले बेदराची पादशाही वरघाटे व तलकोकणांत जाहाली बेदराहून काला खोजा व गोरा खोजा ऐसे दोघे जण आले यांणी सर्व देशाची लावणी संचणी केली माहाल कसबे केले प्रभावली मामला करून अठरा माहाल मामल्यास दिले कृष्णाजी परभोलकर यास बारा गांव दुसरे कोकणांत दिले रंगोबाचा पुत्र सोमाजी नायक याणी पराक्रम फार केला चालके मवासपणे वर्तो लागले कुमारजी च्यालक्याचा पुत्र धारोजी त्याणे उष्णतीर्था जवळ श्री केदाराचे देवालय बांधिले असुर्डे गांव केदारास इनाम दिला सोमाजी नायकांचा पुत्र राघोबा त्याचा पुत्र नरसोबा नायक बेदरीं पादशाहास भेटोन सरदेशमुखीचा जीर्णोधार केला पत्रे हि घेतलीं व तेथील सेना व परभोलकर साह्य करून चालक्येयासी युध केलें धारोजी खोत चालके संगमेश्वरीं युधीं पडीले नरसोबा नायकी पहिल्याप्रमाणे संगमेश्वर वसविलें नदीचे उतरभागी पेठ केली होती तं संगमेश्वरा खाले घेतली मग कांहीं काल बेदर लोपले विज्यापुरी पादशाही जाहाली नरसोबा नायकांचा पुत्र केशव नायक विज्यापुरी पादशाहास भेटोन बहुमान पावोन सरदेशमुखीचा जीर्णोधार व फरमान घेतले बुरबाडे गाव इनाम घेतला पादशाहां पासून प्रभावलीस हवालदार आणिला मग त्यांचे व परभोलकरांचे महद्वैर जाहाले कानोजी परभोलकर मवास जाहाला त्या वरी विज्यापुरींची फौज येऊन मोठे युध प्रभावलीत जाहाले सारे परभोलकर युधी पडिले कानोजीचा पुत्र चांदजी त्याचे पुरोहित घेऊन गोवेलेयास पळऊन नेला चांदजी देवगिरीस जाऊन पातशाहास भेटोन गोवेले तपा मोकासा घेतला मग तो सवा शत शिपाई सजून राजापूर पावे तो देशोपद्रव करी मग केशव नायक पातशाहा पासी विज्यापुरी मध्यस्त होऊन चांदजीस कौल घेतला चांदजीन सात शत माणसा निसी पातशाहा पासी चाकरी मान्य केली मग त्यस संगमेश्वरतर्फेस ०००० चास गाव मोकासा दिले श्रीगारपूर राहावयासी दिलें केशव नायकीं कोंड असर्डे व गिर्ये गावी आगर सेत इनाम घेतले केशव नायक

सता चालो ने दी त्याचा पुत्र सूर्याजी तो हि बलिष्ट जाहाला मग रंगोवा नायक यांचा पुत्र गणोवा नायक त्याणे विद्यानगरीहून साह्य आणून स्वयें युध करून सूर्याजीस मारिले तेधवां गणोवा नायकांस धामापूर इनाम दिलें गणोवा नायक यांचा पुत्र गोपाल त्याचा पुत्र विसाजी तो देशमुखी करी तेव्हा हणमंतराउ चांदा मराठा मवास होऊन डिगणीच्या रानांत राहोन देश मारी तेव्हां विसाजीने परभोलकर हिरोजी प्रतिष्टित होता त्यासीं घरोबा करून विद्यानगरीचे साह्य आणून चांदास मारिले तेव्हा कुंभारखणी खुर्द इनाम घेतली विसाजीस पुत्र नृसिंह नायक देशमुखी करीत असतां विद्यानगरीहून आणापा खारेपाटणास देशाधिपति करून आला त्याचे व परभोलकरांचे महद्वेर जाहालें परभोलकर विठोजी देश मारी मग नृसिंह नायक यांचा पुत्र गणोवा नायक विद्यानगरास जाऊन राजदर्शन घेऊन परभोलकरांस सवा शत गांव वरघांटे व कोकणांत देऊन नेमावर ठेविले काहीं काल गेलेया वरी धाकोजी चालका मराठा माहासूर तीन शत लोकांचा सरदार त्याणे सेवाधर्मे राजकृपा संपादून गडनदीपासून बावननदीपर्यंत नव्वद गांव मोकासा घेतले संगमेश्वरी दुर्गाश्रयें राहिला नृसिंह नायकांचा व चालक्यांचा मोहा विरोध जाहाला मग नृसिंह नायकों संगमेश्वर सोडून नदीचे उतरभागी दो नदीमध्ये दुर्ग बांधोन दुग्धगणपतीपासून नूतन पेठ केली हाट बाजार केले जाखमातेचे पूर्वभागी दुसरी पेठ वसविली मग नृसिंह नायक यांस पुत्र गणोवा नायक धाकोजीचा पुत्र रामाजी याचे माहा वइर जाहाले चालके च्यार पिढ्या होते गणोवाचा पुत्र रंगोवा तो पराक्रमी होता रामजीचा पुत्र कुमारजी त्याचे व रंगोवाचे वइर होते च मग रंगोवाचा मुतालीक यादव नायक त्याणे मध्यस्त होऊन रंगोवाचे व कुमारजीचे सख्य केलें रंगोवा नायक विद्यानगरास जाऊन बहुत राजमान्य पावला साहा गांव मोकासा घेतले वेंकापा अधिकारी खारेपाटणास आणिला रंगोवा नायकाचे पुत्र च्यार जेष्ट सोमाजी त्याणे विद्यानगरास जाऊन सात शत गांवची सरदेशमुखीची पत्रें घेतलीं व

प्रभावळीत हवालदारा जवळ राहिले त्याचे पुत्र तीन गणोबा व विसोबा व नारोबा नारोबास पुत्रसंतान नाही त्याणे रामभट सरवटे खारेपाटण- कर त्याचा पुत्र विस्णु दतक घेतला तो गिर्यें गांवीं केशव नायकी आर्जविले सेत व आगर ते खाऊन तेथे राहिला त्याणे गिर्यें गावीचें ज्योतीस व धर्माधिकारण साधून तेथें च राहिला विसोबाने देशमुखीची मुद्रा दुसरी करावी निमे कारभार आपण करावा ह्मणौन गणोबा नायकां पासी वेव्हार आरंभिला तेधवा समस्त दायदानी व त्याचे पिते केशव नायकी विसोबास सांगितलें जे जो वडील त्यास च सिके इतरानी वडीलांचे आज्ञेत वर्तावे वडीलांनी सर्वांचें चालवावें आमच्या वंशांत आजि पावे तो ऐसे चालिले यास अन्यथा वर्तेल जो त्याचे बरें होणार नाही मग विसोबा समजला गणोबा नायकीं विसोबास अर्धें बुर्बाड दिले गणोबा नायकीं देशमुखी चालविली त्यास पुत्र च्यार माहांदोबा एक १ नरसोबा एक १ दामोबा एक १ विठोबा एक १ एकून च्यार ४ माहादोबा सरदेशमुखी करीत असतां खिलण्यास किलेदाराने हुजरून नवद गांव तनखा मामल्याहून निराला केला तो कारभार निराला जाहालिया वर किलास नरसोबा राहिला त्याचा वंश देवलेकर देसाई विठोबास पुत्र दोन हरी एक १ व पुर्षोतम एक १ एकून दोन पुर्षोतमाने विज्यापुरास जाऊन साडे च्यार हजार लाहारी खर्च करून सेतवाडे माहालची सरदेशमुखीचे फर्मान आणिले खर्च लागला तो माहांदोबाने रीण घेऊन दिला मग माहांदोबा जवळ सरदेशमुखीचा वंत पुर्षोतम मागो लागला वंत द्या किंवा कर्ज वारा मग माहांदोबाने सारे कर्ज आपण च वारिले आणि सरदेशमुखीच्या वंतासी पुर्षोतमास पुत्रपौत्रादि- कीं संबध नाहीसा केला पुर्षोतमाचा वंश सेतवडेकर दामोदर आपुत्रीक माहादोबास पुत्र तीन गोविंद एक १ अंतोबा एक १ सिवाजी एक १ गोविंद देशमुखी करीत असतां प्रभावली प्रांत इजारा केला तंव पर्ज्यन्य गेला वलटा पडिला टोलानी आगरे भक्षिली लोक देशांतरास गेले गोविंद नायकास महसुला बदल खेलण्यावर नेऊन घातलें दुसरे वर्षी पर्ज्यन्य

लागला गोविंद नायकीं विज्यापुरास जाऊन अर्धी बाकी सोडविली प्रभा-वळीची खोती मिरास फर्मानी व वैझर बुा ताा देवरुख हा गांव इनाम घेतला सिवाजी बंधूस बरोबर नेऊन साहा हजार लाहारी खर्चून त्याचे नावें कलेसी व सेवी तर्फेचे फर्मान घेतले खर्च आपण देऊन कलेसी व सेवीची देशमुखी विसाजीस दिली आणि वडीलांचे वतनास संबंध नाहीसा केला विसाजी तिकडेस च राहिला अंतोबा नायक निरंतर प्रभावलींत राहिले गोविंद नायकांस पुत्र केशव त्याचा पुत्र नसोंबा नायक त्याने मावलंगेयाचे च्यार विभाग करून एक देवळेकरांस एक सैतवडेकरास ऐसे दिले आपण दोन घेतले इतर दायदास कोणास कोंड कोणास आगरे सेतें इनामती देऊन समजाविले विज्यापुरास जाऊन लवल्याचा कोड इनाम आणिला नरसो नायकांस पुत्र च्यार केशव नायक एक १ गणोबा नायक एक १ माहादोबा नायक एक १ नारोबा नायक एक १ केशव नायकी फार पराक्रम केला विज्यापुरी साहा वर्षे होते गणोबा नायक प्रभावलीस राहोन सरदेशमुखीचा कारभार करीत असतां माहादोबा लवल्याच्या कोडांत राहिला त्यास लवलेकर च ह्मणत त्यास पुत्र आपण सोमाजी केशव नायकीं अडीच हजार होन दर्बारखर्च करून दाभोलसुभाची सरदेशमुखी व दोन गाव फर्मानी करून घेतले प्रभावली प्रांते मुचरी इनाम घेतली हक्क व लाजिमा ज्या-जती करून घेतला दिवाणातून प्रभावली प्रांत इजारा तिसाल केला टोलक्रांत जाहाली संपूर्ण आगरें मोडलीं त्या मुळें दोन वर्षांत पंचावन हजार लाहारी नुकसान आलें दिवाणातून वराता जाहाल्या ऐवज नाहीं सारीं हकें इनामती अनामत केल्या बाकी बदल केशव नायकांस खीलण्या गडा वर घातलें मग गणोबा नायकीं विज्यापुरास जाऊन दीड वर्ष राहोन तिजाई बाकी सोडिली हकें इनामती सोडवि-ल्या रीण घेऊन निमे बाकी वारिली बाकी राहिली त्यास ऐवज नाही मग सारे गोत्रज मिलोन आठ हजार लाहारी बाकीस दिल्या मग केशव नायक सुटले नारोबा नायक बंधु त्यांच्या स्वाधीन दोन वर्षें व

धामापूर व मावळंगे केले होते मग दोन वर्षांचा ऐवज साडे तीन हजार लाहारी त्या कडेस राहिल्या. बाकी खंडावयासी केशव नायक मागत होते परंतु ते देत नात बाकी बदल गडा वर ओलीस राहा ह्मणत तेव्हा नारोबा नायकीं उतर दिलें की आह्मास वतन न लगे आपणा जवळ द्रव्य द्यावयास नाहीं आणि आ(प)णास गडावर राहावे ना ऐसे बोलोन समस्त दायादास पत्र लिहोन दिले जे आपण वतन सोडिले आपणास पुत्रपौत्रादिकां वतनासी संबंध नाही त्या पासून ते व(त)नास तुटले केशव नायकीं कासीकरांची कर्जे काढून विज्यापुरीचे कर्जबाकी वारिलें केशव नायक प्रभावळीत असत गणोवा नायक संगमेश्वरी राहिले केशव नायकास पुत्र नाहीं गणोवा नायकास क्षयवेथा जाहाली ते डोली करून माहायात्रेस गेले केशव नायकांचा प्रांत समय आला तेधवा संगमेश्वरीच्या घरी आले कासीकरांच्या देण्याचा व देशमुखीचा भार कोणी दायादा मध्ये मान्य न करी तेधवा आपल्यास लवल्याहून आणून आपल्या गळीं सिके घालून वतन व कर्जाचा भार घालून बोलिले जे सोमाजी तू आपला पुतण्या गणोवा नायक वाराणसीस गेले ते आले तर बरे च नाहीतर सर्व वतन इनामती तुझ्या स्वाधीन असे ऐसे बोलोन ते उतमलोकास गेले नारोबा नायकीं वतनसंबध नाही आपण पुत्रपौत्रादिकीं वतन सोडिले ऐसे पत्र देऊन आपण वेझरे गांवीं राहिले त्याचा पुत्र वेझरांत विसोवा आहे या प्रमाणें पूर्वील वंशावली व वतनाची स्थीत असे या उपरीची स्थिति सोमाजी नायक देशमुखी करीत असतां गणोवा नायक रोगमुक्त होऊन तीन वर्षी देशयात्रेहून देशास आलिया वर सोमाजी नायकीं वडीलांचे सिके व वतन गणोवा नायक चुलते यांचे स्वाधीन केलें मग गणोवा नायकी च्यार वर्षे देशमुखीचा कारभार केला सोमाजी नायकांस विज्यापुरास पाठविले त्याणी बरा उत्कर्ष केला सोंदेची मसलत पातशाहां पासी मान्य केली तेव्हा कोलबेचीं बाग व कुवेसीवाडी इनाम घेतली माखजून गांव व उचगांव इसाफती घेतल्या

प्रभावलीचा हवालदारास वैर जाहाले ह्मणऊन मागती विज्यापुरास गेले तीन वर्षे राहोन साहा हजार लाहारी दरबारखर्च करून हवालदार तगीर केला दाभोलच्या सरदेशमुखीची ताकीदपत्रे व हक लाजीमा करून घेतला प्रभावलीची सोनारवाडी इनाम व निवे गांव इनाम मिरास खोती करून घेतली प्रभावलीस आली त्यां[1]

लेखांक ६] [१६१७ माघ शुद्ध १३

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेकशके २२ युवानामसंवत्छर माघशुधत्रयोदसी सोम्यवासर क्षत्रियकुलावतंस श्रीराजारामछत्रपती याणी

[श्री शंभु सुमनोत्कंठ मोरेश्वरसुत नीळकंठ]

[श्री लक्ष्मीनृसिंहभक्त श्री नीररायादि जन्मणः ॥ आल्हादवर्धिनी मुद्रा प्रल्हादस्य विजयते]

राजश्री रंगोबानायक बिन केशवनाईक सरदेसाई मामले प्रभावली यासी वृत्तीपत्र दिल्हे ऐसे जे तुह्मी हुजूर विनती केली की देहाय हमजाबाद व देहाय जाफराबाद मामले मुस्तफाबाद हाली नाव सुभा प्रांत दाभोल येथील सरदेशमुखी वतन पुरातन आपले पिढी दर पिढी चालत आले आहे भोगवटा अवलपासून माहाराज राजश्री कैलासवासी स्वामीचे कारकीर्दीस राजश्री राघो बलाल आत्रे यासी प्रांत मजकूरचा सुभा होता तो पावेत तो आविछिन चालिले या उपर राजश्री स्वामीने कुल वतनदाराचे हक व इनामती आमानत केल्या खंड हि बेमुबलगा बांधला त्यामुळे आपला काही उबार राहिला नाही सर्वस्व खंडाचे भरीस पडिले सवे च आपले पिते

---

१ या पुढील मजकूर लिहिला गेला नाहीं. या पुढें बरा च कागद कोरा राहिला आहे; या वरून आणखी मजकूर लिहिण्याचा उद्देश लेखकाचा होता, परंतु तो कांहीं कारणामुळें तडीस गेला नसावा, असें दिसतें.

तेल्याच्या घाण्यास तेल वजन दर अडीच सेर ८०२॥

गवलियाची ह्मस दुबती असेली तीस लोणी वजन अदसेर नवटाक ८८॥९

वाणियाच्या दुकानास आडका ८॥

सरेकरी याच्या दुकानास रुका एक ०१.

मालियाच्या मलीयास रुब येक २

चांबार दुकानास जुते एक १

चाव्याच्या दुकानास रुका येक ८१

लोण्याच्या दुकानास रुका नीम ८॥

भासोलीचे होडीस रूब येक २

माहावी जुलीयास रूब एक २

तांबोली दुकानास पाने विडियाची पनास५०

माळवे वोझियास वजन आदसेर नवटाक ८८॥९

परीटवरास रूब एक २

लोहारदुकानास रूब येक २

आगरी जिनस आणितील त्यास दरमणे साडे-ध्यार टाक नारल दोशास एक १

खाटीक दुकानास मास आदसेर नवटाक ८८॥९

एकूण कलम १

एकूण बाब आठरा कलम येक १

सुतारदुकानास रूब एक ·।·

धनगर व साली मागास रूब एक ·।·

चाटेदुकानास रूब एक ·।·

सोनारदुकानास रूब एक ·।·

सराफदुकानास रूब नीम ८=

कोस्टी मागास रूब एक ·।·

भामटेमागास रूब एक ·।·

पंचकणेदुकानास रूब एक ·।·

सिपीदुकानास रूब नीम ८=

सरेकरीदुकानास लारी नीम ·॥·

एकूण बाब आठरा आला कलम एक १

जकाती उभामार्ग

पंचकणे दर गोणीस रुका एक ८१

गडी जिनस दर गोणीस रुके तीन ०३

कापड मोठे नगास रुके तीन ०३

कापड देसुरी जरमीना दर नगास दर सदे चवल एक ८=

घोडियास दर लारी नीम ·॥·

एकूण कलमे पाच आरा कलम १

तंबाकु गादीस दर सदे एक रूब फाटे ।-

केशवनायक होते त्यास देवाज्ञा जाली ते समई आपण लाहान होतो मुतालीक व चाकर होते त्यास भक्षावयासी नाही ऐसा अर्थ जाहला याकरिता कितेक आपणास टाकून गेले वतने चालऊन आटोप करी ऐसे मासूस आपल्या जवली राहिले नाही या कारिता राघो बलाल याचे कारकीर्दी आलाकडे वतनाचा भोगवटा चालत नाही मधे आपण पोख्ता जालिया वरी राजश्री संभाजी राजे याचे कारकीर्दीस हुजूर जाऊन या वतना विसी विनती केली त्या वरी त्यानी मनास आणून आपल्या माथा सेरणी ठेऊन आपले वतन आपल्यास द्यावे ऐसे केले होते परंतु ते च समई तांब्राची धामधूम जाली वतनाचा कागद आपल्या हातास आला नाही या उपर माहाराजे दिग्विजय करून धर्मस्थापना केली माहाराजे दयावंत होऊन आपले पुरातन वतन आपल्या दुमाले केले पाहिजे ह्मणऊन त्या वरून मनास आणून देहाय महमजाबाद व देहाय जाफराबाद सुभा प्रांत मजकूर येथील सरदेसमुखी तुमच्या वडीला पासून पिढी दर पिढी भोगवटा चालत आला त्या प्रमाणे सरदेसमुखी तुमच्या दुमाले केली असे सरदेसमुखीचा कार्यभाग करीत जाणे तुह्मास हक व इनामती व लवाजिमा चालत होता त्यास हाली येणे प्रमाणे करून दिल्हा असे

इनाम गाऊ कुलबाब कुलकानू खेरीज हकदार व इनामदार देह २ बि॥

मौजे तनाली ता॥ वेल्हा १ मौजे चिचघर ता॥ खेड १

हकरकमी दस्तास सालीना मोईन खेरीज इनामती दाभोली लारी साडे बारा हजार १२५०० रयतनिसबतीने केली असे

लवाजिमीयाची मोईन रयतनिसबतीने

दस्तीबाब वरी लवाजिमा मोईन

मोहतर्फा कुलास सालिना मोईन बाजार आठवडियास भरतो त्यास दर आठवडियास दुकानास मोईन

ज्या बजातीचे जकातीचा आकार दिवाणात होईल त्यास दर सदे उदीमियाचे निसबतीने लारी २ दोन व वानगी जिनस माफीक एकूण कलम एक १

एकूण कलम १

कोंबडे कुणुबा गावास दर गावास एक १

हलद व आले राजभाग आकार होईल त्यास दर खंडीस वजन दाहा सेर

किसमीठ राजभाग आकार होईल त्यास दर खंडीस पाउ मण ८०।०

उसाच्या फडास राजभागास पिकाच्या आजमासे दर खंडीस वजन अडीच सेर ८०२॥

सिगोटी खरीदीफ्रोख्तास दर रुके तीन ८३

बकरीयाचा कलप देशाचा असेली त्यास सेलके बकरे एक १

एकूण बाब अकरा आरा कलम १

खेरीज दस्तीवाव लवाजिमा मोईन

कुणुबगाव असेली त्यास सालीना लोणच्याचे जिनसाचे बोझे नीम०॥०

कुंभाराच्या आविथास मडिके एक१

राबणूक दर माहालास सालीना एक महिना

गुरव १ माहार एक १

एकूण दोन आरा कलम १

इरले दर गावास सालीना एक १

जेवा दर गावास सालीना लारी नीम ०॥०

लाकडाचे भारे दर गावास सालीना पाच ५

पारधीस

१ डुकरास सिसाल एक

१ सामरास सात एक

१ वरकड पारधीस भाकसी एक

३

एकूण तीन आरा कलम १

एकूण बाब सात आरा कलम एक १

एकूण बाब दोन आरा कलम एक १

एकूण इना(म)ती गाऊ दोन व हकाची मोईन सालीना दाभोली

लारी साडे बारा हजार व लयाजिमीयाचे कलम येक येणे प्रमाणे मोईन करून दिली असे या या प्रमाणे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें उपभोग करून सुखरूप राहणे सदरहू वतन तुह्मास मऱ्हामत करून तुमचे माथा सेरणी दाभोली लारी १५००० पंधरा हजार ठेविली आणि रसुलाची विल्हे हुजूर केली असे जाणिजे लेखनालंकार

मर्या
देयं विरा
जते

तेरीख १० रजब सुा सीत तिसैन अलफ

माहे रजब

सुरु सूद बार

लेखांक ७] [१६१७ फाल्गुन शुद्ध १३

श्री

श्रीमत्स्वामिक्त
पारामा मुद्रा संपदा
दायिनी महादेव
सुतस्यैषा गणेश
स्य विराजते

+ + + ठाणे ताा चिपुळण ताहा खोतानी देहाय सुहूर सन सीत तिसैन अलफ राजश्री छत्रपती स्वामीचे आज्ञापत्र सादर शके २२ युवानामसंवत्सरे माघसुधत्रयोदशी सौम्यवार छ १० रजब सन सीत पैवस्ता छ ७ साबान साल मार तेथे आज्ञा कीं राजश्री रंगोवा नाईक..ह्मणउन राजपत्र सादर जाहले यासि राजश्री पंतअमात्यस्वामिंचे आज्ञापत्र सादर

---

१ येथें शके १६१७ माघ शुद्ध त्रयोदशी (लेखांक ६) मितीस दिलेलें आज्ञापत्र अथपासून इतिपर्यंत लिहिलें आहे.

ची सनद सादर पौ छ ११ साबानी जाहाले त्यास देहाय मजकुरीं सदरहू प्रमाणे पत्र सादर करून हक व लवाजिमा पाववावयाची मोईन करून दिली असे ऐसीयासि देहाय मजकुरीं हकलवाजिमा जे बाबा असेल ते सदरहू मोईन प्रा पाववीत जाणे रा छ ११ साबान मोर्तब सूद[1]

विलस
ति लेखन
सीमा

लेखांक ८] [१६१९ ज्येष्ठ शुद्ध ७

माहजर कर्दे बतारीख छ ५ जिलकाद अज मुकाम कसबे चिपुळीण मामले हमजाबाद अमाल बंदर मैमून मुस्तफाबाद सुहूर सनं सबा तिसैन अलफ विहुजूर हजीरमजालसी

वेदमूर्ती कसबे मजकूर		राजश्री गणेश माहादेव हवाल्दार
अवधूतभट धर्मादिकारणी	सिवरामभट धर्मादिकारणी	तां चिपुळीण
हरजोसी गोंद-जोसी	अनंतभट मंत्र-भट	राजश्री रामजी पंताजी मजमदार ता मजकूर
विश्वनाथभट पटवर्धन		**देसक मामले मजकूर**
राजश्री बालाजी विश्वनाथ देशमुख मामले दंडाराजपुर प्रांत सीवर्धन	रंगोवा नायक सरदेसाई	खंडो आबाजी जानीब खंडो ब-

---

१ असें च आणखी एक पत्र 'ब्रह्माजी कोनेर हवालदार व कारकून ता हवेली वर्तमान व भावी' यांस 'विठ्ठल गोपाल सभासद नामजाद व कारकून सुभा मामले दाभोल ' यानें पाठविलें आहे.

छ ११ रजब सन सीत पैवस्ता छ ७ साबान साल मार तेथे आज्ञा कीं राजश्री रंगोबानाईक बिन केशवनाईक सरदेसाई यास सुभा प्रां मजकूरचे सरदेशमुखी वतन यांचे दुमाळें केले असे त्या च राजमुद्रेचे वृतिपत्र व तुह्मास सनद सादर आलाहिदा आहे तेणे प्रा वतन यांचे दुमाले करून यांचे हाते सरदेसमुखीचा कार्यभाग घेत जाणे यास वतन इनाम गाव दोनी व हक सालीना लारी १२५०० साडे बारा हजार लारी व लवाजिमा मोईन प्रमाणे करून दिली असे त्यास प्रस्तुत इनाम गाव दोनी व लवाजिमा राजमुद्रेचे सनद सादर आहे तेणे प्रा चालवणे हकाची मोईन सालीना लारी १२५०० साडे बारा हजार लारी प्रा प्रस्तुत पाववावे तरी मुलुक खराब जुजवी वसाहत आहे या करिता प्रस्तुत हक पाववावयाची मोईन ऐसी केली आहे साल दर साल नख्तबाब देखील खंड गैरमहसूल व जिरातीचे दस्त गला व बाजे जिनस व बागाइताचा दस्त याचे नख्त राजश्री अनाजीपंताचे कारकीर्दीच्या निर्खाच्या धारिया प्रा नख्त होईल ते ऐसे मिलोन एकबेरजी सुबे मजकुरींचा आकार होईल त्या पैकीं लवाजिमा मोईन करून दिली आहे त्या मध्यें दस्ती बाबा आलया आहेति त्याचे दस्त वजा करणे

मोहतर्फा १	बाजार आठव-	जकात जावजा-	
मिठागर किस-	डियास दस्त भ-	त १ ...	जकात उभा
मीठ १	रतो त्यास होईल	आले हळद १	मार्ग १
	ते १	उसाचे दस्त १	सिगोटी १
	गादी तंबाकू १	कोंबडीपटी १	

बकरियाचे महसुल १

एकून अकरा बाबेचे दस्त होईल ते वजा करून. बाकी बेरजेस दर सदे लारी ११ सवा प्रा सुबा मारीं हमदारीची जमा होत आहे त्यापैकीं पाववीत जाणे असल पत्र भोगवटीया बा मारवलेस परतून देणे ह्मणऊन सुभा आज्ञापत्र सादर जाहालें त्या वरून सुभांहून माहा-

लाल देशमुख
सुभा मामले मज-
कूर

राजश्री उधाजी भागवत
राजश्री सताजी भागवत
देवजी भागवत
जोत्याजी चवाण
जैताजी रणनवरे
राणोजी वागचवरे पाटील

मौजे आलगाऊ तां वरेई

मळजी गावडे गौड वस्ती
राजीवली तां फलटण
बावाजी होणमणे वस्ती
तराडगाव तां फलटण
सखोजी राजपुरे पाटील

मौजे मणरवड तां वाई

कासोजी गाजरे पाटील
मौजे पारनेर प्रांत जुनेर
सुभानजी रणनवरे पाटील
राला परगणे समत सासवड
संताजी सिंदे
शामजी कायदेव वावरे
पाटील कसबे कुडाल
विष्णु आवाजी

मुकासाई

अंताजीराव पेढावकर
संभाजीराव पेढावकर
तानाजीराव वाडकर
येसाजीराव वाडकर

नारो रघुनाथ
मुकादम मुतालीक सावरकर

देसक कर्यात चिपुळीण

महमदजी देसाई
हरी कृष्ण कदीम—देशकुलकर्णी
तुकसेट माहाजन
अंतो परशराम
व निलो नरसी
पतकी कदीम
श्रावणसेट सेट्ये
रावो विश्वनाथ
जानीव देशकुलकर्णी दिा
त्रिंबकरावजी
गोविंद रघुनाथ निवावन कसबे मजकूर
गंगाधर हरी

उदमी कसबे मजकूर

तिमाजी नाईक देऊसकर
नारोवा नाईक साखरे
गणो आबाजी
त्रिंबक नाइक चिखले
नारोवा खोरगडे
परशराम कमोद्ये

बकाल कसबे मजकूर

लखसेट चवधरी
गोखसेट वाडकर
बालसेट वाडकर
जैतसेट माहांकाळ

गंगाजीराव तिवरेकर	धारोजीराव तिवरेकर
हसाजीराव पालाडे व बावाजीराव पालाडे	रायाजीराव व रामाजीराव अडरेकर
भानोजीराव ठेरूकर	सूर्याजीराव नादीवीसकर
सूर्याजीराव बोवलीकर	तानाजीराव रुद्राजीराव कादवडकर
रत्नोजी कुचेकर धणगर	संताजी लालगा धणगर

कृष्णाजी इंगवला व रामजी इंगवला वस्ती दलवठणे

भिका तेली कसबे मजकूर

कानसेट मेहतर सिंपी कसबे मजकूर

नीला व धारा परीट कसबे मजकूर

तेज माहाला हजाम व राम माहाला हजाम

जोग सालवी व बाजे कुंभार

पिला बहिरवकर गुरव

तर्फे जमाती

हसाजी सणगा	अलजी देसाई

तर्फे कासार

भीकसेट कासार	बालसेट कासार
कृष्णसेट सोनार	

तर्फे गौवली

सखाऊ मेहतर	हरगौवली ठसाला

तर्फे साली

संभु ताब्या	बिठोजी काबली
तुकसेट बैलकरी	

तर्फे साटे

आबाजी मेहतर	इसुबजी मेहतर

डाणगे ता। मजकूर

सुडकोजी पडवल	माहाद लाडू

डांग्ये जमाती चवधरी मजकूर

कानोजी डांग्या	यलोजी डांग्या

पिला टावरी कसबे मजकूर

लखमोजी गुरव केदारकर

संभा ह्मार कसबे मजकूर

जाहाला माहाजर ऐसा जें बकोजी घाटोरा व मानाजी घाटोरा वस्ती मौजे दलवटणे ता। मजकूर हाली वस्ती मौजे सिंपी ता। मलवडी अगरवादी दादजी बिन तुकोजी सावळकर व बाजी सावळकर वस्ती आधली ता। मलवडी पछमवादी यां उभयतामध्ये पेठ धणगराची ता। मजकुरी येत त्यांचे वडील गावडेपणाचा वेव्हार लागला ह्मणोन भांडत तां। मजकुरी आले गोतामध्ये मनसुबीस उभे राहिले बकोजी घाटोरा व मानाजी घाटोरा हे दोघे जण राजश्री गणेश माहादेव हवालदार ता। मजकूर यां जवळ

येऊन उभे राहिले त्याही गोत मेळऊन हरदुजणाच्या तकरीरा घेतल्यां छ २० माहे रज्यब

बकाजी घाटोरा व मानाजी घाटोरा अग्रवादी याणे तकरीद केली की ता। मजकूरचे पेठेचे गावडेपण पुरातन आपले चालत आले ऐशासी माहाराज राजश्री कैलासवासी छत्रपती स्वामीची नवी काबिजात जाली ते समई केशव सेट सेव्ये ता। मजकूर गाव टाकून कराडास गेले ते समई आपला बाप पदाजी घाटोरा सेव्ये बाहेर पडले ह्मणौन घाटा वरी गेला तेथे पदाजी घाटोरा मरोन गेला आपण लाहाण होतो कोकणात यावयास फावले नाही घरकड धणगर पेठेस येत होते त्यामध्ये तुकोजी सावलकर वडीलपणाचे पान घेऊ लागला हे वर्तमान आपणास कलले त्यासी आपण हि पोख्ता जाहालो मग आपण हि दलवटणेयासी आलो तुकोजी सावलकर याची पेठ आली फरोक्त जाहाल्या वर घाटा वर जाता दलवटणे येथे भेटला तेथे हटकिला कीं आपले

दादजी सावलकर व बाजी सावलकर पछमवादी यांणी तकरीर केली ऐसी जे पेंठ मजकूरचे वडीलकी गावडेपण आपले पिढी दर पिढी चालत आले पिढी

१ राघोजी
१ गोयाजी
१ सिरसोजी
१ दादजी
१ तुकोजी
१ हाली दादजी

६

येणे प्रमाणे आपले वडीलपण पिढी दर पिढी चालत आले आहे मध्ये बकोजी घाटोरा याणे आपला बाप तुकोजी या सवे दलवटणेयात कथला करून माणकोजी जामदार मौजे मजकुरी होता त्या जवल आपले बापास नेऊन बोलिला की घाटोरे दलवटणेयात राहातात आणि तुह्मी येऊन यासि न भेटता जाता येता वडीलकीचे पान घेता ह्मणौन हटकिले त्या वरी

वडीलपणाचे पान का घेतोस ऐसे. बोलिलो त्यास वाद सांगो लागला की मग माणकोजी जांमदार या जवळ उभा राहोन तुकोजीस आणाविले त्याणे हरदुजणाचा कथला ऐकोन त्याणे सांगितले की तुकोजीस पान घ्यावयास निसबत नाही घाटोरीयानी वडील-पणाचे पान घ्यावे ऐसे केलेयां उपरी पदाजी सावलकर याणे आपल्या पिढ्या सांगितल्या त्या लटक्या याचा आजा दादजी सावलकर वरकड धणगर येतात ते जातीने येऊ लागले त्या मागे सावलकराचे कोण्ही येत नव्हते सांप्रत वडीलपणाचे पान घेतात हे तकरीर सही

हरदुजणांचा वाद जाहाला पेंठ कोणां तागायत चालत्ये आणि दलवठणे-यात वस्ती कधी हें.........जातीचा करीणा बोलणे जाहाले त्या वरून त्याणे घाटोरीयास लटके केले आपले बापास सांगितलें कीं तू जैसी पेठ घेऊन येतोस तेसी येत जात जाणें त्या उपरी आपणां सवे कोण्ही कटकट केली नाही अगर दुसरा कोणी पेठेस आला नाही पहिल्या पासून चालत आलें आहे तैसे च चालवीत आहे सांप्रत हाली बाकोजी व मानाजी घाटोरा कथलियास उभा राहिला घाटा वरी दोन तीन स्थली मन-सुभीस उभा राहिला परंतु घांटोरा समजे ना हाली येथे आला आहे हे तकरीर सही

येणेप्रमाणे तकरीरा लिहून दिल्या त्या उपरी हरदुजणास गोताने पुसिले की घाटा वरून दोन तीन स्थलीहून फिरत आलेत या उपरी हे स्थलींची मनसुभी मानत असेल तर मांन्य–पत्रें लिहून देणें त्या उपरी हरदुजण स्थलास मान्य होऊन राजीनामे लिहून दिल्हे कीं चिपुलिणचे स्थली मनसुभी निवडेल त्या प्रमाणें राजी जो न ऐके कथला करील तो गोताचा व दिवाणचा अन्यांई ह्मणौन हरदुजणानी राजीनामे लिहून दिल्हे दुसरे दिवर्सी मनसुभीस गोत मिळाले मनसुभीस हरदुजण वादी उभे राहिले मनसुभी मुलें वृध वृध साक्ष मनास आणिली

तुकसेट कराडकर बेलकरी कसबे जोसी उपाध्ये धुमण वतनदार

मजकूर उमर वर्षे ७०।७५ हा बोलिला की बाकोजी घाटोरा व मानाजी घाटोरा याचा बाप पदाजी घाटोरा यासी सेटीनें वडीलकीचे पान दिल्हे इतके ठाउकें आहे परंतु भोगवटा का राहिला हे कळत नसे ह्मणौन बोलिला

याकुबजी जमाती व कानोजी डांग्या उमर वर्षे ६०।६५ हे बोलिले की सावळकर पेठ घेऊन येतात पान सावळकरांस दिवाण देतें ह्मणौन हरदुजण बोलिले

वीठसेट सेव्या बोलिला कीं आपण घटोरियाची गावडकी ऐसी ऐकिली आहे ह्मणौन बोलिला

अंताजी राव मोकासाई मौजे पेटाबे व रायाजी राव मोकासाई अडिरेकर व बाजे मोकासाइ बोलिले कीं घाटोरे ठावके नाही सावळकर पेठ घेऊन येतात हे ठावके आहे

यासी पुसिले ते बोलिले की हा दिवानगीचा विचार आपणास न कळे परंतु बाळाघाटी धणगर येतात त्याही आपल्या वडीलास धर्मादावपत्र दिल्हे होतें तें मनास आणून सांगों त्या वरून पत्रें आणिली तेथे मकसूदपत्र बनाम वो नरजोसी बिन रघुनाथ जोसी सुा इहिदे आबैन अलफ तेथे सिरसोजी व सुभानजी व राघोजी व कालोजी व समस्त धणगर शेकीन आंधळि व सिदी व बाजे मुकाम आइदे पेठ मजकूर लिहून दिल्हे की भट गोसावी प्रतिवर्सी बिराडास येऊन तिथी वार नक्षत्र सांगतात ह्मणौन कांबलियाच्या नगास ८३ ती रुका बुजरूक धर्मादाव करून दिल्हा त्या वरी निशानी

सिरसोजी	राघोजी
भानजी	कालोजी
लाहाजी	मालजी
दादजी	संभाजी
जावजी मगर	खंडोजी
बालजी गावडा	तुकोजी
खंडोजी इक	
रत्नोजी	
ह्मकोजी	

कुमाजी
मालजी मगर
बावाजी पिंगला
वीठ गांवडा
दलवठणेकर

येणे प्रमाणें गोही जाहाल्या त्याज वर सभासद गोत याही विचारिले की बाकोजी घाटोरा याणे तकरीर केली जे दादजी सावलकरा पासून सावलकर कोकणात दाहाजण धणगर येतात ते जातीने येतात ऐसियास सावलकर याचे वडिली कसबे मजकूरचे जोसियास धर्मादावपत्र करून दिल्हे आहे तेथे नावनिसी सिरसोजी आहे ऐशियासि पत्रे जे करून दिली ती वडीलपणा वेघले देवत नाही त्या वरून बाकोजी घाटोरा याची तकरीर लटकी जाहाली सावलकराचा भोगवटा चालत आहे व गोही हि आहेत त्या वरून सावलकर खरा दिसतो घाटोरियाचा भोगवटा नाहीं एक तुकसेट बैलकरी ह्मणतो की केशवसेट सेट्याही वडीलकीचे पान घाटोरियास दिल्हें ऐशियासि दलवठणेंया मध्यें धणगर नादत होते त्यांची गाउडिकी दिली कीं कसबेयाची पेठेची दिली हा सिधांत तुकसेट यासी न कळे जर कसबेयाचे पेठेची गाउडिकी वडीलपण दिल्हे असते तरी काही दिवस भोगवटा चालता तो हि नाहीं या उपरी माणकोजी जामदार ह्मणजे लस्करचा या जवळ घाटोरा उभा राहिला तरी कोसाचे अंतर माहाल असोन जामदारा जवळ उभे राहावे हा इनसाब नव्हे व देसक सेट्ये माहाजनं माहालीं होते तरी पेठेस येऊन कोणास हि भेटला नाहीं व हे वर्तमान हि दखल केले नाहीं या उपरी घांटोरा दलवठणेंया मध्यें नांदत होता परंतु कसबे मजकूरचे पेंठेचा भोगवटा नाहीं या वरून घाटोरा बातील ऐसें दिसोन येतें त्या उपरि घाटोरा बोलिला कीं आपणांस गोही साक्ष पत्र भोगवटा नाहीं ह्मणता तरी आपण दिव्य काडीन पांढर हात देईल तरी पेंठेची गाउड़की करीन खोटा जाहालों तरी वतना बाहेर

होईन ऐसे बोलोन गैरहाजीर जाहाला, त्या उपरि कांहीकां दिवसी राजश्री माहादाजी बलाल सभासद नामजाद सुभा मामले दाभोल यां जवल घाटोरा उभा राहिला त्या वरून मागती सुभां देसक व प्रहस्त व लस्करी लोक व पाटील मिरासदार ऐसे समस्त गोत मेलऊन श्रीदेवला नजीक मनसुभीस बैसविले हरदुजणाच्या तकरीरा मनास आणून गोही मोझ्ये पाहोन मागती सदरहू मनसुभी प्रमाणे निवाडा जाहाला व माणकोजी जामदाराने मनसुभी केली ते वेलेस गोही यमाजी सिंदा मौजे दलवठणेया मध्यें आहे ह्मणौन बोलिला त्या वरून तो आणून मोझ्या मनास आणिला त्यार्णे तकरीद केली की हरदू धणगर त्या जवल उभे राहून भांडत होते परंतु माणकोजी जामदार याने एक खंरा व एक खोटा ऐसा केला नाही ह्मणौन तकरीद केली त्याउपरि सभासद याहीं घांटोरियास सांगितलें जे तू वतनास लाभत नाहीं त्यां वरी घांटोरा बोलिला कीं आपण रवा काढीन या मुलें निवडेल त्या प्रमाणें वर्तणूक करीन हे वर्तमान राजश्री सुभेदारीं गोतमुखें चित्तास आणून विचार केला कीं हरदूजणा जवल पत्रें नाहीत अगर गोही नाही घांटोरा न समजे रवा काडीन ह्मणतो ऐशियासि रवा दिल्या वेघले दोघे समजत नाहीं त्या वरून घाटोरियाणे रवा काडावा दादजी सावलकर याणे सावली करावी ऐसा तह करुन छ १३ माहे शौवल रविवारी नजीक जुमांमसीद कसबे मजकूर येथे राजश्री माहादाजी बलाल सुभेदार व राजश्री बालाजी विश्वनाथ सभासद व राजश्री गणेश माहादेव हवलदार व कारकून ता। मजकूर व लोक हुजराती व लस्करी व पाटील व देसक व प्रहस्त गोत बैसोन घाटोरियास रवा दिल्हा बाकोजी घाटोरियाणे रवा काढिला दादजी सावलकर याणे सावली केली त्यासि बाकोजी घाटोरियासि रवा लागला आणि खोटा जाहाला ह्मणौन त्या पासून गुनेगारी व दादजी सावलकर खरा जाहाला म्हणौन या पासून हरकी दिवाणात घेऊन सुभे मजकुरी कमावीस

जमा केली सदरहूचे कौल दिवाणचे अलाहिदा असेत दादजी बिन तुकोजी सावलकर व बाजी बिन खंडोजी सावलकर याचे वतन याचे हवाला केले पुत्रपौत्री ता। मजकूरचे पेठेची गाउडकी वडीलपणा चालवावा जाहाला महजर संही

लेखांक ९] [१६२० फाल्गुन वद्य १०

श्री

नकल

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके २५ बहुधान्यसंवत्सरे फाल्गुन-बहुलदशमी गुरुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजाराम छत्रपती याणी राजश्री माहादाजी बलाल सभासद नामजाद सुभा दाभोल यांसी आज्ञा केली ऐसी जे स्वामी करनाटकास मसलतेस जाते समई लस्कराने

{मुद्रा नीलकंठ मोरेश्वर मुख्य प्रधान} {मुद्रा परशराम त्र्यंबक प्रति-निधि}

वतनाचे कितेक मुदे घातले त्या प्रमाणें त्याचे समजाविशी निमित्य वतनाचे कागद करून दिल्हे आहेत ये गोस्टीने एकाचे वतनास एक कथला करावयास उभा राहिला आहे ह्मणून कलो आले तरी चंदीच्या प्रसंगे व मसलतेच्या प्रसंगे समजाविसी निमित्य वतनाचे कागद ज्याणे जैसे मागितले त्यास तैसें दिल्हे काही प्रमाण नाहीं या करितां पूर्वील सनद पत्रा वतनाचेविसी घेऊन येईल अगर एकाच्या वतनास दुसरा कथला करील त्यास ताकीद करून कागदपत्रा निसी हुजूर पाठऊन देणे स्वामी राजश्री कोनेर पंडित न्यायाधीश यास आज्ञा करून बर-हक मनास आणून तुह्मास आज्ञापत्र सादर होईल त्या प्रमाणे वर्तणूक करणे तों वर नूतन वतने एकांदर कोण्हास न चालवणे कैलासवासी स्वामीचे वेळेस ज्याचे वतन चालिले असेल त्यास बिलाकुसूर चालवणे या कामास नाइक निढोका अफराद दिमत लबे यास मेचास लारी ६ रास आदा देविले असे देणे जाणिजे

शालिवाहन शके १६२० बहुधान्य संवछर सन तिसा तिसैन व अलफ या सालातील ताकीद[1]

लेखांक १०] [१६२५ वैशाख शुद्ध २

॥ राजश्री देसकानी व सेटियानि व माहाजन कसबा प्रभावली यासि दादाजी कान्हो सभासद नामजाद कसबे मजकूर सुा सलास मया अलफ संगया गोसावी मठ शीहांसन कसबे मजकूर येऊन विदित केले जे राजश्री रामचंद्र पंडित अमात्य याणी पड जमीन इनामत करोन मठास दिलीं व आपला हि अवकात चालावा व श्रीदेवास हि नेवेद चालावा ह्मणूनं चतुसीमा करोन पत्र दिले ते पत्र हाली तांब्राचे धामधुमी मधे ह्मालींची पत्रे होती ती हिं हरपलीं त्यास आपणांस भोगवटेयास पत्र पाहिजे राजेश्री पंत अमात्य याचे पत्र व देसचतुसीमेचे पत्र आहे तें मनास आणून आपणास चतुसीमा

श्री
दादाजी का
न्हो

करोन दिले पाहिजे बिा सनद राजश्री पंत आमात्य छ २५ रमजान सन तिसा तिसैन अलफ व चतुसीमाचा हि कागद देसकाचा ठिकाण रिंगेचे भाटी जमीन बिघे ८२ अर्ज २७ तुल ३० एकून ८१० वजा बद पाली १० बाकी ८०० एकून बिघे ८२ ह्या कागदचे सक छ १ सौवाल सुा सन तिसा तिसैन येणे प्रमाणे पत्र करोन दिले आहे संगोवा गोसावी कीर्दी करोनं देवास नवेदं वा आपले हित व काल चालवितील येणे प्रमाणे तुमी चालवीत जाणे खेरीज हकदार करोन दिले असे प्रतिवरुसे ताळीक लिहोन घेऊनं मुख्यपत्र संगया गोसाविया जवल देणे नूतन पत्राचा आक्षेप न करणे छ १ जिल्हेज

सिका
मराठी

---

१ या शेवटच्या दोन ओळी पत्राच्या पाठीवर मागाहून कोणी स्मरणार्थ लिहिल्या आहेत.

लेख क ११] [१६२७ फाल्गुन वद्य ८

श्री

नकल असलास रुजू केली

असे बंद ५

स्वस्ति श्री शके १६२७ पार्थिवनामसंवत्सरे फालगुनवद्यअष्टमी रविवासरे तदीनि वेदशास्त्रसंपन्न राजश्री कासी पाध्ये बिन अंतो पाध्ये व रुद्रो पाध्ये बिन पन्हो पाध्ये व देवो पाध्ये देशोपाध्ये धर्माधिकरणी व ज्योतिषी उपनाम गोळवलीकर वास्तव्य कसबे संगमेश्वर यांसि { सिका असे } गणोवानायक सरदेसाई मामले प्रभावली व मामले दाभोळ नमस्कार उपरि तुह्मी सारंगडच्या मुकामी विदित केले की आपली वृती धर्माधिकरण व ज्योतीष व देशोपाध्यपण मौजे देवघर प्रभावली विलायतीचे पासून गुढे विलायतीचे देवघर पावे तो पुरातन भोगवटा चालत आहे कसबे संगमेश्वरी धर्माधिकरण व दुसरीं वृत स्वामीचे घरी घटिका ग्रहपूजन व नूतन पंच्यांग पुरातन चालिले असता सांप्रति स्वामीचे घरी कसबे मजकुरी चिरंजीव बचीचे लग्न जाहाले राजश्री कृष्णाजी भास्कर याचे पुत्रास दिल्ही तेन्हा जोसी कसबेयां मध्ये आपणा मध्ये घटिके विशई कलह होऊ लागला तेन्हा राजश्री कृष्णाजीपंती उभयतास निराले ठेऊन स्वामीचे पुरोहित सप्रे यां करवी घटिका घालऊन लग्नंसिधी केली ऐसियासि स्वामीनी पूर्ववृत मनास आणून आह्मास काय आज्ञा ते करून कलह न होय ते करावे आह्मा जवळ प्राचीनपत्रे आहेत त्यांत प्राचीन रतीत सर्व लिहिली आहे परंतु प्रस्तुत ती पत्रे सिरसकर आमचे दायाद यां पासी राहिली आहेत ते देशांतरी आहेत पत्राचा प्रेत्न होतां घडेल तो खरा स्वामीने वृध्ध वृध्ध आहेत यांसि पुसोन जोसीयाचा आमचा कलह न व्हे ते करावे त्या वरून प्रस्तुत चिरंजीव दादोबा व अंतोबा यांची लग्ने बहिरवगर्डा जाहाली या प्रसंगी वेदमूर्ति सोमनाथभट कात्रे व रामभट हर्षे

व बाळकृष्णभट देव व पुतंभट सप्रे व वासुदेवभट सप्रे हे येथे आले व कसबेचे जोसी बाळजोसी सौदागर व सदासीव जोसी ये ही आले व केसो विठल कुलकर्णी मौजे धामापूर व तिमाजी कृष्ण कुलकर्णी मौजे मुचरी हे समस्त एकत्र बसोन उभयतांचा कलहमोचन कैसे करावे त्या वर सर्वांच्या व उभयताच्या विचारे जाहाले जे वेदमूर्ति विष्णुभट सप्रे आमचे पुरोहित अति वृध नवद वर्षांचे हे सत्यपूर्वक सांगतील तें उभयतानी मान्य करावे ऐसा नियत करून विष्णुभटांस पत्र लिहिले संगमेश्वरी आमचे घरी पुरातन घटिकाविशय कैसा आहे तो सत्यपूर्वक लिहोन पाठवणे त्या वरून विष्णुभटी करीना लिहोन पो जें संगमेश्वरी देशमुखाचे घरी गोलवलकर उपाध्ये घटिका घालीत असतां यो सोमोवानायक प्रथमस्त्रीचे कन्येचे लग्न संगमेश्वरी केले सौंदालकर देशमुखाचे घरी दिल्ही ते वेळेस प्रभावलीचे मामलेकर अनंत जोसी व गण जोसी मामलेचे हवलदाराचें पत्र सोमोवानायकांस घेऊन आले कीं तुह्मी मामलेचे सरदेसाई आणि अनंत जोसी व गण जोसी मामलेयाचे ज्योतिषी याचे तुह्मी आपले घरी ज्योतिष चालवणे त्या वरून सोमोवानायकीं मामलेकर जोसी यांस कसबे मजकुरी दुसरी घटिका दिल्ही त्या वरी मामलेकर जोसी दाहा पंधरा वर्षे कार्य प्रयोजी कसबे मजकुरी देशमुखाचे घरी दुसरी घटिका घालीत होते त्या वर सोमोवानायक विज्यापुरास गेले साडेतीन वर्षे होते तेव्हा वामन जोसी व अनंत जोसी नाइका बरोबर गेले त्यांणी नाइकाचे आर्जव बहुत च केले त्यांणी च्यार सहस्र लारी नायकांस रीण दिल्ह सोमोवानायक कृतकार्य होऊन प्रभावलीस आले मग कोणएक प्रसंगी मामलेकर जोसी या पासून नायकां जवळ अंतर पडिले त्या वर नायकाचे व जोसीयाचे वैमनश्य जाहले मग नायकी गण जोसी यांस रागे भरून सांगितले जे आमचें घरी तुजला पंच्यांग देखील वाचावयास प्रयोजन नाही मग तो विपादी बहुत च जाहाला त्या वर सोमोवा नायकीं आपले पुत्र विठलनाइक याची मुंजी संगमेश्वरी केली तेव्हा मामलेकर जोसी आला

नाहीं ते प्रसंगी वामन जोसी व अनंत जोसी यांणी सोमोबा-नायकांची प्रार्थना केली जे आपण तुमचेथे सर्वकाळ आहों स्वामींनी आपल्ये घरी ज्योतिषपणाचा मान आपणास द्यावा त्या वरी नायकी वामन जोसी व अनंत जोसी यास सांगितले जे मामलेचे जोसी दुसरी घटिका घालीत होते ते घटिका तुह्मी घालणे व गणपतीपूजन घेणे ऐसे नायकी सांगितले त्या पासून कसबेचे जोसी दुसरी घटिका घालितातीं पूर्वी त्या उभयतांचा कलह जाहाला नाही विठलनाइक याचे वेळेस मामलेकर जोसी याणे संगमेश्वरच्या देशमुखाचे घरचे घटके विशई उपाध्ये व जोसी यांसि पाच सात वर्षे कलह बहुत च केला कीं देशमुखाचे येथे आपली च घटिका ह्मणोन उपाध्ये व जोसी यासी प्रभावलीस नेविले होते मग विठल नायकी उपाध्येयासी मामलेकर जोसी याचा कथला च नाही ह्मणोन उपाध्यांस निरोप घरास जावयास देविला मामलेकर जोसी व कसबेकर जोसी या उभयतांची समजाविसी आपण करितो ह्मणोन दिवाणातून सोडऊन आणविले समजाविसी करीत होते परंतु दोघे समजत ना मग नायकी घटिका अमांनत केली मागती याचा कलह वारावा तो विठलनाइक शांत जाहाले येका वर्षानें मामलेकर गण जोसी हि शांत जाहले त्या वर तो कलह तैसा च राहिला पुढे मामलेकर जोसी संगमेश्वरास कार्यप्रयोजनास आले नाहीत त्या उपर केशव नायकी रंगोबा नायकांची मुंज व सोनाबाईचे लग्न संगमेश्वरच्या घरी केले आपाजी बलाल यासि दिल्ही आपण कन्यादान केले तेंव्हा उपाध्ये व जोसी या करवी दोन घ..............(टिका आणविलया ?) आलीकडे रंगोबा नायकीं आपले पुत्राचा + + + + + संगमेश्वरी केला त्या पासून कसबे संगमेश्वरी घटिकेचे प्रयोजन जाहाले तरी जोसी उपाध्ये दोन घटिका घालीत आहेत रंगोबानायकांची कन्या मनुबाईचे लग्न

१ तुमचे + एथे=तुमचेथे.

संगमेश्वरी जाहले राजश्री कृष्णाजी आपाजी नाफडे यांसी दिल्ही तेन्हा उपाध्ये जोसी यांणी दोन घटिका घातल्या जोसी यांणी उपक्रम केला होता कीं कालसाधना आपले घटिकेवरी करावी लग्नपूजा दोघास द्यावी ऐसे बोलत होतें मग कृष्णाबाई यांणी प्राचीन स्तीत सांगितली जे हा कालवंर संगमेश्वरी आपले घरी दोन घटिका चालिल्या पूर्वी उपाध्ये गोलवलकर व मामलेकर अनंत जोसी व गण जोसी घटिका घालीत होते विठलनायकां आलिकडे उपाध्ये गोलवल-कर व कसबे संगमेश्वरचे जोसी ऐसे दोन घटिका घालितात ऐसे सांगितले त्या वरून मनूच्या लग्नात दोन घटिका घातल्या खेडेगावीं देश-मुखानी काय केले तरी उपाध्ये गोलवलकर यांची येक च घटिका चालत आली आलाकडे बचीचे लग्न संगमेश्वरी जाले तेन्हा उपाध्ये व जोसी याचा प्रथम कलह जाला तेन्हा राजश्री कृष्णाजी भास्कर याणी उभयतास निराले ठेऊन सप्रे पुरोहित या करवी घटिका घालविली दादोबा व अंतोबा याच्या मुंजी कुल्यात जाहाल्या तेन्हा घटिका उपाध्येयाची च घातली या प्रो पुरातन स्थीत चालत आली आहे ह्मणोन विष्णु-भटीं करीणा लिहोन पाठविला व तिमाजी कृष्ण यांणी हि या चें प्रो सांगितले व पुतभट व वासुदेवभट सप्रे यांणी तीर्थरूपांचे मुंजी पासून या च प्रो करीणा सांगितला ऐसे आजीवर चालत आहे आले पूर्वी उभ-यतां मध्ये कलह जाहाला नाहीं बचीचे लग्न जाहाले तेन्हा मात्र कथला जाहाला ऐसियास पुढे कथला न-न्हावा व कलह तुटावा या निमित्य बाल जोसी सौदागर व सदासीव जोसी यासि ठेऊन घेतले त्यास बाल जोसी यांणी कथला निमित्य सदासीव जोसी यास ठेऊन आपण निरो-प घेऊन गेले विष्णुभटाचे पत्र यावयास विलंब लागला ह्मणोन सदा-सीव जोसी यांणी चऊ दिवसाचा नेम करून पत्र लेहून देऊन घरासि गेले त्यास व इतर जोसी यास दोन चार वेल लिहिले परंतु ते हजीर होत ना सदासीव जोसी विशालगडास गेले ऐसियास पूर्व वर्तमान मनास आणितां जोसियासि सदरहू घटिकेचा कलह तुह्मासी करावया-


सि संबंध नाहीं तुह्मी पुरातन कसबे मजकुरी आमचे घरी घटिका घा-ळीत आले आहां हां सर्वांचे मते आहे. याप्रो तुह्मी कसबे मजकुरी आमचे घरी घटिका व ग्रहपूजन व नूतन पंच्यांग चालवितां त्या प्रो चालवणे ये विसी हे पत्र तुह्मास दिल्हे असे जाणिजे तुह्मी ये विसी चित उद्विग्न न करणे. मोर्तब आहे


दस्तुर सोमाजी नरसी करकरे

लेखांक १२] [१६२९ चैत्र वद्य ६

श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेकशके १३ सर्वजित्संवत्सरे चैत्रबहुलशष्टी मंद-वासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिवछत्रपति यांणी राजश्री गणावा-





नाईक सरदेसाई मामले दाभोल व प्रभावली यासि आज्ञा केली ऐसी जे मुख्य तांम्र निधन पावल्या वरी शा उदितसिंग यांणी स्वदेशास जावयाचा विचार केला ते प्रसंगी शामलाने विशालगड आपले स्वाधीन करणें ह्मणून राजकारण लाविलें हें तुह्मास कळलिया वरी तुह्मी आपले मुतालीक कृष्णाजी भास्कर यास लेहोन उदितसिंगास उपदेश करऊन ते गोष्टी राहाविली आणि त्यास आपला नायब तेथें ठेऊन किला कृष्णाजी भास्कर यांचे स्वाधीन करून जावें ये गोष्टीचें दृढीकरण राजश्री कृष्णाजी परशराम यांस सांगोन केलें ह्मणून मारनिलेनी लिहिलें व तुह्मा कडील गोपाल अनंत व उदितसिंगा कडील प्रचीतराऊ हुजूर आले व कृष्णाजी परशराम यांणी बालाजी लिंगोजीस पाठविलें त्याणी विनती केली त्या वरून हि कळों आलें ऐसियास तुह्मी स्वामीचे एक-निष्ठ सेवक पहिले पासून निष्ठने सेवा करीत आले आहा तुह्मा पासून

होता तो हस्तगत करून दिल्हा व वरकड माहालोमाहालीचे वतनदारांही दुतर्फा सुरलीतपणे वर्तणूक केली या करितां या वरि कृपाळु होउनु हकाची तिजाई माफ करून दिली आहे तरी तुमचे निसबतीने माहाल आहेत तेथील तिजाईचा उसूल न घेणे सालोसाल तिजाई माफ सुरलीत चालवणें जाणिजे रा छ ९ सफर जाणिजे

राजते
लेखना
वधी

बार

लेखांक १४] [१६२९ वैशाख शुद्ध ११

श्री आईआदिपुरुष

श्रिया सह चिरंजीव राजमान्य राजश्री आपास परसराम त्र्यंबक अनेक आसीरवाद उपरि येथील कुषल जाणून स्वकीय लिहिणे विशेष रा गणोबानाईक सरदेसाई मामले प्रभावली व मामले दाभोल यासी व सरदेशकुळकर्णी मामले प्रभावली व सरदेशमुख ता खिलणा याणी व वरकड वतनदार देसक मामले प्रभावली याणी कस्ट मशाखत करून मोगला कडे विशाळगड असता निष्टेस अंतर केले नाही उदितसिंग तांब्राचे निसबतीने विशाळगडा वरी होता त्याज पासून किला आपले स्वाधीन करून घेऊन राजश्री स्वामीचा किला स्वामीस नजर केला निष्टेस अंतर केले नाहीं या करिता यास हकाची तिजाई माफ केली असे तुह्मी तिजाईचा तगादा न देणे जाणिजे छ ९ सफर जाणिजे लोभ असो देणे हा आशीर्वाद[1]

---

1 येथून शेवटपर्यंत व प्रारंभीची ' श्री आई आदिपुरुष ' हीं अक्षरें खुद्द परशराम त्र्यंबक याचीं आहेत.

स्वामिकार्यास अंतर होऊं पाहाते कीं काय शामलाचा पराश्रम स्थलावरी होऊं न दिल्हा उदितसिंगाने नायब टेऊन किला कृष्णाजी भास्कर याचे स्वाधीन करावासा करारदाद केला हें अति उत्तम केलें तुह्मा कडील कृष्णाजी भास्कर ते जागां आहेत तें बरे शाहाणे माणूस आहे तरी च हा प्रसंग होऊन आला ये गोष्टी वरून स्वामी संतोषी होऊन त्यास अभयपूर्वक समाधानपत्र व वरकड वतनदारास अभयपत्रें सादर केली आहेत उदितसिंग यास हि समाधानपत्र पाठविलें आहे तरी तुम्हीं जाल्या निर्वाहप्रमाणें विचार घेऊन त्याचे जाणे होय कार्य सिधीस पावे तुमचे सेवेचा मुजरा होय ऐसी गोष्टी करणें स्वामीस तुमचे चालवणें अगत्य आहे त्यास राजश्री परशराम पंडित प्रतिनिधी त्या प्रांते पाठविले आहेत तुम्ही त्यांचे आज्ञे प्रो स्वामीसेवा करणें ते तुमच्यां ऊर्जिताचा निश्चय करून हुजूर लिहितील तदनुसार स्वामी तुमचे ऊर्जित करून चालवितील ये विसीं समाधान असों देणें जाणिजे लेखनालंकार

मर्या
देयं विरा
जते

रुजु सुरु-
निवीस

सुरु सूद बार

लेखांक १३] [१६२९ वैशाख शुद्ध ११

श्री

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य
राजश्री धोंडो भास्कर गोसावियांसि

सेवक परशराम त्र्यंबक प्रतिनिधी नमस्कार सुहूरसन सबा मया व अलफ राजश्री गणोजानायक सरदेशाई व देशकुलकर्णी मामले प्रभावली यांणी स्वामीच्या पायांसीं एकनिष्ठता धरून विशालगड तांब्रास

---

१ येथून अक्षराचें वळण निराळें आहे.

लेखांक १५] [१६२९ वैशाख शुद्ध ११

श्री

राजश्रियाविराजित राजश्री गणोबा-
नाइक सरदेसाई मामले प्रभावली
व मामले दाभोल गोसावियासि

सेवक परशराम त्र्यंबक प्रतिनिधी नमस्कार सुहुर सन सबा मयां व अ-लफ विषालगड तांब्राने हस्तगत केला होता ते समई तुह्मी व सरदेश-कुलकर्णी मामले प्रभावली व सरदेशमुख ता। खीलणा याणी व प्रभा-वली मामलियाच्या देसकानी एकनिष्टपणे सेवा केली किला तांब्राकडे होता तो आपले स्वाधीन करून घेऊन राजश्री स्वामीचा किला स्वामीस नजर केला या करिता तुह्मा वरी कृपालु होऊन तुह्मास व सरदेशकुलकर्णी मामले प्रभावली यांस व सरदेशमुख ता। खीलणा यास व घरकड प्रभावली मामलियाच्या देसकास हकाची तिजाई सालोसाल माफ केली असे तरी तुह्मास तिजाईचा तगादा लागणार नाही छ ९ सफर बहुत काय लिहिणे

राजते
लेखना
वधी

सुरु सूद बार

लेखांक १६] [१६२९ वैशाख शुद्ध १२

श्रीशंकर

राजश्री चिमणाजी बलाल देशाधिकारी व लेखक वर्तमान
व भावी सुभा प्रांत मलकापूर गोसावियांसि

अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य श्री परशराम त्र्यंबक प्रतिनिधी आशीर्वाद नमस्कार सुहुरसन सबा मयां अलफ राजश्री गणोबानायक सरदेशाई मामले प्रभावळी यांणी विनंति केली आपण

स्वामीचे पायासी निष्ठा धरून किले विषालगड तांब्रा खाले होता त्यास राजश्री उदितसिंग किलेदार होते त्यासी राजकारण करून स्वामीस किला हस्तगत करून दिल्हा त्यास स्वामीनी कृपालु होउनु वतनाचा जीर्णोद्धार करून घ्यावा ऐसे केले ऐसेयांसी प्रभावली मामलेया खालील मलकापूर माहाल तेथील सरदेशमुखी आपले वतन अदलशाही कारकीर्दीस चालले या राज्या पासून वरघाट सुभा अलाहिदा कमाविषी मुले आपला भोगवटा चालता राहिला देशकुलकर्णी मामलेयाचे माहालचे कुळकर्ण चालवीत आहेत सरदेशमुखी वतन चालत नाही तरी स्वामीनी कृपालु होउनु करार करून चालविले पाहिजे ह्मणून त्या वरून मनास आणून पुरातन मलकापूरचे गाऊ प्रभानवली मामल्या खाले वोढले असतील तेथील सरदेशमुखी वतन याचे यास करार करून दिल्हे असे तरी तुह्मी याचे वतन याचें दुमाले करून सरदेशमुखीचे कार्यभागास मुतालीक ठेवितील त्या पासून सेवा घेउनु हक व लावाजिमा बर निा मामल्या प्रमाणे चालवीत जाणें सदरहू प्रमाणे यास व याच पुत्रपौत्रादिवंशपरंपरेने वतन सरदेशमुखी चालवणे या पत्राची प्रती लेहून घेउनु मुख्यपत्र परतून भोगवटियांस मारनिले जवळी देणें छ १० सफर पाा हुजूर

राजते
लेखना
वधी

श्री आई
आदिपुरुष श्री
राजा शिवछत्रपति
स्वामि कृपानिधी त
स्य परशुराम त्र्यंब
क प्रतिनिधि

बार सुरु सूद बार

पौ छ १५ सफर

लेखांक १७]

(प्रारंभीच्या कांहीं ओळी फाटल्या आहेत.)

(सिका फाटका)

सरदेसाई मामले प्रभावली यांसि आज्ञा ऐसी जे तुह्मी विनंतिपत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लिहि + + + विदित जाहालें आपण स्वामीचे पायांसी एकनिष्ठ + + + णूक करितों याकरितां रांगणियाहून आपले अनी.... बहुता प्रकारें केले तेव्हा (?) करून श्रमी जालों आहों प्रस्तुत विशालगडी आहों राजश्री कृष्णाजीपंत स्वामीचे दर्शनास येतील त्या समागमें दर्शनास येतो आपुले सर्व विशी गोमटे करून चालविले पाहिजे ह्मणोन लिहिलें तरी तुह्मी स्वामीचे पायासी निष्ठा धरून वर्तणूक करिता ये गोष्टीने स्वामीस तुमचे ....विशी चालवणें अवशक आहे तुह्मी आपले समाधान असो देणे तुमचे वेतन स्वामी चालवितील आणि गोमटे करितील राजश्री कृष्णाजी परशराम स्वामीचे दर्शनास येतील त्या समागमे तुह्मी स्वामीचे दर्शनास येणें आणि ऊर्जित करून घेणें तुमचे वतनाचा हक लाजीमा इनाम चालत असेल तेणे प्रमाणें स्वामीने हि करार केले असें आपले समाधान असो देणें जाणिजे निदेश समक्ष

मर्या
देयं रा
जते

सुरु सूद बार

लेखांक १८] [१६२९ कार्तीक वद्य १२

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेकशके ३४ सर्वजित्‌संवत्सरे कार्तिकबहुलद्वादसी इंदुवासरें क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिवछत्रपति याणी समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री कृष्णाजी परशराम

१ येथून अक्षर निराळ्या वळणाचें.

यासि आज्ञा केली ऐसी जे राजश्री गणोवा नाइक सरदेसाई व कृष्णाजी भास्कर यास हुजूर दर्शनास यावयाची आज्ञा केली आहे तरी तुह्मी उभयतास निरोप देऊन हुजूर स्वामीच्या दर्शनास पाठऊन देणे बहुत लिहिणे सुज्ञ असा

मर्या
देयं विरा
जते

बार

लेखांक १९] [१६२९ कार्तिक वद्य १२

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३४ सर्वजित्‌संवत्सरे कार्तीकबहुलद्वादसी इंदुवासरे क्षत्रियकुळावतंस श्री राजा शिवछत्रपति याणी राजश्री गणोवानाइक सरदेसाई मामले दाभोळ व प्रभावळी यासि आज्ञा केली

श्री शि
व नरपति
हर्षनिदान मो
रेश्वर सुत नील
कंठ प्रधान

श्री आई आ
दिपुरुष श्री राजा
शिवछत्रपती स्वामि
कृपानिधि ॥ तस्य प
रशुराम त्र्यंबक
प्रातिनिधि

ऐसी जे विनंतीपत्र पाठविले ते प्रविष्ट जाहाले आपण स्वामीच्या पायांसी एकनिष्टेने वर्तणूक करीत असतां आपला गैरवाका विदित करणार करितात तेणे करून स्वामीचा बद निशा होऊन नस्ती तुफाने आपणा वरी उठतात राजश्री शाहूराजे यांकडील कागदपत्र माणूस आपणा कडे आले नाही जरी हे गोष्ट आपणा कडे शाबीत जाहाली तरी स्वामीनें शासन करितील त्यास मान्य आहो आज्ञा जाहालिया सेवेसी येऊन ह्मणून हे वर्तमान कितेक तपसिले भावभगती निष्टेने लिहिले तें विदित जाले ऐशास तुह्मी वतनदार एकनिष्ट आहा हे यथार्थ च आहे तुह्मी एकनिष्टेने वर्तणूक करीत असता नस्तें तुफान तुह्मा वरी कोण ठेऊ पाहातो दर्शनास यावयाची गोष्ट

लिहिली तरी या पेक्षा उतम तें काय आहे तुह्मीं व कृष्णाजी भास्कर ऐसे हुजूर दर्शनास येणे ये विशीं राजश्री कृष्णाजी परशराम यांस हि आज्ञापत्र सादर केले आहे ते देणे आणि तुह्मी व कृष्णाजी भास्कर ऐसे हुजूर येणे लेखनावधी

मर्या
देयं विरा
जते

रुजु सुरु

निवीस सुरु सुद बार

लेखांक २०] [१६२९ फाल्गुन वद्य ७

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेकशक ३४ सर्वजित्संवत्सरे फालगुन-बहुल-सप्तमीं भौमवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शाहुछत्रपति स्वामी

श्री
शिवनरपति ह
र्षनिधान मोरेश्वर
सुत भैरव मुख्य
प्रधान

राजश्री गणोवानाईक सरदेसाई मामले प्रभावली यासि आज्ञा केली ऐसी जे तुह्मी विनतिपत्र पाठविले प्रविष्ट होऊन लिहिले वर्तमान आपले एकनिष्ठेचे ते विदित जाहाले व तुमचे विशी राजश्री कृष्णाजी परशराम याणीं स्वामीचे सेवेसी लिहिले त्या वरून स्वामीने तुह्मास अभयपुरसर हे आज्ञापत्र सादर केले असे तरी तुह्मी स्वामीचे दर्शनास येणें तुह्मी स्वामीचे राज्यातील वतनदार आहा तुमचे हाते प्रयोजन घेऊन स्वामी सर्वविशी चालवितील गोमटे करितील आपले समाधान असो देणे जाणिजे निदेश[1] समक्ष

मर्या
देयं रा
जते

सुरु सुद बार

---

1 येथून अक्षराचें वळण निराळें आहे.

लेखांक २१] [१६३० कार्तीक वद्य ६

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेकशके ३५ सर्व–धारीसंवत्सरे कार्तीक-बहुलशष्टी मंदवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहुछत्रपती स्वामी याणि राजश्री गणाबा नाईक सरदेसाई मामले प्रभावली यांस आज्ञा केली ऐसी जे राजश्री तिमाजी वेंक-टेस सभासद सेवक रा याचे लग्ना-निमित्य रुपये अडी-चसें संगमेश्वर तर्फ पैकी देविले आहेत

श्री॰
शाहु नर
पति हर्ष नि
धान मोरेश्व
र सुत भैरव मु
ख्य प्रधान

श्री शंकर श्री
शाहु छत्रपती
कृपानिधी प्रल्हा
दसुत गदाधर
प्रतिनिधी

सनद आलाहिदा संताजी दामोदर याचे नावे सादर आहे ऐशास याचे चालवणे स्वामीस अवशक आहे हें जाणून सदर ऐनज सनद प्रमाणे + + + + + + + + + + + + न करणे जाणिजे

मर्या
देयं विरा
जते

रा छ २१ साबान सुरु सूद

लेखांक २२] [१६३२ भाद्रपद वद्य ३०

श्री

तालीक

राजश्री नामाजी गाइकवाड हवलदार व कारकून जंजिरे रत्नांगिरी यांसि

ऽ। अखंडितलक्ष्मिअलंकृतराजमान्य श्री गदाधर प्रल्हाद प्रतिनिधी आसीर्वाद व आंनुक्रमें नमस्कार सुांा इहिदे आशर मयां व आलफ बाग निवे खाले कर्यात नेवरें हा बाग राजश्री गणोवा-

नायक सरदेसाई मामले प्रभावली व दाभोल यांस इंनाम करुंन दिल्हा ये विसीं पेशजीं तुह्मांस राजपत्रें सादर आहेत तेणें प्रो मारनिल्हे कडे इनाम चालवणे त्यास तुह्मीं यांस ह्मणतां की आपणास मुबदला ऐवज आणूंन द्या ह्मणोन यांसि कटकट करितां ऐसें हुजूर विदित केलें तरी हुजुरून राजश्री स्वामीचें आज्ञापत्र सादर आहे त्या प्रो बिलाकुसूर मारनिल्हे कडे इनाम चालवणे ये विसीं फिरोन बोभाट येऊं न देणें जाणिजे छ २८ रजब पो हुजूर

लेखांक २३] [१६३२ भाद्रपद वद्य ३०

श्री

श्री शंकर श्री
शाहु छत्रपती
कृपानिधी प्रल्हा
दसुत गदाधर
प्रतिनिधी

आज्ञापत्र राजश्री पंतप्रतिनिधी ताा कमावीसदार मौजे बुरबाड ताा संगमेस्वर सुहुरसंन इहिदे अशर मयां व अलफ मौजे मजकुरी इनाम लारी

श्रीदेव नरसीह.... मांहाल्गे	वेदमूर्ति शांभट सफरे
५०	१००

येणें प्रा दीडसें लारीची वृती पेसजी पासून आहे त्यास तुह्मी कथला करून चालवीत नाही ह्मणोंन कळो आले तर या उपरी हे आज्ञापत्र सादर केले असे तरी सदरहू वृती पेसजी पासून चालत आली आहे त्या प्रो चालवीत जाणे गै केली ह्मणजे ताकीद होईल जाणिजे छ २८ रजब पाा हुजूर

राजते
लेखना
वधी

बार

लेखांक २४] [१६३६ आषाढ वद्य २

श्री

॥ॐ

मा लोकानी किले विशालगड यासि बावाजी भाडवलकर हवालदार व कारकून किले मजकूर सुहुरसन खमस अशर मया अलफ मुसलखेरे का। प्रभावली येथे तुह्मी सेते केली आहेत त्यास देसमुख राजश्री गणोवानाइक सरदेसाई सुभा प्रांत राजापूर यासि हक दर बिघा गला दसेरी ·८८१ येक पाइली करून दिल्हे कदीम घेरा रोखे खेरीज कोकण तर्फेस लोक सेते कारितील त्यास हक नेमून दिले आहे त्या प्रमाणे देत जाणे छ १५ रजब मोर्तब सूद

(मुद्रा: श्री राजा शाहु चरणी तत्पर बावाजी भाडवलकर)

(मुद्रा: लेखन सीमा)

लेखांक २५] [१६४० मार्गशीर्ष शुद्ध २

श्री

राजश्री विठोजी सिर्के गोसावियासि

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री जोत्याजी केशरकर आ। सरदेशमुख रामराम विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत गेले पाहिजे विशेष सरदेशमुखीचे वतन राजश्री स्वामीचे चालत आलें आहे तेणे प्रो हाली पातशाहानी स्वामीचे स्वामीस बाहाल केलें आहे ऐशास मामले प्रभावली व मामले दाभोल येथील सरदेशमुखीचे वतन रा। गणोवानाईक व विसोबानाईक याचे पुरातन वंशपरंपरेने अनभवीत आले आहेत तैसे स्वामीनी याचे यास करार करून दिल्हे आहे आणि कोकणप्रांते राजश्री स्वामीचे वतनाची कमावीस असली पाहिजे या बदल प्रभावली व दाभोल या दोन्ही

मामलियात खासा राजश्री स्वामीचे वतन सरदेशमुखीचे नूतन राजश्री स्वामीनी मोकरर करून या वतनास हक रयत निा पंचोत्रा

स्वस्ति श्रीसुखदा मुद्रा प्रतापोत्कर्ष वर्द्धिनी ॥ सरदेश मुखस्यैषा शाहु··· राजस्य राजते

मोईन केली आहे व गणोवानाईक व विसोवा-नाईक सरदेशमुख मामले मार यास कदीम हक लाजिमा इनामत असेल ते चालवायाची आज्ञा राजश्री स्वामीनी केली आहे तरी तुह्मी मामले प्रभावली येथील सरदेशमुखीचे वतन पूर्वी पासून याचे चालल्या प्रो चालविले पाहिजे ये विसी राजश्री स्वामीचे आज्ञापत्र सादर आहे तेणे प्रो याचे वतन यास चालविले पाहिजे छ १ मोहरम हे[1] विनंति

लेख नावधि

लेखांक २९] **[१६४२ आश्विन वद्य १२**

नकल हु

अज सुभा मुकाम किले अंजणवेल मामले मैमून मुस्तफाबाद उर्फ दाभोल + + ले मुजाफराबाद उर्फ प्रभावली देशमुखानी व मुकादमानी व देशपांडे यानी व बाजे वतनदारानी व खोतानी व रयानी माहालानिहाय सुभा दाभोल सुहुर सन इहिदे अशरीन मयां व अलफ दादोवानायक बिन रंगोवानायक सरदेसाई सुबैन मजकूर यांही सुभा मुकाम मजंरी इलतमास केली कीं आपलें सरदेशमुखीचे वतन कदीम पुस्त दर पुस्त सुबैन मजकूरचें चालत आले असे दरम्याने धामधुमीचे सबबे करितां सरकारतर्फेस रुजुवातीस मवाफीक आले नव्हतें सबब केसो

---

१ 'हे विनंति' हीं अक्षरें निराळ्या वळणाचीं आहेत. असें च एक पत्र 'दताजी आगरे' याच्या नांवचें आहे. शिवाय राजशक ४५ मार्गशीर्ष शु. २ चें शाहूचें आज्ञापत्र आहे.

कृष्ण गुमस्ते मामले दाभोळ यासि सन खमस अशरमध्यें वतनी पादशाई फरामीन व बाजे कागद देऊन हुजूर जंजिरे दंडाराजपुरीस रवाना केले होतें ते वख्ती त्याणी हुजूर जंजिरा जाऊन वतनी कागद दखल केले त्या वरून हुजुरून खातरीस आणून मेहरबान होऊन केसो कृष्ण मुतालीक यांसि वतन चालवावयासि खुर्दखत मराहमत केलें असें त्या वर ते सुबेन मजकुरी वतनाचे चाकरी वर होते त्या वर आपण हि साल गुदस्तां हुजूर जंजिरे दंडाराजपुरीस जाऊन रुजू होऊन अर्ज केला की वतनाची खिजमती चालवावयासि हाली उमेदवार असों तरी आपले व आपले भाई याचे नावें खुर्दखत देणार साहेब धणी आहेत म्हणोन अर्ज केला त्या वरून हुजरून मेहरबान होऊन सन अशरीनमध्यें मरामत केलें असे त्या मध्यें कदीम हक लवाजिमा इनामत व इसाफत सुदामत चालिलें असेल तें बमोजीब सुभाहून ताकीद फर्माऊन देविली पाहिजे म्हणोन इलतमास केला ऐसियास सरदेसाई मशारुनइलें या वर मेहरबान होऊन हुजुरून खुर्दखत छ २९ जमादिलाखर सन अशरीन मरहमत केलें असें तथें हुंकूम जे सरदेशाई मजकूर हुजूर येऊन खुर्दखतबाबे अर्ज केला त्या वरून खातरेस आणितां सन सीत अशरमध्यें सरदेशाई मार याचें नायब केसो कृष्ण हुजूर येऊन रुजू होऊन वतनाचें खुर्दखता बाबे अर्ज केला त्या वरून छ ११ जिल्हेजी मेहरबान होऊन खुर्दखत करून दिल्हें असें कीं सुबे मजकूरचे सरदेशमुखीचे वतनाची मुतालकी याची कदीम असे सबब याचे दुमालां केली असें याचे हातून वतनाची खिजमत सुदामदबमोजीब पिढी दर पिढी चेत जाणें ऐसे सादर असे हाली खुद दादोबानायक सरदेशाई सन मजकुरी हुजूर येऊन रुजू जाहाले आणि वतनाचें खुर्दखतबाबे अर्ज केला त्या वरून हुजरून या वर मेहेरबान होऊन खुर्दखत मरा[1]हत केलें असे सुबे मजकूरची सरदेशमुखी याची कदीम असे सबब वतन चालवावया फरमाविलें असे तरी खुद नायक मशारइले व यांचे बडेभाई गणोबानायक

---

१ येथें प्रथम 'मराहमत' असें लिहून मधला 'म' खोडून टाकला आहे.

वल्द रंगोबानायक व त्याचा बेटा प्रल्हादनायक व दुसरे भाई विसोवा नायक व नने भाई अंतोवानायक याचें हातून वतनाची खिजमत पिढी दर पिढी सुदामतमोजीब घेत जाणें व याचे वतनाचा हक लवाजिमा व इनामत व इसाफत सुदामत चालिली असेल ते मोजीब चालवणें दर साल ताजे सनदेचा उजूर न धरणें नकल घेऊन असल फिराऊन देणें ह्मणऊन हुजूरचें खुर्दखतात हुकूंम सादर असे ऐसियास खातरेस आणितां सुदामत सरदेशाई मशारइलेयाचा कदीम हक लवाजिमा चालिला आहे त्या मोजीब हाली हि देवावा दुरुस च असे अंमा अवल मुलकाची आबादी होती तेव्हां मवाफीक च पडत होतें फीलहाल चहूंकडील कसालेया मुळें मुलूक वैरान असे जुजवी बसाहत असे ते रयत कसालेया मुळें नाबर पडिली असे मामुळे सुदामतमोजीब हक लवाजिमा ध्यावयासी मवाफीक पडणार नाही या बदल सरदेशाई मशरुनइलेयासी फर्माविलें कीं पेस्तर मुलकाची उस्तवारी जाहालेया वर तुमचा हक लवाजिमा सुदामत चालिला असेल त्या मोजीब घेणे व रयत हि देईल फीलहाल रयतेचे नादानी करितां करार करून फरमाविलें असें तरी येणे प्रमाणें हक लवाजिमा देत जाणे बि॥

हाली जमाबंदी केली ऐन जिनसी असेल त्यास दर जिनसास दरखंडीस च्यार आणे रुपये ।·

नक्त बाब ऐन नक्त देखील घरपटी व वाण हैसी व वज जीव सुमारी जिनसास किमतीस दर रुपयास नीम आणा ८॥·

गौलीयाचे हैसीस सालीना दर हैसीस तूप कचे

ताजीस दर	पाडसीस दर
८८१॥	८८॥·
दीड सेर	अदसेर

लोण्याचे दर बे- मिठाचे व भु-

तेलियाचे खुटास सालीना तेल वजन कचें अडीच सेर ८८२॥·

चांबाराचे दुकानास सालीना

पायपोसकरी-	वाहणाची जुती
याचे दुकाना-	करितात त्यास
स पायपोस	दर दुकानास

वैलास रुके साहा	दर वैली रुके साहा ८६
८६	
पानाचे दर वैलास रुके तीन ८३	डोईचे ओझे व खांदाडीस दीड रुका ८१॥·
कैली वजनी जिनसास व कापड विकतील त्याचे किमतीस दर रुपयास नीम आणा ८॥·	बंदर तरांडेयाची वगैरे जकात आकारेल त्यास दर रुपयास नीम आणा ८॥·

आठवडियाचा बाजार भरेल त्यास दर बाजारास

वाणियाचे दुकानास पाऊण आणा ८॥·	कापडकरी याचे दुकानास दीड रुका ८१॥·
मासलीकरीयाचे दुकानास दीड रुका ८१॥·	सरेकरीयाचे दुकानास दीड रुका ८१॥·
बाजे खुम मोहोतर्फा कुळांस दर दुकानास दीड रुका८१॥.	सराफ दुकानास दीड रुका ८१॥.
	पानाचे मोटेस दर एकसें पानें १००
वजनी जिनसास दर मणे पावसेर ८८।	नारळ दर सदे सुमार एक १

जोडे २	जुतीं जोडे २

रयत निसबतीनें वराडें होतील त्यास दर वराडास

नारळ	पानें सुपारी
१	५० ८८८९

बारीक मीठ पिकेल त्यास पिकास कैली दर खंडीस मीठ कैली अदमण ८॥·

दर गांवास सालिना

जव एक १	शाकभाजीचें ओझें एक १

इरलें एक १

राबता ह्मार चरती एक १	कोंबडें एक १
	रानटी भारे दोन २

कोळी व दाळदी व खारवे व भोई याचे दर होडीस १ मासा एक

कुंभारांचे आव्यास दर मडकें एक १

बुरुडाचे दुकानास सालीना दागिने च्यार ४

खुर्द २	बुदरुख २

साळी कोष्टी याचे मागास सालीना सूत चिवट १

गला कैलीस फ-
सकी गला कैली
गोणीस मोटेस
सवासेर निटवे
८८॥÷

खाटकीयाचे दु-
कानास दर दु-
कानास मास व-
जन सवासेर
८८= ८८१.

धणगर सणगर याचे ह्म····रास
सालीना दर मागास कांबले एक १
नारलाचे बैलास तीन रुके ८३
सणगर व धणगर कांबली प्रोक्त
करील त्यास दर बाधेस साहा रुके
८६

घोडें व उंट प्रो होतील त्यास किम-
तीस दर सदे रुपया एक १

दतपुत्र घेईल त्यास सला एक १

सेळी व मेंढी याचे कळपास
दर सदे बकरें एक १

नारल व सुपारीचे आगरास सा-
लीना

आगरास सिपु-
ट एक १

नागराचे आग-
रास नारल ओले
२

बंदी व गुलाम प्रो होईल त्यास
दर सणगास नीम रुपया ·॥·

सिंगोटी गाई ढोर व ह्मैस ढोर
दर सरास च्यार आणें रुपये ·।·

खंड गुन्हेगारी होईल त्यास दर
सदे पाच रुपये ५

पारध सिकारी सावजास सिसाल
एक १

येणेप्रमाणें हक लवाजिमा फीलहाल करार करून दिल्हें आहे तरी सदरहू मोजीब सरदेशाई मशारुनइलेयास देत जाणें पेस्तर मुलकाची आबादी जाहालेया वर सुदामद कदीम हक लवाजिमा चालिला असेल त्या प्रमाणे घेत जातील व तुह्मीं हि सुदामद मोजीब-देत जाणें दर साल ताजे सनदेचा उजूर न करणें नकल घेऊन असल सरदेसाई मशारइले या नजीक देणें ताकीद समजणें छ २५ जिल्हेज सन २ जुलूस मुताबिक सन ११३३ हिजरी

हा जुलूस ' महमदशाहाचा ' आहे, हा शहाअलमचा नातू. याम च बाळाजी विश्वनाथाच्या मदतीनें सय्यदांनीं दिल्लीच्या तक्तावर बसविला.

लेखांक २७] [१६४३

श्रीआईआदिपुरुष

श्रिया सह चिरंजीव राजमान्य राजश्री श्रीनिवासराऊ यास प्रति कृष्णाजी परशराम आसीर्वाद उपर येथील कुशल जाणून आपले कुशललेखन केले पाहिजे या नंतर राजश्री अंतावानाईक सरदेसाई आपल्या दर्शनास आले आहेत पूर्वी पासून हे आपले पदरचे याची स्थापना सर्वप्रकारे आपले वतन ऐसे मानून तीर्थस्वरूप राजश्री बावाही केली आहे त्या प्रमाणे सर्वविर्सी याचा अभिमान धरून आपण स्थापना केली पाहिजे हे आह्मा पासी आहेत ते आपणा जवली च आहे ऐसे चितांत धरून दया केली पाहिजे च्यार राजें जाहाली आहेत यास आधार आपल्या विरहित दुसरियाचा नाही थोर वतनदार ब्राह्मण ह्मणऊन तार्थस्वरूपी आपले पुत्र ह्मणऊन चालविले आहे त्याचे वादी तुह्मी आहा याचा अभिमान धरून चालणार आपण सर्वज्ञ आहेत याचे विसी चिरंजीव आपणास विनती करितील तदनरुप याचे आहे कृपा केली पाहिजे बहुत काय लिहिणे हे आसीर्वाद

लेखांक २८] [१६४६ चैत्र वद्य ८

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेकशके ५० क्रोधीनामसंवछरे चैत्रबहुलअष्टमी भानुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शंभुछत्रपती स्वामी यांणी

} राजश्री गणोवानाईक व विसोवानाईक व
} दादोवानाईक व अंतोवानाईक गोत्र

कौशीक सरदेसाई मामले प्रभानवली व मामले दाभोल यांसि दिली वतनपत्र ऐसे जे तुह्मी पूर्वी स्वामीसंनिध आपल्या वतना विशई विनंति केली होती व हाली तुमचे पुत्र प्रल्हादनाईक व केशवनाईक व शाम-

---

१ हें सबंध पत्र कृष्णाजी परशुरामाच्या हातचें आहे.

एा साहा से रुपये रास करार केले असेत याचा वसूल हुजूर होईल सदरहू वतनाच्या सनदा अलाहिदा माहालचे नावे सादर आहेत तुह्मी सदरहू दोही माहालचे सरदेशमुखीचें वतन तुह्मी व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने अनभवणे आणि वतनाची सेवा करून सुखरूप राहाणे जाणिजे सदरहू शेरणीचा ऐवज हुजूर पावऊन पावलियाचा जाब घेणे तेणे प्रा मजुरा होईल जाणिजे

लेखांक २९] [१६४८ भाद्रपद वद्य ८

श्री

राजमान्य राजश्री रामराऊ बावाजी मुतालीक अमात्य यासि श्रीमत् मातुश्री राजसबाई साहेब उपरी सुहूर सन सबा अश्रीन मयां अलफ राजश्री अंतोबा नाईक सरदेसाई मामले प्रभावली यां कडील संगमेस्वर माहाली देशमुखीचे कोड आसुर्डे मौजे कुंभारखणी हे दोन्हीं कोड इनाम यांज कडे चालत आहेत हे वतनदार प्रमाणीक याचे चालवणें साहेबांस आवस्यक याज करितां तुम्ही यांचे सदरहू इनामास व वरचील हक इनामतीस तिजाईचे तगादा न करणें याज कडील तिजाई हुजरून माफ केली असे छ २१ माहे मोहोरम बहुत लिहिणें तरी तुम्ही सुज्ञ असा

विलस
ति लेख
नावधि

लेखांक ३०] [१६५१ आषाढ वद्य ५


श्री

स्वस्ति श्रीराज्याभिषेकशके ५६ सौम्यनामसंवत्सरे आशाढबहुलपंचमी

जीनाईक बिन गणोबानाईक यांणी किले पनाळांचे मुकामी विनंती केली की मामलेमजकूरचे सरदेशमुखीचें वतन महत्कदीम आपले मामले प्रभानवळी खालें ता। मलकापूर व ता। असडोली हे दोनी माहाल वरघाटे आहेत येथील कदीम सरदेशमुखी इदलशाहाचे कारकीर्दीस आपले वतन चालत होते त्या आलाकडे कितेक दिवस मुकाशा मुळे दों माहालचा भोगवटा आपला राहात आला आहे तरी स्वामींनी मेहरवान होऊन या वतनाचा भोगवटा बहुत दिवस राहिला आहे तो जीर्णोधार करावयासि माहाराज समर्थ आहेत ह्मणऊन विस्तारें विनंती केली त्या वरून मनास आणितां मामले प्रभानवली खालें सदरहू दोनी माहाल कदीम चालत होते अदलशाही मुकाशा मुळे व या राज्यांत वरघांटे तीर्थरूप राजश्री थोरले कैलासवासी स्वामींनी नूतन सुभे केले तेंव्हा तरफ मलकापुरा खाले आणिखी च्यार माहाल देऊन स्वतंत्र सुभा केला व ता। तारळेयाचा सुभा स्वतंत्र केला त्या खाले आणिखी माहाल व ता। असडोली हा माहाल दिल्हा त्या मुळे वतनाचा भोगवटा राहिला ऐसे दिसोन आले परंतु कदीम वतन इदलशाई कारकीर्दीस प्रभावनळी खालें हे दोनी माहाल चालत होते दरम्याने भोगवटा राहिला नाही ह्मणऊन वतनदाराचे वतन उठावे ऐसे नाही तुह्मी वतनदार प्रामाणीक स्वामीच्या पायांसी तीर्थस्वरूप राजश्री थोरले कैलासवासी स्वामी पासून हा काल पर्यंत एकरूप निष्ठेने वर्तत आहा तुमचे चालवणे हे स्वामीस परम अवश्यक या स्तव स्वामी तुह्मा वर कृपाळु होऊन ता। मलकापूर व ता। असडोली यां दोनी माहालचे सरदेशमुखीचें वतन कदीमप्रमाणे तुह्मास अजरामऱ्हामत करून दिल्हे असे तर तुह्मी सदरहू दोहीं माहालचें वतन आपले दुमालां करून घेणे या वतनांस हक व लवाजिमा व जकायतीस विस्वा बर निसबत मामले प्रभानवळीचे बाजे माहाल प्रमाणे घेत जाणे या वतनसमंधें तुमचे माथां शेरणी रुपये ६००

ता। मलकापूर ३०० ता। असडोली ३००

भृगुवार क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभुछत्रपति स्वामी याणी राजश्री



कान्होवानाईक यांसि आज्ञा केली ऐसी जे पूर्वी राजश्री गणोवा नाइक सरदेसाई माा प्रभानवली व दाभोळ यांस राजश्री शाहू राजे दाजी यांची जाऊन भेटी घ्यावी लागली होती त्यांस भयप्रदर्शन व्हावें ह्मणून तुह्मास राजश्री शिवाजीराजे दाजी याणी रांगण्याचे मुकामी पत्र करून दिल्हें त्या उपरि विषालगडचे मुकामी खरसंवत्सरी गणोवानाईक याणी हुजूर येऊन दर्शन घेतलें तेव्हां तुह्मास पत्र दिल्हें होतें तें रद करून त्यांचे वतन त्यांस चालवावयाचीं पत्रें दिल्हीं ऐसें असतां तुह्मी रांगण्याचे मुकामीचें पत्र राजश्री कान्होजी आंगरे सरखेल यांस दाखऊन यांच्या वतनासीं कथला मांडला आहे तर ऐसें करावयास तुह्मास गरज काय या उपर यांच्या वतनासीं कथला एकंदर न करणे फिरोन हुजूर बोभाट येऊ न देणें यांच्या वतनासीं तुह्मांस समंध नाही जाणिजे निदेश[1] समक्ष



रुजु सुरु सूद बार

लेखांक ३१] [१६५१ आषाढ वद्य ५

श्री

तालीक

स्वस्ति श्री राज्याभिषेकशके ५६ सौम्यनामसंवत्छरे आशाढबहुलपंचमी भृगुवार क्षत्रियकुलावतंस श्री राजाशंभुछत्रपती स्वामी याणीं समस्तरा-

---

१ येथून अक्षरांचें वळण निराळें आहे.

जकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री कान्होजी आंगरे सरखेल यासी आज्ञा केली ऐसी जे राजश्री शाहू राजे दाजी रांगण्याखाले चिकवाडीस आले ते समई कितेक गड क्लिले त्यास हस्तगत होऊन संपूर्ण राज्यात फितवा जाहाला तन्मुले राजश्री गणोवानायक सरदेशाई मामले प्रभानवली व मामले दाभोल यासी भेटावे लागले विसाजीनाईक हुजूर होते ते हि शिंधुदुर्गास स्वारी जाली तेव्हा मागाहून न पुसत गेले या करितां त्यां वरी इतराजी जाली ते प्रसंगी राजश्री रामचंद्र पंडीत हुकमतपन्हा होते त्याणी राजश्री शिवाजी राजे दाजी या जवळ विनंती केली कीं त्याचा दायाज कानोवानाईक आहे त्यास वतनाची पत्रें करून द्यावी ह्मणजे गणोवानाईक यासी आपल्या वतनाची पत्रें दुसारियासी दिल्ही ऐसे भय निर्माण होऊन स्वामीच्या पायांसी सादर होऊन निष्ठेने वर्ततील ऐसे विदित केले त्या वरून कानोवानाईकास पत्र करून दिल्हे होते परंतु त्यास वतनाशी अधिकार नाही त्या मुळें त्याचा भोगवटा जाला नाही त्या उपरि विशालगडचे मुकामी खरनामसंवत्छरी गणोवानाईक याणी राजश्री शिवाजी राजे दाजी याचें दर्शन घेतले ते नाईक मशारनिले वर कृपालु होऊन सदरहू पत्र कानोवानाईकास दिल्हे होते तें रद करून गणोवानाईक याचे वतन यासी सुरलीत करून देऊन पत्रें दिल्ही गणोवानाईक याणी बहुत निष्ठेने वर्तोन वतनीधंदा चालऊन शेवा केली त्या प्रमाणे त्याचे बंधु राजश्री अंतोवानाईक स्वामीच्या पायासी निष्ठेने वर्तत आहेत ऐशास कानोवानायक या पासी पेसजीचे पत्र होते ते तुह्मास दाखऊन याचे वतनासी कथला आरंभिला आहे ह्मणऊन विदित जालें तरी पूर्वापार वतनाचे खावंद गणोवानाईक कानोवानाइकास वतनासी दरकार नाही त्यासी एक निमित्ये पत्र दिल्हे होते की गणोवानाइक यासि भय निर्माण व्हावे त्या वरी गणोवानाईक दर्शनास आल्या नंतर कानोवानाईक यास दिल्हें पत्र रद केले असतां त्या पत्रा वरून त्यास यांच्या वतनासी कथला करा-

वयासी गर(ज) नाही या करितां तुह्मी कानोवानाईकास ताकीद करून याच्या वतनासी कथला न करीत तें गोष्ट करणे गणोवानाईक याचे बंधु राजश्री दादोवानाईक व अंतोवानाईक व पुत्र राजश्री प्रल्हादनाईक व केशवनाईक सरदेशाई पूर्वापार वतनदार एकनिष्ठ आहेत याचे वतन यास सुरलीत चालवणे जाणिजे बहुत काय लिहिणें तरी तुह्मी सुज्ञ असा

लेखांक ३२] [१६५२

श्री

राजश्री सेखोजी आंगरे सरखेल
गोसावियांसि

॥ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री श्रीनिवास परशराम प्रतिनिधी आसीर्वाद विनंती उपरी येथील कुशल जाणऊन स्वकीय कुशल लेखन करीत गेले पाहिजे विशेष राजश्री प्रल्हादनाईक सरदेसाई मामले प्रभावली व दाभोळ हे हुजूर राजश्री स्वामीसंनिध सेवा करितात व राजश्री दादोवानायक सरदेसाई मामले मजकूर हे हि हुजूर येऊन हाजीर जाले ऐसियासि यांच्या हक लवाजिमा व इनामतीस गोसाविया कडून खलेल जाहाली आहे ह्मणऊन विदित जालें तरी हे हुजूर या राज्यांत दखल नसते तरी यांच्या वतनास खलेल करावी हे उचित च होते परंतु हे दखल होऊन स्वामी संनिध सेवा करितात ऐसे असतां याच्या वतनास खलेल करावी ऐसे नाही हे पुरातन वतनदार हे आपल्यास हि अवगत च आहे यांचे हरएकविसी अगत्य धरून चालवावे हे विहित आहे या उपरी गोसावियानी आपल्या कडील कमावीसदारास ताकीद करून मामले मजकूरचे हक व लवाजिमा व इनामती सुरलीत पेसजी पासून भोगवटा आहे त्या

प्रमाणे थांस प्रविष्ट हो तो + + + ...

जाणिजे छ १० जिल्हेज बहुत लिहिणे तरी सुज्ञ असा

० श्री
श्री आई आदिपुरु
ष श्री राजा शाहु छत्रप
ति स्वामि कृपानिधि त
स्य श्रीनिवास परशु
राम प्रतिनिधि

राजते
लेखना
वधी

लेखांक २३]

हु

अजम सिदीसाद दाममह-
बतहू

मोहिबानीपन्हाही मखलिसान दस्तगाह अजी श्रीनिवास पंडित प्रतिनिधी....आंकी येथील खुसी जाणऊन खुद खुसी कलमी मरकूम करीत जाणे दिगर माहाराज राजश्री स्वामीचे सरदेश-मुखीचे वतन आहे त्यासि पातशाहानी नर्मदा आलाकडे सरदेशमुखीचे वतन बाहाल केले आहे वरघाटे वतनी अमल चालत आहे कोकण-प्रांते सरदेशमुखीचा अमल जाला नाही त्यासि वतनी अमल चालवा-वया विसी अमलदारास हुकूम केला त्यासि मा। विसोबानाइक सरदेसाई मामले प्रभावली व मामले दाभोल येही माहाराजाचे सेवेसी अर्ज केला जे दोनी मामलियाचे सरदेशमुखीचे वतन पुरातन आपले आहे त्या प्रा। चालत आहे त्यासी स्वामीनी कृपालु होऊन वतनी अमल चाल-वावा ह्मणऊन अर्ज केला त्या वरून हे वतनदार पुरातन याचे सरदेश-मुखीचे वतन चालवणे माहाराजास जरूर या करितां दोनी मामलेयाचे वतन याचे यासी मोकरर करून दिल्हे असे हक लाजिमा इनाम पुरातन चालत आहे त्या प्रमाणे मोकरर केला असे आणि खासा वतनी अमल माहाराजाचा दोनी मामलेयाचा चालावा या स्तव सरसरदेशमुखीचे वतन...

० श्री
श्री आई आदिपुरु
ष श्री राजा शाहु छत्रप
ति स्वामि कृपानिधि त
स्य श्रीनिवास परशु
राम प्रतिनिधि

लेखांक ३५]

श्री

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री कृष्णराव स्वामी गोसावियांसि

पो बालाजी बाजीराव कृतानेक नमस्कार विनती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत असिले पाहिजे विशेष करवीरच्या बंदोबस्तास राजश्री सदासीव राम व विसाजी नारायण पाठविले असेत तरी तुह्मी आपले जमावा नसी यासि सामील होऊन हे सांगतील त्या प्रो बंदोबस्त करावा किले कोट यांचे आज्ञेत वर्तत ते करावें हे जमाव अणवितील ते वेलेस पाठवावा + छ २४ जमादिलावल बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंति

लेखांक ३६] [१६९० ज्येष्ट वद्य ५

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेकशके ९५ सर्वधारीनामसंवत्सरे जेष्ठवहुलपंचमी भानुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामियाणी समस्तराजकार्यधुरंधरविश्वासनिधि राजमान्य राजश्री आबाजीराव कृष्ण पंडित प्रतिनिधी यासि आज्ञा केली ऐसी जे तुह्मी साहेबाचे शेवेसी योग्य पाहोन तुह्मा वरी तीर्थरूप माहाराज मातुश्री आईसाहेब कृपालु होऊन राजश्री नरसिंगराव सिंदे व यसवंतराव सिंदे सुभेदार यांसि पाठऊन हुजूर किले पनालियाचे मुकामी आणिले आणि प्रतिनिधीचा हुदा सांगीतला वस्त्रें दिल्हीं व प्रतिनिधीचा सरंजाम सुधा व बाबती किले भुदरगड व समानगड व कलानिधिगड व पारगड व भिवगड व आजिरे येथील सरंजामाच्या बाबती पूर्ववत् प्रमाणें करार करून दिल्या असेत तरी तुह्मीं सदरहूं किले मजकूर व बाबती पुरातन आहेत त्या

---

* येथून शेवटपर्यंत अक्षराचें वळण निराळें आहे.

मोकरर करून दर सदे पंचोत्रा हक रयत नि॥ मोकरर केला असे त्या प्रा चालेल ये विसी कोणी खेलेल करील त्यासी ताकीद केली पा॥हिजे दराज काय लिहिणे

राजते
लेखना
वधी

लेखांक ३४] [१६५४ आषाढ वद्य ९

हु

फारसी
सिका

ॐ) सुज्याअतशार सिदी साद सुभेदार सुभा मामले दाभोल व प्रांत राजापूर माळूम बाशद सुहूरसन सलास सलासीन मियां व अलफ आके दादोबानायक बिन रंगोबानायक सरदेशाई सुबैन मजकूर येही मौजे धामापूर तर्फ संगमेश्वर सुभा राजापूर हा आपला कदीम गाव मराठे तर्फेन आपणास इनाम आहे सरकार तर्फ + + णी मौजे मारा वर आहे ते मेहेरबान होऊन आपणास माफ केली पाहिजे म्हणोन अर्ज केला त्या वरून मेहरबान होऊन मौजे मजकूरची खंडणी सरदेशाई मारइलेस माफ केली असे तर जे साली जे खंडणी मौजे मारा वर मुकरर होत जाईल त्याचा सालमजकुरा पासोन सालाचे सालांत माफी खर्च लिहीत जाणे ताजे सनदेचा उजूर न करणे नकल घेऊन असल सरदेशाई या नजीक देणें पा॥ हुजूर रो .... श मां जबानी रघुजी भिकाजी नाईक बोरकर अफराद रा॥ छ २२ माहे मोहरम सन *१४ जुलूस मोर्तब सूद

मोर्तब
सूद (फारशी)

बार सूद

---

* हा जुलूस 'महमदशहा'चा.

प्रमाणे अनभवीत जाणे अणी स्वामीच्या पाया पासी एकनिष्टपणे वर्तो-न स्वामीस संतोषी करून आपले सेवेचा मजुरा करून घेणे व तुम्हांस जामीन राजश्री सुलतानराव सिंदे यांसि हुजूर घेतले असेत जाणिजे बहुत लिहिणे तरी तुह्मी सुज्ञ असा

मर्या
देयं विरा
जते

तेरीख १९
मोहरम सुा तिसा सी(तै)
न मयां अलफ वार

लेखांक ३७] [१६९२

श्री तालीक १/३

आखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री कृष्णांजी विश्वनाथ गोासि

शेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार सुां इहिदे सबैन मयां व अलफ शके १६९२ विकृतिनामसंवत्छरे दादोवानाईक बिन सदासीव-नाईक व नारोवानाईक बिन केशवनाईक सरदेसाई मामले प्रभानुवली व सुभा दाभोल याचा व आनंदराव बिन यसवंतराव चव्हाण देशमुख साडे च्यार माहाल मामले हमजाबाद व भास्कर बाबाजी वोक खोत मौजे कोतलुम ताा वालवें व बद्रे मोकासी ताा चिपळूणं वगैरे याचा दाभोल सुभाचे सरदेशमुखीचा कजिया लागोन मनसुर्फो साल तिगस्ता पासून हुजूर पडली आहे त्यांस सरदेसाई ह्मणतात की दाभोल सुभाची सरदेशमुखी वतंनी परंपरेने वडील वडील अनभवीत आले मध्यें कैलासवांसी सिवाजी माहाराज यांचे कारकीर्दीत अवध्या वतनदाराबरोबर आमचे हि हक मना जाहाले होतें ते राजाराम साहेबाचे कारकीर्दी पासून चालते जाहाले त्याज वंर हबसीयाचा अमल दाभोल सुभांत जाहाला तेव्हा त्याणी मागती मना केलें त्या उपरी आमचे आजे दादोवानायक बिन रंगोवानायक हबसी याज कडे हाले आहेत त्यांस हबसीया पलीकडे

याचा भोग(व)टा कधी च नांही हबसी याज कडे अमल जाहाला तेंव्हा दादोबानायक त्याजला भेटले नव्हते ते समई त्याणी आह्मांस पत्रे पाठविलीं की सरदेशमुखीचें वतन याचे नसता याजला हक तुह्मी देता हे कामाचे नवे म्हणोन पत्रे पाठविली तीन बजिनस आम्हापांसी आहेत म्हणोन विनंती करून पत्रे दाखविली त्याज वरून मनास आणिता सुभे मारचे सरदेसाईपणाच्या वंतनाचे दाखलेयाची पत्रे शंभरा वर्षा पैलीकडील व आलीकडील दादोबानायक बिन सदासीव-नायक याज पांसी आहेत याचे आजे दादोबानायक बिन रंगोबानायक हबसीया कडे रुजू नवते त्या पूर्वीचे हबसीयाचे ताकीदपत्र चवाण वगैरेयाणी आणुंन दाखविले त्या च पत्रा वरून हबसीयाचे अमला अगोधर सरदेसाईयाचा भोगोटा होता ऐसे दिसते परंतु आणखी भोग-वटियाचा पुर्ता शोध करून अक्रां माहालचे वंतन याचे जाहाले तरी याजकडे चालवावे त्यास हबसीयाचे कारकीर्दीस अक्रा माहाल याज कडे चालिले त्याज वर आंगरेयाचे अमलांत तीन माहाल चालिले तो भोगवटा कैलासवासी तींा[1] नानासाहेबी मनांस आणून तीन महालचे सरदेशमुखीचे वंतन याज कडे चालविले त्यांस याची मन-सुफी हुजूर पडली असंता सरसुभाहून सदरहू तीन माहाल अमांनत करावयाचे कारण नाही याज करितां हे पत्र तुम्हास सादर केले असे तरी तां चिपळूण व तां दाभोळ व तां सावर्डे एकूण तीन माहाल देखील मीठबंदर येथील सरदेशमुखीचा हक लवाजिमा तुळाजी आंगरे-याचे अमलाचे अखेरी पर्यंत चालिला असेल त्या प्रो सरदेसाई याज कडे चालवणे आलीकडे सरकारच्यां[2]

लेखांक ३८] [१६७२ श्रावण शुद्ध ४

श्री आई आदिपुरुष

पुरवणी तीर्थरूपाचे सेवेसी

---

१ हा शब्द या पत्रांत दोन वेळा आला आहे, व दोन हि ठिकाणीं 'कैला-सवासी' असें लिहिलें आहे. २ पुढील बंद गहाळ.

विनंती उपरि दरबारचे वर्तमान तरी श्रीमंत मातुश्री आईसाहेब पुणियास आलियाचे वर्तमान आपणास कळले च आहे त्याआलीकडे वर्तमान आषाढ वद्य त्रयोदसीस राजश्री प्रधानपंताच्या वाड्यात आलीं होती नव्या दिवाणखानिया मध्यें बैठक केली होती च्यार घटका रागरंग जाहाला तदनंतर गोशाळे मध्ये बसोन घरांतील अवघ्या बायका बोलाऊन आणून अवघ्यास वस्त्रे दिली प्रधानपंती मातुश्रीस दोन पोषाख एक चांदणी व एक कलसपाकी ऐसे दोन दिल्हे पोहोच्या जडित दोन व एक मोत्याची माल दिली येणे प्रमाणे सत्कार जाहाला राजश्रीचें वर्तमान तरी मातुश्री आजीतागायत हे कर्म खोटे आहे ऐसे ह्मणत आहेत परंतु याचे विचारे जी गोष्ट घडली आहे ते विपर्यास जाहाल्याने राज्यात दुर्लौकीक आपण यांचे पदरी मातबर पूर्वी याणी विच्यार न करितां हे गोष्टी कैसी केली हा लौकीक जनात हे च प्रतिपादावे तरी आज नऊ वर्षे मातुश्रीने नव्हे ह्मणऊन हटात्कार केला आहे होय ह्मणावे तरी मातुश्रीचा आग्रह नव्हे ह्मणावे तरी जनविरुध गोष्ट याज करितां हे हि विचारांत पडिले आहेत या गोष्टीचे रुजू मोझे बहुत मनास आणून मातुश्रीच्या तोंडे हे च गोष्ट खरें ऐसे साक्षी मोझ्या निसी करून स्थापावे ऐसे आहे परंतु ती आइकत नाही या करितां करवीरवासियास आणावे ऐसा मातुश्रीच्या विचारे निश्चय जाहाला त्याज वरून राजश्री········पंत या समागमे राजश्री बिखाजी नारायण व राजश्री हरी राम घोरपडे या कडील समागमे देऊन आणावयास रवानगी केली ते आजी चतुर्थीस निघोन गेले येणे प्रमाणे याचे मुदे त्याणी मान्य[1]

लेखांक ३९ [१७१२

श्री

आन्यासाहेब

स्वस्ति श्री राज्याभिषेकशके ११७ साधारणनामसंवत्सरे··········

---

१ पुढील बंद गहाळ.

..........................भोमवासरें क्षत्रियकुलावतंस श्री राजा शिवछत्रपती स्वामी याणी समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री माधवराव पंडित प्रधान यांसि आज्ञा केली ऐसी जे कसबा संगमेस्वर येथे कैलासवासीं तीर्थस्वरूप माहाराज साहेब याचा वाडा आहे त्या जागे वरी हाली राजश्री सदाशीव दादाजी माहूलंगकर सरदेसाई वाड्याच्या जुन्या जोत्या वरी याणी घर बांधिले ह्मणोन जोसी याज कडून हुजूर गैरवाका समजाऊन देऊन पेशजी आपणास आज्ञापत्र सादर जाहले आहे ऐ.....................सरदेसाईयाणी घर बांधिले आहे व बाग त्या ....नादणूक कसबे मजकुरी कैलासवासी माहाराज............ गडाहून येऊन राहिले होते तेंव्हा व त्यांपूर्वी.............सी जाहली आहे त्याची चौकसी वाजवी न्याय.........ह्मणोन दाखले निसी वैवाट चालत आली आहे..............सरदेसाई याज कडे चालू द्यावी जाणिजे बहुत लिहिणे तरी सुज्ञ आसा

मर्या
देयं विरा
जते

बार बार

लेखांक ४०] श्री [१७१५ श्रावण वद्य ५

स्वस्ति श्रीनृपशाळिवाहानशके १००८ क्षयनामसंवछरे क्षत्रियकुलावंत जयशेखराय राजा याणी श्रीधर व सहस्त्रशर्म ब्राह्मण यासी तोरगल समीप जोतिषाची वृत धारादत करून दिल्या नंतर राजे शांत जाहाले उपरांत राज्यास अधिकारी नाही तेंव्हा हत्तीच्या सोंडेत माल देऊन नगरचे लोक जमा करून हत्ती फिरविला तेंव्हा हातीने माल विद्यारण्यस्वामियांच्या गळात घातली त्यास हे सन्यासी याज करितां त्याचा सिश्य वीरबुक समीप होता त्याच्या गळां ती माल स्वामींनी घालून त्यास राज्याभिषेक केला आणि त्या गांवचे नाव विद्यानगर ठेविले स्वामींनी त्या राज्याचे प्रधानत्व करून सांमराज्य केले त्यापासून त्या राज्याची वंशावल

१ वीरबुक यास पुत्र नरसाणा नाईक
१ त्याचा पुत्र हरिहरराय
१ त्याचा पुत्र देवराय
१ त्याचा पुत्र नरसिंगराय
१ त्याचा पुत्र वीर नरसिंगराय
१ त्याचा पुत्र रामदेवराय
१ त्याचा पुत्र कृष्णराय
१ त्याचा पुत्र अचुःतराय
१ त्याचा पुत्र सदासीवराय
१ त्याचा पुत्र रामराय

१०

या प्रो वीरबुक या पासून रामरायपर्यंत अकरा पिढ्यां त्याणी राज्य केले रामराय रक्षंतगडी तालुके बागलकोट नजीक कृष्णातीर येथे आले होते ते समई अदलशाहा विज्यापूर व कुतुबशाहा हैदराबाद व निज्यामशाहा दौलताबाद या त्रिवर्गाही राजेयांस मारून राज्य घेतले शके १३२२ श्लोक पराभवोब्दे माघे च शुक्ल पक्षे च पंचमी शुक्रवारे च माध्यान्हे रामराज रणे हते ॥ पुढे राज्य यवनाचे जाहाले सदरहू हकीकत सिवाजी नरसिंगरात्र गुमस्ते जेयगौडा लिंगापा देसाई व सरदेसाई व नाडगौडा सरकार तोरगल पो कोटनूर याज पासून लिहोन घेतली असे शके १७१५ प्रमादीनामसंवछरे श्रावण वद्य ५ इंदुवार मु॥ कसबे पुणे

लेखांक ४१] [१७२२ सुमारे

श्री

रामराजा कानडा नरपती अनागोंदीस राज्य करीत होते ते समाप्त

१ पत्रांतील शक विश्वास्य नाहींत.

जाले शके १३२२ ता। शके १७०८ पराभवनामसंवत्छरे सन सबा समार्नीन मया व अलफ पात्रे तो वर्षे जाहाली ३८६

तपसील

विज्यापूरची पादशाहात इा शके १३२२ विक्रमनामसंवत्सरे सन इहिदे समान मया

पादशाची नावे	मामले बंदर मैमुल मुस्तफाबाद उर्फ दाभोल येथें सुभे होते
१५ इसुफ इदलशा	१ मुस्तफाखान
१४ इस्माइल इदलशा	१ चागीजखान सरनोबत
२४ इब्राइम इदलशा	१ खुराशानखान गैबती पटाईत
मुळीखान बिरादार	१ अफजलखान दिवान खास-मजालस
जादे इस्मइल इदलशाहा	१ दौलतखान दिवानखान खास-मजालस
रोज ४० तास ३	१ बडेखान दिवाण खासमजालस
२३ अली अदिलशां	१ मुतनखान दिवाण मुजरी
४७ इब्राइम इदलशाहानी	१ मीर अहमदखान दिवाण खासमजालस
३६ सुलतान महमद	१ शाबुदीनखान
१६ अली इदलशाहांनी	१ ....
१४ सुलतान सिकंदर	——
—— १८९	१०
२० औरंगशाहा निधान शके १६२८	
—— २०९	

शाके रंध्रकरांगभूपरिमिते संवत्सरे च व्यये दर्शे भार्गववासरे प्रथमके यामे गुरू सिंव्हगे ॥ कुंभे सीतकरे अमंदनगरे भानौ च कुंभस्छिते माघे मास्यवरंगशाहनृपते भूलोकभोगाद्दिवं ॥ १ ॥ १६२८

मलीकंबर मेल्यास वर्षे सन सबा सिका मलीकंबर बंदे दरगाह

समानीन शके १७०८ पावेतो येगानि मलिकंबरा चिंगिजखानी जाहाली १६३ ॥

जंजिरे दंडा राजपूरची पैवस्ती

कोळी वगैरे होते सन सलास अशेरीन तिसा मिया	हबसी उळीखान मळीखान सन समान समानीन तिसा मीयां मुदत ८१० ८१०

भोसलेयाचे राज्याचा प्रारंभ

	शालीवाहानशके	सन आर्बा	राजशक	राज केले
सिवाजी माहाराजाचा जन्म शके १५४९ विभवसंवछरी समाप्त शके १६०२ रौद्रनामसंवछरे चैत्रशु॥ १५ आयुर्दाव वर्षे ५३ पौ १७ बालत्व ३० राज्याभिषेकापूर्वी अमल केला —— ४७ बाकी राज्याभिषेक शके १५९६ आनंदनाम संवत्छरे जेष्ट शु॥ १३ सन खमस सबैन अलफ	१५९६	१०७६	१	६
संभाजी राजे तक्तास शके १६०२ रौद्र संवत्छरे वैशाख शु॥ ३ ता॥ शके १६१० विभवसंवत्छरे सन तिसा समानीन अलफ संगमेश्वराहून मोगला(नी) धरून नेले मालेराई जाहाली वर्षे ९॥	१६०२	१०८१	७	९
राजाराम सिंव्हासनारूढ शके	१६११	१०९०	१५	११

१६११ शुक्र संवत्छरे सन तिसैन व अलफ ताां शके १६२१ प्रमाथी संवत्छरे माघ वा। ९ सन मया व अलफ कैलासवासी सिंव्हगडी जाहाले				
सिवाजी राजे धाकटे शके १६२२ तागाइंत शके १६२८ देखील आईसाहेब	१६२२	११०१	२६	७
राजा शाहू शके १६२९ सर्वजितसंवत्छरे सन समानीन मया व अलफ ता। शके १६७१ शुक्र—संवत्छरे सन खमसैन	१६२९	११०८*	३३	४३
रामराजा शके १६७२ प्रमादीनामसंवत्सरे सन इहिदे खमसैन मया व अलफ ता। शके १६९९ हेमलंबीनामसंवत्सरे सन तिसा सबैन	१६७२	११५१	७	२९
शाहूराजे शके १७०० विलंबीनाम संवत्सरे सन समानीन मया व अलफ	१७००	११८०	१०	८

प्रासादो जगदीश्वरस्य जगतामानंदनोनुज्ञया श्रीमछत्रपते शिवस्य नृपतेः सिंव्हासने तिष्ठति ॥ शाके षण्णवबाणभूमिगणनामानंदसंवत्सरे ज्योतीराजमुहूर्तकिर्तिमहिते शुक्लेशसार्पे तिथौ ॥ १ ॥ शाके षट्नंदपंचद्विजपतिसहिते जेष्ठमासे तु शुक्ले वर्षे चानंदसंज्ञे रतिपति-सुतिथौ राजशाहाजपुत्रः राजा सिंव्हासनस्थः शिवइति विदितो भूरिलावण्यगात्रः

---

* येथें मुळांत १००८ आहे; परंतु त्याजागीं ११०८ पाहिजे.

लब्धस्छानेककामः कृतरिपुवनितावारिनेत्रप्रपूरः ॥ रविसुतशनि ऐसे नाम तें वासराला गणिततिथि सुपूर्णा चैत्र चित्रादिनाला । अवतरग शिवाने पूर्ण केले नृपाने शकमिती शतसोळायुग्मरौद्राभीधाने ॥ ३ ॥

बाळाजी विश्वनाथ यांसी पेशवाई जाहालीं शके १६३६ जयनामसंवत्सरे सन खमस अशर मया व अलफ

मराठे राज्यांत दाभोल सुभांस सुभेदार आले

कारकीर्द सिवाजी राजे इा शके १५९६ आनंदनामसंवत्सरे ता। शके १६०२ रौद्रनामसंवत्छरे

१ राघो बलाल अंत्रे
१ राघो वासुदेव
१ आबाजी माहादेव
१ अंताजी रंगनाथ
१ रामाजी अनंत सरसुभेदार
१ माहादाजी अनंत
१ बहिरो त्रिंबक सरसुभेदार
—
७

येणे प्रा। सात सुभेदार राज्याभिषेका पूर्वी व अभिषेक ज्याहाल्या नंतर

कारकीर्द संभाजी राजे व राजाराम व दुसरे सिवाजी राजे व आईसाहेब

१ विठल गोपाळ
१ गंगाजी दादाजी सरसुभां
१ रुद्रजी अनंत

राजाराम व आईसाहेब

१ माहादाजी बलाल
१ कासी रंगनाथ
१ सिवाजी त्रिंबक
१ बापूजी आपाजी
१ कृष्णाजी परशराम
१ माहादाजी राम
—
९

बाळाजी विश्वनाथ यांसीं पेशवाई जाहाली शके १६३६ जय नाम संवत्सरे सन खमस अशर मया व अलफ

१० बाळाजी विश्वनाथ
१२ बाजीराव बलाळ

२४ बाळाजी बाजीराव नानासाहेब सन इहिदे आर्बेन

१३ माधवराव बलाळ

१२ खुद इसने सितैन

१ नारायणराव आर्बा सबैन

—

१३

माधवराव नारायण शके १६९६

किल्ले अंजणवेल

तुळाजी आंगरे सरखेल यांणी शामळा पासून घेतली शके १६६६ रक्ताक्षिनामसंवछरे सन खमस आर्बैन मया व अलफ

अमलदार

१ बाबूजीनाईक कदम सन इहिदे खमसैन

१ आत्माजीराव विचारे सन खमस खमसैन ता। सीत खमसैन पौशमास

—

२

मराठे राज्या पासून हबशाने घेतली शके १६२० बहुधान्यनामसंवछरे सन तिसा सितैन व अलफ जंजिरे दंडाराजपुरीस हबसी याकुदखान दिलीहून आले सन १०५२ सिका याकुबखानी अद्यापी तो च चालतो

श्रीमंत राजश्री पंतप्रधान याणी घेतली शके १६७७ सन सीत खमसैन मया व अलफ स्वारी राजश्री रामाजी माहादेव सुभेदार

१ कानोजी गजे हवलदार निा। रामाजी माहादेव सन सीत ता। सन सबा खमसैन फाल्गुन पावे तो

सन खमस अशरीना मध्ये कानोजी आंगरे यांणी जैगड बांधिला सन खमस अशरीना मध्ये पूर्णगड बांधिला तेन्हा महिमतगडतर्फेचे कैलासवासी श्रीमंत राजश्री श्रीपतराव प्रतिनिधी कडून तेरा हि माहाळचा इजारा करून घेतला तें समई जयगडास सरंजाम सेतवडे माहाल

व संगमेश्वर माहालचें सात गाव व का फुणगूस या प्रो घेतले दोन वर्षें चालिलें पुढें संगमेश्वर माहाल आपणाकडे ठेऊन वरकड माहाल सोडून दिल्हे गावगना

१ मौजे बुरबाड
१ मौजे सरंज
१ मौजे आखली
१ मौजे माखजन
१ मौजे करजुवे
१ मौजे पीरदवणे
१ मौजे डिंगणी
—
७

रत्नागिरी किलां पंतअमात्य याज कडेस होता तो सेखोजी आंगरे याणी सन इसने सलासीना मध्यें चैत्रमासी पंचमीस घेतला कलम १

१ चिमाजी मांणकर ता। सन इहिदे सितैन पौष मास
१ गणेश कृष्ण कोलटकर ता। सन इसने भाद्रपदमास
१ चिमाजी माणकर सन इसने सितैन आश्वीन मास ता। आर्बा सितैन आश्विनमास
१ कृष्णाजी विश्वनाथ बरवे सन आर्बा सितैन आश्वीनमास कारभारी केला आबाजी बलाल फडके सन इहिदे सबैन पौषमासी देवाज्ञा जाहाले सन इहिदे अखेरीस खासा आले ते सन समानीन पौषमासी शु॥ ७ देवाज्ञा जाहाले
१ त्रिंबक कृष्ण सन समानीन पौषमास

शके १५८५ किले सुवर्णदुर्ग इमारत करून पुढे कुलाबेयासि गेले कानोजी आंगरे सरखेल शके १६२० सन तिसा तिसैन अलफ कुलाबेयासि गेले याचा दाखला कुलाबेकर बाल जोसी या जवल पत्र आहे

कानोजी आंगरे २९ शके १६२०
संभाजी आंगरे १२

सेखोजी आंगरे कानोजी आंगरे असतां २
तुलाजी आंगरे १५

आंगरे याणी कुलाबा घेऊन राज्य केले त्याच्या कारकीर्दी

शके १६२० बहुधान्यनामसंवछरे सन तिसा तिसैन अलफ सुवर्णदुर्गाहून कुलाबेयासी गेले शके १६३४ नंदनसंवत्सरे सन सलास अशर मया व अलफात विजयदुर्ग घेतला पुढे त्य च साली सरदली जाहाली सन तिसा अशरीणांत कुलाबेयास समाप्त जाहाले राज्य केले वर्षे २९ सन इसने तिसैन मया व अलफात पूर्वाचे नक्षत्राचा परज्यन्य गेला या मुळे नापीक प्रांत जाहाला याज मुळे कोकणांत चवथाई सूट सरकारातून मुलकास दिल्हीं परजन्य गेल्या मुळे सन सलास दरोबस्त तलकोकण वांई देश हिकडे नर्मदा व दक्षणेस तुंगभद्रा पर्यंत मुलुकात धारण सेवा पायलीची पडली लोक बहुत मेले या प्रो दुकाल पडिला सन आर्बा तिसैन मया व अलफा पासून स्वस्ताई जाहाली कलम १ सातारा किला माहाराज याणी बांधोन राहिले होते त्यास रास्ते व परशरामभाऊ याणी सातारा लुटिला आणि किल्याचा बंदोबस्त केला शके १७२० कालयुक्तनामसंव-

सेखोजी आंगरे याणी राज्य केले वर्षे ३

संभाजी आंगरे याणी राज्य केले वर्षे १० सन इसन्ने आर्बइन मया व अलफ शके १६६३ दुर्मति संवत्सरे ते वर्षी विजयदुर्गी समाप्त जाहाले

तुलाजी आंगरे शके १६६३ सन इसन्ने आर्बइन मया व अलफ सन खमस आर्बइनात सरखेली जाली शके १६७७ युवा संवत्सरी माघ शुा १३ विजयदुर्ग इंग्रज याणे घेतला प्रांत श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांसि अर्जानी जाहाला सन सीत खमसेन मया व अलफ श्रीमंतांचे निशाण सन सबा मध्ये विजयदुर्गा वर चढलें मामलत राजश्री गोविंद सिवराम तात्या टोलक्रांत सन सबा तिसैन मया व अलफात कोकणात व देशात जाहाली समान तिसैन मया व अलफात हि टोल पडिले त्यांस समुद्रकिनारा साहा कोस टोल गेले नाहीत संगमेश्वर माहालीं आश्विनमाशी टोल पडिले तेणे करून सेते बहुतेक टोलानी खालीं व सुपारी नारळ फणस आंबे वगैरे झाडे टोलानी

ल्छरे सन तिसा तिसैन मया व अलफ अधीक श्रावण वा। १२ पेठ लुटिली कलम १

तुळाजी आंगरे सरखेल याज कडून श्रीमंत राजश्री नानासाहेब प्रधान याणी रत्नागिरी किला घेऊनं ताळुका केला सन सीत खमसैन माघ मास

सन सीत सबैनांत तोतया जाहाला सबा समान सबैन दोन साले सदाशीव केशव याणी सुभा केला कलम १

खाली याज मुळे सुपारी नारळ व फणस आंबे याची झाडे मेली बागायत बुडालें तालुके रत्नागिरीस टोलखाज जाहाली ह्मणौन तालुकेयास सूट सरकारातून साडे आठ हजार रुपये सूट दिल्हीं कलम १

प्रधानपंत याज कडेस रत्नागीर सन सीत खमसैनात जाली तेंव्हा पासून अमलदार

१ मोराजी सिंदे साले १०

१ कृष्णाजी हरी व त्याचे पुत्रं महिमतराव व त्याचे पुत्रं कृष्णराव महिमत सन सबा सितैन पासून सन इसने तिसैन पावे तो कलम १

लेखांक ४२] [१७४२ कार्तीक शुद्ध १२

श्री

राजश्री गणोबानाईक बिन प्रल्हादनाईक व राघोबानाईक बिन दादोबानाईक सरदेसाई मामले प्रभावली व सुभा दाभोल यासि आज्ञा केली ऐसी जे सुा इहिदे अशरीन मया तैन व अलफ स्वामीचे शेवेसी तुह्मी हुजूर करवीरचे मुकामी येऊन विनंती केली की कसबा संगमेस्वर येथे पूर्वी आमचा वाडा होता त्या वाड्यात कैलासवासी माहाराज कारणा मुळे राहिले पुढें वाडा धग्ध जाहाला त्या वाड्या वर दादोवानाईक सरदेसाई याणी घर बांधिले त्याज वरून जोसीयाणी गैरवाखा समजाऊन माधवराव पंडित प्रधान यासी आज्ञापत्र देऊन वाडा मोडविला त्याज वर त्या च वर्षी दादोवा-नाईक सरदेसाई याणी आपला मजकूर समजाऊन पंडित-प्रधान यासि वाडा बांधू देणे ह्मणोन आज्ञापत्र

न्हेले परंतु जोसीयाचे भिडे मुळे वाडा जाहाला नाही त्यासि हाली कृपा करून आमचा वाडा आंह्मी बांधितो त्याज विसी आज्ञा जाहली पाहिजे ह्मणोन विदित केले त्याज वरून मनासी आणिता तुमचे वाड्यात कैलासवासी माहाराज राहिले व तुह्मां जवलील कागदपत्र व भोगवटा पाहून पेशजी प्रधानपंत यासि आज्ञापत्र दिल्हे आहे हे जाणून व हाली चवकसी करुन वाड्याची जागा तुमची खरी हे जाणोन तुह्मांस आज्ञापत्र सादर जाहाले असे तरी तुंह्मी कसबे मारी जुन्यावाड्या वरील जागे वर घर बांधून सुखरुप राहाणे जाणिजे रा छ १० माहे मोहरम लेखन खासा[1]

विलस
ति लेख
नावधी

बार

लेखांक ४२]

श्री

करीणा मौजे निवें बुा ताा देवरूख येथील पूर्वापर स्थीत गाव कोणाचा पूर्वी विज्यापुरीहून किले खीलणायांसी नवद गांव तनखा देवके हातखंबे हरचीरी देवरूख येथे चौकसी....माहाली नेमून दिल्हा ते काली मामले प्रभावली माहाल मौजे मजकूर हा गाव वेढत असता टोळकृत होऊन आंगरे नाबूद जाहाली सारे रयत गांव टाकून देशांतरास गेले अकरा वर्षे गाव कुर्ली वोसाड पडिला त्या वरी शके १५०२ व्रशासंवत्सरी राजश्री सोमोवानाईक सरदेसाई मामले प्रभावली यांणीं विज्यापुराहून पातशाहा पासून मौजे-मजकूर इनाम व खोतीं मिरास करून आणिली आंणि गावची लावणी केली गावीचे कदीम रयंता परागंधा होऊन गेले होते त्या मध्ये पाल्या व कुवलेकर कुणबीं व गुरव व म्हांर हे गांवांत आणिलें व हांतखंबे विलायतीहून विठोबा मोघा उर्फ करंबलकर त्यास गांवात आणून सिध्धेस्वर वाडेयांत आगर

१ ‘ लेखन खासा ’ हीं अक्षरें निराळ्या वळणाचीं आहेत.

व सेत भूमी व गांवची महाजनकी देऊन ठेविली व ढवला व अंमृत्या व खंडकार व इतर रयतां आणून वाडीमजकुरा पासून गांवची माहामुरी केली वाडे तीन वसविले मधील वटार व खालील वटारीं आगर मांडणी केली खा घर गांवांत बांधले आगर माहामूर जाहालिया वरी तानो बलाल राजवाडकरी चिपुळणा[1]ब्राह्मण गावात आपलिया घरी जागा देऊन आवारीपणास ठेऊन त्याच्या हवाला खा बाग व सेत केलें व गणोवा सेवड्या याचें हवालीं खाइल्या आगरी वरी दाहिजाचे आगर करून ठेवला त्या वरी चवील वर्षे गाव इनामंत व खोंती नायक मारनिले कडे चालिली त्या वरीं इनामत दिवाणातून दूर जाहाली खोती मीरास नायक यांस चालत असे त्याउपरीं तानो बलाल राजवाडकार मजकुराचे अनुसंधान करून विसोवा राजवाडकार गांवांत आला त्यास किनरा गोसावियाच्या जागा होता तो घरा बांधावयासी दिल्हा त्या पासून राजवाडकर गावांत आहे तानो बलाल राजवाडकार मृत्य पावला त्याचे वंसीचें देशांतरास गेले त्याचें कोणी नाही याज प्रो कितेक काल गेले याज वरी दोन वर्षे वलव्यामुलें सेतें बुडाली व आगरें बुडाली गांवआगरी हि आगरे टाकून पलालें जुजवी वस्ती कोणी गावांत राहिले त्याज उपरीं विसा वर्षी सिवाजी माहाराज याचें राज्य जाहाले ढवलेयांचे आगरांवरी रामाजी राजवाडकार करंबलकराचे आगरावरी भानजी मधील वटारी हरबा याज प्रो राहिले खोती देशमूखाचे निा चालत आली सिवाजी माहा(रा)ज येऊन मारनिलेंस भेटोन गांवची कमाविसीं मागत होते नाईक कमाविसी न सांगत मग बालाजी रघुनाथ सेणवी यांणी भानजी विठल याचे अगत्य धरून गांवचीं कमाविसी सांगावी ह्मणौन बहुत प्रकारें सांगीतलें त्या वरून नाइकीं भानजी विठल यांसी कारभार सांगीतला व आपण नायकीं जाऊन राममट हरडीकर याज कडील कुणबी घेऊन भानजीचें स्वाधीन केले त्यां वरी भानजीने पांच वर्षे गांवची कमाविसीं चालविलीं गांवचा कारभार न

१ हा शब्द चित्पावन ब्राह्मण या अर्थी योजलेला दिसतो.

वोढें दिवाणची बाकी राहिली वसूल न पडे तेंव्हां भिकाजी विस्वनाथ नायकीं आपणा कडून कमाविसीस आपणा जवळून कमाविसीस आपणाकडून ठेविलें त्या वरी हंगामसीर बाकीचा व कर्ज येणे त्याचा तगादा लागला तेंव्हां कुणबीं फिताऊन रयता घेऊन पलोन राजापूरप्रांते गेला याचें राज्यांत बटाई जाहाली खोतांस गांवां मध्ये उपजीविका नाहीं तेंव्हां केशवनायक सरदेसाई होते त्याणीं गांवची खोती नारायणभट हरडीकर व भानंजी राजवाडकार यांसी चालवावयासी सांगीतली ते चालवीत होते मग माहाराज संभाजी राजेयांचे राज्यांत नरसापा कानडा सुखवस्तू गांवांत दोन वर्षे राहिला मग त्याणें लवाडी कबजीबावाचे वगीने तीन वर्षे गांवची खोती केली गाव न सोडी तेंव्हां रंगोबानायक सरदेसाई यांणी सेवड्या व हरडीकर व राजवाडकर या तीघांस गावीहून बोलाऊन आणून त्याज कदीम आगरी सेवड्या पुढे दिवाणात उभा करून वेंव्हार सांगोन पडतपावसी कानडा याची खोती दूर करून विठोबा सेवड्याचे स्वाधीन कारभार खोतीचे समंधे केला त्यास गांवचे उगवणीस मध्यस्थ नारभट हरडीकार व भानजी राजवाडकार घेतलें त्याउपरी भालेराई जाहाली काहीं दिवस धामधुमीत चौघाचा रिगाव चालत होता त्या उपरीं दोन तीन वर्षे गाव कुलीं वोसाड पडिला मग राजश्री रामचंद्रपंती रामाजी गुडेकार यासी चाकरी बदल गांव मुकासा करून दिल्हा तेंव्हां राजवाडकर रामाजीचें अर्धल करून होते रामभट व शंभुभट हरडीकर बाहेर होते गांवात येऊन कुणबावा देऊन होते पांच सांत वर्षी रामाजींचा मुकासां दूर जाहाला त्या वरी हरडीकरीं व राजवाडकार खोतीं करूं लागलें मग राजश्री नीलप्रभु याचे कारकीर्दीस गणोबानायकीं त्याची खोती दूर करून संभाजी अनंत आंबेकर खोतीचे मुतालकीस ठेविलें तेंव्हां गांवी लुकसान आलें मागंती गणोबा नाइकी रामभट हरडीकर यांसी खोतीं सांगीतली त्याणी चौं दिवाणांत जावयासी गांठ न पडे याकारितां विठोबा राजवाडकार यास वांटा दिल्हा

त्या उपरीं ती वर्षानीं नारो गोरपाडा याची धामधूम होऊन मुल्क व गावचे लोक परागंधा जाहाले तेव्हां विठोवा राजवाडकर बावडे प्रांत वेंगसरास गेला रामभट हरडीकर च्यार कुणबी होत ते हाती घेऊन देवरूख माहाली राहिले होते त्या उपरी दाहां अकरां वर्षी अंतोवा नायकी रामभट हरडीकर यांसी गावची लावणी करावयासी सांगितली तेव्हां भानजी राजवाडकर वेंगसराहून

लेखांक ४४]

श्रीरामप्रा

सौमित्राचे बाणी इंद्रजित निकुंबळे पडिला ॥ बाहु तयाचा सुलोचने प्रति सांगू पातला ॥ सुखसमेळीं सति असतां भुज द्वारि पडिला ॥ ओळखिला कर पतिचा जिव सुमतीचा घावरला ॥ हे अकस्मात विज माथां पडली की काय ॥ ˇ जशी गार जळाची पडतां वीरुनि जाय ॥ कशि गत जाहली प्राणनाथ मज सांगा हो तुमची ॥ प्रौढप्रतापी देशधडी तुह्मी केली सुरचमुची ॥ सुलोचना पतिव्रता सुंदरा दुहिता शेषाची ॥ इंद्रजिताची कांता गेली गुढी उभउन येशाची ॥ ध्रु ॥ १ ॥ घेउनी कागद दौत लेखणी भुजे पाशी बसली ॥ कळावा जी मज लिहुन काय गत कोठे ही घडली ॥ प्रेत करें त्या धरुनि लेखणी अक्षरें वर लिहिलीं ॥ निकुंबळे काळाचि उडि येउनि मजवर पडली ॥ वीर लक्ष्मणाचे बाणी पडलें शीर ॥ रुंढाची शकलें केली मारुन तीर ॥ शिर घेउनि गेले आहे जेथे रघुवीर ॥ स्मरण आहे जी भाष जाहाली येकांति तुझि आमुची ॥ वाट पाहात मी उभा राहिलो तव आगमनाची ॥ सुलोचना पतिव्रता ॥ २ ॥ समजला लिखितार्थ मनी गौरीहर आठविला ॥ मृत्युलोकिची वस्ति आमुचा ऋणांनबंध सरला ॥ सखीयानो भुज पतिने मजला मुळारि पाठविला ॥ उभा तिष्टतो धनी माझा गे बहुत वेळ जाहाला ॥ हे फोडुनिया भांडार वांटिलें धन ॥ शुक साळोंल्या मयुरें दिलि सोडून ॥ लिहिली भिंती

---

१ पुढील वंद गहाळ.

वर चित्रें करिति रुदन ॥ ह्मणति निर्मिळे कोणी उपेक्षा का केली आमुची ॥ कोण कर्म वोढवलें तुटली सुखसंगत तुमची ॥ सुलोचना ॥ ३॥ वाहुनियां भुज सींबिके प्रयाण लंके प्रति केले ॥ दशाननानें पाहुनि भुज लिखितार्थ वाचिले ॥ ह्मणे अद्दुष्ट हं संकट कैचें वो घडलें ॥ इंद्रजीत सुत निधांन माझें मृत्युपंथा गेलें ॥ हे मंदोदे

लेखांक ४५] [१६०९ पौष शु॥ १४

(२) देवरुख-देसाई

श्री तालीक


अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य
राजश्री गंगाजी दादाजी सुभेदार व
कारकून प्रांत राजापूर गोसावियासि

सेवक प्रऱ्हाद निराजी न्यायाधीश नमस्कार सु॥ समान समानीन अलफ ता॥ देवरूख येथील देशमुखीचा वेऱ्हार तिमाजी ना॥ बिन कान्होवा ना॥ देशमूख या मध्ये व रामाजी गोविंद या मध्ये वेऱ्हार लागोन हुजूर भांडत आले हुजूर यांचा करीना राजश्री छंदोगामात्य याही मनास आणोन निर्वाह केला की राजश्री छत्रपती स्वामिंचा तह की ज्याचे वृतीस तीस पसतीस वर्षे भोगवटा चालला असेल तो च खरा दुसरियास कथला करावयासी समंध नाही ह्मणौन आज्ञा तरी तिमाजी ना॥ याचे देशमुखीचा भोगवटा सालाबाद आजी तीस वरसे चालत आला आहे त्या प्रो॥ चालो देणे रामाजी गोविंद नवा च कथला करितो त्यास कथला करावयास समंध नाही सालाबाद चालत आहे त्या प्रो॥ चालो देणे या पत्राची तालीक लेहोन घेऊन असल तिमाजी ना॥ यांसि देणे छ १२ माहे रबिलोवल

---

१ पुढील बंद गाहाळ.

लेखांक ४७] [१६१६ आषाढ शुद्ध ७



अज दिवाण ठाणा तपे देवरूख ता। रयानी व ह्माडिगे मौजे उजरे खुर्द ता। + + सु॥ खमस तिसैन अलफ बदल देणे वृत वेद-मूर्ति मादेभट बिन हरभट पुरोहित गोत्र कौसिक आस्वलायन सूत्र + + + स्थल मौजे मजकूर पैकी बा। सनद सुभा छ २० रमजान साल गु॥ तेथें आज्ञा की वेदमूर्ति भट गोसावियानि राजश्री छत्र-पती स्वामी संनिध चंजीचे मुकामी जाऊन आपणास वृत करून दिली पाहिजे ह्मणौनु विनति केली त्या वरून राजश्री स्वामीने मनास आणिता बहुत भले ब्राह्मण सिष्ट सत्पात्र देखोन यासि नूतन वृति करून दिली तपे मजकूर पैकी दाभोली लारी २०० दोनसे लारीची वृति करून दिली तपे मजकूर पैको दाभोली लारी २०० दोनसे लारीची वृति करून दिली ऐसीयासी ब्राह्मण सिष्ट आहेत यासि पुत्र पोत्री चालिले पाहिजे या करिता यासि धर्मादाय पावत होता तो दूर करून सदरहू दोनसे पैकी हाली करार दाभोली लारी १०० एकसे लारीची वृती करार केली असे राजश्री अनाजी-पंताचे कारकीर्दीसि जमिनीसि धारा व गलियासि निर्ख आहे त्या हिसेबी शंभर लारीची पड जमीन चतु:सीमा करून नेमून देणें ह्मणौ-नु राजश्री पंडितराऊ याही लिहिले आहे त्या वरून सदरहू संभर लारीची वृती देविली असे सदरहू तहप्रमाणे पडजमीन मौजे उजरे खुर्द पैकी नेमून देणे सालमजकुरा पासून लागवड करून

लेखांक ४६] [१६०९ पौष वद्य १

श्री

अखंडितलक्ष्मी अलंकृतराजमान्य राजश्री गंगाजी दादाजी
सुबेदार व कारकून प्रांत राजापूर गोसावियांसि

पूर्वक कविकलश छंदोगामात्य आसीर्वाद सुा समान समानीन अलफ तिमाजीनाईक बिन कान्होवानाईक देसाई ताा देवरुख यांत व रामाजी गोविंद या मधे वृतीचा कथला लागोन हुजूर भांडत आळे ऐसियास राजश्री छत्रपती स्वामीचा तह आहे की ज्याची वृति तीस पंचतीस साला चाळोन भोगवटा असेल तो च वृतीवंत दुसरा कथळा करील तरी त्यास समंध नाही त्या वरून राजश्री प्रल्हादपंत न्यायाधीश यांस सांगितळे की यांचा करीना तुह्मी चौकसीने मनास आणून निवाडा करणे त्या वरून तिमाजी नाइकाचा व रामाजी गोविंद याचा कथळा न्यायाधीश याणी मनास आणिता तिमाजी नाइकाचा भोगवटा साळाबाद ताा साल गुदस्त पावे तो चाळत आळा आहे यास च वृतीस समंध रामाजी गोविंद मधे कथळा करितो त्यास कथळा करावया निसबत नाही ऐसा निर्वाह करून तुह्मास आपळे पत्र लेहून पाठविले आहे ते मनास आणून त्याच्या पत्रा प्रमाणे वर्तणूक करून जैसे साळाबाद चालत आळें आहे तैसे चालवणे नवी जिकीर होऊं ने दणे तालीक लिहून घेऊन असल पत्र तिमाजी नाइकास देणें जाणिजे छ १४ रबिलोवल पाा हुजूर

बार सुरु सुद बार
पौ छ १० रबिलाखर

योगक्षेम चालवितील या प्रमाणे भट गोसावियासि पुत्रपौत्री पाळीत जाणे सदरहू जमिनीच्या चतुसीमा करून सुभा लिहोन पाठवणे या प्रमाणे सनद सादर होईल ह्मणौनु आज्ञापत्र सादर होईल त्या वरून मौजे मजकूर पैकी पड जमीन स्थल गौळवाडा नेमून दिला असे चतुरसीमा

पूर्वेकडेस तळवडेचे परयापासून मारगा पावे तो सीमा मारग आरवली नजीक पाई व गोठण सीमा उतरे कडेस वेतालाची मळी व झाराडी पासून तहद चोरपरया देवरूख सीमा

पस्चमेस मारग व आखडका नजीक तहद सीमा परया तळवडी सीमा दक्षणेस चोरपरिया देवरूखची सीमा पासून तहद वेतालाची मळी व झाराडी पावेतो सीमा

येकूण जमीन चावर पांच हाताचे काठीने ०।९८२॥ पैकी वजा खडक झाड अजमासे ८३॥।१॥ बाकी जमीन ०।५।१ येकूण गला दसेरी ३॥०॥।० एकूण एक बेरीज दाभोली लारी

३६ मळा जमीन बिगे ८३।१ दर बिगा प्रा राजभाग सकट च्यार प्रती ०।२। एा भात दसेरी १८४ दर खंडीस लारी ३०

६४ वरकस जमीन अज बिगे ०।२ पैकी वजा निमे साल दरसाल कीर्दीस ८१६ बाकी निवल निमे जमीन ८१६ एकून गला च्यार प्रतीने दसेरी यो लारी

३२।३ नागली जमीन ८४ दर बिगा ८४॥ यो ०॥।३ यो

१४।९ हरीक ८४ दर ८४॥ यो ०॥।३ यो दर १६

७॥ सावे जमीन ८४ दर ८१॥।१॥ यो०।२

दर २०

९॥। तील जमीन ८४ दर ८॥।·॥। दर

सदरहू यो खंडी ८३।· दर खंडीस लारी ६०

६४

१००

एकूण गला दसेरी खंडी तीन खंडी पाउणे अकरा मण एकूर्न लारी एकसे एकूण जमीन सवा पंचतीस बीघे एक पांड थल गोलवाडा मौजे मजकूर पैकीं हद सीमा करून मोजून दिली असे देखील झाड माड दिले असे पुत्रपौत्री चालवीत जाणे वेठ बेगार व तडीतकासिमेचा उपसर्ग न लावणे प्रती लिहोन घेऊन असल भटगोसाविया जवल परतून देणे रा। छ ५ जिलकाद मोर्तब सूद

मोर्तब
सुद

लेखांक ४८ **१६१८ आषाढ वद्य १**

+ + + अनंत सरसुबेदार व कारकून वर्तमान व भावी सुभा प्रांत राजापूर गो।

अखंडीतलक्ष्मी अलंकृत राजमान्य

सेवक रामचंद्र नीलकंठ अमात्य नमस्कार सुहूरसन सबा तिसैन अलफ तानकोवा-नाईक देशमूख तपे देवरूख याणी हुजूर येऊन विदित केलें की राजश्री कैलासवासी छत्रपती स्वामीस देश अर्जानी जालिया वरी मुलकातील वतनदारांचे हक व इनामती दिवाणात अमानत केलिया बराबरी आपला हि हक व इनाम अमानत करून रयतनिसबतीने हक दाभोली लारी २०० दोनी सें करून दिल्हा त्या प्रमाणे चालत आहे ऐसियासि हाली मुलूख खराब पडला या करिता सारा हक पावत नाही त्या वरून साल गुदस्ता यासी पडी जमीन

लेखांक ४९] [१६२५ वैशाख वद्य ११

½ दोन

ग्रंद रास

श्री आई
आदि पुरुष नी
राजी शिवछत्रपती
स्वामि कृपानिधि त
स्य परशुराम त्र्यंब
क प्रतिनिधि

श्रीशंकर

ॐ) वेदमूर्ति राजमान्य राजश्री गो-विंदभट रेमणे नामजाद व कारकून वर्तमान व भावी तपे देवरूख यांसि परशराम त्र्यंबक प्रतिनिधी नमस्कार सुहूर--सन सलास मया व अलफ मा तानकोवानाईक बिन कान्होवानाईक देसाई ता। मजकूर हुजूर येऊन विनंती केली की आपणास हक व इनामत चालत आहे तेणे करून अवकात चालत नाहीं आपण कुटुंबवछ(ल) आहे स्वामीच्या पायाशी निष्ठेने वर्तणूक करीत आहो अशांस स्वामीनी बर-फड वतनदारास हक इनामती जाजती करून स्थापना केल्या आहेत तर श्वामीनी कृपाळु होउनु पेशजी चालत आहे त्या खेरीज जाजती इना-मती करून देउनु वतना वरी स्थापना होऊन योगक्षेम चाले यैसे केले पाहिजे ह्मणुनी त्यावरून मनास आणून तानकोबा--नाईक देसाई ता। मजकूर याणी एकनिष्ठपणे वर्तोन स्वामिसेवा केली खटपटे आणि कुटुंबवछल आहेत याचे चालवणें अगत्य या करीता कृपाळु होऊन पेशजी हक मोईन करून दिल्ही आहे ते व इनामत दोन बिघे चालत आहे त्या खेरीज हाली नूतन इनाम पडजमीन पैकी राजश्री अनाजी-पंताचे कारकीर्दीस जमिनीस धारा गलेयास नीर्ख असेल त्या प्रमाणें इनाम खेरीज दाभोली लारी १०० एक से रास इनाम देविले आहे तरी तुह्मी ता। मजकूर पैकी सदाहू बेरिजेची जमीन हकदार ईनामदार खेरीज करून कुलबाब कुलकानू देखील हालीपटी व पेस्तर पटी चालू

भात मळी जमीन बिघें ८३ तीन यांच्या थळा मध्यें देवविली होती त्या पैकी काही मा + + + जमीन देवविली आहे परंतु तेणे करून आपला औकांत चालत नाही या करिता स्वामी कृपाळू होऊन आपला हक आहे त्या खेरीज इनाम देवविला पाहिजे ह्मणौन तपसिलें विदित केलें त्या वरून मनास आणून हे एकनिस्ठ जाणोन यास मध्ये जमीन देवविली आहे ते दूर करून + + चा हक रयतनिसबती दोनी सें लारी आहेत त्या करार करून त्या खेरीज + + + भात मळी जमीन बिघें ८२ दोनी अवल दूम सीम तीन ही प्रतीची +++ नेमून देवविली आसें तरी सदरहू प्रमाणें दोनी बिघे जमीन भात मळी नेमून देऊन यांस व यांचे पुत्रपौत्रादि वौशपरंपरेस चालवीत जाणें सदरहू जमीन देवविली आहे या पैकी साल गुदस्तां यांच्या हका मध्यें जमीन देवविली होती त्या पैकी माहालीहून जमीन नेमून दिल्ही असेल त्याची कीर्दी साल मजकुरा कारणे याणी केली असेल ते जमीन वजा करून उरली जमीन पडीपैकी + + + + हून नेमून देऊन चालवीत जाणें नवीन पत्राचा आक्षेप साल दर साल करीत नव जाणें तालीक लेहंनु घेऊन असल पत्र परतून भोगवटियासि देशमूख मजकुरा जवलि परतून देणे जाणिजे छ १४ जिल्हेज सदरहू दोनी बिघे जमीन इनाम देवविली आहे या पैकी ह्या मध्यें जमीन देवविली होती त्या वरी कीर्दी केली असेल ते जमीन वजा करून उरली जमीन पडी पैकी देणे निदेश समक्ष

लेखन
सीमा समु
लमती

श्रीरामचं
द्रचरण नील
कंठ सोनदे
व शरण

बार सुरु सुद बार
गो छ १६ रविलावर

प्रतीची पडजमीन नेमून देऊन चतु:सीमा करून देऊन याचे दुमाले करणें त्याची कीर्द करून उपभोग करितील यासी व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इनाम चालवणे साल दर साल ताजे सनदेचा आक्षेप न करणे या पत्राची तालीक लेहून घेउनु मुख्य पत्र नाईक मारनुले जवलि परतोन भोगवटियास देणे जाणिजे छ २४ जिल्हेज पा। हुजूर

राजते
लेखना
वर्धा

बार सुरु सूद बार

लेखांक ५०]

(३) कऱ्हाड-गिजरे

[फारसी दोन ओळी]

साक्षी कामाक्षा तथा हानुमानू

[नांगराचें चिन्ह]

॥ ६) श्री स्वस्ति श्री साकु १४२९ वरीखे परभा वछरे आस्विनु वादि पचमी आद्यातवारु तेया दिवसी करुवे थाळ देको पाटैलु बीन इनाएकु पाटैलु वा खेळो पाटैलु वा नेगो पाटैलु वीगकरु वा वाटगुडी ।पिसळ वा साईदे पाटैलु वा तुकतेऊ वा रामीदेऊ वा सोनु गुडी वाडिका वाडिगा गुडी पु हे मुख्य करुनु सामास्ता पाटैलु गिजरेया भानाभट गोविंदभटें सी वींतीपत्र जोतिक आमचे गांवी ची जैसी पूर्वी आमाचां वडिले तुह्मा सी दिल्ही होती तैसी ची आह्मी दिल्ही ते तुवा आपुली (या) लेकुरा चा लेंकुरी चालावीजे हे आमा ची सत्या हेया बोला सी आन्यथा नाही

गोही

कानोजी मरारजी चोरडे
मादा उदोबा सेटी करुवे
मायी नाईक करुवे
लखुमण बाळो सुतारु करुव
भाई सेटी याई सेटी सोनारु कारुवे
राघो तुकदेऊ पा। सेडे तळघाटू

एकोजी केसोजी साळीया सो।
निगुडी पा। सातारे
पुरखादेऊ मोईगुडी सो। करुवे
बाबू डोईगुडू ताराळू करुवे
माळ दुदुमी सेटी मेहतरी कारुवे

खंडो पलिदेऊ कुळकर्णी रामरामे
नगरकुलकर्णी का। कऱ्हाड सही
मालिक चंदन साहेबु हवल करुवे
गुडो अंतोबा निसिंदा कारुवे
लिखिते भानोबा राघोबा
कुळकरणी कारुवे
पत्राप्रमाणें साक्ष अतो लाहीदेऊ

फारसी शिक्का

लेखांक ५१]

साक्ष कामाक्षी वा हनुमंत वा
कृष्णाभागीरथी

मल्हारजी गोदाजी सही [निशाणी नांगर आकृति]

॥ ६) स्वास्ति श्री सके १४६४ वरीख सुभकृत नाम संवछरें फळगुण वदी तेरसू वारु सणी तदीनी मौजे करुवें थळ गोदोजी बिन देको पटैळू या + + + + को पटैळू बिन वासुदेउ पटैळ

महजन कसबे कऱ्हाड व हकठुवार होउनु धर्मता निवारिता ज्याचे मिरासि होईल त्यासि देवणें अधर्म न कीजे ब्राह्मणाचे घर तुरकासी दिल्हे ह्मणे हे काय आहे आता याचे घर यासी दीजे दुसरेनी फिरी-यादी आलेया बरवे नव्हे जाणिजे लिखितदरशणें रघुभटाचे घर रघुभटाचे दुंबाला करूनु वेव्हारासि न पाठविसी तरी तूं जाणेसी पटेलगी करूनु वाईट काम हाती धरणें हराम आहे ते हे बरवे नव्हे याचे असबाबू घर देउनु याचे दुंबाला करूनु खुर्द वेव्हारसी पाठविजे मोर्तबू

लेखांक ५३] [१५१२ कार्तिक वद्य १



ॐ अज् रद्दतखाने खुदायेवंद मालिक सर्के मालिक बाबाजी काजे-आगळे दामदौलतहू तां हुदेदारांनि व मोकदमानि व रयानि मौजे कोडोली पा कऱ्हाड माळूम दाद कीं हर्ची सुासन तिसैन व तिसा मया जमीन बिघे १५ दरवझ इनाम बदल सदका बो रघुनाथभट बिन भानीभट जोसी जुनारदार मौजेमजकूर हद महसुलेसी दुंबाला कीजे तकरार न कीजे असल खुर्दखत जोसीमजकुरासी परतौनु देईजे तालीक तुह्मी लिहून घेईजे मोर्तब छ १४ माहे मोहरम

लेखांक ५४] [१५२४ चैत्र शुद्ध १० गुरुवार

श्री

श्री सकलगुणसंपन्न यजनयाजनादिकषट्कर्मनिरत राजमान्य राजश्री वेदमूर्ती मोरेश्वरभट व वीरेश्वरभट गिजरे गोसावी यासी श्रीकरा-

वा रवळ जयेक बिन कान जयेक वा नमादेऊ बिन रमागुडी व चिळोदेऊ बिन कमाल गुडी वा माद पुजगुडी बिन ऐदू गुडी वा कान्हु जयेक बिन एकू गुडी वा माद गुडी बिन डाई गुडी वा एकदेऊ बीन रूपगुडी हे मुख करुनु समस्तीं क्रिस्णा भट भान भट गीजरें सी लिहुनु दिले श्रीतीपत्र ऐसे जे तुमचया वडिले सी आमचेया वडिलानी पूर्वानिपूर्वी जोतिसश्रीती दीली होती तैसी ची आता आह्मी तुज दीली असे तुवा आपुले लेकुरा चे लेकुरी वीर्ती चालविजे हे आमचया वडिला चें सत्य भाक हेया बोला सि अनेथा नही

गोही

डाया बिन लखमण सुतारु करुवें	लाहिया नेमदेऊ न्हावी करुवें
तान्हा बिदू डोई गुडी तरळ करुवें	सेदा दरणे बीन पोमा दरणे करुवें
भीकु लाहीया अहीर करुवें	माळ दरणे बीन रीवा दरणे करुवें
तुका बीन साया गान्हर करुवें	साया लुया गान्हरु करुवें

मीया आबास साहेबू हवाल करुवें
क्रीस्णोबा नरसोबा सेणवी मौजे करुवें
लिखिते पिलोबा भानोबा कुळकर्णी करुवें
चंदन मादा मादई जमादारु करुवें
+ + + सेटी बीन दामो सेटी
+ + ळ कसबे करड सही

लेखांक ५२]

॥ श्री ॥ गोदो पटेल मौजे सेरी याप्रती केसवराय पंडित मजमूम मालिक दिवानआला आशिर्वाद उपरी रघुभटासि व गोविंदभटासि मौजेमजकुराचे जोइसीचे वेव्हार होते तेथे चि निवाड करणें ह्मणौउनु त्यासि तेथे पाठविलेया तुह्मी रघुभटावरी ज्यादती केले हे काय ह्मणिजे आतां हकहुरा व समस्त

(फारसी शिक्का)

च्यार्ये पंडितराय नमस्कार राज्याभिषेकशके २९ चित्रभानु संवत्सर चैत्र शुध दशमी गुरुवासरे मौजे सैदापूर राजेश्रीकैलासवासी स्वामीनी समस्त ब्राह्मण क्षेत्र कऱ्हाड यास सर्वमान्य आग्रहार देऊन सिवापूर नाव ठेविलें तेथील विभाग ब्राह्मणपरत्वें करुन जाबीता करून ध्यावयाविषई राजश्रीनी आह्मास आज्ञा केली आह्मी ब्राह्मण मनास आणून नावनिसीवार नेमणूक करुन पुर्वी जाबीता करून दिल्हा आहे त्या पैकी जे कोण्ही गयाल मयत होतील त्यांचे असामीचें जाबीते मध्यें नेमणूक आहे यैसियास जाबीतेचे वेळेस ब्राह्मण नव्हते ते कोणकोण्ही आह्मा पासी येऊन विदित करितातीं की जाबीतेचे वेळेस आपण सनीध नव्हतों आपल्या योगक्षेमाची कांही अनुकूलता होय यैसें केले पाहिजे ह्मणून विदित केले यैसियास सदरहू जाबीते मध्ये असामीचे नेमणूक आहे त्यापैकी गयाळ व मयत असामीचे नेमणूक पैकी भले ब्राह्मण साक्षर कुटुंबवत्सल जाबीते मध्यें ज्याची नेमणूक नाही त्यास यथायोग्य मनास आणून त्यास सदरहू ऐवज नेमून देऊन पावित जाणें प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणें तुह्मास एकंदर हे पत्र दिल्हे आहे जाणिजे छ ८ जिल्हेज सुा सलास मया अलफ पाा हुजूर हे विज्ञप्ती

शुभं भ
वंतु

लेखांक ५५] [१५४९ वैशाख वद्य ४

फारसी
शिका

फारसी मजकूर

अज दीवाण पाा करहाड ताा मोकदमानि वा रयानि मौजे कोणेगाउ

पा। मजकुर ब्रिदानद कीं हर्चों सुा सन सब्रा अशरीन अल्फ फर्मान हुा छ २५ माहे जिल्हेज दर साल सबा अशर व अलफ सादीर असे जमीन चावर ·॥· दर सवाद मौजे मजकूर बाा इनाम बदल सदका हजरती सिलेमानी बो आपदेभट बिन कृश्णभट जुनारदार बाजे ऊ द अवलाद व अफत्राद ऊ बमोजिब फर्मान साबिका मुतैन रवां अस्त

मौजे कोपर्डे खुर्द ·।· मौजे मजकूर चावर ·॥·

मेबायद के जमीन मजकूर बराये की सालाबाद रवा मूदा अस्त बादमा दस्तूर भोगवटा दोदा रवा दारद व बो माहासूल व नकदयाति वा जमील वा जिमात वा बेठबेगार वा फर्मायसी व कुल उजुहाति दुंबाले ऊ मायंद व हर साला फर्मान मूज दादन तल हद व देहीनि फर्मान साल बसाल जारी सानंद वा तालीक बदफ्तर सीतीदा असली फर्मान बाजे गुजारद बाा फर्मान बाजे गुजारद बाा फर्मान जरूर अंद ह्मणौउनु तरी बाा फर्मान सदई प्रमाणें इनाम भटमजकूर दुंबाले केले असे दुंबाला कीजे तालीक लेहून घेउनु असल मिसेली परतोनी दीजे मो।

(फारसी मोर्तब)

तेरीख १७ माहे शाबान

लेखांक ५६] [१५५५ अधिकवैशाखशुद्ध ९

ॐ

अज रक्तखाने मसुरल अनाम

नरसोजी हणगोजी अबाजी घादजी वा

१२ ऐ. मा.

धाराउ
कृरणाजी रामजी
साउजी

सिवजी भापतराउ

नाइकवाडी पा। करहाड मोकासाई मौजे कोणगाउ ता। हुदेदारानि मोकदमानि मौजेमजकूर माळूम दाद सु॥ सन सलास सलासीन अलफ दरवझ इनाम अंतीभट बिन अपदेभट मौजेमजकूर नीम चावर ·॥· बा। फर्मान रवा असे तुह्मी हरकत करूउनु इनाम दुंबाला करीत नाहीं हे काय मणजे अंतीभट मशारनिलेचे इनाम दुंबाला कीजे उजूरु न कीजे मा। माहासुल वा नकदयाति जकाये बा। फर्मान रवा असे कुलबाब दुंबाला कीजे तालीक लिहून घेउनु असल मिसेली परतून दीजे दरसाल मिसेलीचे उजूरु न कीजे मा। भटमजकुराचे इनाम आपुले कुणबियासि लावतील मोकासियानि करावेया निसबत नाहीं हे बाबे ताकीद असे मो

तेरीख ७ सौवाल

लेखांक ५७]   [१५७५ चैत्रशुद्ध ३

फारसी
शिक्का

फारसी मजकूर

बजानेब कारकुनानि पा। कऱ्हाड बिदानद की सु॥सन सलास खमसैन अलफ दरीविले अंतभट बिन आपदेभट नादूरदार से॥ पा। मजकूर हुजूर मालूम केले जे आपणासी इनाम जमीन ·॥· दर सवाद मौजे कोणेगाउ कुलबाब कुलकानू दुंबाला असे सालाबाद कारकीर्दी दर कारकीर्दी चालिले असे हाली साहेबास मुकासा

अर्जानी जाहाले माहाली ताजा खुर्द खताचे उजूर करितात ह्मणून तरी हे काय माना असे आता रसीदन खुर्द खत जुनारदार मजकुराचे इनाम सालाबाद कारकीर्दी दर कारकीर्दी ता। साल गुदस्त भोगवटा तसरुफाती चालिले प्रमाणे इनाम दुंबाला कीजे तालीक लिहोन घेउनु असल परतून दीजे (फारसी मोर्तब)

तेरीख १ माहे जमादिलाखर

लेखांक ५८] [१५७९

अज् रख़तखाने खुदायेवंद सा। अबदुलाखान मा। रेहान खुलीदयामदौलतहू बजानेब कारकुनानी पा। कऱ्हाड बिदानद सुा। समान (फारसी शिक्का) खमसैन अलफ आपदेउभट बिन कृष्णभट जुनारदार हुजूर मालूम केले कीं आपणास इनामजमीन चावर निम ·॥· दर क्षवाद मौजे कोणेगांउ पा। मा। देखील महसूल व नख़्तयाती सजमीळ वा जिकाती व बेठबेगार व फर्मासी कुल उजूहती बा। फर्मान पारसी व हुजती मुकासाइयानी व ठाणे सालाबाद कारकीर्दी दर कारकीर्दी भोगवटा व तसरुफाती बा। खूम हजरती वडे मलिक साहेब व तसरुफाती मलिक अलीशान ता। सालगु। चालिली आहे हालीं सालमजकुराकारणें, पा। मजकूर साहेबांस मुकासा अर्जानी जाला आहे माहाली कारकून ताजा खुर्दखताचा उजूर करितात नजर येनायेत फर्माउनु ताजा खुर्दखत मऱ्हामत होय मालूम जालें तरी सदरहू इनाम चावर नीम बा। फर्मान हुमायून व सालाबाद कारकीर्दी व दर कारकीर्दी व भोगवटे वजिरानी व खुर्दखत हजरती वडे मलिक साहेब व कारकीर्दी मालिक अजम तसरुफाती वडे मलिक साहेबांचे कारकीर्दीपासुनु ता। सालगु। जे

चालत आली असेली तेणे बा हुकूम खातिरेस आणउनु दुमाले कीज अवलियाद व अफलाद चालवीत जाणें दर हर साल ताजा खुर्दखताचा उजूर न कीजे तालिक लेहुनु घेउनु असेली भटमजकुरापासि फिराउनु देणें पा हुजूर रा चिताखान मोर्तब सूद

रुजू सुरु
निवीस

लेखांक ५९] [१५८१

फारसी
शिक्का

अज् दिवाण पा कऱ्हाड ता मोकदमानी मौजे कोपर्डे खुर्द पा मजकूर बिदानद कीं हुर्ची सुा सितैन अलफ दरी विला नरहरीभट गिजरे साकिन पा मा माळूम केले कीं दा फर्मान हुमायून अजराये मऱ्हामत इनाम दर सवाद मौ मार जमीन चावर ·|· तीस बिघे आंपणास चालिले आहेती दरी वख्त खलेल पाऊन भोगवटा जाले नाहीं हाली नवा मुकासा जाला आहे त्या मुकासाइयानी बा फर्मान दुमाले खून सादीर केले आहे तरी दरी बाब ठाणाचे मिसाल होए ह्मणौन माळूम केले तरी भटमजकुरास अजराये मऱ्हामत बा फर्मान इनाम मौजेमारीं बिघे ·|· यास हाद माहदूद घालून कुलबाब दुमाले करणें व अवलाद व अफवाद चालवीत जाणे बिलाकसूर इनाम चालवणें तालिक लिहून घेऊन असली इनामदार मापासीं देणें

लेखांक ६०] [१५८३ पौषशुद्ध ११

अज् रख्तखाने राजश्री जाधवराऊ राजे राजेसाहेब खूलेदयामदौलतहू

वजानेब कारकुनानि पा। कऱ्हाड बिदानद सु॥ सन इसने सितैन अलफ दरी विले आपदेऊ भट बिन कृस्णभट

फारसी शिक्का

जुनारदार हुजूर एऊन मालूम केले जे आपणास इनाम जमीन चावर ॥ दर सवाद मौजे कोर्णेगाऊ पा। मा। देखील महसूल नख्तयाती व जमील वा जिमाती व वेठबीगार व फर्मासी कुल उजुहाती बा। फर्मान पारसी व भोगवटे वाजिरानि कारकीर्दी दर कारकीर्दी सालाबाद चालत आले असे हाली पा। मा। साहेबास मुकासा अर्जानी जाला माहाली कारकून ताजा खुर्द खताचा उजूर करितात साहेबी नजर एनायत करून दुमाला खुर्द खत मऱ्हामत केले पाहिजे मालूम जाले तरी सदरहू इनाम जमीन चावर ॥ बा। फर्मान हुमायून व भोगवटे वजिरानि कारकीर्दी दर कारकीर्दी सालाबाद तसरुफात ता। साल गुदस्त चालत आले अमेल तेणे प्रमाणे खातिरेसी आणून दुमाला करणे बअवलियाद व अफलाद चालवीत जाणे दर हर साल ताजा खुर्द खताचा उजूर न कीजे तालीक लेहून घेऊन असल खु॥ जुनारदार मजकुरास फिराऊन देणे पा। हुजूर रा। मा। आनंदराऊ

फारसी मोर्तब

तेरीख ९ माहे जमादिलावल

जमादिलावल

लेखांक ६१] [१५८४ आषाढवद्य १२

फारसी शिक्का

फारसी मजकूर

फारसी शिक्का

अज सरसुभा खानअलीशान सीपै दयालतदौरा रुसली मेजयादल-

लेखांक ६२] [१५९२ माघवद्य २

अज माहाल देसमुखी पाा कराहाड व सरदेसमुखी माहाला निहाये

फारसी शिक्का

तां मोकदमानि देहाये ताा मसूर

मौजे बुा	काा मजकूर	नागदणे
१ʃ०	१ʃ०	१ʃ०
गारवडे बुा	मौजे आईतवाडे	मौजे कविठे
१ʃ०	१ʃ०	·॥·
मौजे सेरवण	मौजे सीरगाउ	नाडोली
·॥·	·॥·	·।·

सुाा इहिदे सबैन अलफ मौजे मजकुरी सदरहू धर्मादाऊ आहे ये बाबे राजेश्री सुभेदारसाहेबी तागीद फर्माविली असे तरी दरहाल पैके पाठविजे ये बाबे दराज लिहिणे नलगे दरहाल पैके पाठविजे याकामाबदल मखुमभाई अफवाद पाठविला असे पैके दरहाल पाठविजे राा

फारसी शिक्का

तेरीख १५ रमजान

लेखांक ६३] [१५९२

श्री

अज रुदतखाने खादायेवंद

सैदल सावात अवलियाद रसूल सैदलतीफ साहेब हुजुरीं मोकासाई मौजे कोणेगाउं काा हवेली पाा करहाड दयाम दौलतहू तां हुदेदारानी व मोकदमानी मौजेमजकूर मालूम दाद सुहुर-सन इहिदे सबैन अलफ दरी विले आपदेवभट बिन कृष्णभट जुनारदार सेकीन पाा मजकूर हुजूर येऊन मालूम केले जे आपणासी इनाम

दअयामदौलतहू बजानिब कारकुनानि हाल व इस्तकबाल व देस-मुखानि पा। कऱ्हाड बिदानद सु॥ इसने सितैन अलफ दरी विला बो आपदेउभट बिन कृसणभट जुनारदार हुजूर माल्हुम केले कीं आपणास इनाम जमीन चावर नीम ·॥· दर सवाद मौजे कोणेगाउं पा। मा। देखील महसूल व नख्तयाति व जमीळ वा जिकाती व बेट-बेगार व फर्मासी व कुल उजुहती बा। फर्मान पारसी व हुजती मुका-साइयानि व ठाणे सालाबाद कारकीर्दी दर कारकीर्दी व खुर्देखतें अब्दुलाखान मा। रहान माजी मुकासाइ तेणेंप्रमाणे तसरुफाति ता। सालगु॥ चालत आली आहे दरी वख्त मनउन साहेबांचे निसबतीनें जाले आहे माहली ताजा खुर्दखताचा उजूर करिताती दरी बाबे सरं-जाम होय माल्हुम जाले तरी आपदेउभटमजकुरास सदरहू इनाम जमीन चावर नीम ·॥· दर सवाद मौजे मजकूर बा। फर्मान हुमायून व भोगवटे माजी मुकासाइयानि सालाबाद कारकीर्दी दर कारकीर्दी व खुर्देखते सा। अब्दुलाखान मा। रहान माजी मुकासाई तेणेप्रमाणें तसरुफाति ता। सालगु॥ चालत आली असेली तेणे बा। हाली हि खातिरेस आणौनु सदरहू इनाम दुमाले कीजे अवलियाद व अफलाद चालवीत जाइजे दर हर साल ताजा खुर्दखताचा उजूर न कीजे तालीक लेहौनु घेउनु असेली इनामदार मजकुरापासी फिराउनु दीजे पा। हुजूर मोर्तब सुद

फारसी
मुद्रा

तेरीख २५ माहे जिलकाद
जिलकादी

नीम चावर जमीन दर सवाद मौजे मजकूर माहसूल नकदयाति उजुहति कुलबाब कुलकानू दुंबाला असे सालाबाद कारकीर्दी दर कारकीर्दी ता। सालगुदस्ता चालिले असे हाली साहेबासी मोकासा अर्जानी जाहले असे माहली ताजा खुर्देखताचा उजूर करिताती साहेबी नजर इनायेत फर्माऊन खुर्देखत मरहामत करणें ह्मणूनं तरी बराये मालूमाती खातिरेसी आणूनु यासी नोम ·॥· चावर जमीन इनाम + + + +

लेखांक ६४] [१५९१ भाद्रपद

अज दिवाण ठाणा ता। कारवे ता। मोकदमानि मौजे वाघेरी ता। मजकूर सु॥ सन इसने सबैन अलफ बा। सनद सुभा रवाना छ १६ माहे रबिलाखर पौ छ. १७ मि॥ तेथें रजा जे दरी विला नरहरीभट बिन अंतभट गिजरे अध्यापक सो। कऱ्हाड हुजूर येऊन मालूम केले जे अपण अध्यान करून असतो अपणास काही इनाम खाऊन अध्यन करून असीर्वाद देऊन सुखी असोन ह्मणउन तरी बराये मालुमाति खातिरेस अणून नरहरीभट बिन अंतभट अध्यापक सो। कऱ्हाड यासि इनाम दर सवाद मौजे वाघेरी ता। मजकूर अवल जमीन धु॥ पैकीं सालसाती मि॥ बिघे ०१५ पंधरा देखील महसूल ना।याति वा बाजे उजहाति कदीमपटिया वा जदीदपटिया कुलबाब कुलकानू अजरामऱ्हामत करून दिल्हे असे दस्तीबाद देउन हाद माहामुद घालून देणें दरसाला ताजा सनदेचा उजूर न करणें तालीक लेहून घेउन असल परतून दीजे ह्मणऊन रजा रजेबा। अमल करणे तालीक लेहून घेउन असल परतोन दीजे

फारसी मुद्रा

लेखांक ६५] [१५९४ पौषशुद्ध ३

फारसी
शिक्का

अज् दीवाण ठाणा कर्याती कासेगाऊ किले पनाला ता। मोकदमानि देहाय मौजे तांदले मौजे रेटरे का। मा। सु॥ सन सलास सबैन अलफ दरी विले नरहरिभट बिन अंतीभट गिजरे मा। पा। कऱ्हाड यानी हुजूर एऊन माद्धम केले जे आपणास इनाम धर्मादाऊ होन २ असे ता। साल गुदस्त चालिले असता हाली साल मा। ताजा मिसलीचे उजूर करितातो ह्मणोऊन माद्धम केले बराये मालुमाती खातिरेसी आणून मिसेली सादीर केले असे तरी इनामदार मजकुराचे होन २ दोनी बि॥ मौजे तांदुले होन १ मौजे रेटरे होन १ बा। सालाबाद ता। साल गुदस्त प्रमाणे आदा करणे तालीक लेहून घेऊन असल परतून दीजे दरी बाब कुली ताकीद असे पेस्तर याचे फिरयादी येऊ न दीजे फिरयादी आलिया तुह्मी जाणा मोर्तूब सुद

फारसी
शिक्का

तरीख १ माहे रमजान
रमजान

लेखांक ६६] [१५९९ वैशाखशुद्ध ३

श्री

मूळ तालिक बाळबोध

॥०॥ श्री सदाव्रतार्धाश प्रसन्न ॥०॥

॥०॥ स्वस्ति श्रीनृपशालिवाहन शके १५९९ पिंग ०॥

॥०॥ ळ नाम संवत्सरे वैशाख शुध अक्ष त्रीती ०॥

॥०॥ या तद्दिने मल्हारि गोस्वामी सदाव्रताधी ०॥

॥०॥ श तपोनिध इनामदाराचा इनाम चावर ०॥
॥०॥ आर्ध मौजे भोवलें त्यामध्यें राजेश्री वे ०॥
॥०॥ दमुर्ती विश्वनाथभट गिंजरे वास्तव्य ०॥
॥०॥ क्षेत्र कऱ्हाड यांसि बिघे ८१५८ पंध ०॥
॥०॥ रा अक्षइ पूर्वापार दिला आसे ०॥
॥०॥ यांसि नाश करील त्यास कुळक्ष० ॥
॥०॥ य गुरुद्रोह घडेल यांसि देव ब्रा ०॥
॥०॥ ह्मण साक्ष

श्री

लेखांक ६७] [१६०० चैत्रवद्य ११ रविवार

मूळ तालिक बाळबोध

॥०॥ सदाव्रताधीशप्रसन् ॥ ० ॥

॥०॥ स्वस्ति श्रीनृपशालिवाहन शकें १६ सोवळाशें ०॥
॥०॥ वर्षें काळयुक्ताक्षी नाम संवत्सरे चैत्रवदि ०॥
॥०॥ येकादशी रविवासरे तद्दिने मल्लारि गोस्वामी ०॥
॥०॥ सदाव्रति तपोनिध मुकाशा इनाम मौजें ०॥
॥०॥ नाडोली यीहिं राजेश्री वेदमूर्त्ति ०॥
॥०॥ विश्वनाथभट्ट गिजरे वास्तव्य कऱ्हाड क्षेत्रे ०॥
॥०॥ यांसि भूमिदान इनाम मौजें मजकुरीं रुके०॥
॥०॥ ८३ तीन अक्षइ परंपरा दिला आहे यांसि ०॥
॥०॥ सहसा उछेद न करावा यदर्थी उछेद करणारा ०॥
॥०॥ स शास्त्रमर्यादेमधे शफत जे लिहिलें ते ०॥
॥०॥ आहेति कुलबाबेने यांसि दिला आसे ०॥
॥०॥ यांसि अन्यथा करील त्यास कुळक्षय ०॥
॥०॥ गुरुद्रोह होयील यांसि देवब्राह्मण साक्ष

लेखांक ६८] [१६०२ पौषशुद्ध १०
मूळ बाळबोधींत लिहिले आहे.

श्री काळभैरवप्रसन्
श्री काळभैरव साक्ष

शके १६०२ वर्षे रौद्रनाम संवत्सरे पौष शुद्ध १० दशमी तद्दिनी राजेश्री रुद्रभट्ट गिजरे याशि अपदेभट्ट गिजरे यानि खंडपत्र लेहुन दिले जे तुह्मी वाराणशिहुन आलेशि आणि विभाग मागितला तरि अह्मी तुह्मास भाग दिधला यास तपशिल घर व वृत्तिचे धान्य व भांडि व वृत्ति व संहितेचाभाग व देव व लिंग व पश्चादि पंच धातु ऐसा तृतीय भाग तुझा तुज दिला असे व सर्वाचा भाग व तोळा मासा रुका अडक वडील दादा असता तुझा तुज दिला होता तो तुह्मास पावला व वृत्तिचे कागदहि तृतीय भाग दिला असे व अणाचा भाग तृतीय दिला असे व अमचा अह्मास पावला परस्परे कोणाचे कोणा संबध अर्थ अर्थ लेकराचे लेकरी संबध नाहि व यास अन्यथा करील तो देव ब्राह्मणाचा अपराधी व पंचमहापातकाचा दोषी अह्मी अपल्या संतोषे तुमच्या करभागी अंश अला त्यास अह्मी परसात अपल्या अंशात गज दोनि पश्चम भागी वाटे कारणे दिले होते यानंतर दुर्मति संवत्सरी अधिक वदि दशमीस पत्र फाळिले दोघे झगडो लागलो मग सभासतानि उभयतास समजाउन गज १ देविला वाटे कारणे गजा वेगळी भींति सरदेची भिंति उभयतानि यालावि यावेगलि पश्चमेची भिंति रुद्रभटाची हे सत्य वळि २२ पत्र प्रमाणे अपदेभट्ट मान्य चिरास उत्तरे मिति २३

गोहीं पत्रप्रमाणे गिजरे तिमणभट्ट
साक्षी हरिभट वैद्य साक्षि
महादेव भट्ट वैद्य साक्षि नरहरि भट्ट वैद्य
अपदेभट्ट वलवाडे साक्षि माहादे भट्ट ढवली पत्रप्रमाणे साक्षि

लेखांक ६९] [१६०६ माघकृष्ण ७ रविवार

श्री

कृष्णा ककोभती

स्वस्तिश्री नृप शालवान सके १६०६ वरशे रक्ताक्षी नाम संवत्सरे माघमासु कृ(ष्ण)पक्षे सप्तमी रविवासरे तदिनी वेदमूर्ती राजेश्री रुद्रभट गिजरे वास्तव्य कन्हाड थाप्रती कानोजी राजे सिरके दंडवत विनंति उपरी आह्मी श्री संगमीचे तीर्थपुरोहितपण तुह्मास दिले असे तुह्मी श्री अभिसेख करणे प्रतिवरसी वरसासन होन ७ सात तुह्मास देऊन ते क्षेत्री भक्षून आह्मास आसीरवाद देणे आमचे वौशपरंपरानें जो होती ते तुमचे वौशेपरंपरेने चालवितील हे विनंति

लेखांक ७०] [१६१५ श्रावणवद्य १४

++++
+ +++ +
कर्ण भोसले
+ + +

आज्ञापत्र राजश्री कर्णराजा भोसले देसमूख प्रा। कन्हाड व सरदेसमुखी माहाय ताहा मोकदमानी मौजे वडगांव पा। मजकूर सु॥ अर्बा तिसैन अलफ वेदमूर्ती विस्वनाथभट बिन नरहरभट गिजरे सा। कसबा कन्हाड ब्राह्मण भले योग्य कुटुंबवछल योगक्षेम चालविला पाहिजे याकरिता मौजे मजकुरी देशमुखीचा इनाम आहे त्यापैकी जमीन बिघे ०३ तीन बिघे वृतीकरून दिल्ही असे लेकराचेलेकरी चालवावे ऐसा निश्चय केला आहे तरी तुह्मी मौजे मजकूर देशमुखीचा ईनाम पैकी सदरहू जमीन भटगोसावी याचे स्वाधीन करणे तेथील उपभोग भटगोसावी करतील प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न

करणे तालीक लेहून घेऊन असल परतोन देणे छ २७ जिल्हेज मोर्तब सुद तीन बिघेयाचे उत्पन्न भटगोसावियाचे पदरी घालणें दरसाला ताजा खुर्दखताचा उजूर न करणे जाणिजे

लेखांक ७१] [१६१७ आषाढवद्य १४

दा। बे॥ मोकदमानि मौजे दुसेरे पा। करहाड सु॥ सीत तिसैन अलफ कारणे साहेबाचे बंदगीस लेहून दिल्हा हाजीर–जमान–कतबा ऐसा जे बीजमानत बो। कासी पा। व जोगोजी पा। व नारोवा कुलकर्णी मौजे वडगाव यासि हुजूर आणून रजा फर्माविली जे तुह्मी सुभा येऊन गावीची हकीकत हाजीर करावी कस्ट मशाखत करून गाव लावावा तेथील जो आकार होईल तो सुभाचे सनदेनें ज्यास देऊन त्यास द्यावा दरम्याने मुकासी ह्मणऊन कोण्ही येईल याचे फितवियांत न पडावे सुभा आकार करून ज्यास देऊन त्यास द्यावे हिलाहरकत फितवा फादडा न करावा येखादेचा जमान मागितला तरी आपण जमान असो गावीची कीर्दी मामुरी करितील जे समई सुभाचा हुकूम येईल ते वेलेसी हाजीर होतील हिलाहरकत फितवा फादडा करणार नाहींत सुरलित वर्ततील ह्मणऊन जमान मागितला तरी आपण हाजीरजमान असो सदरहूप्रमाणें वर्ततील जरी वर्तनात तरी हाजीर करून हाजीर करू न सको तरी त्याचे तालुकातीचा जाब करून हा कतबा सही (नांगर)

तेरीख२७
जिल्हेज

लेखांक ७२] [१६१८ श्रावणवद्य १०

स्वस्ति श्रीनृपशालिवानशके १६१८ धातनाम संवत्सरे दक्षणायने वरीसारितु श्रावणवदी दशमी तदिनी वेदमुहुर्ती मोरेश्वरभट बिन

विश्वनाथभट व तिमणभट बिन भास्करभट गिजरे वृतवंत मौजे बडगाऊं का प्रा करहाड यासी व जोगोजी पटेल व बहिरो ब्रह्माजी कुलकर्णी मौजे मजकूर सुहूरसन सबा तिसैन अलफ लेहून दिले पत्र ऐसे जे पूर्वी वृत्तवंत होता भोगवटा उठला होता हाली समस्त मिलोन तुह्मास मिरासी करून दिली असे सेत बावती धुराग धोंडा कोठार जमीन धुरंग मुले बिघे ८२५ पंचवीस पटिया दोनी दिले असे व घरजागा नजिक धार सेटी तुलहस्त अर्जहस्त सेत व जागा मिरासी करून दिली असे लेकराचेलेकरी दिली असे सुखरूप राहणे यासी कोणी हिलाहरकत करील त्यासी ब्रह्म-हत्येचे पातक व वाराणसीमधे गोहत्या वध केलेचे पातक हे आपले ईमान सही

हजीर मजालसी

मौजे मजकूर

मलजी पटेल व मानाजी पा	खेत्रोजी बिन धाऊजी मुलीक
शमन बिन शेखूभाई वेसराखा	खोतवाडी मौजे कारवे
	मौजे टेंबू
गणेशभट बीन तिमणभट जोसी मौजे केडेगांव व हिंगणगांव	रखमाजी बिन नरसोजी पटेल
	दताजी बिन + + + + पटेल

मौजे नेरली का सुवरे

भैरोजी बिन खंडोजी पाटील खंडो अनंत कुलकर्णी मौजे ता अपसिंगे खादल सुवली	अंताजीराम कुलकर्णी मौजे वीरवडे
भिकाजी जागनाळे देशकुलकर्णी का निमसोड माईणी व गांव-कुलकर्ण देह ६ साहा	
मौजे गुलसरे १	मौजे सिरसोडी

मौजे आबेड १ मौजे गोरेगाऊ
कसबे निमसोड मौजे वळेचेगाऊ

लेखांक ७३] [१६१९

अज् रख्तखाने खुदायेवंद खान अजम अकरम न्यामतखान किलेदार व फौजदार किले मछींद्रगड सुहुर समान तिसैन अलफ सन ४१ ता। देसकानी प्रा। कऱ्हाड व मोकदमानी मौजे सैदापूर पा। मा। हा गाव जुनारदार भटजी सेकीन का। कऱ्हाड यास ईनाम कुलबाव कुलकानू ईनाम दिले असे जुनारदार मजकुरास दुमाला मौजे मजकूर करणे जुनारदार किर्दी मामुरी करून सुखे राहतील व बाजे रयता व मोहतर्फा कुले आणून गाव मामुरी करून सुखरूप असणे बलकुबलीस किले मजकुरा खाले जन पोगड घेऊन येणे ये बाबे तुह्मास अजार लागणार नाही तालिक लेहून घेऊन असल परतून माघारे दीजे

लेखांक ७४] [१६१९ श्रावणवद्य २

श्रीराम

सौ। मोकदमानी मौजे सैदापूर उरूप सिवापूर पा। कराहाड यासी रुद्राजी चंदो देसकुलकर्णी पा। कराहाड सुा। समान तिसैन अलफ बो। सनद राजेश्री पंडितराउ तेथे आज्ञा केली की श्रीचा अभिसेक बारा महिने वेदमूर्ती वीरेस्वरभट बिन विस्वनाथभट गिजरे सेकिन का। कराहाड हे राजेश्री छत्रपत स्वामीचे तीर्थपुरोहित यासी आज्ञा केली जे श्रीचा अभिसेक बारा महिने करावा तेणेकरून राजेश्री छत्रपती स्वामीचे कल्याण व राज्याचे कल्याण होये ह्मणोन वेदमूर्तीस अभिशेक सांगितला त्यास उपजीविकेस इनाम जमीन दर सवाद मौजे सैदापूर उरुफ सिवापूर तेथें जमीन बिघे ।।। तीस असल देविले आहेती वेदमूर्तीचे दुमाला कुलबाब कुलकानू हाली-पटी व पेस्तरपटी दुमाला केले आहे सदरहून जमीन भटगोसावी

याचे दुमाला करणें ह्मणोन आज्ञा आज्ञेप्रमाणें राजेश्री सरसुभाची सनद आहे त्याप्रमाणें वेदमूर्तीचे दुमाला इनाम स्वाधीन करणें दुसरेने बोभाट येऊं न देणें जाणिजे रा छ १५ माहे मोहरम

लेखांक ७५] [१६१९ श्रावणवद्य ८

श्री

राजेश्री भानजी गोपाल सुभेदार व कारकून वर्तमान भावी सुभे प्रांत कराड मोसावियांसि

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य रामचंद्र निलकंठ अमात्य हुकुमतपंना नमस्कार सुाा समान तिसैन व अलफ कसबे कराड येथील क्षेत्रीचे ब्राह्मणास मौजे सैदापूर प्रां कराड या गावचे नाम शिवापूर ठेऊन अग्रहार करून दिल्हे आहे ते समई मौजे माारचे वृत्तिवंत यानी विदित केले की ब्राह्मणास मौजे माार अग्रहार करून दिल्हे आहे ऐसीयास आपले ईनाम आदलशाहचे काराकिर्दीस चालत होते ते राजश्री कैलासवासी छत्रपती स्वामीस हा देश अर्जानी जाहला त्यानी अमानत केले आहेत ते देविले पाहिजेत ह्मणोन विदित केले त्यावरून मनास आणूनी मौजे मारच्या वृत्तिवंतास ईनाम होते त्या पौ देविले असे जमीन

पाटील बीघे

।

श्रीरेणुका देवी

८१५

माहार पाच बिघे

८५

कुलकर्णी बिघे

८१५

सुतार बिघे

८५

आंबिकरी पांच बिघे

८५

येकूण पंच्याहत्तर बिघे जमीन देविली असे तर तुह्मी मनास आणून यांच्या ईनामती पूर्वी आदलशाहाचे कारकिर्दीस चालत होते ते मनास आणोन त्या पौ सदरहू जमीन अवल दूम प्रतीची जमीन

नेमून देऊन याचे दुमाले करून यास व याचे पुत्रपौत्रादिवंशपरंपरेने चालवित जाणे नवीन पत्राचा आक्षेप प्रतीवर्षी करीत न जाणे या पत्राची तालीक लेहून घेऊन असल पत्र परतोन भोगवटियास देणे जाणीजे छ २१ मोहरम

लेखांक ७६] [१६१९ श्रावणवद्य ८ शुक्रवार

श्री

जाबीता राज्याभिषेकशके २४ ईश्वर नाम सवत्सरे श्रावणवदी आस्टमी भृगुवासरे पुरातन नाम मौजे सैदापूर हाली सीवापूर नाव ठेऊन श्रीकऱ्हाड क्षेत्रवासी समस्त ब्राह्मणासी खेरीज पुरातन ईनामदार व हकदार करून पुरातन सीमा पुस्ता राजश्री पंत अमात्य यानी कृष्णाककुद्मतीसंगमी सहिरण्यकुशोदक अग्रहार करून दिले त्याचे नेमणुक नावनिसीवार करून दिल्हे त्या प्रा पाववावे मौजे मजकूर अदलशाहाचे कारकीर्दीस चावरातीचे मोईन प्रा अज् जमीन बा। धुरुंग झाडा चावर १९८·

यासी वजा जमीन ईनामदार

८१५ रेणुका देऊ

१०· देशाई

·॥· देशकुलकर्णी

·।· पाटील ·।।।· १० पैकी

८१५ कुलकर्णी ·।५ पैकी

८५ सुतार

८५ माहार

८५ अंबीकर

·।· वीरेश्वरभट बिन विश्वनाथभट

२८१५ गायरान

४॥·

१४ ऐ. मा॰

बाकी जमीन चावर १४॥· येकून आकार गला कैली खंडी दसेरी सोळुले मापे १४८।१॥·

अवल काले १२॥१५ दर १० माल जमीन १॥।१५ येकून १२६।· दर ७॥· येकुन १४८१।·

तपसिल

यासी देवस्थाने व ब्राह्मण नेमणूक गला १३७॥१८·

तपसिल

धर्मादाये देवस्थान व ब्राह्मण गला कैली दसेरी सोळुले मापे १३२॥१

देवस्थान

	गलादसेरी	तेलवजनी
रेणुका	·।२	ऽ२।·
हणुमंत	८३॥।·	८१८५
पावकेश्वर	८३॥।·	८१८५
जलदेवता	ऽ३॥।·	८१०५
येकवीरा	ऽ३॥।·	८१८५
मसीद	·।·	ऽ१८५
	१।२	·।२॥।५

ब्राह्मणानी

हजीर

२८· मोरेश्वरभट बिन विश्वनाथभट गिजरे

१ऽ· बालंभट बिन रामभट गिजरे

१८· विश्वनाथभट बिन बालंभट गिजरे

१ऽ· नीलकंठभट बिन हरभट गिजरे

२८· नारायेणभट बिन पोसभट ढवलीकर

१८ चंद्रभट बिन संभढवलीकर

·॥।· रामभट बिन चंद्रभट ढवलीकर

१८· लक्ष्मणभट बिन महादेभट ढवलीकर

१ऽ· बाबदेभट बिन नीलकंठभट गीजरे

१ऽ· नरसीभट बिन आपदेभट गिजरे

१ऽ· केशवभट बिन पंढरीभट गिजरे

·॥· महादेभट बिन पंढरीभट गिजरे

१ऽ· अनंतभट बिन कृष्णभट गिजरे

·॥· कासीभट बिन सामराजभट गिजरे

·।· हरभट बिन सामराजभट गिजरे

·।· रुद्रभट बिन नरहरीभट गिजरे

·।॥· सीवरामभट बिन नरसीभट गिजरे

१ऽ लक्ष्मणभट बिन रुद्रभट गिजरे

·॥· गधादरभट बिन रुद्र भट गिजरे

१ऽ वीरेश्वरभट बिन विश्वनाथभट गिजरे

१ऽ हरभट बिन भानभट वैद

१८ गोविंदभट बिन पोसभट ढवळीकर

·।॥· महादेभट बिन चंद्रभट ढवळीकर

१॥ बाळकृष्णभट बिन हरभट पुराणीक ढवळीकर

१८ विटलभट बिन लिंगभट आगन्होत्री भीलवडीकर

१८ गोविंदजोसी बिन हरजोसी

·।॥· लक्ष्मणजोसी बिन गोविंद जोसी

१८ अंतभट बिन रुद्रभट धडके

·।॥· आपाजोसी बिन अंतजोसी

·।॥· नरसीभट बिन तुकणभट धोंडी

·॥· आपभट बिन रघुनाथभट हरसे

·।॥· विठलभट बिन नारायेणभट हरसे

·।॥· अनतवैद बिन कृस्णवैद आधापक सो पंढरपुरकर

·॥· विनायकभट बिन सारंगभट गरुड

१८ महादेभट बिन कृस्णभट पटवर्धन

१८ हरभट बिन गोविंदभट पुराणीक

·।।। सीवरामभट बिन पुराणीक

१५ प्रव्हादभट बिन नरहरीभट पटवर्धन

१८ कृस्णभट बिन नरहरीभट पटवर्धन

·।।· बहीरवभट बिन देवभट गिजरे

१५ महादेभट बिन सीवभट वैद

१८ रामभट बिन सीवभट वैद

·।।· हरभट बिन तमाणभट गीजरे

१८ गधाधरभट बिन विनायेक-भट खीरसागर

१८ मनोहरभट बिन विनायेक-भट खीरसागर

·।।· हरभट बिन विनायेकभट खीरसागर

·।·· रामभट बिन गधाधरभट खीरसागर

१८ रामभट बिन विस्वनाथभट वलवडे

१८ महादेभट बिन विस्वनाथभट ढवळीकर

१८ सीवरामभट बिन बाळंभट ढवळीकर

·।।· कृस्णभट बिन नरसीभट वलवडे

·।।· नारायेणभट बिन नरहरीभट वळवडे

·।।· चेमणभट बिन हरभट वलवडे

१८ माहादजोसी बिन हरजोसी कऱ्हाडकर

·।।· मोरेश्वरजोसी चिंतामणजोसी कऱ्हाडकर

·।।· मुकुंदजोसी बिन नारायेण-जोसी कऱ्हाडकर

-।।· अंतजोसी बिन येळजोसी कऱ्हाडकर

·।।· कृस्णजोसी बिन येळजोसी कऱ्हाडकर

·।।· रामजोसी बिन चिंतामण-जोसी कऱ्हाडकर

·।।· कृस्णभट बिन नरसीभट सागणी

१८ लक्ष्मणभट बिन हरभट वैद
·॥· बालंभट बिन हरभट वैद
१८ नरहरीभट बिन भानभट वैद
·॥· धोंडीभट बिन नरहरीभट वैद
१८ जीवभट बिन भानभट वैद
·॥· चिंतामणभट बिन जीवभट वैद
१८ आपदेभट बिन त्तिमणंभट खीरसागर नगरउपाध्ये
·॥· गणेशभट बिन आपदेभट खीरसागर नगरउपाधे
·॥· सीवरामभट बिन बालंभट खीरसागर नगरउपाधे
१८ अनंतभट बिन विनायेकभट आरणके
१८ बहीरंभट बिन विनायेकभट आरणके
·॥· सीवरामभट बिंन विनायेकभट आरणके
·।· लक्ष्मणभट बिन अंतभट आरणके
·॥· त्रिबकभट बिन अंगणभट खीरसागर
१८ रघुनाथभट बिन नरहरीभट पटवर्धन

·॥· आपदेभट बिन सारंगभट गरुड
·॥· रघुनाथभट बिन नारायेणभट हरसे
१८ रामभट बिन त्रीबकभट जरे
·॥· बालंभट बिन नागदेभट वलवडे
·॥· नरसीभट बिन नागदेभट वलवडे
·॥· सदासीवभट बिन वैजंभट सीरालेकर
·॥· आणंभट बिन महादेभट आटकेकर
·॥· गीरी बिन लक्ष्मण पुजारी
·॥· गोविंदभट बिन कृष्णंभट पाठक
१८ रामभट बीन कासीभट
१८ सदाशिवभट बिन नारायणभट अयाचित
१८ रघुनाथभट बिन महादेभट अयाचित
·।२ गदाधरभट बिन नरसीभट साळवेकर
·।· शंकरभट बिन तिमणभट मारूलकर
·॥· हरभट बिन तोरभट वलवडे

१८ नारायेणभट बिन हरभट जावले

•|||- बालंभट बिन नारायेणभट जावले

१८ नरसीभट बिन कोनेरभट जाबले

———
३||

———
४||

गैर हाजीरी ब्राह्मण

१८ कृस्णभट बिन नारायेणभट गिजरे

१८ भानभट बिन कृस्णभट गिजरे

१८ तीमणभट बिन हरभट गिजरे

•||• गणेशभट बिन कृस्णभट गिजरे

•|• वीरेश्वरभट बिन भानभट गिजरे

१ दतंभट बिन बहीरंभट गिजरे

•||• गोपालभट बिन दतंभट गीजरे

•||• भगवंतभट बिन नरसीभट खीरसागर

१८ नरसीभट बिन विश्वनाथ खीरसागर

१० सीवभट बिन निलकंठभट अगन्होत्री

१८ आपदेभट निलकंठभट अहः। न्होत्री

•||• रुद्रभट बिन निलकंठभट अहः। न्होत्री

•|||- सखोउतमभट बिन सीवभट अहः। होत्री

१८ तोरभट बिन बावदेभट वालवडे

१८ गंगाधरभट बिन रघुनाथभट वालवडे

•||• आनंतभट बिन संभभट सागणी

•||• लक्ष्मणभट बिन संभभट सागणी

•||- भटंभट बिन विश्वनाथभट वलवडे

।। कासी पाठक बिन अंतभट पाठक डोईफोडे

।। वीस पाठक बिन अंतपाठक डोईफोडे

।। कृस्णपाठक बिन अंतपाठक डोईफोडे

१ आनंत पाठक बिन विश्वनाथ पाठक

।। त्रिंबकभट बिन गोविंदभट पुराणीक

।। चीलंभट बिन निलकंठभट खीरसागर

१ नागदेभट बिन संभभट उवराणी

।।। रघुनाथभट बिन विस्वनाथभट अयाचित

३२।।

।। महादेभट बिन कृस्णभट सागणी

१ गणेशभट पाठक बिन नरसी पाठक

२६।२

३२।।

५८।।।२

वैस्णव

१ कृस्णभट बिन गोविंदभट टोणपे

।।। श्रीनिवासभट बिन आनंदभट टोणपे

१ महादेभट बिन हरभट टोणपे

।।। वेंकटभट बिन तिमणभट टोणपे

१ रामभट बिन तमणभट टोणपे

।।। यादवभट बिन तिमणभट अयाचित

-|||- वासुदेवभट बिन नरसीभट गिजरे
-||- विश्वनाथभट बिन त्रिंबकभट गिजरे
-||- गोपालभट बिन गोविंदभट मोने
-||- मेरुभट बिन हरभट मोने
-|||- मुकुदभट बिन रामकृसणभट खीरसागर
-||- सीवरामभट बिन आपदेभट वळवडे
१|| नरसीभट बिन आणंभट वळवडे
+ + भट बिन संभभट ढवळीकर

१८|-

२१८

वैस्णव ब्राह्मण

१८ अश्वथाच्यार्य
१८ केसवाचार्य
१८ भीमाचार्य बिन कृस्णाचर्या
-|||- कोनेरी बिन कृस्णाचर्या
-|||- नरहरी बिन कृस्णाच्यार्ये
-|||- नारायेणभट बिन
२८ रगाच्यार्ये बिन नारायेणाच्यार्ये आवदानी
-||- शेशभट आस्टपुत्र
१८ नरसीभट मुजेमणी
१८ वेकणभट मुजेमणी
१८ हरभट मुजेमणी
-||- तिमणभट येरी
१८ नरसीभट छुट्ठुफुटू अध्यापक
-|||- रामभट घलसासी
-|||- बसाच्यार्ये
१८ वेकटभट रोटे
१८ गीरभट काले
-||- शेशभट रोटे
१८ भिमाच्यार्ये वरखंडे
१८ नरसीच्यार्ये बिन तीमणाच्यार्ये वरखंडे
१८ रघुनाथभट बीन
१८ कोनेरभट झीजडे
-||- कृस्णभट मुजेमणी
-||- माधवभट मुजेमणी
-||- आमणभट कुंभारी
-||- शेशभट कुंभारी

-॥- नारायेणभट लुटुफुटू
-।॥- वेंकटभट बिन तीमणभट सरडे
-।२ अंतभट बिन भीमाच्यार्ये घलसासी
———
१२॥२

-।॥- शेशभट बिन नारायेणभट येरी
-॥- हणमतभट बिन नरसीभट लुटुफुटू
१० रामभट बीन नारायेणभट व आंतभट बिन विठलभट जाबले
———
१२।
१३॥२
———
२६८२

माहाल मजकूर व बाजे खर्च

माहाल मजकूर होनु
३८ तुषार दर माहे देखील लिहीणार
१ अफराद दर माहे
—
४
येकून च्यार होनु

बाजे खर्च अग्रहारची खटपट करावी व कागद करून आणावे लागताती यासी दसरेरी सो ४ खडी जो कार्येभागासी जातील येतील त्यानी यथाविभागे वाटोन घ्यावे

येकूण नेमणूक प्रा मौजे मजकुरीचे उत्पन वाटून घ्यावे व मौजे मजकुरी वसातीमुले मोहूतर्फा व नख्तबाब घरटका व पुसटका व नदीशकर व तरकारी व रोकडा व जकायत व वोरवनी व बाजे उत्पन होईल ते ब्राह्मणानी नेमुणूक प्रा येथा विभागे वाटोन घ्यावे ब्राह्मणा वेगले कोणास घ्यावयास मज नाही सुा समान तिसैन अलफ ६ २१ माहे मोहरम

———

१५ ऐ मा.

लेखांक७७] [१६११ श्रावणवद्य ११ सोमवार

श्री

श्री सकल–गुण--मंडित वेदशास्त्रसंपन्न राजमान्ये
राजश्री समस्त ब्राह्मण क्षेत्र कऱ्हाड स्वामीचे सेवेसी

॥ॐ)

विनती स्नेहपूर्वक राजा कर्ण भोसले देसमूख व सरदेसमूख पा। मजकूर दडवंत सु॥ समान तिसैन आलफ तीर्थ--स्वरूप राजश्रीछत्रपति स्वामी कृपाळू होऊन मौजे सैदापूर पा। कऱ्हाड याचे नाव शिवापूर ठेऊन अग्राहर करुन देणे ह्मणऊन राजेश्री रामचंद्र पंडित अमात्य यास आज्ञा केली त्यावरून त्यानी सर्वमान्य आग्रहर करून दिल्हे ऐसे असता तुह्मी समस्त ब्राह्मण आह्मापासी येऊन विदित केले की स्वामीची देसमुखी व सरदेसमुखी मौजे मजकुरी हक आहे तो आपणास धर्मादाऊ दिल्हा पाहिजे ह्मणऊन विदित केले त्या वरून तुह्मास देसमुखी व सरदेसमुखी याचा जो हक आहे तो तुह्मास धर्मादाऊ करून दिल्हा असे ऐसीयास तुह्मी वौसपरंपरेने पुत्रपौत्री भक्षून अह्मास व राजेश्री छत्रपति श्वामीस कल्याण चितून सुखरूप राहणे यासि अन्यथा करील त्यास धर्मशास्त्राची वचने आहेत

स्वदत्तां पर दत्तां वा योहरे	स्वदत्ता द्विगुणं पुण्यं
च वसुंधरां ॥ श्वधिष्टा	पर--दत्तानु -पालनं ॥
यां कृमी भूत्वा पितृभिः	परदत्तापहरणं स्वदत्तं
सहमज्जति ॥ १ ॥	निष्फलं भवेत् ॥

ऐसी ।।।के स्मरोन यासि कोणी कथला करणार नाही तुह्मी सुखरूप राहणे श्वस्ति श्री शके २४ ईश्वर नाम संवत्सरे श्रावण वदी एकादसी

ईंदु वासरे तारिख २४ मोहरम बहुत काये लिहिणे

लेखनसी
मार्विरा
जते ॥

लेखांक ७८] [१६१९ श्रावणवद्य ८ नंतर महिन्या भरानें

श्री कृष्ण।

अज सरसुभा राजश्री भानजी गापाळ सरसुबेदार व कारकून सुबा प्रांत कऱ्हाड ताहां मोकदम मौजे सिवापूर पा। कऱ्हाड सुहुरसन समान तिसैन अलफ बा। सनद राजश्री छत्रपति स्वामी छं २१ मोहरम शके २४ ईश्वर नाम सवत्सरे श्रावण बहुल अस्टमी गुरुवासरे व बा। सनद राजश्री पडितराऊ छ २१ मोहरम पैवस्तगी छ १२ सफर तेथें आज्ञा केली ऐसी जे कसबे कऱ्हाड ए स्थलींच्या ब्राह्मणास पूर्वी आदलशाहांचे कारकीर्दीस कितेक वृत्ती होत्या त्यास अलीकडे तीर्थरूप माहाराज राजश्री कैलासवासी छत्रपती स्वामीस देश अर्जानी जाला त्यांही कुल वतनदारांच्या वृत्ती अमानत केल्या त्यां बराबरी

ब्राह्मण घ्या हि वृत्ति अमानत करून ब्राह्मण पाहोन त्यास धर्मादायाची मा:ई। करून दिल्ही होती त्या प्रमाणें चालत आले सांप्रत धामधूम जाली त्या मुळें देश खराब पडला यास्तव देवविल्या धर्मादाया प्र णें चालत नाही ह्मणून हे ब्राह्मण कष्टी होताती अैसीयासि हे राज्य ह्मणजे मऱ्हाष्ट देवा ब्राह्मणां चे आहे एथे इ. इ. इ.

लेखांक ७९] [१६१९ भाद्रपदशुद्ध १ शनिवार

श्री

॥०
लक्ष्मीकांतप
दांभोजभजनाप्त
समुन्नतेः ॥ धर्मसंव
र्धिनी मुद्रा श्रीकर
स्य विराजते

कृष्णाभागीरथी

श्रीसकलगुणमंडित अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री भानजी गोपाळ मुख्य देशाधिकारी व देसलेखक वर्तमानं भावी सुभा प्रांत कऱ्हाड गोसावी या प्रती श्रीकराचार्ये पंडितराऊ आशीर्वाद राज्याभिशेकशक २४ ईश्वरनामसंवत्सरे भाद्रपदसुधे प्रतिपदा मंदवासरे वेदमूर्ती वीरेश्वरभट बिन विस्वनाथभट गिजरे सेकीन कसबे कऱ्हाड हे राजश्री छत्रपती स्वामीचे तीर्थपुरोहित यासी आज्ञा केली जे श्रीचा अभिशक बारामहिने करावा तेणेकरून राजश्री छत्रपती स्वामीचे कल्याण व राज्याचे कल्याण व्हावे ह्मणौन वेदमुर्तीस अभिशेक सांगितला त्यासी उपजीवकेस ईनाम जमीन दर सवाद मौजे सैदापूर

उर्फ मौजे सीवापूर तेथे जमीन बिघे तीस देविले आहेत वेदमुहुर्तीचे दुमालेकरणे कुलबाव कुलकानू हालीपटी व पेस्तरपटी दुमाले केले आहे सदरहू जमीन वेदमुहुर्तीचे स्वाधीन करणे ते भुमीचा उपभोग करून घेतील प्रतिवरसी नूतनपत्राचा आक्षेप करीत नव जाणे प्रती लेहून घेऊन मुख्यपत्र वेदमुहुर्तीपासी परतून देणे छ २९ मोहरम सुहुरसन समान तिसैन अलफ पा हुजूर हे आशीर्वाद

(शुभं भ वतु)

वारसूद
पौ छ ५ माहे सफर

लेखांक ८०] [१६१९ भाद्रपदशुद्ध १

श्री

(श्रीरामचं द्रचरण नील कंठ सोनदेव शरण)

राजश्री आधवराऊ सेनापती गोसावी यासि

ऽ॥ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित रामचंद्र नीलकंठ आसिर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीयकुशललेखन करणे विशेष कऱ्हाडक्षत्रीं बहुत थोर स्पिष्ट ब्राह्मण आहेत त्यास राजगृहीहून धर्मादायाचा विभाग पावोन योगक्षेम त्या ब्राह्मणांचा चालत नाही याकरिता हाली सैदापूरगाव होता त्यास सीवापुर नाव ठेऊनु समस्तब्राह्मणांस अग्रहार करून गांव दिल्हा आहे तरी तुम्ही आपले तर्फेने मौजेमजकुरास कोणे हि गोष्टीचा उपसर्ग न लागे ते गोष्ट करवणे वरकडहि सरदारास ताकीद करून कोणचा हि उपसर्ग न लागे असी गोष्ट करणे अवघे ब्राह्मण मिलोन अग्रहार अनभऊनु

राजयास अभ्युदय चिंतीत असी गोष्ट केली पाहिजे छ २९ मोहरम बहुत लिहिणे तरी तुम्ही सुज्ञ असा

लेखन
सीमा समु
ल्लसती

बार

लेखांक ८१] [१६१९ पौष शुद्ध १५

श्री

श्रीरामचं
द्र चरण नील
कंठ सोनदेव
शरण

राजश्री सुभानजी नलगे हवलदार व रायाजी बालिजी सबनीस किले मलकार्जुनगड गोसावीयासि

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो रामचंद्र नीलकंठ अमात्य आसिर्वाद अनुक्रमे नमस्कार सुहुरसन समान तिसैन अलफ मौजे सईदापूर ताा कऱ्हाड हा गांव कऱ्हाडकर ब्राह्मणास अग्रहार दिल्हे मौजे मजकूर खराब तेथील मोकदम बापूजी पाटील याने तुमचे तक्षिमेचे सेत मौजे भडकंबे येथे केलें होतें त्यांस कौल देऊन आपल्या वतनावरी आणो ह्मा बदल जोगोजी जाधव बारगीर किले वसंतगड यांस पाठविले ऐसीयास तुह्मी आपली सेते मखून घेऊन पटेलमजकुरांस वतनावरी जावयास रजा द्यावी ते गोष्टी न करिता पटेलमजकुरावरी गजर करून मार देऊन गुरे ढोरे देखील बिशाद कैद केली आणि रजा देत नाही हे गोष्टीनें तुमचे हीत कैसे होईल ब्राह्मणास गांव अग्रहार दिला हुजूरून कौल त्यांस दिल्हा असतां त्यास मार देऊन नागविलें आहे हा अन्याये येकवेळ क्षमा केला या उपरी पत्रदर्शनें पटेलमजकुराची गुरे व वस्तभाऊ जरा मजरा देऊन आपल्या

वतनावरी जावेया रजा देणे फिरोन बोभाट आला ह्मणजे तुमची भीड राहणार नाही हे बरें समजणें आणि पटेलमजकुरांस कोणी मारिले काशा बदल मारिलें तो फतेखान् मुसलमान आहे तो कोणाकडील त्याचा शोध करून त्यास सजा देणें आणि त्यास हुजूर पाठविणें आणि बापूजी पाटिलांस निरोप देऊन गांवावरी रवाना करणे व त्याची वस्तभाव जरा बजरा नेली असेल ते फिराऊन देणें हे पत्र लिहिले आहे याप्रमाणें वर्तणूक केली नाहीं आणि बोभाट आला ह्मणजे रायाजीपंतीं तुह्मास शब्द विशेश लागेल हे जाणोन लिहिले प्रमाणे वर्तणूक करणे जाणिजे छ १२ जमादिलाखर निदेस समक्ष.

लेखन
सीमा समु
ल्लसती

लेखांक ८२] [१६२० ज्येष्ठवद्य १३

श्री

कैलासवासी

लक्ष्मीकांतप
दांभोजभजनास
समुन्नतेः धर्मसंव
र्द्धिनी मुद्रा श्रीकर
स्य विराजते

श्री सकलगुणमंडित अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री तिमाजी यमाजी देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी सुभा प्रांत सातारा गोसाविया प्रांती श्रीकराचार्ये पंडितराय आसिर्वाद राज्याभीशेकशके २५ बहुधान्य नाम संवत्सरे जेष्टबहुल त्रयोदसी स्थिरवासरे वेदमूर्ती गोपालभट बिन रामभट गिजरे वास्तव्य कसबे कऱ्हाड यांनीं वसंत-गडीच मुकामी समाप येऊन विदित केले की आपले वडील वेदमूर्ती

आपदेभट बिन कृष्णंभट गिजरे यासी पूर्वी इदलशाईचे कारकीर्दीस मौजे कोणेगव्हाण ता। उंबरज प्रांत सातारा येथे ईनाम भुमी चावर अर्ध होता बहुत दिवस चालत होता त्या अलीकड वेदमूर्ती आपले पितामह नरहरभट बिन आनंतभट हे हि कांहींयेक दिवस उपभोग करून करीत होते त्या उपेरी हा देश राजश्री स्वामीस हस्तगत जाहला ते समयी कुल ईनाम अमानत करून धर्मादाय धान्य देविले होते ते पावत होते त्या अलीकडे वेदमूर्ती वाराणसीस गेले हा देश हि तांब्राचा उपद्रवा करिता उध्वस जाहला आपण हि स्थानचळण होऊन गेलो होतो सांप्रत राजश्री चा देश राजश्री स हस्तगत जाहाला ऐकोन स्वस्थलांस आलो असो व वेदमूर्ती नरहरभट वाराणसीस वास्तव्य करीत आहेत योगक्षेम चालावयास उपाय नाही तरी पूर्वील आपली ईनाम भुमी आपणास देविल्या तेथे अन्न उत्पन्न करून आपला योगक्षेम चालवून व वेदमूर्ती वाराणसीस आहेत त्यास हि कांहीं अन्न प्रविस्ट होईल तेणेकरून स्नानसंध्यादीक वैश्वदेवादीक सत्कर्मे आचरोन अहिर्निषी राज्यास अभिवृधी चिंतून सुखरूप राहून ह्मणून त्यावरून मनांस आणिता वेदमूर्ती नरहरभट वाराणसीस वास्तव्य करीत आहेत व गोपालभट हि भले ब्राह्मण विद्यासंपन्न कुटुंबवत्सल आहेत त्यांचा योगक्षेम चालिला पाहिजे ह्मणून मौज मजकूर पैकी ईदलशाही कारकीर्दीचा ईनाम भुमी बिघे दिल्हे बितपसिल

नरहरभट बिन अनंतभट गिजरे वास्तव्य वाराणसी बिघे ।०	वेदमूर्ती गोपालभट बिन रुद्रभट गिजरे वास्तव्य कऱ्हाड बिघे ।०

येकून अर्ध चावर भूमी ईदलशाही कारकीर्दीचे मोईनेचा दिल्हा असे तरी तुह्मी सदरहू प्रमाणे मौजे मजकूर पैकी भुमी वेदमूर्तीचे दुमाला करून पुत्रपौत्रादिवंशपरंपरेने चालवणें तेथे वेदमूर्ती अन्न उत्पन्न करून आपला योगक्षेम व वेदमूर्तीचे पितामह नरहरीभट वाराणसीस आहेत

त्याचा योगक्षेम चालऊन स्नानसंध्यादिक वेदाध्यायन सत्कर्मे आचरोन अहिर्निशी राज्यास अभिवृधी चिंतून सुखरूप असतील प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणे प्रती लेहून घेऊन मुख्यपत्र वेदमूर्तीपासि। परतून देणे जाणिजे छ जिल्हेज मुा। तिसा तिसैन अलफ हे आशीर्वाद

शुभं भ
वतु

लेखांक ८३] [१६२० ज्येष्ठवद्य १३

श्री

लक्ष्मीकांतप
दांभोजभजनास
समुन्नतेः ॥ धर्मसंव
र्धिनी मुद्रा श्रीकर
स्य विराजते

म्न॰

श्री सकलगुणमंडित अखडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री भानजी गोपाळ मुख्यदेशाधिकारी व देशलेखक प्रांत कऱ्हाड वर्तमान व भावी गोसावी यास प्रति श्रीकराच्यार्ये पंडितराये आसीरवाद राज्याभिशेक-शक २५ बहुधान्य नाम सवछरे जेस्ट वदि त्र्ययोदसी स्थिरवासरे वेदमूर्ति ब्राह्मणसमुदाये वास्तव्य कऱ्हाडक्षेत्र यानी समीप येऊन विदित केले की आपणास पूर्वी आदलशाहाचे वेळी गाउगना इनाम होते तेणे कडून आपला योगक्षेम चालत होता त्या उपरी देश राजश्री माहाराजास हस्तगत जाहाला त्या वेळेस इनाम अमानत ठेऊन ब्राह्मणास धर्मादाये दिल्हे होते तेणे कडून योगक्षेम करून होतो त्या नंतर ताम्राचे राजक्रात जाली त्यामुले देश उद्वस्त जाला आह्मी ब्राह्मणसमुदाये येऊन राजश्री रामचद्र पंडित यांचे दरशण घेतले त्यानी मौजे सैदापूर पा। कऱ्हाड हा गाऊ कृस्णाकोहिनासंगमी आहे तो आह्मास

अग्राहार करून दिल्हे आणि सिवापूर नाव ठेविले आह्मी तेथे काही कीर्दी करून आपले अंन उत्पंन्न होत आहे स्वामी या प्रांतास आले भोगवटीयास आपले पत्र दिल्हे पाहिजे ह्मणौऊन विदित केले त्या वरून मनास आणिता वेदमूर्ति ब्राह्मणसमुदायास राजश्री रामचंद्र पंडित अमात्य यानी मोजे मजकूर अग्रहार करून दिल्हे या विसी त्याचे पत्र आहे व आह्मांकडील ही पत्र आहे ऐसियास येथील उत्पन्न होईल तेणेकडून स्नानसंध्यादिक सत्कर्मे करून राजश्रीस व राज्यास कल्याण चिंतून असतील यास्तव मौजे सैदापूर पा। कऱ्हाड परियाये-नाम सिवापूर हे गाऊ ब्राह्मणसमुदायास वास्तव्य कऱ्हाड यास सर्व-मान्य इनाम पुत्रपौत्रादिवंशपरंपरेने दिल्हे आहे सुरक्षीत चालवणे येथे हालीपटी व पेस्तरपटी कुलबाब कुलकानू खेरीज हकदार व इनामदार करून जलतरुपाषाणनिधिनिक्षेपसहित सर्वमान्य इनाम करून दिल्हे आहे उत्तरोतर चालवणे प्रतिवरसी नूतन पत्राचे आक्षेप न करणे मुख्य पत्राची प्रति लेहून घेऊन मुख्य पत्र परतोन देणे छ २६ जिल्हेज सुहुरसन तिसा तिसैन अलफ पा। हु[illegible]

(शुभं भ वतु)

लेखांक ८४ **१६२० आषाढ शुद्ध ८**

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेकशक २५ बहुधान्य नाम संवत्सरे आशाढ शुध अस्टमी भोमवासर क्षत्रियकुलावतंस श्री राजाराम छत्रपति याणी

(० श्री राजाराम नरपति हर्ष निधान मोरेश्वर सुत नीळकं ठ मुख्य प्रधान)

राअजी भानजी गोपाळ मुख्य देशाधि-कारी व देशलेखक वर्तमान व भावी सरसुभा प्रांत कऱ्हाड यासि आज्ञा केली ऐसी जे वेदमूर्ति ब्राह्मणसमुदाय वास्तव्य कसबे कऱ्हाड क्षेत्र याणी स्वामीसमीप वसंतगडीच्या मुकामी येऊन विदित केलें कीं आपण ब्राह्मणसमुदायास आदलशाहाचे वेळेसी इनाम

भूमि चालत होती त्या उपरी महाराज राजश्री कैलासवासी स्वामीस देश अर्जानी जाला त्याही कुल वरवाटे वतनदार यांची इनामे अमानत केली ते समई आपली इनामत ही अमानत करून ब्राह्मण पाहोन त्यास धर्मादायाची मोईन करून देऊन पाववीत होते तेणेकडून योगक्षेम चालवून क्षत्रवास करून आपली सत्कर्माचरणे करून राहिलों होतो त्या उपरी अलीकडे देशांत ताम्राची प्राबल्यता विशेष जाली होती तेणेकडून देश उद्वस जाला कितेक ब्राह्मण स्थलांतरे गेलो होतो ऐसियास महाराजाचें प्रतापें कडून पुन्हा मागती देश स्वामीस हस्तगत जाला आहे महाराज देवब्राह्मणप्रतिपालक आहेत यास्तव महाराजांचे राज्यांत. आह्मी अवघे ब्राह्मणसमुदाय येऊन पुन्हा स्वस्थलीं राहिलों परंतु देश कितेक खराब पडिला आहे याकरिता धर्मादाऊ मोईन प्रमाणे पावोन आपला योगक्षेम चालत नाहीं यास्तव राजश्री रामचंद्र पंडित अमात्य यांशी ईस्वर संवत्सरी वसंतगडीच्या मुकामी होते तेथें विनंति केली त्यावरून त्याही मनास आणून धर्मादाऊ मोईन प्रमाणे पावत नाही ह्मणून धर्मादायाची मोईन होती व आदलशाहाचे वेळेस इनामत होती ते कुली दूर करून ब्राह्मणसमुदायास अग्रहार मौजे सैदापूर पा। कऱ्हाड हा गाऊ आहे त्याचे नाव सिवापूर ठेऊन कऱ्हाड क्षेत्रीं ईस्वर संवत्सरी जन्माष्टमीचा पर्वी यथायोग्य संकल्प करून स्वामीच्या नांवे धाराउदक घालून अग्रहार देऊन आपले पत्र व राजमुद्रेचें पत्र करून दिल्हे आहे व ब्राह्मण पाहोन यथाविभाग भूमि वाटून देवऊन राजश्री पंडितरायाचें पत्र करून देवविलें आहे त्याप्रमाणे मौजे मजकूर कुलाबाव कुलकानू हालीपटी व पेस्तरपटी व जलतरुपाशाणनिधिनिक्षेप सर्वमान्य खेरीज हक्कदार व इनामदार करून चालत आहे ऐसियास स्वामी या प्रांते आले आहेत तरी सदरहूप्रमाणे अग्रहार चालविलेयां स्वामीस व स्वामीच्या राज्यास कल्याण चिंतून आपली स्नानसंध्यादिक सत्कर्माचरणें करून क्षेत्रीं वास करून राहोन ह्मणून

विस्तारें श्रुत केलें त्यावरून मनास आणिता ब्राह्मणसमुदाय विशेश बहुत थोर विद्वाण आहेत यांचा योगक्षेम चालून सुखरूप क्षेत्रवास करून राहिले पाहिजेत ह्मणून रामचंद्र पंडित अमात्य येंही आदलशाहाचे वेळेसी इनाम होता व आपल्या राज्यांत धर्मादाऊ होता तो कुळी दूर करून मौजे सैदापूर पा। कऱ्हाड या गांवचे नाम सिवापूर ठेऊन मौजे मजकूर प्राचीन सीमायुक्त खेरीज हकदार व इनामदार करून कुलबाब कुलकानू हालीपटी व पेस्तरपटी व जलतरुपाशाण व निधिनिक्षेप सहित सर्वमान्य दिल्हे आहे त्याप्रमाणे करार करून दिल्हे असे तरी ब्राह्मणसमुदाय क्षेत्र कसबे कऱ्हाड यास व याचे पुत्रपौत्रादि वौशपरंपरेस उत्तरोतर चालवीत जाणे नवीन पत्राचा आक्षेप प्रतिवर्षी करीत नव जाणे सदरहू गाव कसबे मजकुरीच्या ब्राह्मणास अग्राहार करून दिल्हा आहे यास कोणी मऱ्हास्ट होऊन खलेल करील त्यास श्रीवाराणसीमध्ये गोहत्येचे पातक व मुसलमान होऊन जो खलेल करील त्यास त्याच्या महजबाचा शपत आहे ये विशी धर्म शास्त्रींची वाक्यें

स्वदत्तां परदत्तां वा यो हरेत वसुं-
धरां ॥ सविस्टायां कृमि भूत्वा
पितृभि:सह मज्जति ॥ १ ॥

स्वदत्ता द्विगुणं पुण्यं परदत्तानु-
पालनं ॥ परदत्तापहारेण स्वदत्तं
निष्फलं भवेत ॥ १ ॥

ऐसीं पातकें स्मरोन वेदमूर्तिसमुदायास सदरहू गाव अग्रहार चालवणे नवीन पत्राचा आक्षेप प्रतिवर्षी करीत नव जाणे या पत्राची प्रति लेहोन घेऊन मुख्य पत्र परतुन भोगवटीयास वेदमूर्ती जवळी देणे लेखनालंकार

मर्या
देयं विरा
जते

लेखांक ८५] [१६२१ ज्येष्ठशुद्ध १

श्री

राजश्री महादाजी सोनदेऊ देशाधिकारी व देशलेखक वर्तमान व भावी पा। कऱ्हाड गोसावीयासि

॥ ६) अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य सेवक शंकराजी नारायण सचिव नमस्कार सुा तिसा तिसैन अलफ वेदमूर्ति ब्राह्मण-समुदाय वास्तव्य कसबे कऱ्हाड क्षेत्र यास राजश्री छत्रपति स्वामींनी यास आग्रार मौजे सैदापूर पा कऱ्हाड हा गाऊ आहे त्याचे नाव सिवापूर ठेऊन कऱ्हाड क्षेत्री ईस्वरसंवछरी जन्माष्टमीचा पर्वी यथायोग्य संकल्प करून राजश्री स्वामीच्या नावे धाराउदक घालून अग्रहार देऊन राजमुद्रेची सनद राजश्री रामचंद्र पंडित याणी करून दिल्हे पेशजी का मजकूरच्या ब्राह्मणास धर्मादाऊ मोईन होती व आदल-शाहाचे वेळेसी इनामत होती ते कुली दूर करून ब्राह्मणसमुदायास मौजे मा अग्रहार दिल्हा आहे याची सनद सुभे मजकुरी आलाहिदा राजश्री स्वामींची सादर आहे त्याप्रमाणे मौजेमजकूर सर्वमान्य ब्राह्मणास यथाविधभागे भूमि वाटून देऊन सर्वमान्य खेरीज हकदार व इनामदार करून त्या प्रा सुरक्षित चालवणे दर हर साल नूतन पत्राचा आक्षेप न करणे या पत्राची प्रति लिहून घेऊन असल परतून देणे जाणजे छ २९ जिलकाद पा हुजूर

श्री
शंकराजी
नारायण

पत्रा
वधिरयं
भाति

बार सुरु सूद बार

लेखांक ८६] [१६२१ आषाढशुद्ध १० सोमवार

श्री

वेदशास्त्रसंपन राजमान्ये राजेश्री समस्त ब्राह्मणसमुदाये अग्राहार मौजे सीवापूर बा कऱ्हाड गोसावी यासी

श्नेहाभिळासी श्रीकराच्यार्ये पंडीतराये नमस्कार प्रमाथीनाम संवत्सरे आशाडसुध दशमी ईंदुवांसरे तुह्मी समीप येऊन विदित केले की

मौजे मजकूर अग्राहार अह्मास समस्त ब्राह्मणास आपण विभाग करून दिला त्याचे नावनिसीवार जावीता करून दिला आहे त्या मध्ये ऐसियास ग्रामसंमधी कार्येभाग आमचे राजग्राहास व लस्करास व परमुलकी राजग्रहास ब्राह्मणानी जावे लागते जे समई ज्या कार्या कारणे जावे ते कार्ये होये जे तोवरी ब्राह्मणास वेचखर्च लागतो त्या बद्दल वरशासं मध्ये सादिलवार खर्च निा भट ब्राह्मण गला खंडी दसेरी सोळुले मापे ३८ तीन खंडी नेमून दिला आहे त्यासी कार्ये-भागाचे समई कार्या कारणे भलते येका ब्राह्मणास जा ह्मटिले तरी त्यासी कदाचित् अनकूल पडते कदाचित् पडत नाही तेव्हा कार्ये-भागास अंतर पडते त्या निमित्य त्या कार्यास आह्मी समस्तानी संमते करून ब्राह्मण नेमिले आहेत

बाबेदेवभट बिन निलकंठभट गीजरे १

महादेभट बिन विस्वरूपभट खीरसागर १

नरसीभट बिन अंतभट अरणके १

महादेभट बिन चवंडभट ढवलीकर १

महादेभट आप्पाभट गिजरे १

मलारजोसी बिन गोविंदभट जोसी १

गोपालभट बिन गोविंदभट टोणपे १

येणे प्रमाणे सात जण नेमिले आहेत याचे नावे सदरहू तीन खंडी गला यथाविभागे नेमून दिल्हा पाहीजे तेणे कडून तो खर्च खाऊन सात जण पर्याये पर्याये समई कार्या कारणे नेहमी जाऊन कार्येभाग करून येतील ह्मणऊन तुह्मी समस्तानी विदित केले त्या वरून मनास आणिता नेहमी ब्राह्मण असिलिया वेगले अपिक्षीत कार्ये होईना यास्तव या कार्या कारणे जावीतिया मधे सादिलवार निा भट ब्राह्मण दसेरी सोळुले गला खंडी तीन नेमिला आहे तो सदरहू सात जणास समविभाग वाटून दिल्हे असे तुह्मी त्याचे समविभागे देत जाणे आणि ग्रामसमंधी कार्ये त्याचे हातून घेत जाणे त्यात कार्यास

जो नव जाये त्याचा विभाग सदरहू ब्राह्मण जे कार्ये करणार त्यास तुह्मी संमते वाटून देत जाणे कागदपत्र अग्राहारसंमधी वेदमूर्ती मोरेश्वरभट बिन विस्वनाथ गिजरे या पासी देत जाणे छ ८ मोहरम सुरूसन मया अलफ पा। हुजूर

श्रीम
नांजनेय
हनुमन्
त्राहि ॥

बार

लेखांक ८७] [१६२१ भाद्रपदवद्य ११ शनिवार

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेकशके २६ प्रमाथी नाम संवत्सरे भाद्रपद बहुल येकादसी मंदवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजाराम छत्रपति याणी वेदमूर्ती मोरेश्वरंभट गिजरे यासि आज्ञा केली ऐसी जे तुह्मी स्वामी समीप येऊन विदित केले की राजश्री कैलासवासी स्वामींने आपले पत्र विश्वनाथभट गिजरे यांस कऱ्हाड क्षेत्र संनिध कृष्णाकोयना + + दा नदी येथील तीर्थपुरोहितपण आपले वृती करून देऊन इनाम करून दिल्हें तें धामधुमे करितां गेले तरी स्वामींने आपले नांवे पत्र करून दिल्हे पाहिजे व आपणास स्वामींने उभयता नदीचा नित्याभिषेक दिल्हा आहे त्यास मौजे शिवापूर ता। कऱ्हाड हा गांव क्षेत्रींचे ब्राह्मणास अग्रहार करून दिल्हा आहे तेथें यथाविभागे काही इनाम देविला पाहिजे ह्मणोन विनंती केली यावरून स्वामी तुह्मावरी

श्री आई आदि
पुरुष प्रसन्न श्री
राजाराम नरपति
हर्ष निधान परश
राम त्र्यंबक मु
ख्य प्रधान

कृपाळू होऊन कृष्णावेण्या येथील आपले तीर्थउपाध्येपण स्वामीने तुह्मास करार केलें असे तरी तुह्मी पुत्रपौत्रादिवंषपरंपरेने चालवीत जाणें व तुह्मास उभयता नदीचा नित्याभिषेक सांगितला आहे यास्तव मौजे शिवापूर पैकी तीस बिघे ईनाम दिल्हा असे सनद राजश्री श्रीकराच्यार्य पंडितराउ यांची सादर आहे तेणेप्रमाणे ईनामाचा उपभोग करुन सुखरुप असणें जाणिजे निदेश समक्ष

मर्या
देयं विरा
जते

रुजू सुरू
निविस

सुरू सूद बार

लेखांक ८८] [१६२३ माघवद्य ८

श्रीशंकर

सौजन मोकदमानि मौजे सैदापूर प्रा कऱ्हाड यांसि बहिरो राम गुमस्ते व कारकून दिा रा गिरजोजी यादव देसमूख प्रा मजकूर सुा ११११ मौजे मजकूर हक सालमजकूर देणे ऐसीयास मौजे-मजकूर राजश्री वेदमूर्ती ब्राह्मण क्षेत्र यासी अग्रार आहे यंदा पाऊस होऊन पिका माफक पाऊस नाहीं ह्मणऊन नापीक जाहले गांवामधें तारा नाहीं गावामधें अग्रार समंधे ब्राह्मणास कांहीं प्राप्त नाहीं थोर ब्राह्मण योग्य त्यास क्षुद्र उपद्रव करिता येत नाहीं ह्मणऊन हक साल-मजकूर नापिकाकरिता नख्त रुपये ११ अकरा रास केले असे तरी सदरहू रुपये घेऊन पावलियाचे सनद देणें जाणिजे छ २१ रमजान मोर्तब सुद

मोर्तब
सुद

लेखांक ८९]   [१६२४ अधिकज्येष्ठ वद्य ११

फारसी
शिक्का

अज् दिवाण ठाणे मसूर तां मोकदमानी व रयानी मौजे सैदापूर उर्फ सीवापूर पा। कऱ्हाड सु॥ ११०७ मालूम दानद की मौजे मजकूर कुळबाब कुळकानू ब्राह्मणास ईनाम करून दिल्हे असे मौजे मजकुरी जे जमा आकार होईल ते ब्राह्मणांस दिल्ही असे ये बाबे हिला हरकती न करणे दरसाल ताजे सनदेचा उजूर न करणे मोर्तब

फारसी:
शिक्का

तेरीख २४ माहे सफर

लेखांक ९०]   [१६२४ मार्गशीर्ष शुद्ध ११

कौलनामा अज दिवाण ठाणा पा। करराबाद ता। मोकदमानि व रयानि मौजे सैदापूर प्रा। मा। सु॥ सन ११११ कारणे दादे कौलनामा लिहून दिला ऐसा जे देसक हजूर येऊन जाहीर केले जे मोजणीमुळें टका देवत नाहीं रकमालियाचा च्यार साला कौल सादर केलिया गाव आबाद करून रकमा कौला प्रा। भरून देऊं ह्मणऊन बराये अर्ज खातिरेसी आणून मौजे मजकुरास कौल सादर केला असे जे इ॥ सन ११११ ता। सन १११४ कारणें रकमाली भरून देणें बा।

सन ११११	सन १११२	सन १११३ रु.	सन १११४ रु.
१९४।=	३८६।॥·	५८३।=	११३।≡

येणे प्रों सदरहू सालदरसाल बेरीज देऊन गाव कीर्द मामुरी करून सुखें असणें दरी बाब कौल असे जाणिजे मोर्तब सुद

तेरीख ९ माहे रजबु

लेखांक ९१] [१६२५ मार्गशीर्ष शुद्ध ५ गुरुवार

श्री

श्रीसकलगुणसंपन्न यजनयाजनादिषट्कर्मनिरत वेदमूर्ती राजेश्री मोरेश्वरभट व वीरेश्वरभट बिन विश्वनाथभट गिजरे वास्तव्य क्षेत्र कऱ्हाड गोसावी यास श्रीकराचार्य पंडितराय नमस्कार राज्याभिषेकशके ३० सुभानु संवत्सर मार्गशीर्ष शुध पंचमी गुरुवासरे मौजे सैदापूर पा कऱ्हाड हे गाव राजश्री कैलासवासी याणीं कऱ्हाड क्षेत्रीचे तुह्मा समस्त ब्राह्मणांस अग्रहार सर्वमान्य देऊन अग्रहाराचें नाव सिवापूर ठेविले ऐसीयास अग्रहार संपादायाविषई तुह्मी उभयतानी श्रम बहुत केले सर्वच खर्च पडिला त्याची अनुकूलता तुह्मी केली त्याउपरी अग्रहारी लावणीसंचणी व्हावी त्यास मौजेमजकुरावरी देशमुख व सरदेशमुख राजश्री राजा कर्ण याचे कुळकारभारी रा सुंदर तुकदेउ याचे विद्यमानें देशमुखी व सरदेशमुखीची बाकी होती व रा भानजी गोपाळ सरसुभेदार पा मजकूर याचे हिसेबीं माहलमुळें बाकी होती त्या बाकीचे भयास्तव पाटीलकुलकर्णी गांवावरी येऊं न शकेत तेव्हां तुह्मी कर्जवामें काढून सदरहू दोन्ही बाकियाचा भाग वारिला त्यावरी पाटीलकुलकर्णी गांवावरी आले परंतु मौजेमजकूर पूर्वी बहुत दिवस खराब पडलें होतें तेथें कीर्द व्हावी यास पाटीलकुलकर्णी व रयता आणाव्या त्यास पोटापाणियास वही बुडली यास दिल्हें वेगळे कीर्द होई ना यास्तव त्यास हि कर्जवामें काढून घातली तें मुदल गला व नक्त यांचें दिढीवाढी व कळांतर देखील बेरीज बहुत झाली तेव्हां अग्रहारीचे पाटीलकुलकर्णी तुह्मापासी येऊन बजीद झाले कीं तुमचे कर्जाचें सदरहू दोनी बाकी तुह्मी वारिल्या व आह्मास पोटापाणियास वही बुडल्यास दिल्हे त्यातागाईत मुदल व दिढीवाढी कळांतर देयास आह्मास शक्ति नाहीं आह्मी तुह्मास मौजेमजकुरी पाणियाखालील अवल भूमी आहे त्यांत काठीमुळें ०२॥। पावणेतीन बिघे कुलबाब कुल-

कानू हालीपटी व पेस्तरपटी व हकदारी देखील पुत्रपौत्रीं वृत्ति करून गांवसंबंधेंच वृत्तिपत्र करून देतो या पावणेतीन बिघेवरी जे बाब व कानू व हालीपटी पेस्तरपटी व हकदारी बैसेल ते आह्मी गांवावरी देऊ तुह्मी आह्मांवरी कृपा करून मान्य केले पाहिजे ह्मणून तुह्मास पाटीलकुलकर्णी वजीद होऊन बोलिले त्यास तुह्मी विवेक केला कीं हे अग्रहार बहुता ब्राह्मणाचें आहे येथें रयतानीं शंका सोडून कांदे केलीयानें बहुतास उपभोग होईल ऐसा विवेक करून सदरहूप्रा मान्य केले मग पाटीलकुलकर्णी यानी मौजेमजकुरी पाण्याखालील भूमी बिघे ॥२॥। काठीमुळें पावणेतीन बिघे पुत्रपौत्रीं कुलबाब कुलकानू हालीपटी व पेस्तरपटी व हकदारी देखील वृत्ति करून दिल्ही आणि वृत्तिपत्र दिल्हें ते तुह्मी दाखविलें ऐशीयास तुह्मी मौजेमजकूर अग्रहार संपादायाविषईं बहुत श्रम केले व वेचखर्च पडिला तो अनुकूल केला व अग्रहार झाल्याउपरी मौजेमजकुरी सदरहू देशमुखसरदेशमुखीसंबंधें बाकी व माहलमुळें बाकीचा भाग वारून गांवावरील कजिया वारिला व पाटीलकुलकर्णियास व रयतांस पोटास वही वुडल्यास कर्ज दिल्ही त्याचा हिसेबाप्रा निर्वाह पाटीलकुलकर्णी याचेनें व्हावयास त्यास शक्ति नाहीं ह्मणून त्यांणीं आत्मसंतोषें पाणियाखालील पावणेतीन बिघे काठीमुळें वृत्ति करून तुह्मास दिली तेणेंप्रा तुह्मी पुत्रपौत्रीं उपभोग करून सुखरूप असणें येथें कोण्ही कटकट करील त्यास ब्रह्मद्रोह घडेल जाणिजे छ ३ शाबान सुा अर्बा मया अलफ पा। हुजूर हे विज्ञाति

शुभं भवतु

बार

लेखांक ९२] [१६२६ चैत्रवद्य ५ गुरुवार

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेकशके ३० तारण नाम संवत्सरे चैत्र बहुल

पंचमी गुरुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शिव छत्रपति याणी

श्री शि
व नरपति
हर्ष निदान मो
रेश्वर सुत नील
कंठ प्रधान

श्री आइ आ
दिपुरुष श्रीराजा
शिव स्वामी कृपानिधी
तस्य परशराम त्रि
बक प्रतीनीधी

सुबेदारानी व कारकुनानी व लोक सुभे लस्कर व वाजे यांसी आज्ञा केली ऐसी जे मौजे शिवापूर प्रां कन्हाड हा गांव स्वामींनी कन्हाड क्षेत्रीचे ब्राह्मणास सर्वमान्य अग्रहार करून दिल्हें आहे तेथें तुह्मी मार्गीं येतां जातां नसता उपसर्ग लाविता ह्मणोन विदित जाले तरी गांव सर्वमान्य ब्राह्मणास दिल्हा असतां तेथे तुह्मास उपसर्ग द्यावया गरज काय सांप्रत हें आज्ञापत्र सादर केलें असे तरी या उपरी मौजे मजकूरचे वाटे नव जाणें अत:पर उपसर्ग देईल ह्मणिजे मुलाहिजा होणार नाही ऐसे जाणोन आज्ञे प्रमाणे वर्तणुक करणे निदेश समक्ष

मर्या
देयं विरा
जते

रुजू सुरु
निविस

सुरू सूद बार

लेखांक ९३] [१६२८ अधिकज्येष्ठवद्य.११

फारसी
शिक्का

कौलनामा अज् दिवाण ठाणे पा। मसूर तां। समस्त ब्राह्मण ईनामदार मौजे सैदापूर ऊर्फ सिवापूर कर्याती हवेली पा। कन्हाड सुा। ११०७ द्वादे कौलनामा ऐसा जे तुह्मी समस्त ब्राह्मण हुजूर येऊन अर्ज केला

की आपणास महतक़दम मौजे मजकूर ईनाम चालत आले आहे यास साहेबी आपले तर्फेने कौलमऱ्हामत केलिया आपण गांव आबादान करून उत्पन्न होईल ते भक्षून स्नानसंध्या अनुष्ठान करून आसीर्वाद देऊन कृष्णातीरी सुखे असो स्वामीस आसीर्वाद देऊ ह्मणोन अर्ज केला बराये अर्ज खातिरेस आणून कदीम सनद पाहून कौल मऱ्हामत केला असे कोणे बाबे शक न धरणे गावी जे उत्पन्न होईल ते भक्षून सुखे असणे कोणे बाबे शक न धरणे आपले तरफेने कांहीं आजार लागणार नाही दरी बाब कौल असे मोर्तब

फारसी
मोर्तब

तेरीख २४ माहे सफर

लेखांक ९४] [१६३० मार्गशीर्षशुद्ध १२

श्री

श्री
राजाराम
चरणी दृढभा
व सेनापति ध
नाजी जाध
व राव

आज्ञापत्र समस्तसेनाधुरंधर विस्वासनिधी राजमान्य राजश्री चंद्रसेन जाधवराऊ सेनापती ता मोकदमानी मौजे सैदापूर पा कऱ्हाड सुा तिसा मया अलफ मौजे मजकूर कऱ्हाडकर ब्राह्मणास अग्रहार हुजरून दिल्हा आहे ऐसियास मौजेमजकूरची सरदेशमुखी आपणास राजश्री छत्रपति स्वामीनी दिल्ही ऐसियास हा गाऊ ब्राह्मणास ईनाम ब्राह्मणाचे चालविणे आपणास अगत्य याजकरिता आपली वतनी सरदेशमुखीचा ऐवज ब्राह्मणास दिल्हा आहे गांवीचे आकारप्रमाण सरदेशमुखीचा ऐवज होईल तो वेदमूर्तीस पावता करणे आज्ञाकडील आणीक सरदेशमुखीचा उपसर्ग लागणार नाही प्रतिवर्षी नूतन पत्राचा

उजूर न करणे तालीक लेहून घेऊन मुख्यपत्र भोगवटियास देणे जाणिजे छ १० रमजान

विलसतु
लेखनाव
धि मुद्रा

लेखांक ९५] [१६३१ ज्येष्ठशुद्ध ७

श्री

० श्री
शाहु भूप विश्वा
सनिधि प्रल्हाद ज
न्मनः नारायणस्य
मुद्रेयं बाळेंदु रि
व राजते

आज्ञापत्र राजेश्री नारो प्रल्हाद अजहत देसमूख ताां मोकदमानी मौजे सैदापूर ताा हवेली प्राा कऱ्हाड सुाा असर मया अलफ मौजे मजकूर समस्त ब्राह्मण कऱ्हाडकर यासी अग्रहर पुर्वी पासून चालत आला आहे त्यासी सरदेसमुखीचे वतन राजश्री स्वामीनी राजश्री चंद्रसेन जाधवराय यास दिल्हे आहे यैसीयासी मौजे मजकूरची सरदेसमुखी ब्राह्मणाचा गाव ह्मणऊन न घ्यावी ये विसी जाधवराऊ या कडील ही पत्र आहे तर सरदेसमुखीचा उपसर्ग ब्राह्मणास व रयेतेस न लावणे जाणिजे छ ५ रबिलाखर मोर्तबसूद

मोर्तब
सूद

लेखांक ९६] [१६३१ श्रावणशुद्ध ४ शुक्रवार

श्री

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३६ विरोधी नाम संवत्सरे श्रावण शुध

चतुर्थी भृगुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी याणि राजश्री कृष्णाजी बलाल देशाधिकारी व लेखक प्रा। कऱ्हाड

यासि आज्ञा केली ऐसी जे वेदमूर्ती मोरेश्वरभट गिजरे वस्ती कऱ्हाड हे

तीर्थपुरोहित यास श्री कुकुद्मतीसंगमी श्रावणमासीचा अभिषेक करावयाची आज्ञा केली आहे त्यास पूजेची अनकूलता व वेदमूर्तीचा उलुफा व दक्षणा मोईन करून दिली आहे बि॥

पूजा व नैवयद	मोईन वेदमूर्ती
रुपये	७॥ उलुफा
७॥	५ दक्षणा
	१२॥

येकूण वीस रुपये रास देविले असे साल दर साल प्रमाणे आदा करणे जाणिजे लेखनालंकार

रुजु

तेरीख २ जमादिलाखर
सुहुरसन अशर मया अलफ
बार सुरू सुद बार

लेखांक ९७] [१६३३ कार्तिक शुद्ध ५

श्री

श्री
राजा शाहु चर
णि दृढ भाव सेना
पति धनसिंग सु
त संताजी जाध
वराव

आज्ञापत्र समस्तसेनाधुरंधर विस्वासनिधी राजमान्य राजश्री संताजी

जाधवराऊ सेनापती तां मोकदमानी मौजे सैदापूर पा। कऱ्हाड सु॥ इसने मया असर अलफ मौजे मजकूर वेदमूर्ती राजश्री ब्राह्मण समस्त कऱ्हाडकर यास राजश्री स्वामीनी अग्राहार करून दिल्हे आहे ऐसी-यास मौजे मजकुरी सरदेशमुखी आमचा खासगत ईनाम आहे त्याचा ऐवज आमचा होईल तो आह्मी ब्राह्मणांस आपले तर्फेने दिल्हा आहे आकार प्रमाणे सरदेशमुखीचा ऐवज बिलाकुसूर साल दरसाल देत जाणे आमचे कमावीसदार असतील वर्तमान भावी कोण्ही उपसर्ग लावणार नाहीत जाणिजे प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणे तालीक लेहून घेऊन अस्सलपत्र भट गोसावियांसि भोगवटेयास देणे जाणिजे छ २ शोवल

मो
र्तब सु
द

लेखांक ९८] [१६३७ चैत्रशुद्ध ४ रविवार

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेशशके ४१ मन्मथनाम संवत्सरे चैत्र सुध चतुर्थी रविवासरे क्षत्रियकुलावंतस श्री राजा शंभु छत्रपती स्वामी याणी

श्री शि
व नरपति
हर्षनिदान मो
रेश्वरसुत नील
कंठ प्रधान

श्री आई आदि पु
रुष श्रीराजा शिव छ
त्रपति स्वामि कृपानिधी
तस्य कृष्णाजि परशु
राम प्रतिनिधि

राजश्री देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी प्रांत कराड यासि आज्ञा केली ऐसी जे

वेदमूर्ती मोरेश्वरभट गिजरे याणी पनाळांचे मुकामी स्वामी

संनिध येऊन विदित केलें कीं राजश्री थोरले कैलासवासी स्वामीनी कऱ्हाडक्षेत्र संनिध कृष्णाकोइना येथील आपले तीर्थपुरोहितपण आपले पिते विश्वनाथभट यास वृती करून देऊन पत्र दिल्हें तदनुरूप कैलासवासी स्वामीनी हि तीर्थपुरोहितपणांचे पत्र दिल्हे व उभयता नदीचा नित्याभिषेक सांगोन त्यांस मौजे शिवापूर पा। मजकूर या गांवपैकी इनाम भुमी बिघे ।:। तीस देऊन पत्र दिल्हे आहे तेणे-प्रमाणे स्वामीनी हि आपणास उतरोतर चालवाया विशाई भोगवटि-यास पत्र दिल्हे पाहिजे ह्मणून विदित केले व तीर्थस्वरूप कैलासवासी स्वामीचें पत्र आणून दाखविलें त्यावरून हि कळो आले ऐशास हे भले ब्राह्मण सत्क्षेत्री स्वामीचें पुरोहितपण थोरले कैलासवासी पासून व कैलासवासी स्वामीपासून करीत आले आहेत त्याप्रमाणें तीर्थपुरोहितपण व कैलासवासी स्वामीनी उभयतां नदीचा नित्याभिषेक सांगोन मौजे मजकूर पैकी तीस बिघे इनाम दिल्ह्या प्रमाणे चालविणे हें स्वामीस अवश्यक व तेणेकडून स्वामीस व स्वामीच्या राज्यास कल्याण आहे याकारिता तुह्मांस हे आज्ञापत्र सादर केले आहे तरी तुह्मी कैलासवासी स्वामीच्या पत्राप्रमाणें तीर्थपुरोहितपण व उभयता नदींचा नित्याभिषेक व यास मौजे शिवापूरपैकी इनाम जमीन बिघे तीस ऐसे मोरेश्वरभट गिजरे यांस पुत्रपौत्रादिवंश-परंपरेने चालवणे नवीन पत्राची अपेक्षा न करणे या पत्राची प्रत लेहून घेऊन मुख्यपत्र भोगवटीया निमित्य वेदमूर्तीजवळ परतोन देणे लेखनालंकार

रुजू

सुरू सुद बार

लेखांक ९९] [१६२७ चैत्र शुद्ध १३

श्री

श्रीमत् श्रौतस्मार्तकर्मानुष्ठानपरायण विद्यावृत्तसंपन्न राजमान्य राजश्री समस्त ब्राह्मण क्षेत्र कऱ्हाड स्वामिगो।।

पोष्य श्रीकराचार्ये पंडितराय कृतानेक नमस्कार येथील कुशल जाणून स्वकीय लिहिलें पाहिजे या उपरि राजश्री राजाराममहाराजानीं तुह्मास समस्त ब्राह्मणास मौजे सैदापूर परगणे कऱ्हाड हें गांव शिवापूर पर्यायनाम ठेऊन अग्रहार करून दिल्हें त्याचा विभाग ब्राह्मणपरत्वें करून द्यावया आह्मास आज्ञा केली त्या आज्ञे प्रमाणें तुमचें संमतें विभागाचा जाबिता आह्मी करून दिल्हा आहे व अवघे ब्राह्मण हि त्या प्रमाणें चालत आहा अलीकडे सांप्रत मन्मथसंवत्सरी रामनवमीमहोत्सावप्रसगें तुह्मी पनाळेस आलेंत तेंव्हा तुह्मी समस्त आह्मा पासी येऊन प्रसंग केला कीं आपण पूर्वी अग्रहाराचा विभाग व तेथील व्यवस्था जे करून देऊन पत्रें दिल्हीं आहेत त्यास पूर्वील व्यवस्थेचा विपर्यास करून अलाकडे पत्र दिल्हें आहे ऐसियास आपण धर्मपरायण आहेत पूर्वव्यवस्थेस विपर्यास जालियानें आह्मां समस्तांस संमत नाहीं त्यामुळे आह्मी समस्त श्रम पावूं यास्तव आपण पूर्वव्यवस्थेस विपर्यास होऊ न द्यावा ह्मणौन तरी जे आह्मी पूर्वी व्यवस्था करून पत्रें दिल्हीं आहेत ते च प्रमाण अलाकडे आह्मां पासून पूर्वील व्यवस्थेस विपर्यास करून पत्र मागोन घेतलें असेल तरी तें रद असे तुह्मीं पूर्वील व्यवस्थे प्रमाणें सुखरूप राहाणें मन्मथसंवत्सर चैत्रशुध त्रयोदशी भौमवार हे विज्ञप्ती तुह्मीं बोलिलेत कीं अग्रहारीचें वडीलपण पाचा जणास देऊन पत्र दिल्हें आहे ह्मणौन ऐकतों ऐसें बोलिलेत तरि पांचा जणाचें वडीलपणाचें पत्र आह्मां पासून कदाचित् घेतलें असेल तरी तें गिथ्या असे पंक्ती २९ हे विज्ञप्ति

लेखांक १००] [१६३७ वैशाखशुद्ध ७

फारशी
शिक्का

कौलनामा ता। जुनारदार कसबे कराराबाद सु॥ सन ११२४ दादे

कौल ऐसा जे तुमचे बाबे स्वरूपजी यादव देसमूख व देसपांडे पा। मजकूर यानी अर्ज केला जे मौजे सैदापूर जमीन वरले तरफेने इनाम दिल्हा होता धामधूम करिता परागदा जाले ह्मणऊन जाहीर केले बराये अर्ज खातिरेस आणून तुह्मास कौल सादर केला असे तरी तुह्मास वरले तरफेने जमीन जे सुदामद चालत आली आहे ते तुह्मी कीर्दी करून सुखरूप राहाणें सरकारचे तरफेने तुह्मास तगादा लागणार नाहीं खातीरजमा राखोन लावणी करणे कोन्हे बाबे शक आंदेशा न धरणें दरी बाब कौल असे छ ५ माहे जमादिलोवल

लेखांक १०१ [१६४० पौषशुद्ध ३ शनिवार

श्री

स्वति श्री राज्याभिषेकशके ४५ विलंबी संवत्सरे पौष्य शुध त्रितीया मंदवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपती स्वामी याणी राजश्री

श्री
राजा शाहु छ
त्रपति हर्ष नींधा
न बाळाजी वि
श्वनाथ प्रधा
न

श्री आई आदी पु
रुष श्री राजा शाहु छ
त्रपति स्वमी कृपानींधी
तस्य श्रीनीवास पर
शुराम प्रतिनीधी

देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी प्रांत कऱ्हाड यासि आज्ञा केली ऐसी जे समस्त ब्राह्मण क्षेत्र कऱ्हाड याणी स्वामी समीप येऊन विनंती केली कीं मौजे सैदापूर ता। हवेली प्रां। मा। हा गांव कुळबाब कुलकानू आपणांस अग्रार इनाम सर्वमान्य आहे तेथील उत्पन्नांवरी योगक्षेम चाळऊन स्नानसंध्यादिक सत्कर्मे अचरोन स्वामीचे कल्याण इछितो त्यास प्रस्तुत मोगलपटीचा गांवास उपसर्ग लागला आहे तो न लागे ऐसी आज्ञा केली पाहिजे ह्मणोन त्यावरून क्षेत्रस्त ब्राह्मण थोर सत्पात्र यांचें अविक्षेपें चालवणें स्वामीस अगत्य यानिमित्य मौजे सैदापूर ऊर्फ सिवापूर ता। हवेली प्रा। मा।र देखील

संमस्तांस कुलबाब कुलकानू खेरीज हकदार व ईनामदार देखील हालीपटी व पेस्तरपटी जलतरुकाष्टपाषाणनिधीनिक्षेपआदी करून पडलें पान चतुःसीमापुर्वक पूर्वमर्यादे प्रमाणे ईनाम पूर्वी करुन दिल्हा आहे तेणे प्रमाणे चालत होतें त्यास अलीकडे मुलुकांत तांब्राची आमदानी जाहाली होती त्यामुले निमे वसूल त्याजकडे द्यावा असे जाहाले होते परंतु त्यांस हीं पत्रें दाखविलीं सदरहू प्रमांणे त्यांनीं आपली पत्रें करुन देऊन चालवित होते प्रस्तुत महाराजांच्या स्वराज्यांतील मोगल जाऊन अमंल उलटा आण दुतर्फा अमल माहाराजाकडे जाहाला तर स्वामीनीं दुतर्फा देखील मोगलाई ऐवज जाहागीरदारी व फौजदारी व सायेर वगैरे बाब कुलबाब कुलकानू आपणांस नूतन पत्रें करुन देऊन चालविले पाहिजे ह्मणून त्या वरून मनास आणिता तुह्मी थोर सत्पात्र क्षेत्रीं राहून श्नानसंध्यादिशटकर्मे आचरोन स्वामीस व स्वामीच्या राज्यास कल्यांण चिंतोंन आहा तुमचे चालविलेया श्वामीस श्रेयस्कर जाणून स्वामी तुह्मा समस्तावरी कृपालु होऊन मौजे मजकूर कुलबाब कुलकानू खेरीज हकदार व कदींम ईनामदार देखील मोगलपटी व जाहागीरदारी व फौजदारी व किलेदारी व सायेर वगैरे बाब व हालीपटी व पेस्तरपटी जलतरुतृणकाष्टपाशाणनिधीनिक्षेपआदी करून पडले पान चतुःसीमापूर्वक पूर्वमर्यादे तुह्मास व तुमचे पुत्रपौत्रादिवौशपरंपरेने अग्रहार सर्वमान्य करून दिल्हा असे तर सदरहू प्रमाणे तुह्मी समस्त वौशपरंपरेने ईनाम अनभऊन सुखरूप राहाणें लेखनालंकार

मर्या
देयं विरा
जते

रुजू सुरु सां।

निवीस मंत्री

तेरीख १

सफर सुा तिसा बार सूद सुरु सूद बार बार

मोगलपटी कुलबाब कुलकानू इनाम करार करून दिल्हा आहे समस्त ब्राह्मण क्षेत्र कऱ्हाड यास पुत्रपौत्रादिवंशपरंरेनें चालवणें आणि ब्राह्मण सत्कर्माचरण करून स्वामीचें कल्याण चिंतून सुखरूप राहात असे करणे मोगलपटीचा वगैरे उपसर्ग येकजरा न करणें यापत्राची प्रती लेहून घेउनु हे मुख्य पत्र भोगवटियास देणें जाणिजे लेखनालंकार

रुजू सुरू — सा।
निवीस — मंत्री
बार सुद — सुरू सुद — बार बार

लेखांक १०२] [१६४० पौषशुद्ध ३ शनिवार

श्री

श्री
वर्धिष्णुर्विक्रमैः
विष्णोः सा मूर्तिरिव
वामनीः शंभुसूनो
रसौ मुद्रा शिवरा।
जस्य राजते

स्वस्ति श्री राज्याभिषेकशके ४५ विलंबीसंवत्सरे पौशशुध त्रितिया मंदवासर क्षेत्रियेकुळावतंस श्री राजा शाहू छत्रपती स्वामी याणी वेदमूर्ती

श्री ०
राजाराम छ
त्रपति हर्षनिधा
न बाळाजी वि
श्वनाथ प्रधा
न

०
श्री आई आदि पु
रुष श्रीराजा शाहु छ
त्रपति स्वमी कृपानिधी
तस्य श्रीनिवास परशु
राम प्रतिनीधि

समस्त ब्राह्मण क्षेत्र कराड यासी दिल्हे ईनामपत्र ऐसेजे तुह्मी स्वामी संनीध श्री माहादेवचे मुकामी येउन विदित केले जे मौजे सैदापूर उर्फ सीवापुर ता। हवेली कराड हा गाव

लेखांक १०५] [१६४१ पौषशुा ५

॥ श्रीविघ्ननाशोजयति ॥

हा गणपति

श्रीमच्चिरंजीव शिवदास गोस्वामी यां प्रति निरंजन गोस्वामी बिंन नरसिंह पाठक साख्यायन गोत्र वास्तव्य कऱ्हाड अशिर्वाद उपरि शके १६४१ वर्षे विकारी संवत्सरे पौष शुक्ल पंचमी रविवासरे तद्दिनीं श्रीकरहाटकक्षेत्रीं दानपत्र तुह्मास लेहून दिल्हे ऐसें जें राजा शाहू छत्रपती याणीं अह्मा यिनाम चावर १ येक मौजे ढेंभु येथे दिल्हा आहे त्यापैकीं श्रीमप्रीत्यर्थ बिघे १५ पंधरा तुह्मास यिनाम दिल्हा असे तथें धान्य उत्पन्न करून सत्कर्मे सत्काळक्षेप करणे यास कोण्हीं अन्यथा करील त्यास पंचमहापातकांचे पाप घडेल हें दानपत्र लिहिलें सत्य भुभवंतु

लेखांक १०६ [१६४३ भाद्रपद १४

श्री

श्रीमत् श्रौतस्मार्तकर्मानुस्टानपरायण राजमान्य राजश्री समस्त ब्राह्मण विद्वद् वैदिक क्षेत्र कऱ्हाड स्वामी गोसांवी यांसि

स्नेहाभिलाषी हरीराजाचार्ये पंडितराय नमस्कार उपरी वेदमूर्ती केशव भट बीन माहादे भट व वेदमूर्ती रुद्र भट बीन नारायण भट व वेदमूर्ती नरहरी भट बीन तीमण भट उपनाम गिजरे याणी किले पनालेचे मुकामी येउन विदित केलें की आपणास योगक्षेमास उपाय काही नाही आपणांस काही भूमी देविली पाहिजे ह्मणौन विदित केले त्या वरून मनास आणिता ब्राह्मण भले योगक्षेमाविणे श्रमी होतात ऐसे पाहून यास मौजे शिवापूर अग्रहार पैकी भूमि देविली बिता।

वेदमूर्ती केशवभट बिन	वेदमूर्ती नरहरभट बिन
माहादेवभट गिजरे यास	तिमणभट गिजरे यास
भूमी बिघे ८२	भूमी बिघे ८२

लेखांक १०३ [१६४० पौषशुद्ध ७

श्री

राजमान्ये राजश्री कमाविसदार सावोत्रा प्रा। कऱ्हाड यास नारो शंकर सचीव सु॥ तिसा असर मया अलफ मौजे सैदापूर प्रा। मा॥र हा गांव समस्त ब्राह्मण वास्तव्य क्षेत्र कऱ्हाड यांस इनाम सर्वमान्य आहे त्यास तेथील सावोत्रा ब्राह्मणास पूर्वी पासून दिल्हा आहे त्याप्रमाणें त्याकडे सालदरसाल पावत आहे तरी मौजेमजकूरचा सावोत्रियाचा अकार होईल तो वेदमुर्ती समस्तास पावेल तुह्मी मौजेमजकुरास वसुलाचा तगादा न लावणें पूर्ववत्प्रमाणें ब्राह्मणाकडे चालवणे जाणिजे छ ५ सफर

सुरू सुद

पत्राल
+ + + + +
+ + +

लेखांक १०४] [१६४० फाल्गुनवद्य ९

श्री

छ्र मशरुल अनाम देशमुख व देशपांडे कर्यात दुधगाऊ पा। हुकेरी यासी कृष्णाजी विठल सुहुरसन तिसा असर मया अलफ हुजुरून या प्रांतीचे चौथाई हुजूर बाबतीचा कार्यभाग आह्माकडे सांगितला आहे या करिता आह्मी आपले तर्फेने राजश्री शिवाजी केशव व रा॥ राघो विस्वासराऊ यासि त्या प्रांते धंदा सांगोन पाठविले आहे ये विसी राजपत्रे हि सादर आहेत तरी तुह्मी मा॥रनिलेसी रुजू होऊन का॥ मा॥रचा तहरह करून ये तर्फेचा वसूल सुरलीत देत जाणे आणि ता॥ मजकुरास अजार न लागे ते गोष्ट करणे जाणिजे छ २२ रबिलाखर

श्री सीव
चरणी तत्पर
कृष्णाजी वीठ
ल नीरतंर

लेख
ना वधी

वेदमूर्ती रुद्रभट बिन
नारायणभट गिजरे यास
भूमी बिघे ८१

श्री चिंता
मणिचरण
शरण

येणे प्रमाणे भूमी देविली असे तरी यांस मोजे मार अग्रहार पैकी गयाल व नकल जे असेल त्या ऐवजी त्रिवर्ग वेदमूर्तीस सदरहू भूमी बिघे ८६ साहा बिघे नेमून देणे छ २७ माहे जिलकाद सुहुर सन ईसने अशरैन मया अलफ हे नमस्कार

शुभं भ
वतु

लेखांक १०७] [१६५४ चैत्रशुद्ध ११

श्री

अज् रवारी राजश्री चिमणाजी माणकेस्वर ता। मोकदमानी मौजे वडगांव १ मौजे कारवे १ मौजे सेरे १ पा। कराड सु॥ सन इसने असरीन मया अलफ मौजे मजकूरच्या जोतिसाचा कथला वेदमूर्ती रा। गोपालभट व केशवभट गिजरे याचा व शामभट व भिऊभट याचा आहे ऐसियासी कारवे मुकामी याचा कथला निवडावा ऐसा केला त्यास देशकाही अर्जे केला की वर्षप्रतिपदा जाले उपर निर्वाह करून देऊ त्यावरून वतन अमानत केले नहोते हाली वतने अमानत

केली असत जे निवाडा होई तो पावेतो अमानत असो देणे कार्य प्रयोजन लग्नमूर्ती होईल त्याचे होईल तें दिवाण रुजू न करणे छ ९ साबान

लेखांक १०८] [१६४४ चैत्रवद्य ५ सोमवार

श्री

श्री सकलगुणमंडित अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजेश्री देशाधिकारी व देशलेखक वर्तमान व भावी प्रा कऱ्हाड गोसावी यासी श्रीकराच्यार्ये पंडित आसिर्वाद राज्याभिषेकशके ४८शुभकृत् नाम संवत्सरे चैत्र बहुल पंचमी इंदुवासरे मौजे सैदापूर पा। कऱ्हाड प्रा। मजकूर हा गाव राजेश्री कैलासवासी स्वामीनी समस्त ब्राम्हण

श्री चिंता मणि चरण शरण

क्षेत्र कसबा कऱ्हाड यास सर्वमान्य अग्रहार ईनाम देऊन पर्याय नाम सिवापूर ह्मणून ठेविले ऐसीयास त्याकाली पामारीचें देशमुखी व सरदेशमुखी राजेश्री कैलासवासी याणी रा। राजा कर्ण याचे स्वाधीन केली होती त्यांणीं क्षेत्रीचे ब्राह्मण भले विद्यावंत व ब्राह्मणसमूहास हि विशेष व कऱ्हाड क्षेत्र बहुत थोर कृष्णातीर पुराणप्रसिद्ध यास्तव त्याणी देशमुखी सरदेशमुखीचे हकदारी मौजे सिवापूर आग्रहारीची समस्त ब्राह्मणांस धर्मादाय दिल्हा आणि पत्र दिल्हे जे सदरहू हकदारी तुह्मा समस्त ब्राह्मणांस पुत्रपौत्रादि दिल्ही आहे ते भक्षून राजेश्री छत्रपति स्वामीस व राज्यास कल्याण चिंतून सुखरुप असणें ह्मणून पत्र दिल्हे व वेदमूर्ती मोरेश्वरभट व वीरेश्वरभट बिन विश्वनाथभट गिजरे यास सदरहू अग्रहार पैकीं श्री कृष्णानदीस नित्याभिषेक करावया बदल भूमी ईनाम बिघे ।· तीस बीघे आह्मी नेमून दिल्हे त्याचे हकदारी वेदमूर्तीस देऊन त्याचे पत्र अलाहिदा दिल्हे व वेदमूर्तीचे ईनाम सदरहू तीस बीघीयांची

काय करीना असेल तो मनास आणून चिमणाजीपंताकडे लेहून पाठवणे जाणिजे छ ५ रजबु

मोर्तब
सुद

लेखांक १:०] [१६४४ फाल्गुनवद्य ११

श्री

वेदमूर्ती राजश्री गोपालभट व शामभट व केमभट गोपात्रियासि सेवक श्रीनिवास परशराम प्रतीनिधी नमस्कार सुा सलास अशरीन मया अलफ वडिगांव कारवे सेरे या तिनी गांवचा कज्या जोसीपणाचा आहे त्यास थल उंबरज लेहून तिनी गांवचे पाटील उंबरजेस पाठविले आहेत हे कृष्णेत सिरोन ज्यास खरा ह्मणून काढतील त्याचा खरा होईल या कामास महमद हमाती चोपदार पाटविला यास रुपये ५ पांच देणे जाणिजे छ २४ जमादिलाखर

राजते
लेखना
वधी

लेखांक १११] [१६४५ ज्येष्ठशुद्ध १० रविवार

श्री

येक
१

३७
सदतीस

निवाडपत्र बतारीख छ ९ माहे रमजान स्थल मुकाम सातारा सुा आर्बा आशरीन मया आलफ बेहुजूर हाजीरानि मज्यालसी

राजमुद्रा

हकदारी रा। रुद्राजी चंदो देशकुलकर्णी पा। मार यांणी आपली वेदमूर्तीस दिल्ही आणि आपले पत्र दिल्हे ऐसियास कऱ्हाड ह्मणजे कृष्णातीर बहुत थोर क्षेत्र पुराणप्रसिध्द विख्यात तेथे ब्राह्मणसमुदाय बहुत व ब्राह्मण विद्यावंत अग्निहोत्री आहेत वेदमूर्ती मोरेश्वरभट व वीरेश्वरभट हे पुरातन राजेश्री छत्रपतीचे तीर्थपुरोहित यास्तव अग्रहारमारीचे देशमुखी सरदेशमुखीची हकदारी राजेश्री राजा कर्ण यांचें पत्रा प्रा समस्त ब्राह्मणास चालवणे व उभयता वेदमूर्तीस सदरहू तीस बिघे ईनामाचे देशमुखी व सरदेशमुखीची हकदारी व देशकुलकर्णसबंधी हकदारी रुद्राजी पंतांचे पत्रा प्रा सुरक्षित चालवणे प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणे या पत्राची प्रति लिहून घेऊन मुख्य पत्र उभयता वेदमूर्ती पासी परतून देणें छ ३ जमादिलाखर सु॥ इहिदे अशरीन मया अलफ हे आशीर्वाद

शुभं भवतु

बार

लेखांक १०९] [१६४४ वैशाखशुद्ध ७

श्री

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री माणको कृष्ण गोसावी यांसि

सेवक आंबुराव अमात्य नमस्कार सु॥ इसन्ने अशरीन मया अलफ वेदमूर्ती गोपालभट व केशवभट गिजरे याचे जोतिसपणाचे गाव मौजे कारवे व वडगाव व सेरे हे तीन गाव आहेत याच्या वडिलानी शामभट प्रथमशाकी मताल्किंास ठेविले होते ते प्रस्तुत यासि भाडतात हा कजिया रा। चिमणाजीपंताकडे गेला होता त्यानी तुह्मास निवडावयासि सांगितला आहे ह्मणोन यानी विदित केले तरी त्यानी तुह्मास सांगितला असेल तरी तीन गावचे वतनदार बोलाऊन आणून जो

राजश्री मोरो सामराज	राजश्री कृष्णाजी विठल सभासद नामजाद सुभा प्रांत कन्हाड

देसक पा। कराड

——माहादाजी कृष्ण अजहती देसमूख भो पा। मजकूर	दा। देसपांडे पा। मजकूर
	दा। देसचौगुले पा। कराड मौजे मारुले १ मानजी पा। १ रामजी पा। १ गोविंद आपाजी कुलकर्णी —— ३
रामजी कासी देशपांडे ता। परळी ता। गुजर	
शामजी रायाजी खोडगडे कुलकर्णी मौजे मुदरूळ व नाडेनांडोली प्रा। कन्हाड १	गणेश जगंनाथ क्षीरसागर कुलकर्णी मौजे सेलगाव व पाचुंद व बेलवडे बत्राजी आबजी खीरसागर कुलकरणी जोतिसी मौजे हिंगणगाव बु। का। आडंभ मौजे येडे का। वांगी
मुकुंदभट्ट बिन उत्धव पाठक ज्योतिषि प्रां खट्टाव देहाय	रामभट्ट बि। नरसिंभट्ट ढेकणे नि। मोरो सामराज
जिवजी सिवदेउ देशकुलकर्णी का। कलेहाडि व का। केलगुण १	महिपतराउ लक्षुमण खलदकर कुलकर्णी मौजे खलद प्रा। पुर्णेदेस ता। कन्हेपठार

अंताजी जगंनाथ जोसी कुलकर्णी कसबे पारनेर

१

केशो लक्षुमण देसपांडे पा। सिरवल

कोंडापा बिन सिवपा कुलकर्णी मौजे गोटखिंडी प्रा। वाल्वे व भडकंबे प्रां हुकेरी

पत्र प्रा। साक्ष खंडो श्रीधर बुचके देशपांडे प्रा। सुपें

जानो रघुनाथ कुलकरणी मौजे खेडीवंतडिवले व चंचली व धु. मालवाडी कोरेगांव प्रा। वांई

अनाजी कासी कुलकरणी मौजे माजी व मौजे खोजवडी ता। सातारा

१

कीर्यात निंबसोडमाइणी

सिदोजी बिन मुधोजी घारगे देसमुख का। निंबसोड

सिदोजी बिन बहिराजी घारगे देसमुख का। माइणी

हैबतराव बेनाजी
सहश्रभोजने देसपांडें
का। निंबसोड व माइणी

बावाजी बिन जानोजी पाटील यादव मौजे कडेगांव का। मजकूर

अगनोजी बिन लखमोजी पाटील मौजे बेलिचागांव का। मा।

साबजी बिन चंदजी पाटील घाटगें मौजे धोडेवाड का। मजकूर

सबसेट बिन बससेटे कसबे माइणी

तमणभट बिन विश्वनाथभट

गोपाळराम पिटके जोसि व कुळकर्णि कस्बे माइणि देहाय

ह्मसाजी बिन कुमाजी बिन खेलोजी पाटील ईगल मौजे सिरसवडी का। मजकूर

बेनाजी बिन बहिरोजी पाटील माने मौजे माहुली का। मा।

सिदोजी बिन संभाजी पाटील मौजे मालवर का। माइणी

बहिरजी बिन+मोजी नाईक नाइकवाडी का। मा।

रघसेट बिन सिवसेट माहाजन कसबे माइणी

कालोपरशराम बडवे श्री माहादेव अंताजी बापूजी व जिवजी लिंगो॰
शामजी शंकर बडवे माहादजी जी वाघ कुलकर्णी जोसी कसबे
येशाजी बडवे पभाकर कालो माइणी
बडवे

यां विद्यामार्ने शके १६४५ शोभकृत नाम संवत्सरे जेष्ठ शुध दशमी भानुवासरे तदिनीं वेदमूर्ती नारायेणभट बिन वारेश्वरभट गोपाळभट बिरुद्रभट गिजरे जोतिषी मौजे कारवे व मौजे वडगांव व मौजे सेरे व मौजे दुसेरे व मौजे कोडोली प्रां कऱ्हाड यांस लेहून दिल्हे निवाडपत्र ऐसेजें तुह्मामध्यें व सदासिवभट बिन भानभट गिजरे कऱ्हाडकर यांमध्यें सदरहू गांवीचा जोसपिणाचा कथला लागून पंचाईतमुलें निवाडियास स्थल मजकुरास आला त्यास पंचाइतानीं उभयेतांस बोलवून करीना मनास आणून तकरीरा लेहून मागितल्या त्यावरून तुह्मी उभयेतानी तकरीरा लेहून दिधल्या बितपसील.

तकरीर-कर्दे सदासिवभट बिन भानभट गिजरे आप्रवादी वास्तव्य क्षेत्र कऱ्हाड लेहून दिल्हे ऐसेजें मौजे सेरें व मौजे वडगांव व मौजे कारवे व मौजे दुसेरें व मौजे कोडोली प्रां कऱ्हाड सदरहू पांचा गांवीचे जोतीष कुलकरणि यांचे घरींचें उपाध्यपण आपलें पुरातन आहे वडिल खात आलें आहेत त्यास कांहीं दिवस मुतालिक ठेऊन वृत्ती अनभवीत आलों पहिलें वृत्ति गंगाधरभट पानसे यांचे जोतिष व कुलकरणियांचे घरीचें उपाध्यपण होतें तें श्रीवाराणसीस जातेसमई आपले पूर्वज रामेश्वरभट गिजरे यांस दानपत्र करून सदरहू वृत्तीचें पत्र करून दिल्हें त्यावरून अनुभवीत होतों त्यास कांहीं दिवस मुतालिक स्वामित्व देत आले सांप्रतकालें मुतालिकानी स्वामित्वास विक्षेप केला त्याउपरी कजिया प्राप्त जाला त्यास दिवाण व गोतमुखें निर्वाह करून घ्यावा तरी राजीक आनकूल पडिलें नाहीं त्याउपरी राजश्री भानजी गोपाळ सुभेदार प्रां कऱ्हाड यांचे घरीं मोरेश्वरभट होते त्यांनीं गिजरयांची वृत्ती ह्मणऊन प्रसंग केला त्यास भानजीपंत बोलिले जे गिजरेयांची वृत्ति ह्मणतां तरी त्यांचें

कागदपत्र कांहीं आश्रयें आहे कीं काये याउपरी आपले आजे कृष्णभट यासि मोरेश्वरभट यांनीं पुसिलें कीं आपण सुभेदारासीं बोलिलों गिजरेयांची वृत्ति मुतालिक खातातीयाचा वृत्तांत काये तो कळला असेल तो सांगणें त्याउपरि कृष्णभटानीं सांगितलें कीं भानभटास पुसणें ते सांगतील त्यावरून भानभटास मोरेश्वरभटानीं पुसिलें त्यास उत्तर दिल्हें कीं आमची वृत्ति खरी कागदपत्र आपणाजवळी आहेत आपण खरें करून देऊं त्यास मोरेश्वरभट ह्मणों लागलें कीं कागद आपले द्रिस्टीस घालणें ह्मणिजे आपण बोलिलों ते गोस्टी भानजीपंतापासी खरी जाहली त्यास भानभटानीं बरें तुह्मास पत्रें दाखऊं त्यास कधीं पत्र दाखवितां ते काये सांगणें त्यास श्रीमाहादेवाच्या यात्रेस आह्मीही येतों तुह्मी तेथें या पत्रें दाखऊं त्यास तेही श्रीच्या यात्रेस आले आह्मी आलों परंतु समागमें पत्रें आणिलीं नाहींत त्यास मोरेश्वरभटीं अतिशये केला कीं सुभेदार यां प्रांतीं आपण लटिकें होतों कागद अगत्यरूप दाखविणें त्यावरून उमाभट परिचारक यासि रुपये ३ तीन कबूल करून कागद श्रीपंढरीहून आणविले आणि मोरेश्वरभटास दाखविले ते कागद आपणाजवळी द्या ह्मणऊन मोरेश्वरभटीं मागून घेतलें कीं भानजीपंत यासि दाखऊन सवेंच आणून तुमचे तुह्मास देऊं ह्मणऊन आपणाजवळील पत्रें घेतलीं ते साक्षीमोइशा नसीं आपण मोरेश्वरभटापासीं दिल्हें आहेत हें खरें करून देऊं तें पत्रें आह्मास फिराऊन दिल्हीं नाहींत रामेश्वरभट आमचे पूर्वज आपली वृत्ति आहे हें खरें करून देऊं पिलंभट यांच्या नांवाचें मुतालिकाचें पत्र येक व रामेश्वरभटाच्या नांवाचें दानपत्र येक ऐसीं दोनी पत्रें दिल्हीं हें सत्य रामेश्वरभट यांचे इनाम-इजारती कसबे मजकुरीं त्यांचा भोगवटा आमचा आहे आणखी हि वृत्तीचा भोगवटा दाखऊन आमची वृत्तिसमंधें पत्रें व फर्मान आदिकरून पत्रें राजिकामधें गेली संपूर्ण गाठोडें च गेलें हें समस्तांस टाउकें च आहे मरळीकर व दुसेरेकर आह्मी त्रिवर्गाचा मूलपुरुष येक ऐसें खरें करून देऊं न देऊं तरी वृत्तीस समंध नाहीं गोताचे आन्याई हे लेहून दिल्ही तकरीर सही छ १० माहे शाबान

तकरीर पश्चमवादी

शके १६४५ शोभकृतनाम संवत्सरे वैशाख शुध द्वादसी तदिनीं समस्त गोतगंगा यांप्रती तकरीर कर्दे नारायेणभट बिन वीरेश्वरभट व गोपाळभट बिन रुद्रभट गिजरे जोतिषी मौजे कारवें व मौजे वडगाव व मौजें सेरें व मौजें दुसेरें व मौजें कोडोली प्रां कऱ्हाड यानि तकरीर केली ऐसी जे आमचे मूळपुरुष रामेश्वरभट गिजरे यानि सदरहू गांव पांच हे जोतिषवृत्ति व कुळकरणीयांच्या घरीचें उपाध्यपण ऐशा दोनी वृत्ति संपादिल्या त्या वृत्तीस आह्मी व वाईकर गिजरे व दुसेरेकर गिजरे ऐसे त्रिवर्ग भाऊ यांनी भक्षाव्या ऐसे आहे हें खरें करून देऊं सांपृत सदासिवभट गिजरे बोलताती कीं आपले तीर्थरूप भानभट यांनी मोरेश्वरभटापासीं रामेश्वरभटाच्या नांवाचे दानपत्र एक व पिलंभटाच्या नांवाचें मुताळिकाचें पत्र येक ऐसीं दोनी पत्रें दिल्हीं ह्मणताती त्यास मोरेश्वरभट असतां हे व आह्मी येकेठायीं होतों तेंव्हां कांहीं बोलिलें नाहींत आतां तों मोरेश्वरभट नाहींत याकरितां आह्मीं सदासिवभटास श्रीकुळस्वामीच्या देवाळयांत श्री ची शफत उभयेतांस करून बोली केली ताळिका आसतील अथवा मोरेश्वरभटाचे हातीचा कागद अथवा साक्षी आसतील तरी श्रीपासीं आणा आह्मी आपलीं पत्रें आणितों ताळिकास व आसलास ऐक्यता जाहली ह्मणजे तुमचीं पत्रें खरीं ऐसें बोलिलों त्यास सदासिवभट बोलिले कीं ताळिका व मोरेश्वरभटाचे हातीचा कागद साक्ष ऐसीं तिन्हीं नाहींत ऐसे श्री चें साक्षीनें बोलिलें त्यास राजश्री श्रीनिवास परशराम प्रतिनिधी यांचा हुजऱ्या दाजी कदम साक्ष आहे त्या उपरांतिक संध्याकाळीं बाबदेवभट याचें घरीं जाऊन त्यास हि श्रीगृहपती साक्षी करून हें च विचारिलें त्यानीं ही सदासिवभटा सारिखें उत्तर दिल्हें त्यास साक्ष पुरुषोत्तमभट आफळे व धोंडभट वाळिंबे हे उभयेता आहेत त्यानंतर दादंभट ढवळीकर वास्तव्य वाई हे हि साक्ष आहेत यासी मोरेश्वरभट परंधामास गेलें आतां व्यवहार हे करिताती तरी यांनीं कोल्याच्या मुकामीं वाईकर व दुसेरेकर व आपण ऐसे त्रिवर्ग भाऊ वृत्ति

त्रिवर्गांची ऐसे लेहून आह्मास दिल्हे आह्मी हि तैसें च लेहून त्यांस दिल्हें आहे त्या प्रमाणें त्यांनीं खरें करून दिल्हे ह्मणिजे वृत्ति त्यांची खरी हें पत्रें दोनी दिल्ही ह्मणताती ते आह्मास ठावकीं नाहींत आह्मी त्रिवर्ग भाऊ खरे वृत्ति त्रिवर्गानीं भक्षावीं ऐसें आहे हें भोगवटियामुळें व गोतमुखें व पत्रद्वारें खरें करून देऊं यासि अन्यथा जाहलों तरी गोताचे आन्याई या वेगळें आमचीं तीनपत्रें राजिकांत पुस्तकाबराबरी गेली बि ता।

१ देशपांडे यांची वंशावळी प्रां मजकूर

१ देशपांडेयाचे घरीचें उपाध्यपणाचे पत्र

१ रामेश्वरभटाचें नांवाचा इनामाचा फर्मान

येकून तीनपत्रें गेलीं आहेत ऐसें मोरेश्वरभटीं सांगितलें आहे आपणापासीं पत्रें आहेत तें हि पत्रें आपली हें खरें करून न देऊं तरी आह्मास वृत्तीस समंध नाहीं हे तकरीर लेहून दिल्ही सही छ १० माहे शाबान येणें प्रमाणें उभयेतांच्या तकरीरा पंचाइतानीं वाचून पाहिल्या पश्चमवादी तुह्मी तकरीर केली कीं सदासिवभट व बाबदेवभट यांसि कऱ्हाडिं श्रीकुलस्वामीच्या देवाळयांत श्रीचा शफत उभयेतास करून बोली केली तालिका असतील अथवा मोरेश्वरभटाचे हातिचा कागद अथवा साक्षी असतील तरी श्रीपासीं आणा आह्मी आपलीं पत्रें आणितों तालिकास व आसलास ऐक्यता जाहलीं ह्मणिजे तुमचीं पत्रें खरी ऐसे बोलिलों त्यास सदासिवभट बोलिलें कीं तालिका व मोरेश्वरभटाचे हातिचा कागद व साक्षी ऐसीं तिन्हीं नाहींत ऐसें श्रीचे साक्षीनें बोलिले त्यास साक्ष बित॥

१ दाजी कदम दिा रा प्रतिनिधी
१ धोंडभट वाळिंबे
१ पुरुषोत्तमभट आफले
१ दादंभट ढवळीकर

२

ऐसें चौघे साक्षी आहेत चौघांपैकीं दादंभट ढवळीकर याच्या साक्षीनें सानाराच्या मुकामीं बोलिले ऐसी तुह्मी तकरीर केली त्यावरून सदासिवभटास पंचाइतानीं पुसिलें कीं तुह्मीं कऱ्हाडीं आपणापासीं कागदाच्या तालिका अगर मोरस्वरभटाचे हातीचा कागद व साक्षी ऐसी नाहीं ह्मणऊन सदरहूचे साक्षीनी बोलिलां आणि तक्रीर केली कीं कागद दिल्हे ऐसें साक्षीनसी खरें करून देऊं तरी या उपरि तुमचे रुजू काय धरावें तेव्हा नामुकरादीस जाऊन आपण साक्षी नाहीत ऐसें बोलिलों नाहीं ह्मणून पंचाइतापासीं विनंति करून मागती तक्रीरेस पुरवणी लेहून दिल्ही बितपसील

तकरीर कर्दे सदासिवभट बिन भानभट गिजरे वास्तव्य कऱ्हाड तकरीर केली ऐसी जे कऱ्हाडहून गोपालभट सातारियास येतेसमईं श्रीच्या देवालयामधें आपणासीं व त्यांसीं बोलणें जाह्लें कीं तुमच्या दानपत्राचीं तालिक व पिलंभटाच्या पत्राची तालिक व मोरेश्वरभटाचे हातिचा कागद ऐसें आणिलें तरी आपणांस दाखवणें साक्षी आसिलें तरी सांगणें त्यास आपण बोलिलों जें आपणापासीं दों पत्राच्या तालिका नाहींत मोरेश्वरभटाचे हातिचा कागद नाहीं ऐसें आपण बोलिलों त्यास गोपालभट मागती रात्रीं बाबदेवभटाच्या घरास येऊन गृहपतीची शफत करून करून आपण तुह्मांसीं कृत्रिमें बोलत नाहीं कागदाच्या तालिका अगर मोरेश्वरभटाचें पत्र अथवा साक्षी दाखवा ऐसें पुरुषोत्तमभट आफले व धोंडभट वालिंबे यांच्या साक्षीनें बोलिलों त्यास बाबदेवभट बोलिलें कीं दोघ भले ग्रहस्त बैसोन तुमचें व आमचे लिहिलें होऊन तें समईं जें बोलणें तें बोलों येथें बाजारीं बोलण्यामधें काये आहे ऐसे बाबदेवभट बोलिलें त्यास गोपालभट ह्मणताती कीं साक्षी अगर तालिका मोरेश्वरभटाचे हातिचा कागद ऐसें नाहीं ह्मणऊन उभयेतांचे गुजारतीनें बोलिलें हें खरें करून देऊं तरी येणेंप्रमाणें उभयेतानी साक्ष दिल्ही तरी आह्मास बोलावयास समंध नाहीं आपण सर्व आंन्याई याखेरीज दादंभट ढवळीकर व दाजी कदम याचे गुजारतीनें हि येणेंप्रमाणें च बोलिलों ह्मणताती तरी उभ-

येता भट गोसावी यानीं साक्षी दिल्ही त्याचप्रमाणें ह्या उभयेतांनीं हि साक्षी दिल्ही ह्मणिजे आपण आन्याई बोलावयास समंध नाहीं हें लिहिलें सही तारीख ११ माहे साबान

येणेंप्रमाणें दुसरी तक्रीर सदासिवभटांनीं केली ते पंचाइतानीं वाचून पाहिली आणि त्यास पृछा केली कीं तुह्मापासी कागद जुनेपाने बहुता दिवसाचे वतनाचे भोगवटियाचे आसले तरी पंचाइतापासीं आणून ठेवणें त्यास सदासिवभट बोलिलें कीं आपणापासीं कागद दोनी होते ते आपला बाप भानभट यानि मोरेश्वरभटास श्रीमहादेवाचे स्थळीं दिले बिता।

रामेश्वरभटाचे नांवाचे दान पत्र येक १	पिलंभटाचे नावांचें मुतालिकाचें पत्र येक १

येकून पत्रें दोनीं होतीं तें दिल्हीं याखेरीज वतनी कागद नाहींत ह्मणून पंचाइतापासीं कतबे लेहून दिल्हे

बितपसील.

दा॥ बो॥ सदासिवभट बिन भानभट गिजरे सु॥ सलास अशरीन मया अलफ कारणें लेहून दिल्हा कतबा ऐसा जे आपणामधें व नारायेणभट गिजरे यांमेंधे पांचागांवींच्या जोसीपणाचा वेव्हार लागून स्थलमजकुरास आलों उभयेतांपासून तकरीरा व वंशावली घेऊन कागदपत्र वतनाचें देणें ह्मणऊन आज्ञा केली त्यास आपणापासीं कागद दोनीं दोतें ते आपल्या तीर्थरूपांनीं मोरेश्वरभट गिजरे यांपासीं दिल्हे त्य कागदाच्या तालिका व मोरेश्वरभटाचे हातिचा कागद आपणापासी नाहीं सदरहू कागद दोनी दिल्हे ऐसें साक्षीमुलें खरें करून देऊं न देऊं तरी आपणास वृत्तीस समंध नाहीं हे लेहून दिल्हे सही बिकलम बाबदेवभट गिजरे तेरीख १२ माहे शाबान

त्यावरी पश्चमवादी तुह्मास पंचाइतानीं पृछा केली कीं तुह्मापासीं कागदपत्र जे वतनाचे बहुतादिवसाचे भोगवटियाचे असतील

तकरीर पश्चमवादी

शके १६४५ शोभकृतनाम संवत्सरे वैशाख शुध द्वादसी तदिनीं समस्त गोतगंगा यांप्रती तकरीर कर्दे नारायेणभट बिन वीरेश्वरभट व गोपालभट बिन रुद्रभट गिजरे जोतिषी मौजें कारवें व मौजे वडगांव व मौजें सेरें व मौजें दुसेरें व मौजें कोडोली प्रां कऱ्हाड यानि तकरीर केली ऐसीं जे आमचे मूळपुरुष रामेश्वरभट गिजरे यानि सदरहू गांव पांच हे जोतिषवृत्ति व कुळकरणीयांच्या घरीचें उपाध्यपण ऐशा दोनी वृत्ति संपादिल्या त्या वृत्तीस आह्मी व वाईकर गिजरे व दुसेरेकर गिजरे ऐसे त्रिवर्ग भाऊ यांनी भक्षाव्या ऐसे आहे हें खरें करून देऊं सांप्रत सदासिवभट गिजरे बोलताती कीं आपले तीर्थरूप भानभट यांनी मोरेश्वरभटापासीं रामेश्वरभटाच्या नांवाचे दानपत्र एक व पिलंभटाच्या नांवाचें मुतालिकाचें पत्र येक ऐसीं दोनी पत्रें दिल्हीं ह्मणताती त्यास मोरेश्वरभट असतां हे व आह्मी येकेठायीं होतों तेव्हां कांहीं बोलिलें नाहींत आतां तो मोरेश्वरभट नाहींत याकरितां आह्मी सदासिवभटास श्रीकुलस्वामीच्या देवाळयांत श्री ची शफत उभयेतांस करून बोली केली तालिका आसतील अथवा मोरेश्वरभटाचे हातीचा कागद अथवा साक्षी आसतील तरी श्रीपासीं आणा आह्मी आपलीं पत्रें आणितों तालिकास व आसलास ऐक्यता जाहलीं ह्मणजे तुमचीं पत्रें खरीं ऐसें बोलिलों त्यास सदासिवभट बोलिले कीं तालिका व मोरेश्वरभटाचे हातीचा कागद साक्ष ऐसीं तिन्हीं नाहींत ऐसे श्री चें साक्षीनें बोलिलें त्यास राजश्री श्रीनिवास परशराम प्रतिनिधी यांचा हुजऱ्या दाजी कदम साक्ष आहे त्या उपरांतिक संध्याकाळीं बाबदेवभट याचें घरीं जाऊन त्यास हि श्रीगृहपती साक्षी करून हें च विचारिलें त्यानीं ही सदासिवभटा सारिखें उत्तर दिल्हें त्यास साक्ष पुरुषोत्तमभट आफले व धोंडभट वालिंबे हे उभयेता आहेत त्यानंतर दादंभट ढवलीकर वास्तव्य वांई हे हि साक्ष आहेत यासी मोरेश्वरभट परंधामास गेलें आतां व्यवहार हे करिताती तरी यांनीं कोल्याच्या मुकामीं वाईकर व दुसेरेकर व आपण ऐसे त्रिवर्ग भाऊ वृत्ति

त्रिवर्गाची ऐसे लेहून आह्मास दिल्हे आह्मी हि तैसें च लेहून त्यांस दिल्हें आहे त्या प्रमाणें त्यांनीं खरें करून दिल्हे ह्मणिजे वृत्ति त्यांची खरी हें पत्रें दोनी दिल्ही ह्मणताती ते आह्मास ठावकीं नाहींत आह्मी त्रिवर्ग भाऊ खरे वृत्ति त्रिवर्गानीं भक्षावीं ऐसें आहे हें भोगवटियामुळें व गोतमुखें व पत्रद्वारें खरें करून देऊं यासि अन्यथा जाहल्यों तरी गोताचे आन्याई या वेगळें आमचीं तीनपत्रें राजिकांत पुस्तकाबराबरी गेली बि ता।

१ देशपांडे यांची वंशावळी प्रा। मजकूर

१ देशपांडेयाचे घरीचें उपाध्यपणाचे पत्र

१ रामेश्वरभटाचें नांवाचा इनामाचा फर्मान

येकून तीनपत्रें गेलीं आहेत ऐसें मोरेश्वरभटीं सांगितलें आहे आपणापासीं पत्रें आहेत तें हि पत्रें आपली हें खरें करून न देऊं तरी आह्मास वृत्तीस समंध नाहीं हें तकरीर लेहून दिल्ही सही छ १० माहे शाबान येणें प्रमाणें उभयेतांच्या तकरीरा पंचाइतानीं वाचून पाहिल्या पश्चमवादीं तुह्मी तकरीर केली कीं सदासिवभट व बाबदेवभट यांसि कऱ्हाडिं श्रीकुलस्वामीच्या देवाळयांत श्रीचा शफत उभयेतास करून बोली केली तालिका असतील अथवा मोरेश्वरभटाचे हातिचा कागद अथवा साक्षी असतील तरी श्रीपासीं आणा आह्मी आपलीं पत्रें आणितों तालिकास व आसलास ऐक्यता जाहलीं ह्मणिजे तुमचीं पत्रें खरी ऐसे बोलिलों त्यास सदासिवभट बोलिलें कीं तालिका व मोरेश्वरभटाचे हातिचा कागद व साक्षी ऐसीं तिन्हीं नाहींत ऐसें श्रीचे साक्षीनें बोलिले त्यास साक्ष बित॥

१ दाजी कदम दि।	१ पुरुषोत्तमभट आफले
रा। प्रतिनिधी	१ दादंभट ढवळीकर
१ धोंडभट वालिंबे	——
——	२
२	

ऐसें चौघे साक्षी आहेत चौघांपैकीं दादंभट ढवळीकर यांच्या साक्षीनें सानाराच्या मुकामीं बोलिले ऐसी तुह्मी तकरीर केली त्यावरून सदासिवभटास पंचाइतानीं पुसिलें कीं तुह्मीं कऱ्हाडीं आपणापासीं कागदाच्या तालिका अगर मोरस्वरभटाचे हातीचा कागद व साक्षी ऐसी नाहीं ह्मणऊन सदरहूचे साक्षीनी बोलिलां आणि तकीर केली कीं कागद दिल्हे ऐसें साक्षीनसी खरें करून देऊं तरी या उपरि तुमचे रुजू काय धरावें तेंव्हा नामुकरादीस जाऊन आपण साक्षी नाहीत ऐसें बोलिलों नाहीं ह्मणून पंचाइतापासीं विनंति करून मागती तकीरेस पुरवणी लेहून दिल्ही बितपसील

तकरीर कर्दे सदासिवभट बिन भानभट गिजरे वास्तव्य कऱ्हाड तकरीर केली ऐसी जे कऱ्हाडहून गोपाळभट सातारियास येतेसमईं श्रीच्या देवाळयामधें आपणासीं व त्यांसीं बोलणें जाहलें कीं तुमच्या दानपत्राचीं तालिक व पिलंभटाच्या पत्राची तालिक व मोरेश्वरभटाचे हातिचा कागद ऐसें आणिलें तरी आपणांस दाखवणें साक्षी आसिलें तरी सांगणें त्यास आपण बोलिलों जें आपणापासीं दों पत्राच्या तालिका नाहींत मोरेश्वरभटाचे हातिचा कागद नाहीं ऐसें आपण बोलिलों त्यास गोपाळभट मागती रात्रीं बाबदेवभटाच्या घरास येऊन गृहपतीची शफत करून करून आपण तुह्मांसीं कृत्रिमें बोलत नाहीं कागदाच्या तालिका अगर मोरेश्वरभटाचें पत्र अथवा साक्षी दाखवा ऐसें पुरुषोत्तमभट आफले व धोंडभट वालिंबे यांच्या साक्षीनें बोलिलों त्यास बाबदेवभट बोलिलें कीं दोघ भलते ग्रहस्त बैसोन तुमचें व आमचे लिहिलें होऊन तें समईं जें बोलणें तें बोलों येथें बाजारीं बोलण्यामधें काये आहे ऐसे बावदेवभट बोलिलें त्यास गोपाळभट ह्मणताती कीं साक्षी अगर तालिका मोरेश्वरभटाचे हातिचा कागद ऐसें नाहीं ह्मणऊन उभयेतांचे गुजारतीनें बोलिलें हें खरें करून देऊं तरी येणेंप्रमाणें उभयेतानी साक्ष दिल्ही तरीं आह्मास बोलावयास समंध नाहीं आपण सर्वे आन्याई याखेरीज दादंभट ढवळीकर व दाजी कदम याचे गुजारतीनें हि येणेंप्रमाणें च बोलिलों ह्मणताती तरी उभ-

येता भट गोसावी यानीं साक्षी दिल्ही त्याचप्रमाणें ह्या उभयेतांनीं हि साक्षी दिल्ही ह्मणिजे आपण आन्याई बोलावयास समंध नाहीं हें लिहिलें सही तारीख ११ माहे साबान

येणेंप्रमाणें दुसरी तकरीर सदासिवभटानीं केली ते पंचाइतानीं वाचून पाहिली आणि त्यास पृछा केली कीं तुह्मापासी कागद जुनेपाने बहुता दिवसाचे वतनाचे भोगवटियाचे आसले तरी पंचाइतापासीं आणून ठेवणें त्यास सदासिवभट बोलिलें कीं आपणापासीं कागद दोनी होते ते आपला बाप भानभट यानि मोरेश्वरभटास श्रीमहादेवाचे स्थलीं दिले बितपसील

रामेश्वरभटाचे नांवाचे दान पत्र येक १	पिलंभटाचे नावांचें मुतालिकाचें पत्र येक १

येकून पत्रें दोनीं होतीं तें दिल्हीं याखेरीज वतनी कागद नाहींत ह्मणून पंचाइतापासीं कतबे लेहून दिल्हे
बितपसील.

दा॥ बे॥ सदासिवभट बिन भानभट गिजरे सु॥ सलास अशरीन मया अलफ कारणें लेहून दिल्हा कतबा ऐसा जे आपणामधें व नारायेणभट गिजरे यांमेंध पांचागांवींच्या जोसीपणाचा बेव्हार लागून स्थलमजकुरास आलों उभयेतांपासून तकरीरा व वंशावली घेऊन कागदपत्र वतनाचें देणें ह्मणऊन आज्ञा केली त्यास आपणापासीं कागद दोनीं दोतें ते आपल्या तीर्थरूपांनीं मोरेश्वरभट गिजरे यांपासीं दिल्हे त्य कागदाच्या तालिका व मोरेश्वरभटाचे हातिचा कागद आपणापासी नाहीं सदरहू कागद दोनी दिल्हे ऐसें साक्षीमुळें खरें करून देऊं न देऊं तरी आपणास वृत्तीस समंध नाहीं हे लेहून दिल्हे सही बिकलम बाबदेवभट गिजरे तेरीख १२ माहे शाबान

त्यावरी पश्चमवादी तुह्मास पंचाइतानीं पृछा केली कीं तुह्मापासीं कागदपत्र जे वतनाचे बहुतादिवसाचे भोगवटियाचे असतील

तरी ते आणून पंचाइतापासीं ठेवणें त्यावरून तुह्मी कागद आणून पंचाइतापासीं ठेविले बिता।।

६ वृत्तीचीं पत्रें	९ वेव्हारपत्रें
१ पारसी पत्र जुनें	३ देशपांडेयांची पत्रें
४ खंडपत्रें	३ समापत्रें वाईकर भाऊ
१ जाबिता	१ राघो जोगदेव याचें पत्र
११ खुर्दखतें इनामांची	१ आनंदभटास लिहिलें पत्र
१ वडगांवकराचें पत्र	——
	१७

——
२४

सदरहू येकेतालिस पत्रें पंचाइतमुखें खरीं करून देऊं न देऊं तरी गोताचे आन्याई ह्मणऊन बोलोन सदरहू पत्रें पंचाइतापुढें ठेविलीं त्यावरी तुह्मां उभयेता वादियांसि पंचाइतमुखें निवाडा होईल तेणें-प्रमाणें साधल्या आर्थीं वर्तवावें तुटल्या अंतीं निवारण करावें येखादेचें जमान देणें ह्मणऊन पंचाइतानीं आज्ञा केली आज्ञाप्रमाणें तुह्मी उभ-येता वादी यांनीं जमान दिल्हे बिता।।

आग्रवादी सदासिवभट यांनीं जमान दिल्हा

दा।। बो।। रामभट बिन चंद्रभट ढवलीकर सु।। सलास अशरीन मया अलफ कारणें लेहून दिल्हा कतबा ऐसा जे गोपालभट गिजरे जोतिषी या मधें व सदासिवभट गिजरे क्ऱ्हाडकर या मधें पांचा-गांवीचा जोसीपणाचा वेव्हार लागून मुनसफी बदल आलें त्यास पंचा-इतमुखें निवाडा होईल तेणें प्रमाणें साधिल्याआर्थीं वर्तवावें तुटल्या-आर्थीं निवारण करावें येखादेचें जमान देणें ह्मणऊन आज्ञा केली त्यास आपण सदासिवभट यास जमान असों साधिल्याआर्थीं वर्तऊं तुटल्या-आर्थीं निवारण करून हा लेहून दिल्हा जमान कतबा सही तेरीख १७ माहे शाबान

पश्चमवादी गोपाळभट बिन
रुद्रभट गिजरे यांनीं जमान दिल्हा.

दा वो चिंतामणीभट बिन नारायेणभट वलवडे कऱ्हाडकर सुा सळास अशरीन मया अलफ कारणे लेहून दिल्हा कतबा ऐसा जे गोपाळभट गिजरे जोतिषी या मधें व सदासिवभट गिजरे कऱ्हाडकर या मधें पांचा गांवीचा जोसीपणाचा वेव्हार लागून निवाडयाकरितां आले त्यास पंचाइतमुखें निवाडा होईल तेणें प्रमाणें साधिल्या आर्थी वर्तवावें तुटल्या आर्थी निवारण करावें एखादेचे जमान मागितले त्यास आपण गोपाळभट बिन रुद्रभट यांसि जमान असो साधिल्याआर्थी वर्तऊं तुटल्या आर्थी निवारण करून हा लेहून दिल्हा जमान कतबा सही तेरीख १७ माहे साबान

सदरहू तुह्मा उभयेतापासून वर्तावयाचे जमात घेऊन सदासिवभट यांसि पृछा केली कीं तुह्मी कागद दोन्ही दिल्हे ते साक्षीमुळें खरें करून देऊं ह्मणऊन तकरीर केली तरी साक्षीयांचीं नावें सांगून साक्षीमुळें खरें करून देणें ह्मणऊन पंचाइतानीं आज्ञा केली त्यावरून सदासिवभट बिन भानभट यांनीं साक्षी लेहून दिल्हे बितपशील

१ नारायेण आफळे जानभटी	१ बहिरंभट आफळे
१ नारायेणभट आध्यापक	१ हरिभट गिजरे
२	२

पैकीं आहेत दोघे नारायेणभट आफळे जानभटी येक, व नारायेणभट अध्यापक येक १ येकून दोघे बाकी दोघे त्यांचे हातीचें दस्तूर बहिरंभट आफळे यांच्या अक्षरें दोघांची साक्ष आहे त्यांचा पुत्र आहे तो रुजू करून देईल सदरहू साक्षी यानी आपले बेतालीस स्मरोन श्रीकृष्णा स्मरोन पंचाइत भले सिष्ट यांच्या विद्यमानें साक्षी देतील ते खरी तेणें-प्रमाणें वर्तों यासि दिकत करूं तरी गोताचे आन्याई येणेंप्रमाणें साक्षी

यांची नावनिसी लेहून दिल्ही त्याउपरी तुह्मां उभयेता वादी यासि पंचाइतानी विचारिले कीं तुह्मी वाईकर व दुसेरेकर भाऊ ह्मणऊन लेहून दिल्हे तरी उभयेता मुखें भाऊपणा पुरऊन देणें भाऊपणा पुरऊन देईल तो पंचाइतमुखें खरा होईल ऐसे बोलोन वाईकर व दुसेरेकर तुह्मी उभयेता वादे जाऊन त्यास घेऊन येऊन भाऊपणा त्रिवर्गांचा येक करून देणें ज्याचा भाऊपणा न लागे तो अनायासें च उडाला ऐसें सांगितलियाउपरी दुसेरेकर भाऊ समीप सीधच होते वाईकरास घेऊन येणें ह्मणऊन तुह्मा उभयेतास सांगितलें व सदासिवभट बिन भानभट यांसि सांगितलें कीं तुह्मी साक्षी लेहून दिल्हे त्याप्रमाणें घेऊन येणें व तुह्मांस सांगितले जे तुह्मी तकरीर केली कीं कन्हाडीं सदासिवभट व बाबदेवभट यांसि बोली जाहली तेसमईं त्यांनीं कागदाच्या तालिका व मोरेश्वर भटाचे हातिचा कागद व साक्षी ऐसें नाहीं ह्मटिलें ते वेळेचे साक्षी सदरहू लेहून दिल्हे याप्रमाणें घेऊन तुह्मीं येणेंप्रमाणें तुह्मां उभयेता वादी यास आपले निसबतवार साक्षी व वांईकर भाऊ घेऊन येणें ह्मणऊन आज्ञा करून वाईकर भाऊ यांसि स्थलीहून पत्र लेहून तुह्मांपासीं दिल्हे त्याप्रमाणें तुह्मी जाऊन निसबतवार साक्षी घेऊन आलां कन्हाडचे तुमचे चौघां साक्षीपैकीं दोघे साक्षी बितपसील

पुरुषोत्तमभट आफले १ धोंडभट बालिंबे १

येकून दोघे या उभयेतानीं साक्षीच्या तकरीरा लेहून दिल्हीया बितपसील

दा। बो। पुरुषोत्तमभट बिन बापूभट आफले माहुलीकर सु॥ सलास अशरीन मया अलफ कारणे लेहून दिल्ही तकरीर ऐसी जे सदासिवभट गिजरे व बाबदेवभट गिजरे यां मधें व गोपालभट गिजरे यां मधें पांचां गांवीचे जोतिषपणाचा कथला लागोन स्थल मजकुरास आले त्यास गोपालभट गिजरे यांनी लेहून दिल्हें कीं आमचे गुजारतीनें सदासिवभट व बाबदेवभट यांसि कन्हाडीं बोली जाहली ते समईं

सदासिवभट बाबदेवभट बोलिले कीं आपणापासीं कागदाच्या तालिका अगर मोरेश्वरभटाचे हातिचा कागद व साक्षी नाहींत ऐसे आमचे गुजारतीनें बोलिले ह्मणऊन आपणास आणून सत्य घाळून साक्ष विचारिली तरी सदासिवभट व बाबदेवभट बोलिले कीं आपणापासीं तालिका अगर मोरेश्वरभटाचे हातिचा कागद आपणापासीं नाहींत भानभटापासीं दोनी कागद होते ते मोरेश्वरभटापासीं दिल्हे ऐसें बोलिले हे सही तेरीख १८ माहे साबान.

दा। ब्रो धोंडभट बिन सिवभट जोतिषी कुळकरणी मौजे आसनगाव सुा। सलास अशरीन मया अलफ कारणे लेहून दिल्ही तकरीर ऐसी जे बाबदेवभट व सदासिवभट गिजरे यां मधें व गोपाळभट गिजरे यां मधें पांचा गांवीचे जोसीपणाचा कथला लागून स्थलास आले तकरीरा लेहून दिल्हीया त्यास गोपाळभट यांनि लेहून दिल्हे कीं आमचे गुजारतीनें सदासिवभट व बाबदेवभट बोलिले कीं कागदाच्या तालिका अगर मोरेश्वरभटाचे हातिचा कागद व साक्षी नाहींत ऐसें कऱ्हाडीं बोलिले ह्मणऊन आपणास आणून सत्य घाळून विचारिले तरी सदासिवभट व बाबदेवभट बोलिले कीं आपणापासीं तालिका अगर मोरेश्वरभटाचे हातिचा कागद आपणापासीं नाहीं भानभटापासी दोनी कागद होते ते मोरेश्वरभटापासीं दिल्हे ऐसे बोलिले हे सत्य तेरीख १९ माहे शाबान.

येणेंप्रमाणें उभयेतांनी साक्ष दिल्ही उभता साक्षदार आले नाहींत तुह्मी आणितों ह्मणो लागलेस त्यास आह्मीं पंचातानी आज्ञा केली कीं त्या साक्षी वांचुन कांहीं खोळंबा नाहीं तुह्मी येकासयेक परस्परें घरीं उदंड गोस्टी बोलिलां त्यास प्रमाण काये वादाचे काम मनास मानेल तैसे बोलतात याचें सत्य काये याची साक्ष कोठवरी पाहावी परंतु दोघांच्या साक्षीचा मोझा पाहून ते गोस्टी राहऊन मुख्य गोस्टी तुह्मी उभयेता वादी यांनी वांईकर व दुसेरेकर यांचा भाऊपणा लाऊन द्यावा व सदासिवभटीं साक्षीबदल लेहून दिल्हे त्याच्यामुखें साक्ष खरी करावी सदा-

सिवभट यांनी व तुह्मीं वाईकर भाऊ आणिला दुसेरेकर प्रसंगीच होता त्या उभयेतास पंचाइतानी सत्य घालून तुह्मां उभयेताची साक्षी विचारली त्यानी साक्ष दिल्ही बितपसील दा। बा। गणेशभट व रुद्रभट बिन नारायेणभट गिजरे दुसेरेकर सुा। सलास अशरीन मया अलफ कारणें लेहून दिल्ही तकरीर ऐसी जे सदासिवभट बिन भानभट गिजरे यां मधें व नारायेणभट बिन वीरेश्वरभट गिजरे यां मधें पांचा गांवीच्या जोसीपणाच्या वतनाचा कजिया लागून स्थलास आले त्यास तकरीरा लेहून मागितल्या उभयेतानीं तकरीरा लेहून दिल्हीया त्यांत त्यानीं लेहून दिल्हें कीं आपला तिघां भावांचा विस्तार येक आपण येक वांईकर येक दुसेरेकर ऐसें तिघे भाऊ ऐसें उभयेतानीं हि लेहून दिल्हे. तरी तुह्मीं त्या तिघां भावांतील आहां तुमचा भाऊ कोण आहे त्याचा तपसील लाऊन देणें ह्मणऊन आज्ञा केली ऐसीयासि आपला मूळपुरुष रामेश्वरभट त्यास पुत्र तिघे बितपसील

वडील नरहरी भट	दुसरा रंगभट	तिसरा गोविंदभट
१	१	१
हाली त्याचा वंश	हाली त्याचा वंश	हाली त्याचा वंश
१ नारायेणभट	विश्वनाथभट	आपण
१ गोपालभट	वाईकर १	

२

येणंप्रमाणें तिघांचा विस्तार आहे नारायेणभट गोपालभट आपले भाऊ सदासिवभट बिन भानभट हा आपले पदरीचा भाऊ नव्हे देवरात गोत्री मात्र त्यास आपणास संमंध नाहीं येणेंप्रमाणें लेहून दिल्हे आहे हे श्री मधें निवोन याचप्रमाणें बोलों यासि अन्यथा जाहलों तरी आपणास वृत्तीस समंध नाहीं हे लेहून दिल्हे सही तेरीख २९ माहे शाबान येणें प्रमाणें दुसेरेकरानीं तकरीर लेहून दिल्ही व वंशावली लेहून दिल्ही त्याउपरी विश्वनाथभट बिन बाळंभट गिजरे वाईकर

यासि तुह्मा उभयेतांचा करीना विचारिला त्यास विश्वनाथभट यासि पुसावें एक आणि बोले एक ऐसा चावळूं लागला तेंव्हां पंचाइतानी त्यास ह्मटिले कीं तुमचे देशपांडे याचे घरीचें उपाध्यपणावरी समजोन राहिला ते वृत्ती व हालीं जोसीपणाच्या वृत्ती येक करून त्रिवर्गांस देत नाहीं तुह्मीं कांहीं संशये न धरणें भाऊपणा मात्र जैसा असेलें तैसा सत्य सांगणें ऐसें बोलिले तऱ्ही त्याच्या चित्तास न येतां आपल्या मनांत संशये धरून नपुत्रा नपुत्री ऐसें बोले त्यावरून पंचाइतानी निर्भेछिला तेंव्हां त्यानें पंचाइतापासीं विनंती केली कीं आपली आजी कासीबाई वांईस आहे तीस कुलकट ठाऊक आहे वांईस जाऊन पुसोन येतों ह्मणऊन समागमें मनुष्य घेऊन वाईस गेला मग तेथून येऊन तकरीर लेहून दिल्हा बितपसील

तकरीरकर्दे बो विश्वनाथभट बिन बाळंभट गिजरे वांईकर सुा आर्बा अशरीन मया अलफ लेहून दिल्ही तकरीर ऐसी जे सदासिवभट बिन भानभट गिजरे व नारायेणभट बिन वीरेश्वरभट या उभयेतांत पांचा गांवीच्या जोतिषपणाचा कजिया लागून स्थलास आले तकरीरा लेहून दिल्हीया त्यामधें उभयेतांनी लिहिलें कीं आपण तिघे भाऊ येक वांईकर व येक दुसेरेकर व येक आपण ह्मणऊन लेहून दिल्हे त्यावरून आपणास बोलावून वडिलांचें सत्य घालून विचारिलें कीं उभयतानीं तुह्मीं भाऊ ह्मणऊन लेहून दिल्हे तरी याचें सत्य स्मरून कोणता भाऊ आपला हा निर्वाह करून देणें त्यास आपले आजीनें सांगितलें कीं आपला आजेसासरा सांगत होता कीं आपली मूलवृत्ती वीरवाल्हे तेथील जोसीपण तें थिटियांच्या स्वाधीन करून ते स्थल सोडून आले कोणी वांईस राहिले कोणी माहुलीस राहिले कोणी कऱ्हाडीं राहिले परंतु येकमेकांची वृधिअवरोध धरीत नाहीं येणेंप्रमाणें आपली आजी कासीबाईनें सांगितलें ते लेहून दिल्हें सही तेरीख १ माहे रमजान.

येणेंप्रमाणें वांईकर विश्वनाथभट यानें लेहून दिल्हें ते पंचाइतानीं मनास आणिलें त्याचा विचार मनास आणिला तों वांईकर मोघम

गोस्टी बोलतात आपण देशपांडे यांचे घरीचे उपाध्यपण खातों त्यास कालकला कथला होईल या करितां मोघम बोलताती परंतु या मार्गे यांच्या वडिलाचें लिहिलें पुसिलें आहे तिघे भाऊ येक घर आहे तिघांचा मूलपुरुष येक खरें परंतु वांईकराचा भोगवटा सांपृत पांचा गांवीं नाहीं आणि दुसेरेकर यांचा व नारायेणभट व गोपाळभट गिजरे कऱ्हाडकर यांचा भोगवटा सांपृत देशपांडिये यांच्या घरीं नाहीं त्यास गांवकीच्या वृत्ति ह्मणिजे कसालियाच्या आणि उपेंद्र थोडिका आणि देशपांडे यांचेथील उपेंद्र विशेष आणि कसाला नाहीं त्यास आतां भाऊ ह्मणवावें तरी प्रथमशाखे व समुद्रखानि यांसि गोपालभट व केशवभट गिजरे यानीं प्रथमशाखी व समुद्रखानि यांसि वेव्हार करून ते उभयेता खोटे करून उभयेता गिजरे यानीं वृत्तीचें साधन केलें आहे त्यास वेव्हार संमंधें द्रव्य पडिलें आहे हे गोस्टीची तकसीम तिसरी द्यावी लागेल आणि देशपांडे यांचेथील दोनी तकसिमा गोपाळभट व केशवभटास द्याव्या लागतील हे गोस्टी मनांत आणून कची बुधीनें बोलतो परंतु हे त्रिवर्ग भाऊ खरे वांईकर आनंदभट गिजरे ह्मणिजे प्रसिध राजमान्य त्यांचे समापत्र व विश्वनाथभटाचा बाप बाळंभट याचें समापत्र आसोन व आनंदभट वांईकर याचा पुत्र नारायेणभट याचे हि समापत्र गोपालभट केशवभटापासीं ऐसीं तीनीं पत्रें आहेत याचा शोध केला जाईल ऐसा निर्वाह करून सदासिवभट बिन भानभट यानीं पत्रें दिल्हीं ऐसीं खरीं करून देतों ह्मणऊन साक्षी लेहून दिल्हे सदरहू साक्षीप्रमाणें साक्ष घेऊन आले त्यास पंचाइतानीं सत्य घालून विचारिलें त्यावरून साक्षी यानीं तकरीरा लेहून दिल्हीया बितपसील.

दा बो नारायेणभट आफले सुा सलास अशरीन मया अलफ कारणें लेहून दिल्ही तकरीर ऐसी जे सदासिवभट बिन भानभट गिजरे यां मधें व नारायेणभट बिन वीरेश्वरभट गिजरे यां मधें जोसीपणाच्या वतनाचा कजिया लागून निवाडियाबदल आले त्यास सदासिवभट यानीं

लेहून दिल्हें कीं आपला बाप भानभट यानीं मोरेश्वरभटापासीं वतनाचा कागद येक व पिलंभटाच्या नांवाचा मुतालिकाचा कागद येक ऐसे दोनी कागद श्रीमाहादेवीं दिल्हें त्यास साक्षी आह्मीं आहों ह्मणऊन लेहून दिल्हें त्यावरून आह्मास श्री चा शफत घालून विचारिलें तरी तें कांहीं आपणास दखल नाहीं च्यार महिने जाहले सदासिवभटानें पंचांगासारिखा कागद गुंडाळून तुमचे हातिचें अक्षर ह्मणऊन दुरून दाखविलें परंतु कागद आपण पाहिला नाहीं अगर आह्मास हें कांहींच दखल नाहीं हें लेहून दिल्हें सही शोभकृत नाम संवछरे जेष्ठ शुध प्रतिपदा भृगुवासरे शकें १६४५

तकरीरकर्दे बो। नारायेणभट अध्यापक समस्त सभानाईक यांसि लेहून दिल्ही तकरीर ऐसी जे भानभट गिजरे व मोरभट गिजरे उभयेता बोलिले कीं पत्रें आह्मांस पावलीं भानभट बोलिले कीं मोरेश्वरभटीं आपणापासीं कागद मागितलें मोरेश्वरभट बोलिले कीं आपणास पत्रें पावलीं पत्रें कशाचीं हें आपणास ठावकीं नाहींत आपण स्वदस्तुरें कांहीं गोष्टी लिहिली नाहीं हे सत्य शोभकृत नाम संवछरे जेष्ट शुध प्रतिपदा भृगुवासरे हे गोस्टी ईश्वर नाम संवछरीं जाहली उभयेता बोलिले मात्र पत्रें आपणादेखत भानभटीं मोरेश्वरभटापासीं दिल्हीं नाहींत हें सत्य

येणेंप्रमाणें उभयेतानी साक्षी दिल्ही बाकी दोघे निवर्तले त्यांच्या साक्षी बहिरंभट आफले यांच्या अक्षरें दोघांची साक्ष आहे त्यांचा पुत्र आहे तो रुजू करून देईल ह्मणऊन सदासिवभटीं करार केला त्यावरून बहिरंभट आफळे यांचा पुत्र मुकुंदभट आफले यांसि सत्य घालून करीना विचारिला ते बोलिलें कीं हें वर्तमान आपणास कांहीं विदित नाहीं परंतु हें अक्षर आपल्या तीर्थरूपाचे ह्मणऊन श्रीकृष्णेमधें निघोन खरें करून देऊं ऐसें प्रथमचि बोलिले त्यास पंचाइतानी विचार केला कीं हे साक्षी आणि येकायेकींच श्री त निघों ह्मणताती त्याचा विचार काये आपले बापाचेंअक्षर जाहलें तरी त्यांचे हातीचें पुस्तक अगर आणखी कागद गांवांतील आणून रुजू करून ऐक्यता करून दाखवावें ऐसे न करितां श्री मधें

निघों ऐसें बोलिलें तेव्हां अप्रमाणतेची गोस्टी दोघे जिवंत साक्षी आहेत त्यां पैकीं एकानें तों आपणास कांहींच ठाऊक नाहीं दस्तूर आपलें नव्हे कांहींच स्मरत नाहीं ऐसी साक्षी दिल्ही दुसरियानें साक्षी दिल्ही कीं कागद दिल्हे परंतु कशाचे दिल्हे हें ठाऊक नाहीं आपणादेखत हि दिल्हे नाहींत साक्ष हि आपले अक्षरें घातली नाहीं ऐसे बोलिला त्यास दोघे जिवंत साक्षी त्यांचा विचार या प्रकारीचा याच्या तों तीर्थरूपाच्या अक्षराचीं साक्षी ऐसे आसोन प्रमाण करीन ह्मणऊन वदला तेव्हां पंचाइतानी अप्रमाण करून निरोप दिल्हा ऐसे तिघे साक्षी यांची बोलीचाली लेहून त्या उपरी त्रिवर्ग बंधूंचा शोध पाहिला तुह्मास आज्ञा केली कीं तुह्मापासीं भाऊपणाचे कागद आहेत ते पंचाइतास वाचून दाखवणें त्यावरून तुह्मीं तीं पत्रें बजिनस आसलें आणून दिल्हीं त्यांत वांईकरभटांचीं समापत्रें तीन बितपसील

आनंदभटाचे नांवांचे पत्र येक १	बाळंभटाचे नांवांचे पत्र येक १	नारायेणभाटाचे नांवांचे पत्र १

येकून समापत्रें तीनी पैकीं पेशजीचें वेव्हाराचे पत्र आनंदभटाचे नांवाचें तीर्थरूप राजश्री रुद्रभट कऱ्हाडकर व तिमणभट दुसेरेकर गिजरे गोसांवी यांसी प्रती आनंदभट गिजरे वांईकर साष्टांग नमस्कार विनंती उपरी तुह्मी आह्मासीं नेम करून गेलेती त्यास बोलिल्या नेमाप्रमाणें आले नाहींत आह्मी आठ दिवस मार्ग पाहिला मग राजकार्य होते ह्मणऊन गेलों ऐसियासि तुह्मी जें कार्य आंवलंबिले आहे तें करणें त्यास काय बरें वाईट होईल त्यास तिसरे तकसीमेस आह्मीं मान्य असों जें काये पडेल तें देऊं येविशीं आनमान न करणें श्रीमुख संवछर आशाढ शुध सप्तमी भृगुवासर हा नमस्कार पत्र येक १

का। पत्र पेशजीचें बाळंभटाचे नांवांचें शके १६१४ आंगिरा-नाम संवछरे श्रावण शुध दशमी तदिनीं रुद्रभट कऱ्हाडकरें व तिमण-

भट दुसेरेकर गिजरे यांसि बाळंभट व समस्त बापभाऊ वांईकर यानीं लेहून दिल्हे जे वृत्तीसमंधें जें द्रव्य पडेल तें देऊं जें पडिलें आसेल तें हि देऊं संवछर प्रतिपदेकारणें देऊं न देऊं तरी संवछर प्रतिपदेपासून कलांतरासकट वैशाखमासीं देऊं मुदतीस नेंदूं तरी वृत्तीस आह्मास समंध नाहीं हें लिहिलें सत्य साक्ष रामभट आरणके पत्र येक १

किता येकपत्र हालीं वेन्हराचे राजमान्य राजश्री विरेश्वरभट गिजरे कऱ्हाडकर व केशवभट गिजरे दुसेरेकर स्वामी गोसांवी यांसि नारायेणभट बिन आनंदभट गिजरे वांईकर साष्टांग नमस्कार उपरी तुह्मी दुसेरेकर आपले बापभाऊ यांसि कटकट करून दुसेरे व कोडोली येथील वृत्तींचा भाग वारून घेतला त्या मुळें तुह्मास जें द्रव्य पडिलें असेल व हाली तींही गांवींचा कथला शामभट प्रथमशाखी व भीमभट समुद्रखानी यांसि मांडिला आहे तरी आसाध्य साध्य विचारें जें द्रव्य पडेल तें श्री स्मरोन तुह्मीं सांगाल त्याप्रमाणें देऊं आह्मीं विभागपरत्वें देऊं यासि आह्मांपासून अंतर पडणार नाहीं तुह्मीं आह्मासीं छद्मयुक्त न वर्तावें शकें १६४४ शुभकृत नाम संवछरे चैत्र वद्य शष्टी हें लेहून दिल्हें सत्य साक्ष रामभट बुधकर १ अनंतभट ढवलीकर वास्तव्य पाराशर १ गोपालभट पोरे १ बहिरंभट आरणके १

येणेंप्रमाणें तुह्मीं तीनी समापत्रें वांईकर भावाचीं दाखविलीं त्यावरून तुमचा व दुसेरेकराचा व वांईकराचा भाऊपणा येक जाला विश्वनाथभट बिन बाळंभट वांईकर यानीं मनामधें देशपांडे याचे घरीच्या उपाध्येपणाच्या अंशाचें भयें धरून नपुत्रा नपुत्री बोलिले तेन्हां त्यांच्या वडिलांच्या समापत्रावरून तुह्मी व ते व दुसेरेकर ऐसे भाऊ पंचाईतामुखें खरें जाहला व दुसेरेकर भाऊ यांच्या वडिलांच्या खंडिपत्रावरून भाऊपणा त्रिवर्गाचा येक जाला कागदपत्रावरून व वंशावलीवरून पाहतां परस्परें त्रिवर्गाचा भाऊपणा खरा जाहला त्याच्या दाखल्यास तुह्मापासीं देशपांडे यांचे कागद तीनी आहेत त्यापैकीं पेशजीच्या वेन्हाराचे वेळेचा बितपसील

सौजन्य मोकदमानी मौजें रेठरें बुा यासि रुद्राजी चंदो देशकुळकरणी प्रां कऱ्हाड सुा सलास तिसैन अलफ तुह्मीं पत्र पाठविलें होतें कीं गिजरे बहुत आहेत त्यांस वृत्तीस समंध कोणास आहे कोणास नाहीं हें लेहून पाठवणें ह्मणऊन लिहिलें होतें तरी त्यास आह्मी विचार केला त्यास वेदमूर्ती राजश्री मोरेश्वरभट कऱ्हाडकर व ता रा बाळंभट बांईकर व ता रा तिमणभट दुसेरेकर ऐसें त्रिवर्ग गिजरे यांचे घर येक व मूळपुरुष येक या त्रिवर्गांनी मिळोन पांचा गांवींचें जोतिषपण व आमचे घरीचे व राजश्री कृष्णाजी शंकर यांचे घरींचें व रा निरंजन आवघूतराव यांचे घरीचें व आमचे आत्रघे उंबरजकर यांचे घरीचें उपाध्यपण व सेरेकर कुलकरणी याचे तीनी घरीचें उपाध्यपण ऐसें या त्रिवर्गांनी येथाविभागें भक्षावें ऐसें पुरातन आहे परंतु आमचे तीनी घरीचें उपाध्यपण सांपृत बांईकर गिजरे करीत आहेत ह्मणऊन सेरेकराचे तीनी घरींचें उपाध्यपण व हालीं मौजे कोडोली व मौजे दुसेरें येथील जोतिष दुसेरेकर गिजरे व कऱ्हाड मोरेश्वरभट गिजरे ऐसे उभयेता मिळोन भक्षिताहेत तीनी गांवीचा तों कथला आहे या करितां तुह्मांपासीं गिजरे व प्रथमशाखी व समुद्रखानी ऐसे उभयेता पाठविले आहेत तुह्मी समस्त गोत मिळोन जेणेंप्रमाणें निवाडा कराल त्या प्रमाणें त्रिवर्ग गिजरे वर्तेतील व आणिखीं गिजरे अहिरंभटाचे विल्हेचे आहेत व माहुलीकर गिजरे आहेत त्या उभयेतास व या त्रिवर्गास कोणेयेके गोस्टीविशीं आर्थाआर्थी समंध नाहीं जाणिजे रा छ २९ माहे रबिलावल

येणेंप्रमाणें देशपांडे यांच्या पत्राच्या दाखल्यावरून तुम्हां त्रिवर्गाचा मूळपुरुष येक तुम्हीं त्रिवर्ग भाऊ खरे व वृत्ती त्रिवर्गाची ऐसी खरी जाहली वृत्तीचे व भोगवटियाचे कागद तुम्ही पंचाइतापासीं सदरहू प्रमाणें दाखविले बिता।

६ वृत्तिपत्रें जुनीं असल

१ रामेश्वर भटाच्या नांवाचें दानपत्र

१ नरहरी भटाचे नांवांचे दानपत्र
१ कृष्णंभट व भानभट यांचे नांवाचे दानपत्र
१ त्रिवर्ग भाऊ यांच्या वडिलांचे नावांचा महजर देसकाचा
२ मुतालिक पत्रें
१ अंतभट व रघुभट याच्या नांवांचें
१ अंतभट भास्करभट यांच्या नावांचें

२

६

१ पारसी पत्र जुनें असल	४ खंडिपत्रे
१ जाबिता	९ पेशजींची वेव्हारपत्रें
३ देशपांडे यांचीं पत्रें	३ समापत्रें वांईकर भाऊ यांची
१ राघो जोगदेउ यांचें पत्र	११ खुर्दखतें इनामांची
१ आनंदभटास लिहिलें पत्र	१ वडगांवकराचें पत्र

४१

येकून पत्रें येकेतालीस त्यांपैकीं वाईकर भाऊ यांची समापत्रें तीनी व देशपांडे यांचें पत्र येक येकून च्यार पत्रें तपसीलवार लेहून बाकी पत्रें सदतीस अक्षरशाहा वाचून पंचाइतांनीं पाहिलीं या मधें तुम्हां तिघांचा तपसील भाऊपणाचा व भोगवटियाचा लागत आला या पत्रा वरून तुमचा भाऊपणा खराखुरा ऐसा पंचाइतांनीं निश्चयें करून तुम्हां उभयेतास विचारिलें कीं तुह्मीं या स्थलास राजी असाल तरी येथेंच निवाडा करून आगर तुह्मांस दुसरे स्थळ पाहिजेसें असेल तरी हे मायेस्थल करून तुह्मां उभयेतास मानेल तें स्थल देऊं ह्मणऊन तुह्मां उभयेतांस आज्ञा केली त्या वरून तुह्मीं उभयेतांनीं विनती केली कीं आह्मीं ये स्थलीं च पंचाइतास रजावंद असो तुह्मीं पंचाईत परमेश्वराचे ठाईं आहां आम्हीं येथें त्रिवाचा राजी असों त्या वरून तुह्मां उभयेतांस

राजीनामे लेहून देणें ह्मणऊन आज्ञा केली तुह्मी उभयेतांनी राजीनामे लेहून दिल्हे बितपसील

राजीनामा बो। सदासिवभट बिन भानभट गिजरे कऱ्हाडकर अग्रवादी सुा सलास अशरीन मया अलफ कारणें लेहून दिल्हा राजीनामा ऐसा जे नारायेणभट बिन वीरेश्वर भट गिजरे व गोपालभट बिन रुद्रभट गिजरे यां मधें व आह्मामधें कारवें व वडगांव व सेरें व दुसेरे व कोडोली येथील जोतिषाचा व कुलकरणियाचे घरीचें उपाध्यपण याचीं पत्रें श्रीमाहादेवीं आपले बाप भानभटीं मोरेश्वरभटापासीं दिल्हीं याचा वेव्हार करून उभयेता स्वामीपासीं आलों स्वामीनी उभयेतांच्या तकरीरा व जमान घेतले उपरी सभानाईकीं उभयेतांस विचारिलें कीं तुह्मीं या मज्यालसीच्या गोतास मान्य आहां कीं परस्थलास मान्य आहां ऐसें विचारिलें त्यास या च सभेच्या गोतास मान्य असों ऐसें बोलिलों राजीनामा मागितला त्यास आह्मीं मान्य होऊन राजीनामा दिल्हा आहे त्यास तुह्मीं सभानाईक जेणेंप्रमाणें न्याये कराल त्यास आह्मीं मान्य असों अन्यथा होऊं तरी गोताचे आन्याई असों हा राजीनामा सही शके १६४५ शोभकृत नाम संवत्सरे जेष्ट शुद्ध प्रतिपदा भृगुवासर

राजीनामा बो। नारायेणभट बिन वीरेश्वरभट व गोपालभट बिन रुद्रभट गिजरे जोतिषी पश्चमवादी सुा सलास अशरीन मया अलफ शके १६४५ शोभकृत नाम संवछरे जेष्ठ शुध प्रतिपदा भृगुवासरे लेहून दिल्हा राजीनामा ऐसा जें भानभट बिन कृष्णभट व बावदेवभट बिन नीलकंठभट गिजरे यां मधें व आह्मामधें कारवें व वडगांव व सेरें व दुसेरें व कोडोली येथील जोसीपणाचा व कुलकरणियांचे घरीचें उपाध्यपणाचा वेव्हार लागला ह्मणऊन उभयेता स्वामीपासीं आलों स्वामीनीं उभयतांच्या तकरीरा व जमान घेतले त्याउपरी सभानाइकीं उभयेतांस विचारिलें कीं तुह्मीं या मज्यालसीच्या गोतास मान्य आहां कीं परस्थलास मान्य आहां ऐसें विचारिलें त्यास आह्मीं या च सभेच्या गोतास मान्य असों ऐसें बोलिलों राजीनामा लेहून मागितला त्यास आह्मीं

मान्य होऊन हा राजीनामा लेहून दिल्हा आहे त्यास तुह्मीं सभानाईक जेणें प्रमाणें न्याये कराल त्यास आह्मी मान्य असों त्रिवाचा मान्य असों यासी अन्यथा होऊं तरी गोताचे अन्याई हा राजीनामा लेहून दिल्हा सही छ २९ साबान

येणेंप्रमाणें उभयेतांचे राजीनामे घेऊन पंचाइतानीं तुमच्या तकरीरेबमोजिब तुमचा व दुसेरेकराचा व वांईकराचा वंशावलीवरून भाऊपणा येक जाला मूलपुरुष रामेश्वरभट त्यास पुत्र तिघे बितपसील

वडील	दुसरा	तिसरा
नरहरीभट	रंगभट	गोविंदभट
१	१	१
त्याचा वंश हाली तुह्मी नारायेणभट बिन वीरेश्वरभट व गोपालभट बिन रुद्रभट कऱ्हाडकर	त्याचा वंश हालीं विश्वनाथभट बिन बाळंभट वांईकर	त्याचा वंश हालीं गणेशभट बिन नारायेणभट दुसेरेकर

येकून तिघे वंशावलीप्रमाणें येक जाहले सदरहू कागद एकेतालीस अक्षरशाहा वाचून पाहिले त्याचा दाखला वंशावलीस घालून सदरहू भाऊपणास दुसरा मोझ्या घालून त्यावरी वतनाच्या भोगवटियामुळें तुह्मी त्रिवर्ग भाऊपणास तिसरा मोझ्या घालून पंचाइतानीं तुह्मी त्रिवर्ग बंधू कऱ्हाडकर व दुसेरेकर व वांईकर ऐसें खरें ऐसा सिधांत करून ठेविला त्या वरी सदासिवभट बिन भानभट गिजरे यांच्या तकरीरे बमोजिब सिधांताचा विचार पाहिला तों मुख्य हासील कलम तिघांचा भाऊपणा खरा करून द्यावा त्यास वांईकर व दुसेरेकर यानीं आपला भाऊ सदासिवभट बिन भानभट नव्हे यास आपणास समंध नाहीं उपनामाचे मात्र गिजरे देवरात गोत्री नारायेणभट बिन वीरेश्वरभट व गोपालभट बिन रुद्रभट हे आपले भाऊ ऐसी साक्षी पुरली त्यावरी

दुसरें कलम श्रीमाहादेवीं भानभट बिन कृष्णभट यानीं कागद दोनी मोरेश्वरभटापासीं दिल्हे बिता।

रामेश्वरभटाचे नावांचें दानपत्र पिलंभटाचे नावाचें मुतालिकाचें
येक १ पत्र १

येकून पत्रें दोन्ही दिल्हीं त्याचे साक्षी आहेत त्यांच्यामुखें खरें करून देऊं ह्मणऊन साक्षीयांची नावनिसी लेहून दिल्ही त्याप्रमाणें सदरहू साक्षी यांसी सत्य घालून विचारिलें त्यानी आपणास कांहीं ठाऊक नाहीं ह्मणऊन साक्ष दिल्हीं तेव्हां दोनी हासिल कलमें होतीं तें त्यांच्या च साक्षीमुळें लटकीं जाहलीं तेव्हां पंचाइतास आशंका येक होती कीं सदासिवभटाचे साक्षीपैकीं नारायेणभट आफले यांनी साक्ष दिल्ही कीं पंचांगासारिखा कागद गुंडाळून दुरून दाखविला कीं तुमचे अक्षरें तुमची साक्षी आहे त्याचा शोध पाहावा व मृत साक्षी बहिरंभट आफले त्याचा पुत्र मुकुंदभट आफले आपल्या पित्याचीं अक्षरें साक्षींची ह्मणऊन श्री त निवेन ह्मणतों याचा शोध करून पाहावा आशंका देऊं नये याकरितां सदासिवभट बिन भानभट यासी आज्ञा केली कीं तुह्मांपासीं साक्षियांची अक्षरें स्वहस्तींची आहेत तें पत्र आणून पंचाइतापासीं ठेवणें ज्यांचीं अक्षरें तें हि आहेत त्याचा शोध करून त्या वरून सदासिवभटानीं पत्र पंचाइतापासीं ठेविलें मग समस्तानीं वाचून पाहिलें पत्र कीं लिखित मजकूर बितपसील

शके १४५२ हेमलंबी नाम संवत्सरे कार्तिक शुध दशमी रविवार तदिनी राजश्री पिलंभट गिजरे वास्तव्य कऱ्हाड याचें जोतिष मौजे वडगांव व मौ कारवें याचे जोतिशाची मुतालिकी-कबूल केली ऐसे मुद्गलभट बिन शंभुभट प्रथमशाखी रामलिंगकर यानीं लेहून दिल्हें जें तुमची वृत्ति आसे आह्मास समंध नाहीं आह्मी मुतालिक असों कलेंले पाहिजे हें सत्य आह्मास लेंकराचे लेंकरी समंध नाहीं हें सत्य तुह्मास आह्मीं स्वामित्व गांव टका १ येक देऊं कुलकरणियांचे घरीं लग्न मुहूर्त होईल तें तुमचें तुह्मीं स्वामित्वामधें घ्यावें आह्मास समंध नाहीं आह्मास

वृत्तीस समंध नाहीं जे कालीं आह्मास निरोप द्याल ते कालीं आह्मीं जाऊं हें आमचे वडिलांचें सत्य आह्मास लेंकराचें लेंकरी समंध नाहीं कलले पाहिजे हें सत्य कृष्णवेणी साक्ष

गोही

हरजी कान्हो यादव देसाई प्रां कऱ्हाड
१

लाहामाजीपंत देशकुलकरणी प्रां कऱ्हाड
१

कृष्णाजी पाटील मौजे वडगांव
१

जानकोजी पाटील बिन वासुदेव पाटील मौजे कारवे
१

पिलाजी कुलकरणी मौजें कारवें

कलमाजी कुलकरणी मौजे वडगांव
१

जोगसेटी व बाबसेट चिखले माहाजन प्रां कऱ्हाड
१

नरसिंभट आफले मसूरकर

नरहरीभट पलसोडेकर
१

रामभट वैद्य पलसोडेकर
१

रघुनाथ पाटील गोवारेकर
१

वैद्य भास्करभट साक्षी
१

पत्रप्रमाणें साक्षी पाऊसे बलंभट

पत्रप्रा साक्ष गरूड तिमणभट
१

चवडोबा नारोबा सराफ
१

ह्यापत्राच्या पाठीसी सदासिवभट बिन भानभट यांनीं साक्षी लेहून दिल्हे ते त्यांच्या दस्तूरची साक्षी बितपसील दानपत्र १ येक मुतालिकपत्र १ येक यांचीं असलपत्रें मोरेश्वरभटापासीं दिल्हीं असे

असेल तरी कबूल करणें नाहींतरी आह्मी मायेस्थल होऊन तुह्मास दुसरें स्थल देऊं त्यास उभयेतांनीं पंचाइतास अनन्यभावें विनंती करून हें स्थल आह्मास मानलें ह्मणऊन राजीनामे लेहून दिल्हे त्यावरून या उभयेतांचा धर्मता न्याये करून झगडा विल्हेस लाविला आह्मी कांहीं दिवाण नहों आह्मास कांहीं सेरणी गुन्हेगारीचा तगादा करणें नाहीं ज्याप्रमाणें करीना जाहला तेणेंप्रमाणें खरा जो आहे त्यास निवाडपत्र करून देऊं ऐसें पंडितरायास सांगोन पाठविलें आणि तुह्मांस निवाडपत्र करून दिल्हे असे सदरहू पांचा गांवीचें जोसीपण व उपाध्येपण तुमची वृत्ति खरी सदासिवभट बिन भानभट यासी आर्थाआर्थी समंध नाहीं तुह्मी त्रिवर्ग भावांनीं आपल्या पुत्र–पौत्रादि–वंशपरंपरा वतन अनभऊन सुखरूप आसणें सदासिवभट बीन भानभट याचे तकरीरे प्रमाणें भाऊपणास खोटे जाहलें व कागदाचे साक्षीमुळें खोटे जाहले व वतनाचे भोगवटा नाहीं त्यामुळें खोटे जाहले येकून तिन्ही कलमांस खोटे जाहले तुह्मी आपले तकरीरे प्रमाणें भाऊपणास खरें जाहलेस व कागदपत्रीं खरे जाहलेस व पांचा गांवीच्या भोगवटियामुळें खरे जाहलेस त्यावरून तुह्मास हें निवाडपत्र करून दिल्हे असे परंपरागत आपले वंशपरंपरा पुत्रपौत्रादि पांचा गांवीचें जोसीपण व उपाध्येपण वृत्ति आनभऊन सुखरूप असणें सदासिवभट बिन भानभट यांसी व यांच्या गोत्रजांस अर्थाअर्थी समंध नाहीं हें लेहून दिल्हें निवाडपत्र सही

(लेखन सिमा)

लेखांक ११२] [१६४५ ज्येष्ठवद्य १४

श्री

वेदमूर्ती राजश्री गोपालभट व केशवभट गिजरे जोतिशीं मौजे कारवे व मौजे वडगाऊ व मौजे सेरे गोसावियासि

पोष्य कृष्णाजी विठल नमस्कार सुा सलास असरीन मया अलफ तुह्मा-
मध्ये व शामभट प्रथमशाकी व भीवभट समुद्रखानी यामध्यें सदरहू गा-
वीचे जोतिशपणाचा कथला होता त्यास गोतमुखे उभयताचा निवाडा
जाहला शामभट व भीवभट समुद्रखानी खोटे जाले तुह्मी खरे जालेत स-
दरहून तीन गावीचे जोतीश तुमचे तुह्मांस दुमाला करून सेरणी
रुपये १०० एक से करार करून सदरहू रुपये राजेश्री भास्कर गोसावि-
यास देविले ते साताराचे मुकामी त्यास प्रविस्ट जाले मंजुरा असेत
छ २७ शाबान

लेखांक ११३] [१६४५ श्रावणशुद्ध १३

श्री

वेदमूर्ती राजश्री गोपाळभट गिजरे व केशवभट जोसी स्वामींचे सेवेसी
सेवक संताजी चव्हाण सुभेदार दिा सरदेशमुखी प्रा कराड दंडवत वि-
नंती सुा अर्बा असरीन मया अलफ शामभट व भीमभट या मध्ये व
तुह्मा मध्ये कारवे वडगाऊ सेरे दुसेरे या तिनी गावीचे जोतिशाचे भां-
डण लागले होते त्यास भांडण सुरू जालियावरी दिवाणानें सेरणी तु-
ह्माकडे रुा १०० सेभर केले त्याची सरदेशमुखी रुा १० दाहा पावले
जाणिजे छ ११ जिलकाद हे विनंती

मोर्तब
सुद

लेखांक ११४] [१६४५ भाद्रपदवद्य २

श्री

श्री शांब
चरणी तत्पर
कृष्णाजी वीठ
ल नीरंतर

आज्ञापत्र राजश्री कृष्णाजी विठल ताा मोकदम मौजे कारवे मौजे वड-

त्यास साक्षी माहुलकर बहिरंभट आफले हरिभट गिजरे आध्यापक नारायेणभट्ट आफले नारायेणभट जानभटी ऐसी साक्षी त्यास पंचाइतानीं याचा निर्णये केला कीं मुख्य सदासिवभट्ट यानीं वतनाचा कागदपत्र नाहीं व दों पत्राच्या तालिका नाहीं ह्मणऊन कतबा लेहून दिल्हा वतनाचा कागद असोन पन्हाम करूं तरी गोताचे अन्याई त्यास हा कागद वतनाचे बाबेचा खरा अगर लटिका परंतु यानीं आधीं नाहीं ह्मटिलें मग उमगला तेन्हां त्यांच्या च मुखें ते आन्याई कागद रद्द पंचाईतांनीं पाहूं नये परंतु याची आशंका राहूं नये याकरितां पत्राचा शोध पाहिला तों कागद वरुषें १९३ एकसें त्रियानव वर्षांचा त्यावरी साक्षीं आहेत त्याचा शोध पाहिला तों कोण्हीं मरून तीस वर्षें जाहलीं आवघिया साक्षीचा शोध पाहतां ऐसी वर्षापलीकडील कोण्हीं साक्षी पुरवत नाहीं तेन्हां ऐसें दिसोन आलें कीं यांनीं कागद मनसंकल्पेंच केला आणि साक्षीही मनसंकल्पेंच घातल्या कागद कृत्रिमी याचा शोध पाहतां अगदींच बाष्कल साक्षी याची दस्तुरें निराळीं असावीं तें अवघें दस्तुर आदिअंत येक च तेन्हां साक्षी यानीं साक्ष दिली त्यास व दस्तुरास ऐक्य जाहले तेन्हां साक्षी यानी कांहीं च ठाऊक नाहीं ह्मटिलें ते च गोस्टी खरी मुकुंदभट आपल्या पितियाचें अक्षर ह्मणउन श्रीत निघेन ह्मणतों क्रियानष्ट साक्ष अप्रमाण ऐसा सिधांत करून कागदकृत्रिमी ऐसा जाहला तेन्हां सदासिवभट बिन भानभट यांसि वतनास समंध नाहीं ऐसा सिधांत करून ठेविलियावरी तुह्मा उभयेता वादी यासी बैसवून समस्तांदेखत करीना वाचून दाखविल्या त्यास आग्रवादी सदासिवभट बिन भानभट यासी पंचाइतानी पृछा केली कीं तुह्मी तकरीर केली कीं आपला मूलपुरुष जोगदेवभट त्यास पुत्र तिघे येक मरलीकर येक दुसेरेकर येक आपण ऐसें खरें करून देऊं न देऊं तरी वृत्तीस समंध नाहीं खोटें ह्मणऊन लेहून दिल्हें त्यावरून मरलीकर ह्मणिजे वांईकर व दुसेरेकर आणिलें त्यास त्यानीं साक्षी दिल्ही कीं सदासिवभट बिन भानभट यासी आपणास समंध नाहीं उपनामाचे मात्र

देवरात गोत्री नारायेणभट बिन वीरेश्वरभट गोपाळभट बिन रुद्रभट हे आपले भाऊ खरे ऐसी साक्ष दिल्ही तुह्मी आपला व त्यांचा भाऊपणा खरा करून देऊं ह्मटिलें त्यास भावाचा विचार ऐसा तुह्मास भाऊ नव्हे ह्मणतात या उपरी तुह्मास काये ह्मणावें ऐसी पृछा करितां सदासिवभट यांची बोलायाची वाचा कुंठित जाली तेव्हां दुसरी पृछा केली कीं तुह्मी दोनीं पत्रें दिल्हीं याचे साक्षी आहेत त्याच्यामुखें खरें करून देऊं न देऊं तरी आपणास वृत्तीस समंध नाहीं ह्मणऊन साक्षी यांची नावनिसी लेहून दिल्ही त्या वरून सदरहू नावनिसीप्रमाणें साक्षी आणून सत्य घालून करीना विचारिला त्यास साक्षी यानी तुह्मादेखत साक्षी दिल्ही कीं आपणास कांहीं ठाऊक नाहीं तेव्हां तुह्मी लेहून दिल्हे साक्षियाच्यामुखें खरें करून देऊं न देऊं तरी आपणास वृत्तीस समंध नाहीं खोटे ते च गोस्टी तुमचे तकरीरे बमोजिब खोटि जाहली ऐसी पंचाइतानी पृछा केली त्या वरी भोगवटियामुळें खरें करून देऊं ह्मणऊन तकरीर केली त्यास तुह्मी वतनाचा भोगवटा खरा करून दिल्हा नाहीं येकून तिन्हीं कलमें लटकीं जाहलीं त्यास तुम्ही साक्षीमुळें व वतनाच्या भोगवटियामुळें व कागदपत्रावरून खोटे जाहलेस याउपरी तुह्मास नारायेणभट बिन वीरेश्वरभट व गोपाळभट बिन रुद्रभट यासी कथला करावयास समंध नाहीं यांसी यजीजखत लेहून देणें ह्मणऊन पंचाइतानी आज्ञा केली त्यास सदासिवभट बिन भानभट व त्यांचा भाऊ बावदेवभट बिन नीळकंठभट व त्यांचे समस्त भाऊ यानीं पंचाइतापासीं नेम केला कीं आपण साईंकाळीं येऊन यजीजखत लेहून देऊं त्यास राजश्री मुद्गलभट पंडितराव यांच्या घरास जाऊन वर्तमान सांगितलें त्यावरून पंडितरायानीं आपणाकडून शामभट यां बरावरी देऊन रायांनीं सांगून पाठविलें कीं यांसि दुसरें स्थळ देणें त्यास पंचाइतानीं उत्तर दिल्हे कीं आह्मीं कांहीं दिवाण नव्हों यापासीं कांहीं सेरणी गुन्हेगारीचे कतबे घेतले नाहींत आह्मास कांहीं लाभलोभ नव्हता आधींच उभयेता वादी यासी विचारिलें कीं तुह्मास हें स्थळ मानत

असेल तरी कबूल करणें नाहींतरी आह्मी मायेस्थळ होऊन तुह्मास दुसरें स्थल देऊं त्यास उभयेतांनीं पंचाइतास अनन्यभावें विनंती करून हें स्थळ आह्मास मानलें ह्मणऊन राजीनामे लेहून दिल्हे त्यावरून या उभयेतांचा धर्मता न्याये करून झगडा विल्हेस लाविला आह्मी कांहीं दिवाण नहों आह्मास कांहीं सेरणी गुन्हे-गारीचा तगादा करणें नाहीं ज्याप्रमाणें करीना जाहला तेणेंप्रमाणें खरा जो आहे त्यास निवाडपत्र करून देऊं ऐसें पंडितरायास सांगोन पाठविलें आणि तुह्मांस निवाडपत्र करून दिल्हे असे सदरहू पांचा गांवीचें जोसीपण व उपाध्येपण तुमची वृत्ति खरी सदासिवभट बिन भानभट यासी आर्थाआर्थी समंध नाहीं तुह्मी त्रिवर्ग भावांनीं आपल्या पुत्र–पौत्रादि–वंशपरंपरा वतन अनभऊन सुखरूप आसणें सदासिवभट बीन भानभट याचे तकरीरे प्रमाणें भाऊपणास खोटे जाहलें व कागदाचे साक्षीमुळें खोटे जाहले व वतनाचे भोगवटा नाहीं त्यामुळें खोटे जाहले येकून तिन्ही कलमांस खोटे जाहले तुह्मी आपले तकरीरे प्रमाणें भाऊ-पणास खरे जाहलेस व कागदपत्रीं खरे जाहलेस व पांचा गांवीच्या भोगवटियामुळें खरे जाहलेस त्यावरून तुह्मास हें निवाडपत्र करून दिल्हे असे परंपरागत आपले वंशपरंपरा पुत्रपौत्रादि पांचा गांवीचें जोसीपण व उपाध्येपण वृत्ति आनभऊन सुखरूप असणें सदासिव-भट बिन भानभट यांसी व यांच्या गोत्रजांस अर्थाअर्थी समंध नाहीं हें लेहून दिल्हें निवाडपत्र सही

(लेखन सिमा)

लेखांक ११२] [१६४५ ज्येष्ठवद्य १४

श्री

वेदमूर्ती राजश्री गोपालभट व केशवभट गिजरे जोतिशीं मौजे कारवे व मौजे वडगाऊ व मौजे सेरे गोसावियासि

पोष्य कृष्णाजी विठल नमस्कार सुा सलास असरीन मया अलफ तुह्मा-
मध्ये व शामभट प्रथमशाकी व भीवभट समुद्रखानी यामध्यें सदरहू गा-
वीचे जोतिशपणाचा कथला होता त्यास गोतमुखे उभयताचा निवाडा
जाहला शामभट व भीवभट समुद्रखानी खोटे जाले तुह्मी खरे जालेत स-
दरहून तीन गावीचे जोतीश तुमचे तुह्मांस दुमाला करून सेरणी
रुपये १०० एक से करार करून सदरहू रुपये राजेश्री भास्कर गोसावि-
यास देविले ते साताराचे मुकामी त्यास प्रविस्ट जाले मंजुरा असेत
छ २७ शाबान

लेखांक ११३] [१६४५ श्रावणशुद्ध १३

श्री

वेदमूर्ती राजश्री गोपालभट गिजरे व केशवभट जोसी स्वामींचे सेवेसी
सेवक संताजी चऱ्हाण सुभेदार दिा सरदेशमुखी प्रा कराड दंडवत वि-
नंती सुा अर्बा असरीन मया अलफ शामभट व भीमभट या मध्ये व
तुह्मा मध्ये कारवे वडगाऊ सेरे दुसेरे या तिनी गावींचे जोतिशाचे भां-
डण लागले होते त्यास भांडण सुरू जालियावरी दिवाणानें सेरणी तु-
ह्माकडे रुा १०० सेभर केले त्याची सरदेशमुखी रुा १० दाहा पावले
जाणिजे छ ११ जिलकाद हे विनंती

मोर्तब
सुद

लेखांक ११४] [१६४५ भाद्रपदवद्य २

श्री

श्री शीव
चरणी तत्पर
कृष्णाजी वीठ
ल नीरंतर


आज्ञापत्र राजश्री कृष्णाजी विठल ताा मोकदम मौजे कारवे मौजे वड-

गाव पा। कराड सुा। सलास अशरीन मया अलफ मौजे मजकूरचे जोतिषीपणाचे कजिया गोपालभट गिजरे व शामभट करमरीकर यामध्यें लागला याकरिता तुम्हास हुजूर आणून उभयेता जोसी तुमचे स्वाधीन केले की याचा कजिया निवडून देणें खरें खोटें करणें म्हणून आज्ञा केली त्यास तुह्मी आठा रोजाची मुदत मागितली होती त्यास आठ रोज होउनु अधिक जाले याकरिता याकडील हरकी गुन्हेगारीचे भटानी कतबे (दिले) आहेत त्याकडे दोनीसे रुा येणे ते हुजूर रसदेस आणविले असे पाठवणे या कामास आंबोजी माला पाठविला आहे यास उभयताकडून १ येक रुपया देवणे छ १५ जिल्हेज उभयता तुह्मी हाती घेतले आहेत श्रीकृष्णातीरीं आपले बेतालीस पूर्वज स्मरोन श्रीकृष्णेमध्यें घालून ओढून काढणें कोण्हाचे भीड न धरणें छ १५ जिल्हेज भीवभट समुद्रखाणी याचा कजिया मौजे सेरे याकडे आहे त्यास तुह्मी हाती घेतला त्याकडे शंभर रुा। येणें त्याचे शंभर रुा देणें त्याकडील मसाला नीम रुा आंबोजीस देणें



लेखांक ११५] [१६४६ आश्विनशुद्ध ६

श्री



आज्ञापत्र राजश्री कृष्णाजी विठल ताा मोकदमानी देहाय मौजे कारवे

१ मौजे वडगाऊ १ मौजे सेरे १ पा। कराड सु॥ सन खमस अशरीन मया व अलफ गोपालभट यांचा व शामभट व भीवभट या मध्ये जोसीपणाचा कजिया लागला होता त्यावरून हरदूजण हुजूर आले त्याउपरी तुह्मां त्रिवर्गास आज्ञा केली कीं या उभयेतामध्ये खरा कोण आणी खोटा कोण हे श्री कृष्णेमध्ये घालऊन निवडून देणे ह्मणून सांगितले त्यास आध्यापी निवडून पाठविले नाही यावरून काय ह्मणावे याउपरी हे आज्ञापत्र तुह्मा त्रिवर्गास सादर केले आसे तरी ती गावीचे बारा बलुते व भवरगावीचे पाटील मेलऊन या हरदूजणास श्रीकृष्णेमध्ये घालऊन खरा कोण आणी खोटा कोण हे सत्य स्मरोन वोडून काढणे येकाची रयात करून मुरवतीने काढाल ह्मणजे तुमचे बेतालीस नरकात जातील बरे समजून सिताबीने निवडून पाठऊन देणे जाणिजे छ ४ मोहरम

(लेख
नावर्धा)

लेखांक ११६] [१६४७ मार्गशीर्षवद्य १०

श्री

ता।

(० श्री
माहादाजी
कृस्ण आ।
देशमुख पा।
मजकूर)

सौजेन्ये मोकदमानी मौजे सैदापूर ता। हवेली पा। कराड यासी माहादाजी कृष्ण आ। देसमुख पा। मजकूर सु॥ सीत असरीन मया अलफ वेदशास्त्र संपन्ये राजेश्री वीरेश्वरभट गिजरे हे राजेश्रीस्वामीचे तीर्थपुरोहित या कारिता मौजे मजकुरी अग्राहारपैकी ईनाम इदलशाही जमीन बिघे ·|· तीस बिघे जमीन ईनाम कुलबाब कुलकानू दिल्हा असे त्या जमीनीची देसमुखीची हकदारी भटगोसावी यास माफ केली असे तरी सदरहू जमी-

नीचे हकदारी होईल त्याचा तगादा वेदमूर्तीस न करणे प्रतिवर्षी ताजे सनदेचा उजूर न करणे जाणिजे छ २३ रबिलाखर

मोर्तब सुद

लेखांक ११७] **[१६४७ फाल्गुनवद्य ६**

श्री

रा॥ राऊजी पाटील मौजे कोडोली व रा॥ रखमाजी पाटील मौजे दुसेरे व वेदमूर्ती गोपालभट व केशवभट गिजरे जोतिसी देहे ५ पा॥ कराड गोसावियासि

इमानपत्र बो॥ अपाजी साबाजी कुलकर्णी मौजे मा॥ आसीर्वाद नमस्कार सु॥ सीत असरीन मया अलफ कारणे लिहिले ऐसे जे गणेश भास्कर या मधे व आपणा मधे भाऊपणाचा गर्गशा लागला व्होत्ता तो व आह्मी उभयता आपणामधे समजलो त्यांनीं व आह्मी परस्परे स्वदस्तुरे पत्रे येकमेकास तुमचे साक्षीने लेहून दिली त्या पत्रांत शफत लिहिल्या आहेत त्याप्रमाणे उभेतानी वर्तावे नवदीगर करील तो अन्याई लेहून दिल्हे इमानपत्र सही छ १९ रजब हास्ताक्षर अपाजी साबाजी

लेखांक ११८] **१६४८ वैशाखशुद्ध १ गुरुवार**

श्री

श्री
राजाशाहुनरप
तिहर्षनिधान बा
जीराव बळाळ
मुख्य प्रधा
न

श्री आई आदिपुरु
ष श्रीराजा शाहुछत्रप
तिस्वामि कृपानिधित
स्य श्रीनिवास परशु
रामप्रतिनिधि

स्वास्तिश्री राज्याभीषेकशक शके ५२ पराभवनाम संवत्सरे वैशाखशुध

प्रतीपदा गुरुवासरे क्षात्रियकुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी याणी मोकादमानी मौजे टाळगांव प्रा। कऱ्हाड यांस आज्ञा केली ऐसी जे वेदमूर्ती रा। नारायणभट बिन वीरेश्वरभट उपनाम गिजरे गोत्र देवरात सूत्र आश्वलायन अग्निहोत्री वास्तव्य क्षेत्र कसबा कऱ्हाड हे थोर ब्राह्मण वेदशास्त्रसंपन्न सत्पात्र क्षेत्री वास करून स्नानसंध्यादि षट्कर्मे आचरोन स्वामीस व स्वामीच्या राज्यास अभीष्ट चिंतून आहेत याचा याचा योगक्षेम चालविलेयाने श्रेयस्कर आहे ऐसे जाणोन स्वामी यांजवर कृपाळू होऊन मौजे मजकूर पेशजीच्या मुकाशिया कडून दूर करून हाली वेदमूर्तीस नूतन ईनाम स्वराज्य मोगलाई अंमल येकूण दुतर्फा देखील हालीपटी व पेस्तरपटी व ईनाम तिजाई कुलबाब कुलकानू खेरीज ईनामदार व हकदार पुत्रपौत्रादिवंशपरंपरेने ईनाम करून दिल्हा असे तरी तुह्मी यास रुजू होऊन मौजेमजकूरचा ऐवज आकार प्रमाणें भटगोसावियास व याचे वंशपरंपरेने यांजकडे वसूल देत जाणे प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणे या पत्राची प्रती लेहून घेऊन हे पत्र भोगवटियास भटगोसावी याजवळी परतोन देणे लेखनालंकार

मर्या
देयं रा
जते

रुजु सुरु सुमंत सा। सा।
निविस सुमंत मंत्री सरकार

तेरीख २९
साबान सु। सीत अलफ
बार सुद सुरु सुरु
बार बार बार बार

लेखांक ११९] [१६४८ वैशाखशुद्ध ४ रविवार

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेकशके ५२ पराभवनाम संवत्सरे वैशाख शुध चतुर्थी रविवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपती स्वामी याणी राजश्री कृष्णाजी विठल यांसी आज्ञा केली ऐसी जे वेदमूर्ती राजश्री नारायणभट बिन वीरेश्वरभट उपनाम गिजरे अग्निहोत्री गोत्र देवरात सूत्र आश्वलायन यास मौजे टाळगांव ता। बारसे पा। कराड हा गांव कुलबाब कुलकानू स्वराज्य व मोगलाई अमल ए॥ दुतर्फा देखील ईनाम तिजाई खेरीज हकदार व ईनामदार करून नूतन ईनाम देऊन सनदा अलाहिदा केल्या आहेत तरी मौजे मजकूर वेदमूर्तीचे दुमाले करून पुत्रपौत्रादिवंशपरंपरेने ईनाम चालवणे जाणिजे बहूत काय लिहिणे

वार सुरू सुद बार बार बार

लेखांक १२०] [१६४८ वैशाखशुद्ध ४ रविवार

श्री

बाजीराव बल्लाळचा शिक्का.

श्रीनिवास प्रतिनिधीचा शिक्का

स्वास्तिश्री राज्याभिषेकशके ५२ पराभवनाम संवत्सरे वैशाखशुध चतुर्थी रविवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपती स्वामी याणी देशमूख व देशपांडे प्रां। कराड यास आज्ञा केली ऐसी जे वेदमूर्ती राजश्री नारायणभट बिन वीरेश्वरभट उपनाम गिजरे गोत्र देवरात सूत्र आश्वलायन अग्निहोत्री वा। कसबे कराड हे बहुत थोर ब्राह्मण वेदशास्त्रसंपन्न क्षेत्री राहून स्नानसंध्यादि सत्कर्मे आचरोन स्वामीस व स्वामीच्या

राज्यास कल्याण चिंतून आहेत यांचा योगक्षेम चालविल्याने श्रेयस्कर आहे ऐसे जाणून त्यांजवरी स्वामी कृपाळू होऊन मौजे टाळगांव ता। बारसे प्रा। मजकूर हा गांव पेशजीच्या मोकासीयाकडून दूर करून हाली वेदमूर्तीस कुलबाब कुलकानू स्वराज्य व मोगलाई अमल दो। दुतर्फा व इनाम तिजाई देखील हालीपटी व पेस्तरपटी जलतरूतृणकाष्ठपाषाणनिधिनिक्षेपसहित खेरीज हकदार व ईनामदार करून नूतन ईनाम दिल्हा असे तरी तुह्मी मौजे मजकूर चतु:सीमा पूर्वमर्यादे प्रमाणे वेदमूर्तीचे दुमाला करून पुत्रपौत्रादिवंशपरंपरेने ईनाम चालविणे प्रतीवर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करणे या पत्राची प्रती लेहून घेऊन हे मुख्यपत्र भोगवटीयास परतोन वेदमूर्ती जवळ देणे जाणिजे लेखनालंकार

मर्या
देयं रा
जते

रुजू सुरू समंत सा। सा।
निविस सुमंत मंत्री सरकार
बार सुद सुरू सुरू
बार बार बार बार

लेखांक १२१] [१६५८ मार्गशीर्षशुद्ध ९

श्री

फारसी
शिक्का

कौलनामा तां। मोकदमानि मौजे सैदापूर परगणे कराड सु॥ ११४६ चिदानंद दरीविला दादे कौलनामा ऐसा जे मौजेमार हा गांव परगणे मजकूरचे ब्राह्मणाकडे चालत आहे त्याप्रमाणें सरकारतर्फेनें गांव ब्राह्मणांकडे दिला आहे तुह्मीं कोणें बाबे शक न धरितां गांवावर राहून

लेखांक ११९] [१६४८ वैशाखशुद्ध ४ रविवार

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेकशके ५२ पराभवनाम संवत्सरे वैशाख शुध चतुर्थी रविवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपती स्वामी याणी राजश्री कृष्णाजी विठल यांसी आज्ञा केली ऐसी जे वेदमूर्ती राजश्री नारायणभट बिन वीरेश्वरभट उपनाम गिजरे अग्निहोत्री गोत्र देवरात सूत्र आश्वलायन यास मौजे टाळगांव ताा बारसे पाा कराड हा गांव कुलबाब कुलकानू स्वराज्य व मोगलाई अमल ए॥ दुतर्फा देखील ईनाम तिजाई खेरीज हकदार व ईनामदार करून नूतन ईनाम देऊन सनदा अलाहिदा केल्या आहेत तरी मौजे मजकूर वेदमूर्तीचे दुमाले करून पुत्रपौत्रादिवंशपरंपरेने ईनाम चालवणे जाणिजे बहूत काय लिहिणे

बार सुरू सुद बार बार बार

लेखांक १२०] [१६४८ वैशाखशुद्ध ४ रविवार

श्री

बाजीराव बल्लाळ'चा शिक्का.

श्रीनिवास प्रतिनिधीचा शिक्का.

स्वास्तिश्री राज्याभिषेकशके ५२ पराभवनाम संवत्सरे वैशाखशुध चतुर्थी रविवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपती स्वामी याणी देशमूख व देशपांडे प्राा कराड यास आज्ञा केली ऐसी जे वेदमूर्ती राजश्री नारायणभट बिन वीरेश्वरभट उपनाम गिजरे गोत्र देवरात सूत्र आश्वलायन अग्निहोत्री वाा कसबे कराड हे बहुत थोर ब्राह्मण वेदशास्त्रसंपन्न क्षेत्री राहून स्नानसंध्यादि सत्कर्मे आचरोन स्वामीस व स्वामीच्या

राज्यास कल्याण चिंतून आहेत यांचा योगक्षेम चालविल्याने श्रेयस्कर आहे ऐसे जाणून त्यांजवरी स्वामी कृपाळू होऊन मौजे टाळगांव ता। बारसे प्रा। मजकूर हा गांव पेशजीच्या मोकासीयाकडून दूर करून हाली वेदमूर्तीस कुलबाब कुलकानू स्वराज्य व मोगलाई अमल दो। दुतर्फा व इनाम तिजाई देखील हालीपटी व पेस्तरपटी जलतरूतृण-काष्ठपाषाणनिधिनिक्षेपसहित खेरीज हकदार व ईनामदार करून नूतन ईनाम दिल्हा असे तरी तुह्मी मौजे मजकूर चतुःसीमा पूर्वमर्यादे प्रमाणे वेदमूर्तीचे दुमाला करून पुत्रपौत्रादिवंशपरंपरेने ईनाम चालविणे प्रती-वर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करणे या पत्राची प्रती लेहून घेऊन हे मुख्यपत्र भोगवटीयास परतोन वेदमूर्ती जवळ देणे जाणिजे लेखनालंकार

मर्या
देयं रा
जते

रुजू सुरू समंत सा। सा।
निविस सुमंत मंत्री सरकार
बार सुद सुरू सुरू
बार बार बार बार

लेखांक १२१] [१६५८ मार्गशीर्षशुद्ध ९

श्री

फारसी
शिक्का

कौलनामा तां। मोकदमानि मौजे सैदापूर परगणे कराड सु॥ ११४६ बिदानंद दरीविला दादे कौलनामा ऐसा जे मौजेमार हा गांव परगणे मजकूरचे ब्राह्मणाकडे चालत आहे त्याप्रमाणें सरकारतर्फेनें गांव ब्राह्म-णांकडे दिला आहे तुह्मीं कोणें बाबे शक न धरितां गांवावर राहून

सुरळित वसूल देत जाणें सरकार तर्फेनें कांहीं आजार लागणार नाही बेवसवास राहाणें दरी बाब कौल असें जाणिजे छ ७ शाबान

लेखांक १२२] १६६२ पौषवद्य ८

श्री

श्री आई आदी पुरु
ष श्री राजा शाहु छत्रप
ति स्वमी कृपानिधि त
स्य श्रीनिवास परशु
राम प्रतिनिधि

प॥ बंततीन रास

आकार मौजे टाळगाव पा॥ कराड सुहुरसन इहिदे अर्बैन मया अलफ जमाई रुपये ३०२८=

यो॥ तीनसेदोन रुपये चावल रास

नक्त बाब घर पूस टका रुपये
५८·

ता॥ मुजेरी बदल मोजणी सन तिसा जमीन १।२९॥।१॥ पैकीं वजा
·।७॥२॥· हकदार
८९॥।१॥ सरदेसमूख
८१६॥·॥ देसमूख
८५।१ देसपांडे
८३॥२॥· देसचौ॥
८२।· नाडगौडे

·।७॥२॥·
८११ इनाम गांव जा॥

ठ४॥॰ ग्रामदेव
ठ३ आदा भट जोसी
ठ३॥ माहार
———
ठ११
ठ२४ सनद
ठ४ धारकरी
ठ२० सेरी मोकासी खासा
॰ घर बाब
———
ठ२४
———
॰॥१२॥२॥॰
बाकी जा। रयत नीम ॰।॥१७।१ पैकीं वजा इनाम पाटील कुळकर्णी जा। ठ४ बाकी जमीन ॰।॥१३।१ दर येकून आकार गला

४ठ३ठ२ आवल जा। ४।॥०।३।१ येक
२।॥॰॥२ खरीप जा। ठ२२।१ दरठ२॥॰
१।॰ पांढरकण जा। ठ१० दर ठ२॥
ठ२॥॰ रबी जा। ठ१ दर ठ२॥
———
४ठ३ठ२

दुम जमीन ठ२० येकर
१॥ खरीप ठ१५ दर ठ२
॰॥॰ पांढरकण ठ५
———
२
३।॥॰ सीम जा। ॰।२० येकर

३ खरीप ·।१० दर ८१॥

·।।।· पांढरकण जमीन ८१० दर ८१॥

३।।।·

९।।।३८२

येकून जमा रुपये

२१८।= खरीप १।·॥२ दर ३० प्रा
१०० पांढरकण २॥· दर ४०

६।· रबी ८२॥· दर ५०

३२४॥=

७।।।

टके २५ दर ३। प्रा रुपये

३३२।≡

५ नख्तबाब रुपये

३३७।≡

१७ माहालमजकूर
८ इनामपटी

३६२।≡

९०।।।· हकदार

३४ सरदेसमुख
१७ देसमूख
८॥ देसपांडे

४।· देसचौ
६।।।· नाडगौड
२०।· साहोतरा

९०।।।·

४५३८=

पैकीं वजा सोड तिजाई

रुपये

१५१८-

बाकी बेरीज रुपये १०२८=

ता

दिवाण बेरीज	हकदार
२२५ ऐनहता	२२।।= सरदेसमूख
५।।· इनामपट्टी	११।- देसमूख
११।· माहालमार	५।।= देसपांडे
	२।।।- देसचौ
२४१।।।·	४।। नाडगोड
	१३।। साहोतरा
	६०।=

येकून तीनसे दोन रुपये चवल रास छ २१ सवाल निदेश समक्ष

राजते
लेखना
वधी

सुरु सुद बार

२४ ए. मा.

लेखांक १२३:] [१६६६ अधिक आषाढवद्य ५

श्री काळभैरवप्रसन्

मूळतालीक बाळबोध

स्वस्ति श्रीनृप शालिवाहन शके १६६६ वर्षे रक्ताक्षी नाम संवत्सरे अधिक वद्य पंचमी तद्दिनी राजेश्री तीर्थरूप अंणा प्रति रघूने खंडपत्र लेहुन दिल्हे ऐसे जे तुह्मी व अह्मी व भिमा ऐसे त्रिवर्ग विभक्त जहालों त्यास पंचधातू तोळा व मासा व अडिका रुका हंडे व भांडे व पोथी पुस्तक व पशू व दाणे कागदपत्र इनामाचे व वृत्तीचे व टाळगांवीचे व धर्मादायाचे व ब्रह्मसभेचे ऐसे जे घरामध्यें जे होतें ते तुह्मी अह्मी तीघानी अपलेले विभाग घेउन समजलो तीन घराची स्थळे त्यात वडिलाचा स्थळावरि तुह्मी राहावे रामराया बाबेति स्थळावरि अह्मी राहावे भिमाने महारुद्रा बाबेति स्थळावरि राहावे ऐसे संतोषे करून तिघे जणे समजलों या खेरीज अग्रहारिचे शेत व टाळगांव वृत्ति ज्योतिषाचा विभाग व उपाध्येपणाचा विभाग व गांवगन्ना इनाम व कोणेगांविचा इनामाचा विभाग व राजेश्रीचे तीर्थ उपाध्यपण अर्धे सैदापुरीचा तीर्थ उपाध्यपणाचे तीस बीघे आहेत त्याचा निमे विभाग व अणिखि तीर्थउपाध्यपण ऐसें समाईक आहे हे तुह्मी व अह्मी व भीमानें ऐसे तिघानि तीन ठाई यथाविभागे भक्षावे लेकराचें लेकरीं भक्षून सुखरूप असावे परस्परे विवाद करायास संमंध नाहिं यास जो अन्यथा करील तो देवब्राह्मण द्रोही त्यास श्रीची शफथ असे हे खंडपत्र लेहुन दिधले सहि लिहिल्याप्रमाणें रघुनाथ मान्य वळी सुमार सद्तीस ३७

गोही

बाबा दिक्षित गिजरे

पत्राप्रमाणे शिवरामभट्ट गिजरे

पत्राप्रमाणें ढुंढाराज पाठक कऱ्हाडकर पत्राप्रमाणें साक्ष घोंडभट्ट वैद्य

धोंडभट्ट गिजरे साक्षी

पत्राप्रमाणे साक्ष नारायण दीक्षित बिन्न यज्ञेश्वर दीक्षीत
पत्राप्रमाणे साक्ष बाळाजी नाईक क्षेत्रे बीन नरसाबा नाईक क्षेत्रे
गोपाळभट्ट गिजरे
स्वहस्ताक्षर साक्षि

लेखांक १२४] [१६७६ फाल्गुनशुद्ध १५

श्री

राजश्री मोकदमानि मौजे सैदापूर गोसावी यासि

ठेवणाईत नरसनाक परवरी म्हार मौजे मजकूर सुा खमस खमसैन मया अलफ आह्मी परागंदा होऊन अजीपर्येत बारा वरसे वाट पाहिली परंतु माजी दाद केली नाहीं हली तूर्त सध्या उदईक होलिकापूजेन आले आहे तर साहेबी मौजेमजकूरचे माहार यास ताकीद करौन होळीस पोळी बांदितील त्यास ताकीद करौन माजी वाट जाहालियाखेरीज मजला गावावर नेहल्याविना होलिकापूजेन केले तर दैसमूख दैसपांडे याची दोही असे याउपर धटाई करोन होळीस पोळी बांधली तर जिकडे माजी दाद होईल तिकडून करौन घेऊ परट समजौन लिहिले असे बहुत काये लिहिणें कृपा कीजे हे विनंती

लेखांक १२५] [१६८२ श्रावणशुद्ध १ सोमवार

श्री कृष्णा (क) कुमती संगमो जयति

स्वस्ति श्रीमत् करहाटक क्षेत्रस्थ समस्त ब्राह्मण व पंचाईत यानी निवाडपत्र करून दिले दिले शके १६८२ वर्षे विक्रम नाम संवत्सरे श्रावण शुद्ध १ सोमवार ते दिवसी राजेश्री गोपाळभट्ट गिजरे याप्रति नारायेण दीक्षित गिजरे भिमदीक्षित गिजरे यादवभट्ट गिजरे बाळकृष्णभट्ट गिजरे धोंडभट्ट गिजरे नरसिंभट्ट गिजरे यानी लेहून दिले एसे जे तुमचा काळ समीप तुह्मास पुत्रापत्य नाही पुढे दीर्घ बायकाचे चा-

लावें लागते याचा विचार काय केला त्यावरुन तुह्मी बोलिला की आपले घर व शेते इनाम मौजे सैदापुर व कोणेगाव व कारवेवडगाव व शेरें व दुशेरे व कोडोली येथील ज्योतीष अपल्या विभागाचें आहे जो याचें योगक्षेमाचें चालवील त्याच्या स्वाधीन करतील तुह्मास संकट काय आहे ऐसें बोलिला त्यावरून पाच ग्रहस्त व अह्मी येउन अवघे येकत्र होउन निश्चय केला की तुह्मा पाठीमागें यावत्काळ दो आहे तावत्काळ याचें चालउ त्या दोघीस मान्य करा मग दोघीस मान्य करून येणें प्रमाणें पाचाच्याविद्यमानें आपले अंशाचे भाउ याच्या विद्यमानें करार केला बितपशील

मूलि धाकटी नवरी आहे तीचे लग्न करायाचा समयी अह्मी विभागाप्रमाणें द्रव्य चोघाच्या विचारे देउ १

१ ज्योतीषगाव पाच १ इनामगाव दोन
५ २

घर क्षेत्रातील येक १
१

ज्योतीष व इनाम तुमच्या अंशाचें आहे ते त्यानी दोघीनी भक्षावें अह्मास भक्षायास कारण नाहीं आपल्या घरात राहून काळक्षेप करावा पुढे किरकोळ खर्चास पाहिजे याजकरिता तुह्मा दोघीस ज्योतिषाचा व इनामाच्या ऐवजा वेगळे रुपये २५ पंचवीस दरसाल देऊ याप्रमाणे भक्षून सुखरूप असावे यास जो अंतर करील तो अन्यायी त्याला तुमच्या पाठीमागे तुमचा विभाग भक्षायास कारण नाही येणेप्रमाणें जो तुह्मात चालवील तोच भक्षील यास जो अंतर करील तो देवब्राह्मण द्रोही त्याला पूर्वजाचा व कुळस्वामीचा शपथ असें हे पत्र लिहिलें सत्य वळी सुमार २० वीस बिकलम बाळकृष्णभट्ट ढवळीकर ॥००॥
येणेप्रमाणें पाच भाऊ मान्य गिजरे कागदपत्र वृत्तीचे जे तुह्मापाशी आहेत ते तुम्हापाशी जतन ठेवणे जे समई अम्हा कार्य लागल ते समयी येकाच्या गुजारतीने अम्हास देणें कार्य करून गुजारतीने तुम्हापाशी फिरोन देउ वळी २४ चवीस ॥ ॥

साक्षी

१ पत्रप्रमाण मानभट्ट वैद्य
१ बाजिभट्ट वैद्य
१ गरूड नारायणभट्ट माणीकभट घोडके

१ मोरो सीवदेव पारसनीस पा। मजकूर
१ माणको रघुनाथ कुळकर्णी मौजे वीरवड प्रा। मा।र

साक्ष बापुजी होनाजी कुलकर्णी का। मजकूर पत्रप्रमाण साक्ष गोपाळ गोविंद कुलकर्णी का। कऱ्हाड

१

वेंकाजी नरहरी कुलकर्णी का। कराड

१

अंबाजी तुकदेउ कुलकर्णी मौजे कोरेगाव प्रा। मजकूर

१

लेखांक १२६] १६९२ आश्विनवद्य ९

श्रीगुरुनिरंजनशिवदासगुरु

करीना शके १६९२ विकृति नाम संवत्सरे आश्विन वद्य नवमी शनिवार तद्दिनी काशिनाथ गोसावी शुक्ल वास्तव्य कऱ्हाडक्षेत्र आमचे तीर्थस्वरूप कृष्णाजी नाईक व केशव नायकाचे तीर्थस्वरूप मैराळ नाईक मारुलबोहल्यांत राहत असतां आमचे तीर्थस्वरूप विरक्त जाले चौदा वर्षांचे होते मातुश्री बारा वर्षांची होतीं उभयता निघोन कऱ्हाडीं निरंजन स्वामी होतें त्यांस शरण आले निरंजनस्वामीनी अनुग्रह देउ-ऊन त्यांच्या संगतीनें तीर्थयात्रा बहुत दिवस केल्या स्वामीनी शिवदास-गोसावी नाम ठेऊन क्षेत्रात शुक्लवृत्ति करणे ह्मणून आज्ञा केली भीक्षा करून आसतां आमचे वडीलबंधू तीर्थस्वरूप नागेशबा व आह्मी जालों कऱ्हाडीं राहिलों आमचे चुलते मैराळ नाईक चाटेपन करूं लागले मग मारुल सोडून सातारियास गेले तेथे दुकान घालून राहिलें त्यांचे

दोघे पुत्र धोंडोबा नाईक व केशव नाईक केशव नायकाचे दोघे पुत्र बाबू व गंगाधर ते सातारियात व आह्मी कन्हाडीं राहिलों असतां आमचे बंधू नागेशबावा वारणेत उखळंबास गेले गांवकराहून घेउन मठ बांधून दिल्हा व दोन बिघे सेत देऊन स्थापना केली पुढें काळें करून नागेशबावा कैलासवासी जाले मग आह्मी मठांत नरशिंहा ब्राह्मण ठेविला पुढें आह्मास क्षेत्रात असतां केशव नायकाचे पुत्र गंगाधर दुखणेकरी आमच्या घरास आला आह्मी त्यास व केशव नायकास पत्र न पाठवितां न बलाविता घरास आला आह्मी त्यास पुशिलें येथे येयास कारण काय गंगाधर बोलिला आपणास बरें वाटत नाहीं व आपले बंधू व भावजय मानीत नाहीत यास्तव तुह्मा पासीं राहीन पुढें सांगाल त्याज प्रमाणे वर्तुणूक करीन आह्मा बरोबर च्यार महिने होता बरा जाला आह्मी बोलिलों की आपल्या घरास जाणे त्यास तो बोलिला कीं मी देशांतरास जाईन परंतु सातारियास जाणार नाहीं त्याजवरून आह्मी विचार केला गंगाधरास स्त्री नाहीं त्याज वरून आह्मी विचार केला निस्पृह आहे नागेश बावाच्या मठात संरक्षणास योजावा मग मठास नेऊन गांवकरास भेटऊन मठ व देवतार्चन त्यांचें जें होतें तें गंगाधराच्या स्वाधीन करून सत्कर्म करून मठांत राहणें ह्मणून सांगितले गंगाधराच्या भेटीस केशव नाईक आले ते हि मठांत राहिले पुढें गंगाधर आह्मा बरोबर च्यार महिने होता आमचा मेहुणा चिरंजीव खंडोबा यासीं कळह करून प्रातःकाळीं आंह्मास न पुसत वारणेत गेला याला साक्षी जनार्दनाच्यार्य टोनपे व कृष्णाजी त्रिंबक आहेत गंगाधर पळून गेला त्याज वरून आम्हास क्रोध आला आम्ही केशव नाईक व गांवकरास पत्र पाठविलें जें तुम्हास मठांत राह्मास संमंध नाही तुह्मी स्थळांतर करणे आणिखी कोणाच्या स्वाधीन मठ करूं त्यास गांवकरानी राहून घेतलें गंगाधर आमचा संप्रदायी नव्हे असें आसतां आह्मास बरें वाटेनासें जालें अत्यंत अवस्था जाली त्याजवर गंगाधरास आंह्मी पत्र पाठविलें तुज वांचून आह्मास कोणी नाही सर्व तुझें आहे देखत

पत्र लवकर येणे गंगाधरानें आमचे पत्र मानिलें नाहीं दुसरें पत्र पाठविलें आमची अत्यंत अवस्था आहे तरी अगत्य येणे आला नाही असीं पत्रें आठ आपण पाठविलीं गंगाधराने अमान्य केलीं त्याजवरून आमचें शरीर स्वस्थ नसतां आमची स्त्री व आह्मी वारणेत जाऊन गंगाधरास भेटलों गंगाधरास बोलिलों जे आमच्या शरीराचा भरवसा नाहीं तूं क्षेत्रास चाल तुझे स्वाधीन अवघें करूं ह्मणून बोलिलो गंगाधरानें आमच्या पाया वरि हात ठेविला आठा दिवसी येतों त्यास च्यार महिने गंगाधर आला नांहीं पुढे बेलवडी गणेश भटानी कोटिहोम केला तेथे गंगाधर आला ह्मणून अैकून गेलों गंगाधरास बोलिलों जें क्षेत्रास चाल गंगाधर बोलिला आपण पुढें चालावें मी उदेक येतों या रात्रौ कऱ्हाडीं कुंभाराचे घरी राहिला आमच्या घरास आला नाही परस्परें इसलांपुरास जाऊन वारेणेत गेला आह्मास वर्त्तमान कळलें आणिखी आह्मी मुजरत माणूस व पत्र पाठविलें गंगाधरास अवघें तुझें आहे स्वाधीन करितों गंगाधर आला नाही असीं तीन वर्षे पत्रें आण घालून पाठविलीं परंतु नाहीं आला सेवटीं आह्मास फार बरें वाटेनासें जालें त्यास भगवंत कुंभार पाठविला पत्रांत लिहिलें कीं तुझ्या स्वाधीन सर्व करितों सर्व तुझें आहे अनमान करिसील माझी शफत असे गुरें ढोरे मठ कोणाचे स्वाधीन करून देखत पत्र अगत्य येणें त्याजवरून भगवंता बरोबर कऱ्हाडास आला आह्मास नमस्कार घातला सहस्र अन्याय क्षमा करणें त्यास गंगाधराची खांसगत महीष होती त्यास आह्मी पुसिलें ह्मैस कोठे आहे गंगाधर बोलिला महीष वारणेत चारणीस घालविली आणि महीष भगवंत कुंभाराचें पदरी घातली त्याचे साक्षी बाळू चिंतामणी नेरलीकर भगवंत कुंभार व खंडोबा आमचे मेहुणे आमचा ह्मणून आम्हासीं हि कृत्रिम केलें हें हि असो गंगाधरास आह्मी बोलिलों जे आह्मी वृद्ध जालों तुजला हि स्त्री नाहीं तुं हि अशक्त जालास पुढे देवतार्चन व संसार करावयास कोणी नाही त्यास सातारियांत तुझे चुलते धोंडोबा नाईक यांचे पुत्र नातू आहेत त्यास तुह्मी आह्मी

मिळोन जाऊन घेऊन येऊन त्यांची स्थापना क्षेत्रात करूं तुझें हि आमचें हि संरक्षण करील त्यास गंगाधर बोलिला कीं त्यांचा आमचा द्वेष आहे बरें वाईट जालें तरि त्याचें निमित्य आह्मावरि येथील तो कामाचा नव्हे मग आह्मीं गंगाधरास बोलिलों कीं आमची कन्या चिरंजीविनी सौभाग्यवती तुकाबाई व आमचे जामात रामभट्ट तुमचे व आमचे पुरोहित त्यांचे स्वाधीन सर्व करूं त्यास गंगाधर बोलिला कीं फार सरस आहे मग गंगाधर व आह्मी वेदमूर्ति राजेश्री भगवंत गोसावीं यांच्या घरास गेलों भगवंत कुंभार व खंडोबा व बाळंभट्ट नेरलीकर व सदाशिवभट्ट येळगांवकर बिन रामचंद्र पाठक असे मिळुन भगवंत बावास वर्त्तमान निवेदन केले गंगाधराच्या अनुमत्तें पत्र लिहिलें कीं रामभट्ट व सौभाग्यवती तुकायीं यांचें स्वाधीन देवार्चन व ईनाम व सर्वार्थे रामभट्टास दिल्हा गंगाधरानें वडीलपणानें यांचें संरक्षण करावे गंगाधराचें रामभट्टानी संरक्षण करावे माये ममतेने असावें याज प्रमाणे भगवंतबावा पासिं पत्र लिहून दिल्हें सदरहू गंगाधरास वारणेत आह्मी पत्रें दाहा पाठविलीं परंतु त्याणे अमान्य करून आमाचा द्वेष करूं लागला त्याज पासीं आमची पत्रें आहेंत तीं रद असेत पुढें गंगाधरा वारणेत भिक्षेस रवाना केला त्यास शरीरास समाधान नाहीं सें जालें वारणेत राहिला मागुती श्रावणमासीं गंगाधरानें भगवंत कुंभारास पत्र पाठविलें कीं त्वां माझा घात केला महीषींचें वर्तमान बावास सांगीतले तरि तुझें पारपत्य करीन असे पाठविले हा हि अन्याय सर्वस्वें आमचें भक्षून आह्मावरि फिरोन पडिला आमचा विभागी नसतां सांप्रदायी नसतां आमचा घात इछूं लागला हें वर्तमान समस्त ब्राह्मणास आह्मी निवेदन केलें तेव्हां समस्त क्षेत्रस्थ भगवंत बावा यांच्या विचारें करुन रामभट्टास आह्मी क्षेत्रा बलाऊन आपलें दानपत्र व समस्त ब्राह्मणाचें पत्र श्रीमंत प्रतिनीधीचें पत्र देशमुख देशपांडियाचें पत्रें देऊन रामभट्टाची स्थापना केली आह्मी तुळसीचें झाड लाविलें आहे तरि सर्वत्रानी संरक्षण करावें हें सत्य सत्य सत्य

लेखांक १२७] [१७१० आश्विन वद्य १४

श्री नकल

निवाडापत्र स्थळ मोकदमानी मौजे नडसी प्रां कऱ्हाड व पांढर मौजे सैदापूर मोकदम महार मजकूर सैदापूरकर याचा निवाडा पांढरीचेपत्र व सरकारचेपत्र स्थळांस आले त्यावरून महार मजकूर उभयतापासी राजीनामा व जामीन कतबा व करीणा व इमानपत्र घेऊन निवाडपत्रं केली सुा तिसा समानीन मया अलफ महाराची नावे बितपसीलवार हसनाक वलद धोलनाक व काणनाक वलद देवनाक व माणनाक वलद कुसनाक महार कलमे तपसीलवार

२ होळीचेमानाचे कलम

१ पोली आदी हसनाक याचे घरची आणावी मग माननाक याचे घरची पोली ऐशा दोन पोल्या आणून माननाक याने होलीस बांधाव्या कलम १

१ दुसरे कलम होलीस विस्तू काननाक याने आपले घरचा आणावा आणी पानाचा विडा व खोबरेचीवाटी गांवचे होलीपुडे उचलावा — कलम १

२

१ दसरेचा आपठा पुढला विडा माननाक व हसनाक याने उच-लावा कलम १

१ दिवालीचे दिवसी मांगुळीचा काननाक याने उचलावा कलम १

४ गांवजत्रा लक्ष्मीचारेडा मारावा त्याचा मान तपसील

१ हसनाक याने रेडास खरग घालून उजवे बाजूस बसावे कलम त

१ दुसरे कलम माननाक याणे आपले घरची स्थळभरीत आरती आणून रेडाचे सीर उचलून डावे बाजूस बसावे कलम १

१ तिसरे कलम जातेसमई लक्ष्मी म्हसनाकाने पो ध्यावी माननाक याने सीर व दिवा घ्यावा आणी सिवसर न्यावी कलम

१ काननाकाने दुरडी घुगरेची पेंडेची घागर हा मान याने उचलावा

—

४ कलम १

३ गुरांची माने फाडावे ते समई याची कलम तपसीलवार

१ म्हसनाक याने कुमडी येक ध्यावी

१ दुसरी कुमडी माननाक याने ध्यावी

१ आतडी व कान काननाकाने ध्यावी कलम १

—

३

१ मेहतरकीचा मान घास मुटका व रानातील पेंडी काडी जी मिळती माननाक व म्हसनाक यानी दोईसाही ध्यावी कलम १

१ लक्षुमीबाहेरचीजत्रा व गांवजत्रा होईल तिचा मान मुंडी म्हसनाक याने आणावी आणी माननाकाचे घरी रहावी मग काननाकास जेवायास बोलावे आणी तिघांनी जेवावे कलम

१ फिरती तराळकी ती जागा वरसली प्रा करावी कलम १

१ गांव मोट व महाराटी व माहारकी व बलुते ती जागा बरोबर येताविभाग वाटून ध्यावी आणीक हजरीस माहार तिघाजणांनी उभा करावा कलम १

१ गुढेचा पाडवेचा मान लिंबाचा पाला पाटील लिंब देतील तो माननाक याने पदरी घेऊन मग म्हसनाक याने बालगोपाल यास द्यावा कलम १

—

८

येणेप्रमाणें निवाडा करून महार मजकूर यांची समजूत पडली कलम लिहिले बरहुकूम ज्याचे त्याणी मान उचलावे याप्रमाणे या पत्रास घालमेल जो करील तो दिवाणचा गुणेगार व देवाचा अन्याई व वतनाचा खोटा हे लेहून दिल्हे निवाडपत्र सही तेरीख छ २७ मोहरम शके १७१० कीलकनाम संवत्सरे आश्वीन वा १४ बिा बहिरो

आनंत कुलकर्णी मौजे मा। पत्राप्रमाणे साक्षी ता। बार. सैदापूरकर मोकदमानी

१ लक्षुमण बिन संभाजी पां।
१ कुषजी बिन कोनाजी पां।
१ धोंडजी बिन मलजी पां।
१ जोत्याजी बिन बापूजी पां।
१ जानोजी बिन माधारजी पां।
१ गिरजी बिन माहामाजी पां।
१ मयाजी बिन लिंबाजी पां।
१ हाणगोजी बिन राणोजी पां। मौजे मा।
१ संताजी बिन रखमाजी
१ आपाजी बिन जिवाजी पां।

लेखांक १२८] [१७११ फाल्गुनवद्य १०

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री समस्त ब्राह्मण व धर्माधिकारी उपाध्ये जोतिषी प्रां। कऱ्हाड स्वामीगोसांवी यांस

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सु॥ तिसैन मया व अलफ का। पेण पा। साकसे येथील समस्त ब्राह्मण यांणीं हुजूर येऊन निवेदन केले कीं श्रीमंत कैलासवासी नारायणराव साहेब यांचे कारकीर्दीत परभूचे कर्माचरणाविशई सरकारांतून ठराव करून दिल्हा त्याप्रमाणें त्यांणीं वर्तावें तें न करितां आपला धर्म सोडून मनश्वी वर्तणूक करून चोरून ब्राह्मकर्में करितात येविसी त्यास ताकीद होऊन बंदोबस्त जाला पाहिजे ह्मणोन त्याजवरून मनास आणितां पेशजी कैलासवासी तीर्थरूप रावसाहेब यांचे वेळेस चौकसी होऊन परभूचे वर्तणुकेविसी कलमांचा ठराव जाला त्याप्रा। त्यांणी सरकारांत कतबा लेहून दिल्हा त्यांतील कलमें बितपसील

१ वैदिकमंत्रें करून कांहींच कर्म करणार नाहीं

१ वैदिकमंत्र जे येत असतील त्याचा उच्चार करणार नाहीं

१ भाताचे पिंड करणार नाहीं

१ देवपूजादीक विहितकर्मे पुराणोक्तमंत्रेकरूनच करूं व ब्राह्मणभोजन आपले घरीं करणार नाहीं.

१ शालग्रामपूजा करणार नाहीं

१ ज्या देवास शूद्र जातात त्या देवास आम्ही जाऊं

१ ब्राह्मणास दंडवत मोठ्यानें म्हणत जाऊं व आपले जातींत हि दंडवतच म्हणत जाऊं

१ वैदिक ब्राह्मण व आचारी व पाणके व शागीर्द ब्राह्मण व ब्राह्मण बायको चाकरीस ठेवणार नाहीं व आपले घरीं हि ठेवणार नाहीं.

१ आमचे जातीमध्यें आपले संतोषे पाट लावितील त्यास आह्मी आडथला करणार नाहीं

येणेंप्रमाणें नव कलमें लेहून दिल्हीं असतां परभू आपले घरीं चोरून ब्रह्मकर्मे करितात यामुळें पेणकर ब्राह्मणाचा व त्यांचा कजिया वाढोन परभूचे घरचीं सर्व कर्मे बंद जालीं त्यास येविसीचा हालीहि विचार करितां परभूचे कर्माचरणाविशई पेशजी चौकसी होऊन कलमें ठराऊन दिल्ही आहेत त्याप्रमाणें त्याणीं वर्तावें ते न करितां आपला धर्म सोडून चोरून मनस्वी वर्तणूक करितात हे आनुचित पेशजी कलमें ठराऊन दिल्हीं आहेत तीच योग्य ऐसे शिष्टसंमते ठरोन पुण्यांत परभूचीं घरें आहेत त्यास हुजूर ताकीद करून हें पत्र तुम्हास सादर केले असे तरी प्रांत मार येथें परभूचीं घरें असतील त्यांस निक्षूण ताकीद करून सदरहू कलमाप्रमाणें वर्तवीत जाणें जाणिजे छ २३ जमादिलाखर आज्ञाप्रमाण

लेखन सीमा बार

लेखांक १२९] [१७२२ आश्विन वद्य ७

श्री

श्री धूतपापेश्वरो जयति

श्रीमत् राजश्री रामकृष्णपंत सुभेदार विजयदुर्ग स्वामीप्रति आश्रित साग्निचित् सोमयाजी महेश्वरोपाध्याय तथा धोंडदीक्षित ज्योतिषी व धर्माधिकारी व देशोपाध्ये अष्टाधिकारी तर्फ राजापूर कृतानेक आशिर्वाद विनंती विशेष आपण पत्र पाठविले त्यांत लिहिलें कि केशव मोडक वस्ती सोलगांव यांचा बापास कुणबी यांणी मारिले हे केशव मजकूर यास पूर्वी समजले अस्ता बापास कळविले नाहीं सबब सर्कारांत अटकेस ठेविला होता त्याची मोकळिक करून तुह्माकडेस पाठविला आहे तरि शास्त्रमतें पंक्तिपावन होय तो शास्त्रार्थ निवडून उत्तर पाठवावे आपले पत्राप्रमाणें उपाध्ये ज्योतिषी व धर्माधिकारी यांशि पत्र द्यावयास होयील ह्मणोन लिहिले त्यास शास्त्रमते करून केशव यास व्यवहारज्ञता आलि नाही षोडश वर्षानंतर व्यवहारज्ञता शास्त्रमते करून होत्ये तत्पूर्वी त्याचा व्यवहार अज्ञानकृत जाणावा मुख्य ब्रह्महत्या दोष मारणारांकडेस आहे केशव याजकडेस अनुमति दोष आहे तोहि अज्ञानत्वेंकरून जाणावा यास्तव केशव यांस संकल्पपूर्वक कृष्णायात्रेस पाठवावा तदुत्तरकाळी स्वग्रामी येउन सार्ध चतुरब्द प्रायश्चित्त करावें म्हणजे त्याची शुध्दता होयील याप्रमाणें शास्त्रसंमत आहे ग्रामस्छ सर्व ब्राह्मणांचें संमतें करून करवावे बहुत काय लिहावे हे विनंती सदरहू असल पत्र रा। बाळाजी विश्वनाथ आपटे यांचे घरास केशव मोडक पत्र घेउन आला त्याची नकल लेहून घेतली शके १७२२ आश्वीन वा। ७ मु॥ कराड

लेखांक १३०]

श्रीशंकर

श्रीमत्परमहंसादियथोक्तबिरुदांकित शृंगेरीसिंव्हासनाधीश्वर-

श्रीमच्छंकराचार्यान्वयसंजाताभिनवश्रीविद्यानरसिंहभारती-
स्वामीकृत नारायणस्मरणानि

श्रीमत्सकलगुणालंकरण हरिगुरुभक्तिपरायण राजमान्य राजश्री समस्त ब्रह्मवृंद क्षेत्रकरहाटक परमभक्तोत्तम यांप्रती विशेषस्तु तुमचें कल्याण इच्छित करवीरक्षेत्रीं छत्रसभासमवेत श्रीसमीप राहिलो असों तदनंतर आपण वर्षासन भिक्षा गोपूजाबदल मौजे सैदापूर भूमी देऊन दानपत्र दिल्हें त्यास विस्वावसुनाम संवत्सरीचा ऐवज मठास पावला पाहिजे हंगामी ब्राह्मण पाठवावया अनकूल पडिले नाहीं यांकरितां प्रस्तुत आसीर्वादपत्र लिहून रा। कृष्णाजीपंत पाठविले आहेत तरी भूमीवा। गोपूजा यांचे पदरीं घातलें पाहिजेत समयास बैल पाठवून आणऊं तें ब्राह्मणमुखी ++ होतील तेणेंकरून आपणांस श्रेयस्कर आहे आपण मठीचा ऐवज सिध करून ठेविला असेल परंतु स्मरणास्तव लिहिलें असें गोपूजा पाठऊन येशः कीर्ती संपादणें सुज्ञाप्रती बहुत लिहिणें नलगे

मोर्तब
सुद

लेखांक १३१]

श्री कृष्णाककुद्मतीप्रसन्न

स्वस्तिश्रीमत्सकलगुणालंकरण गोब्राह्मणप्रतिपालक राजमान्य राजश्री दादोपंत प्रभुवर्येषु आश्रित समस्त ब्राह्मण क्षेत्र कराड कृतानेकवेदोक्त अनेक आसीर्वाद विनंती उपरी आह्मी येतेसमई राजश्री पाराजीपंत याचे दर्शन घेऊन आलो तेव्हां ते बोलिलें की श्रीमंताकडे जाऊन ताकीदपत्रें घेणें त्यावरून पुण्यांस आलों श्रीमंताचें दर्शन घेऊन सविस्तर वर्तमान विदित केलें त्यावरून आपणांस पत्र घेऊन पाठविले आहे गांव बितपसील ईनाम

१ श्रीपावकेश्वर मौजे काळवडे　　१ मौजे टाळगांव बो॥ राजश्री

१ मौजे सैदापूर समस्त ब्राह्मण क्षेत्र मजकूर
१ मौजे वारांजी वेदमूर्ती राजश्री बापाजी कासीकर यांस
१ मौजे नडसी हा गांव वेदमूर्ती वासुदेवभट क्षीरसागर

४
५ तेरीज

९

नारायेण दीक्षित गिजरे
१ मौजे पांचुंद समस्त ब्राह्मण क्षेत्र मजकूर
१ मौजे पांचमोरी बाबा दीक्षित गिजरे यास
१ मौजे जिंती बाळकृष्ण दिक्षीत उंबराणी
१ मौजे सेणे नरसिंभट लाटकर

५

येणे प्रमाणें देह नव पाा कराड याचे चौथाई आह्माकडे दिल्ही त्याप्रमाणे सदरहू गांवचे चौथाईचा वसूल जाहाला त्याप्रमाणें मखतियांत मजुरा देऊ ह्मणून राजश्री बाबूराव रघुनाथ यांस हि पत्र दिल्हे आहे हे वर्तमान आपणांस कळावे आणि गांवगंना उपद्रव जाहला असेल तो मना करावा ह्मणून आपणांस पत्र पाठविले आहे आह्मांस च्यार दिवस लग्नाकरिता राहून घेतलें ह्मणून राहिलो तरी गांवगंना कांहीं उपद्रव न होय तो अर्थ करावा येतेसमई आपले दर्शन घेऊन जाऊ देशमुखी व सरदेशमुखीचा आमलाचा बहूत उपसर्ग जाहला आहे ह्मणून ऐकिले त्यांस पेसजी आमलदार घेत होते त्यांचीं पत्रें आह्माकडे आहेत त्याप्रमाणें आह्मी आल्यावर निकाल होईल तूर्त दोहीअमलांचा उपसर्ग न होय तें करावे सर्वप्रकारे ब्राह्मणांचे अगत्य आपणांस आहे तेथ विशेप काये लिहिणें आह्मी सत्वरीच येतो बहुत काय लिहिणे हे अशिर्वाद

श्री

लेखांक १३२]

माहाराज राजाधिराज राजमान्य राजश्री पंत अमात्य स्वामीचे सेवेसी

येक खंडी आहे त्याचे दामाशाही पावीत जाणें व जाबित्यामध्यें मोरेश्वरभट व कासीभट या दोघांच्या असामी आहेत त्याचा आंश जो नेमिला आहे त्याचें ही दामाशाई प्रा आंश पावीत जाणें या उपरी रा वीरेश्वरभट गिजरे याणी आह्मास गोष्टी विचारिली त्याविषई वीरेश्वरभटापासीं सांगितले ते मुखवचनें सांगतील विशेष काय लिहिणें लोभ असो देणें हे नमस्कार

शुभं भ
वतु

लेखांक १३४]

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजेश्री समस्त ब्राह्मण क्षेत्र
करहाटक स्वामीचे शेवेशि

आज्ञाधारक नारायणाचार्यें कृत साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसी जे स्वामीनी पत्रें पाठविली ती पावली वर्तमान विदित झालें त्यानंतर श्रीमंत नाना फडनिसाचे दर्शन घेऊन वर्तमान सर्वे विदित केले ते बोलिले कीं अह्मास चवकशी करावी लागती त्यावरून यादीची मकलाशी संदिग्ध केली की कोणाचे गांव व इनाम व वर्षासनें कोणी दिल्ही याचे कागदपत्र कैसे अहेत याचा शोध करणें ह्मणोन मकलाशी झाली असे दोन वेल झाले दिकत फार पत्रामध्ये लिहिली मग राजेश्री गोपाल नाईक तांबवेकर यानी दोन वेला सांगून दूसरी यादि केली पत्र लिहिले त्यामध्यें हि दिकत अहेच राश्री नारोपंत पर्चुरे मुख्य कार्भारी चौउकशी फार या करीता समस्त ब्राह्मणाचे येक च पत्र जाहले पृथक् पृथक् होईना तर कदाचीत् राश्री दाजीपंतानी कोणास काहीं गाव विषई अथवा इनामा विषई उपद्रव केला तर मनुष्या हाती पत्र लिहून पाठवणे ताकीत पाठऊन देऊ यां ब्राह्मणास उपद्रव न करणे ह्मणून दोन पत्रे रा नाना याची ताकीद हि आहे त्यावरि रा रामाजी नायीक

विनति सेवेसी सेवक रुद्राजी चंदो देसकुलकर्णी पा। कऱ्हाड कृतानेक साष्टांग नमस्कार विनति येथील क्षेम ता। ७ माहे जिलकाद पावेतो सेवकाचे वर्तमान माहाराजाचे कृपादिस्टी करिता येथास्तीत असे माहाराजानी कऱ्हाड क्षेत्रीच्या ब्राह्मणास मौजे सैदापूर त्याचे नाव सिवापूर ठेऊन अग्राहार करून दिल्हे ते क्षेत्रा समीप क्षेत्रीचे विद्वान बाधताती ब्राह्मणास गावीची उपजीविका होऊन येईना ह्मणौउन ब्राह्मणानी सांगितले त्यावरी स्वामी कृपाळ होउन मौजे अटके दिल्हे त्या पत्रानिमित्य माहाराजापासी वेदमूर्ति मोरेस्वरभट व समस्त ब्राह्मण आले आहेत मौजे मजकूरची भूमी चावर ३६।१८

बिता।

आवलजमीन चावर	दुमजमीन चावर	सीमजमीन चावर
२०८१०	१३८१८	३८२०

देखील प्राचीन इनामदार आहे तेथील पाटील पलाले आहेत त्यासी आणायाचे येत्न केला आहे तो गाउ दोनी तीन वरसे खराब पडिला आहे स्वामीस ब्राह्मणाचा अभिमान आहे पत्र करून द्यावयास स्वामी समर्थ आहेत बहुत काये लेहू सेवक असो हे विनंति

लेखांक १३३]

श्री

राजमान्य राजेश्री रामभट बुधकर अग्रहार मौजे ब्रह्मपुरी गोसावी यांसी

स्नेहाभिलाषी श्रीकराचार्य पंडितराय नमस्कार उपरी मौजे ब्रह्मपुरी अग्रहार येथें आमचें अंश जमीन ।। पाव चावर आहे त्याचे लागणी काय जाली आहे उत्पन्न अल्पस्वल्प काय होते हे कांहीं तुह्मी लिहून पाठवीत नाहींत हे तुह्मांस उचित नव्हे जे काय थोडें बहुत उत्पन्न होईल ते आमचे आह्मास प्रविष्ट करीत जाणें व बाळंभट सिराळेकर याचें नेमणूक आश अग्रहारीचे विभागाच्या जाबित्यामध्यें खंडी १८

भिडे याचे ही पत्र पाठविलें आहे धंदा अवघा नाइकानी देवविला त्यानी उत्तम पत्र दिधले आहे कांहीं उपद्रव झाला तरि भय दादाचे न धरणें त्यानंतरि जाचे जे इनाम वर्षासने व धान्य जे आहेत जे चालतात त्यास अडस्थला न करणें ह्मणून आज्ञा येकंधर केली आहे कळले पाहिजे तुमची तालिका पत्रे अवघी पाठऊन दिधली असेत येथील दरबारची रीति फार दुर्घट झाली आहे पत्रे शीघ्र होत नाहीं भोगवट्या व्यतिरिक्त पत्र होत नाहीं चवथाईच्या ताकिती येक दोन गेल्या आहे कांही चिंता न करणें बहुत काय लिहिणे हे नमस्कारा:
सर्वांनीं वर्षासने अपली मागून घेणे त्यानंतर अह्मी प्रतिनिधीस पत्रे घेतले आहे की अमचा परसात शूद्र रघू मुलीक राहिला आहे तो काढून स्थल मुक्त करणे त्यास तुह्मी ही यत्न करून शूद्र निघेल ते गोष्टि करावी सा दादास पत्र आहे होमशाला बांधायाची आहे सूज्ञेषु किंबहुना इत्यलं पल्लवेन हा नमस्कार

लेखांक १३५]

श्री

वेदमूर्ती राजश्री गोपालभट बिन रुद्रभट गिजरे वास्तव्य
कसबे कऱ्हाड स्वामीचे शेवेसी

सेवक कालोजी बिन सोमाजी भोसले सां दंडवत विनंति उपरी कऱ्हाड क्षेत्रीचे तुह्मी आमचे तीर्थपुरोहित आमचे वडिलांचे लिहिले तुह्मापासी होतें ते लिहिलें तुह्मापासून गेले तुह्मी आह्मापासी येऊन त्या प्रमाणे सांगितले कीं वडिलाचे लिहिले आह्मा पासून गेले आहे त्यास मनास आणिता तुह्मी आमचे तीर्थपुरोहित ऐसे जाणून तुह्मास पत्र लिहून दिल्हे असे तुह्मी आमचे पुरोहित आमचे वौंशीचे देऊन येतील तें तुमचें पूजन करितील यांसि अंतर नाहीं तुह्मास दरसाल वरशासन रुा १० बाब देऊं जे आसीर्वाद देऊन सुखरूप राहणे बहुत काय लिहिणें हे विनंति

लेखांक १३६]

श्री

माहाराज राजाधिराज राजमान्य राजश्री पंत अमात्य
स्वामींचे शेवेसी

विनति सेवेसी सेवक रुद्राजी चंदो देसकुलकर्णी पा। कऱ्हाड कृतानेक सास्टांग नमस्कार विनति क्षेम ता। छ ७ माहे जिलकाद पावेतो सेवकाचे वर्तमान माहाराजाचे कृपादस्टी करिता यथास्तीत आसे माहाराजानी कसबे क्षेत्रीच्या ब्राह्मणास मौजे सैदापूर त्याचे नाव सिवापूर ठेऊन अग्रहार करून दिल्हे ते क्षेत्रा समीप

वाधताती ब्राह्मणास गावीची उपजीवका होऊन येई ना ह्मणौऊन ब्राह्मणानी सागीतले त्या वरी स्वामी कृपाळू होऊन मौजे आटके दिल्हे त्या पत्रा निमित्य माहाराजा पासी वेदमूर्ती मोरेश्वर भट व समस्त ब्राह्मण आले आहेत मौजे मजकूरची चावर ३६।१८ बि ता।

आवल जमीन चावर	दूम जमीन चावर	सीम-जमीन
२०॥१०	१३॥१८	३॥२०

देखील प्राचीन इनामदार आहे तेथील पाटील पळाले आहेत त्यासी आणावयाचे यत्न केला आहे तो गाऊ दोनी तीन वरसे खराब पडिला आहे स्वामीस ब्राह्मणाचा अभिमान आहे पत्र करून द्यावयास स्वामी समर्थ आहेत बहुत काय लिहू सेवक असे ही विनति

लेखांक १३७]

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री तात्या दीक्षित गिजरे
स्वामीचे सेवेसि

विनंती उपरी येथील कुशल ता। छ २४ रजब पर्यंत तुमचे आसीर्वादे सुखरूप असो विशेष वो। राजश्री श्रीनिवास जोसी कुटुंब सुधा पुण्यास लग्नास आले होते ते समई जोसी बावाची कन्या दि आली तिचा भर-

तार हि आह्मांपासी लग्नात होता लग्न जाहल्यावर येक महिना राहिला होता स्त्रीपुरुषें कांहीं दिवस येकत्र होती नंतर घरास गेली जोसीबांवा राहिले होते कांहीं दिवसानी ते हि गेले असे असतां हाली तुमचे ग्रामस्त मनस्वी वल्गना करितात जी गोष्ट घडावयाची स्वप्नांत हि नाही ऐसें बोलणें बोलतात त्यास कोणती हि गोष्ट बोलणें ती स्थल पाहून वस्तु पाहून बोलावी ती न करिता अपशब्द बोलावे हे सर्वास ठीक नव्हे आणि बाइकानी वगैरे हे श्रवण करून भयाभीत व्हावे हे उचित कीं काय पूर्वीचा समंध पाहता कांहींच अंतर नाहीं लग्नास आली किंवा नाहीं याचा शोध न करितां गैरसमजुतीनें कोणती हि गोष्ट बोलो नये तुह्मी क्षेत्रस्त ह्मणौन विनंती लिहिली आहे कोणती हि गोष्ट जे करणे ते समजून करावी सुज्ञाप्रति विशेष काय लिहिणें पत्राचे उत्तर पाठयावे हे विज्ञापना

लेखांक १३८]

श्रीरामचंद्र

वेदमूहूर्ती राजश्री नारायेणभट गिजरे तीर्थउपाध्ये क्षेत्र
कराड स्वामीचे सेवेसीं

सेवक भगवंतराउ रामचंद्र कृतानेक नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये लिहिले पाहिजे विशेष माहादाजी खंडेराऊ याजपासून कांहीं अप्रमाद घडोन आला या करितां हाली श्री स्नानास तुह्माकडेस पाठविले आहेत ऐसीयासि येथाशास्त्र प्रायेचीत देऊन शुभ्रपत्र दाहा ब्राह्मणाचें विद्यमानें देऊन पाठविले पाहिजे छ २२ रमजान कृपा असो दीजे हे विनंती पा। हुजर

लेखांक १३९] [१६४०-बाळबोध

श्रीरामो जयति

श्रीमत्परमहंसादियथोक्ताविरुदांकितैः शंकराचार्यान्वयसंजातश्रीमच्छंकेश्वरमठस्थविद्याशंकरभारतीभिः कृत नारायणस्मरणानि

स्वस्ति श्रीमन्निखिलनिगमाध्ययनाध्यापनार्जितयशोनिकुरंबरंजितदिक्प्रांतेषु श्रीमत्करहाटकक्षेत्रस्थब्रह्मवृंदेषु विशेषः संप्रति श्रीमत्प्रांते प्रतिवर्षं तैलंगाः समायांति अस्मन्मठाभिमानः केनापि न क्रियते तद्वशादस्माभिः श्रीमत्प्रांते अस्माकं मठपूजामठदक्षणाआचारव्यवहारप्रायश्चित्तादिकं श्रीमोरेश्वरभट्टगिजरोपनामकधर्माधिकारिणां स्वाधीनता कृतास्ति तर्हि श्रीमद्भिः सर्वैः पूर्वपरंपरया मठधर्मो यथाचालितस्थितस्तथैवाधुनापि चालनीयः आलश्यो मा विधेयः इदं भवतामेव श्लाघ्यं धर्मोल्लिंघनंन कर्तव्यमित्यलं सुज्ञेषु

(मुद्रा: इत्य लम्)

लेखांक १४०] [शके १६२९—१६४८

॥ श्रीविद्याशंकर ॥

श्रीमत्परमहंसादियथोक्तबिरुदांकितश्रृंगेरीसिंहासनाधीश्वरश्रीमच्छंकराचार्यान्वयश्रीविद्याशंकरभारतीस्वामिकरकमलसंजाताभिनवश्रीविद्यानरसिंहभारतीस्वामिकृतनारायणस्मरणानि

श्रीमत्सकलगुणालंकरण हरिगुरुभक्तिपरायण राजमान्य राजश्री कृष्णाजी विठल सुभेदार प्रां कराड भक्तोत्तम या प्रति विशेषस्तु तुमचें कल्याण इच्छित करवीरक्षेत्रीं छात्रसभासमवेत श्रीनिकट राहिलों असों तदनंतर अत्रत्य कुशल जाणोन स्वकीय सुखानुभवलेखनद्वारा चित्त प्रमोदवीत असलें पाहिजे दुसेरीक्षेत्रास आले समई आपण श्रीच्या पुण्यतिथी

करितां गोदूम पांच मण मान्य केले आहेत त्यास प्रस्तुत पुण्यतिथी समीप उरली गोदूम मठास आणावे लागताती या करितां रा। वेंकणभट या समागमें आशीर्वादपत्र पाठविलें आहे तरी गोदूम सिध करून उत्तर पाठवणें ह्मणजे बैल पाठवून मठास आणऊं ते ब्राह्मणमुखी व्यय होतील तेणें करितां श्रेयस्कर आहे आपण मठीचे अभिमानी सच्छिष्य असा तेथें विशेष काय लिहिणें

इत्य
लम्

लेखांक १४१] [शके १७१६ वैशाख शु॥ २

॥ श्रीशंकर ॥

अनेकश
क्तिसघटप्रका
शलहरिघनध्वा
तध्वंसी विजयते
विद्याशंकरभा
॥ रती ॥

श्रीमच्छंकराचार्यान्वयसंजाताभिनवश्रीविद्याशंकरभारती-स्वामिकरकंजोद्भवश्रीविद्यानरसिंहभारतीस्वामिकृतनारायणेन-स्मरणानि

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री समस्त ब्रह्मवृंद विद्वज्जन व राजकीय गृहस्थ व व्यवसाई गृहस्थ व वास्तव्य क्षेत्रकरहाटक परमभक्तोत्तम यांसी विशेषस्तु तुमचें कल्याण इच्छित छात्रसभासमवेत श्रीनिकट असों अत्रत्य कुशल जाणोन स्वकीय लेखन करीत असलें पाहिजे या नंतर वैशाख वद्य नवमीस श्रीआ(चा)र्ये यांची पुण्यतिथी ब्राह्मणसंतर्पण वार्षिकी उत्छाह मठसिरगांवीं वाळवें नजीक कृष्णातीरीं आहे तर तुह्मी सर्वत्र तीर्थप्रसादास

येणे अनमान न करावा अगत्य यावें तैसे क्षेत्रमजकुरीं संस्थानास इनाम जमीन आहे त्याचा ऐवज संस्थानीं येऊन पावत नाहीं जाणून लिहिलें आहे तरी. इस्तकबील पासून ऐवज राहिला असेल तो पाठवून द्यावा ये विसीं आळस न करावा विशेष काय लिहिणें इत्यलम्

माहानुशासन वरीवर्त्ति.

पौा मिती शके १७१६ वैशाख शुा। २

हस्तें सखाराम पोंवार

लेखांक १४२]

श्रीविद्याशंकर

श्रीमत्परमहंसादियथोक्तबिरुदांकितशृंगेरीसिंहासनाधीश्वर-श्रीमच्छंकराचार्यान्वयश्रीविद्याशंकरभारतीस्वामिकरकम-लसंजाताभिनवश्रीविद्यानरसिंहभारतीस्वामिकृतनारायण-स्मरणानि

श्रीमत्सकलगुणालंकरण हरिगुरुभक्तिपरायण राजश्रिया विराजित राज-रान्य राजश्री समस्त ब्रह्मवृंद क्षेत्रकरहाटक भक्तोत्तम या प्रति विशेषस्तु तुमचें कल्याण इच्छित करवीरक्षेत्रीं छात्रसभासमवेत श्रीनिकट राहिलों असों तदनंतर येथील कुशल जाणून स्वकीय सुखानुभव लिहून मानस तोषवित असिलें पाहिजे या नंतर आपण पत्र पाठविलें पाऊन लिहिला भावार्थ अवगत जाहला तेथ अर्थ कीं रा। केशोपंत खोडगडे याचे मुक्तते विषईं राजश्री रत्नाकरपंत यांहीं विनंति लिहिली आहे तरी स्वामींनीं दया करून त्यास मुक्ततेचें पत्र पाठवून द्यावें मठीचा बहुमान मठास देऊं ह्मणोन तरी केशोपंता कडील गुणदोष तुह्मांस व रा। रत्नाकरपंतास पहिले च सांगितले आहे त्या हि वरी रा। अंताजी सित्रदेऊ मठसंबंधी याचे विद्यमानें मठास शत रुपये देतों दया करावी ह्मणून बोली जाहली त्यास मान्य केलें नाहीं ऐसें असतां सांप्रत आपण व रा। रत्नाकरपंत यांहीं लिहिलें तेंव्हां मठीचा अंश काढाल चिंता काय मुख्य

हरिगुरुभक्तिपरायण राजमान्य राजश्री नारायणभट गिजरे व बापाजी नाईक क्षेत्रे वास्तव्य कराटक यासी विशेष यमाजी बाा पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें असेल परंतु वस्ता पाठविल्या नाहींत ऐसीयासी राजेश्री वेंकटभट यासी पाठविलें असे तरी त्याज बराबरी ब्राह्मण दोघे जण देऊन वस्ता पाठविणें आणि वजन करून घेणें आह्मी येथें वजन करून घेऊं तरी शीघ्र वस्ता ब्राह्मण देऊन पाठविणें आळस न करणें जाणोन उदईक कडेगांवास पाठविणे जाणिजे

इत्य
लम्

लेखांक १४५]

श्रीविद्याशंकर

श्रीविद्याशंकरभारतीस्वामिकृतनारायणस्मरणानि

वेदमूर्ती राजश्री नारायणभट गिजरे व बाबाजीनाईक वास्तव्य कराड यांसि विशेष

छत्री करावयास घातली आहे त्याची मुदती जाहाली तरी सोनारा करवी रोक उत्तम करून छत्री व पताका व सुरेपान काविले प्रमाणे वस्त उत्तम पाहून ब्राह्मणा पासी देऊन प्रविष्ट करवणें या विसी विलंब न करणे जाणिजे तारलीस गेलो तरी उदयीक पावते होय ऐसे करावे

इत्य
लम्

लेखांक १४६]

श्रीशंकर

श्रीमच्छंकराच्यार्यान्वयसंजाताभिनवश्रीविद्याशंकरभारती-
स्वामिकृतनारायणस्मरणानि

राजमान्य राजश्री नारायणभट गिजरे यांसी विशेषस्तु तुमचे कल्याण
२७ ऐ. मा.

तुमचे व राजश्री रत्नाकरपंताचे अवश्यकता जाणून तुमचे पत्रा वरून त्यास शुद्धपत्र पाठविलें असे पहिली बोली हि आपणांस दर्शविली आहे यांत मठीची सेवा जी कराल ती युक्त तुह्मां विरहित दुसरे आप्त कोण आहे तैसे सारिखे आपण शेवेसीं तत्पर असतां तेथें विशेष काय लिहिणें

(इत्य लम्)

लेखांक १४३]

॥ श्रीशंकर ॥

श्रीमत्परमहंसादियथोक्तबिरुदांकितश्रृंगेरीसिंहासनाधीश्वर
श्रीमच्छंकराचार्यान्वयश्रीविद्यानरसिंहभारतीस्वामिकरक-
मलसंजाताभिनवश्रीविद्याशंकरभारतीस्वामिकृतनारायण
स्मरणानि

श्रीमत्सकलगुणालंकरण हरिगुरुभक्तपरायण राजमान्य राजश्री समस्त ब्रह्मवृंद आच्यार्य व जोतिषी व उपाध्ये व समस्त राजकीय ग्रहस्त व देशमुख व देशपांडे व समस्त ग्रहस्त क्षेत्रकऱ्हाटक भक्तोत्तम यां प्रती विशेषस्तु तुमचें कल्याण इछित करवीरक्षेत्रीं छयात्रसभासमवेत श्रीनिकट राहिलों असों तदनंतर सांप्रत पौषसीत नवमीस श्रीची पुण्यतिथी आहे या करितां लिहिले असे तरी आपण सहसमुदाय येऊन मोहत्साव सांग केला पाहिजे बहुत काय लिहिणें

(इत्य लम्)

लेखांक १४४]

॥ श्रीविद्याशंकर ॥

श्रीमच्छंकराचार्यान्वयसंजाताभिनवश्रीविद्याशंकरभार-
तीस्वामिकृतनारायणस्मरणानि

इछित करवीरक्षेत्रीं छात्रसभासमवेत श्रीनिकट राहिलों असों तदनंतर सा॥ प्रा॥ पौष्यसित नवमीस श्रीची पुण्यातिथी आहे या करिता लिहिले असे तरी आपण सहसमुदाय एऊन मोहच्छाव सांग केला पाहिजे बहुत काय लिहिणे ये विषइ वडगांवास व राजश्री उमाजी गोसावी यासी व मसूरकर व पालीकर यासी पत्रे लिहून पाठविली आहेत तरी त्यांस प्रविष्ट होतील ऐसें केले पाहिजे जाणिजे

इत्य
लम्

लेखांक १४७]

श्रीशंकर

श्रीमत्छंकराच्यार्यान्वयसंजाताभिनवश्रीविद्यानरसिंव्हभारतीस्वामिकरकंजोद्भवश्रीविद्याशंकरभारतीस्वामिकृतनारायणस्मरणानि

सकलगुणालंकरण हरिभक्तिपरायण राजमान्य राजश्री गो॥ नारायण दीक्षित वास्तव्य क्षेत्र करहाटक कऱ्हाड या प्रती विशेषस्तु तुमचे कल्याण ईछीत करवीरक्षेत्रीं छात्रसभासमवेत श्रीनिकट असों तदनंतर येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन करीत गेले पाहिजे या नंतर सांप्रत पौष्य सीत नवमीस श्रीची पुण्यातिथी आहे तरी आपण सह समुदाय येऊन मोहोत्साव सांग संपादून गेले पाहिजे ये विशई अनमान न करणे बहुत काये लिहिणें श्रीच्या पुण्येतिथी करिता रा॥ साबाजी गो॥ व रा॥ उमाजी गो॥ व रा॥ रामकृष्ण गो॥ व मसुरास पत्रें पाठविली आहेत पावती करऊन ते यात्रेस येत ते गोष्टी करणे जाणिजे

इत्य
लम्

लेखांक १४८]

श्रीविद्याशंकर

श्रीमत्छंकराचार्यान्वयसंजाताभिनवश्रीविद्याशंकरभारती-
स्वामिकृतनारायणस्मरणानि

सकलगुणालंकरण हरिगुरुभक्तिपरायण राजमान्य राजश्री नारायणभट गिजरे क्षेत्र कऱ्हाटक या प्रती विशेषस्तु तुमचे कल्याण इच्छीत करवीरक्षेत्रीं श्रीनिकट राहिलों असों तदनंतर सांप्रत पुष्य शु॥ नवमीस श्रीची पुण्यतिथी आहे तरी तुह्मी समुदायसहित आले पाहिजे आणि तत्प्रांती क्षेत्रास व राजश्री रुद्रमुनी व उमाजी गोसावी व वाईमाहुलीस पत्रें लिहून आपणा कडे पाठविले आहे तरी मुद्दाम येवडी पत्रें प्रविष्ट करवणार सुज्ञ असा सप्तऋषी वगैरे पत्रे लिहून पाठविली आहेत येवडी पावती करावी आपणा करिता निश्चिती असो जाणिजे

इत्य
लम्

लेखांक १४९]

श्रीशंकर

श्रीमत्परमहंसपरिव्राजिकाचार्यश्रीमत्छंकराचार्यान्वयसंजाता-
भिनवश्रीविद्यानरसिंहभारतीस्वामिकृतनारायणस्मरणानि

श्रीमत्सकलगुणालंकरण हरिगुरुभक्तिपरायण राजमान्य राजश्री समस्त ब्रह्मवृंद व राजकीय ग्रहस्त व देशमुखदेशपांडे व ग्रामस्त वास्तव्य क्षेत्र कऱ्हाटक भक्तोत्तम यांसि विशेषस्तु तुमचें कल्याण इच्छित श्री पासीं राहिलों असों तदनंतर इकडील वर्तमान तरी रा॥ बाबूराव पुराणिक पुराण सांगावया समीप ठेऊन घेतला होता व आमचे पूर्वाश्रमीचा द्वेसी कासीकर ब्राह्मण हि त्यांनीं ठेवून घेऊन या संस्थानाची बहुता प्रकारें आस्था धरून आह्मांस विचारणा केली नंतर ते गोष्टी अमान्य केली ते च चित्तीं क्रोध धरून सांप्रत नवरात्रा कारणें संकेस्वरास गेलों

कीं केशोपंतास शुधपत्र दिले सारखें क्षेत्रीं प्रायश्चित घ्यावयासी आज्ञ करावी ह्मणोन तरी बहिष्कृतपत्र देतां तुमच्या संमतें राजश्री रत्नाकर-पंताचे गुजारतीनें दिल्हें शुधपत्र तुम्हीं मागता च दिल्हें पूजाद्रव्य संस्थानास तुह्मीं प्रविष्ट करावें ऐसे निर्गम जाहालें नंतर येथें तो कशास पाहिजे केसोपंत तुह्मां पासीं आहे प्रायश्चितविधि करवून पूजाद्रव्य पाठवावें येथें वेचास पाहिजे तो अर्थ वेदमूर्ति माणिकभटाचे वाग्विलासें कळेल माहुलीकराचे उत्थटपण वेदमूर्ति जगो दीक्षिता समक्षा बोलणे जाहले ते सांगतां कळेल पुढें प्रसंगास तुह्मास विदित असावें ह्मणून लिहिलें असे. सुज्ञा प्रति बहुत लिहिणें काय असे (इत्यलम्)

लेखांक १५१]

श्रीविद्याशंकर

श्रीविद्यानरसिंव्हभारतीस्वामिकृतनारायणस्मरणानि

वेदमुर्ती राजश्री नारायणभट गिजेर यासीं विशेषस्तु तुमचे कल्याण इछित श्री पासी असो तदनंतर मोजे सैदापूरचे शेताचा कौल हि पुरवला आणि लावणी ह्माली असतां मठास विशेष गल्ला पावत नाहीं करितां लिहिले असे तरी वाटेकरी यासी सांगून जो जिन्नस जाहला असेल तो आपण भट मिरजकर यांच्या घरास पावता करणे ह्मणजे मठास पावेल आपण कांहीं मठोच्या कामास अंतर करीत नाही परंतु सुचना लिहिली असे आउशा प्रमाणे जिन्नस पिकेल तो पावता करणे बहुत काय लिहिणे

लेखांक १५२]

श्रीशंकर

श्रीस्वामिकृतनारायणस्मरणानि

वेदमूर्ती राजश्री नारायणभट व बाबदेभट गिजेर भक्तोत्तम या प्रती विशेष तुमचे कल्याण इछीत श्री पासी असो तदनंतर मौजे सैदा-

होतों तेथें हर्दू मठीचे सेवक एक दोघे व कासीकर व आपले विद्यार्थी ऐसे दाहा वीस मिळोन रात्रौ नग्नशस्त्र घेऊन मारण्या आले तों ईश्वर-कृपेनें जागृत जाहलों तों पळोन गेले प्रातःकाळीं विचारणा करूं ह्मणोन मन माने तैसें तुफान करूं लागले तात्काल शिक्षा करावी तरी तो काटक मुलूक ब्राह्मण मारिले जातील या करितां करवीरास पाठवून मागून आह्मा हि येथें आलों येथील ब्राह्मणांनीं बहुता प्रकारें विनंति त्या विषईं केली नंतर निरोप दिल्हा शिक्षा करावी तरी आह्मां योग्य नव्हे त्यांचे कर्मास ते जातील ऐसें असतां मागती त्या ब्राह्मणांस व मठीचे सेवकांस आपदेभट कासगांवकर व सात पांच ढोंगी ब्राह्मण मिळोन आह्मांसी गरगशा लाविला आहे व मठीचा सेवक आहे तो बाल-कृष्णभट भटजी याचा रामभटाचा पुतण्या या करितां या दुर्शास्तव ते हि या कर्मास प्रवर्तले आहेत तुह्मी मठसंस्थानाचे अभिमानी आहां कळावें एदन्निमित्यं लिहिलें असे भेटी नंतर सविस्तर कळेल येथील ब्राह्मण ऐसे दुर्वर्त आहेत संस्थान बुडऊं पाहताती परंतु आह्मी गणणेस आणितों ऐसें नाहीं कळलें पाहिजे

इत्यलम्

लेखांक १५०]

श्रीविद्याशंकर

श्रीमत्परमहंसादियथोक्तबिरुदांकितशृंगेरीसिंहासनाधीश्वर-श्रीमच्छंकराचार्यान्वयसंजाताभिनवश्रीविद्यानरसिंहभारती स्वामिकरकंजोद्भवश्रीविद्याशंकरभारतीस्वामिकृतनारायण-स्मरणानि

स्वस्ति श्रीमद्वेदशास्त्रसंपन्न षट्कर्मनिरत राजमान्य राजश्री समस्तब्रह्मवृंद व समस्तदीक्षित वास्तव्य क्षेत्र करहाटक यां प्रति विशेषस्तु तुह्मीं पत्र पाठविलें प्रविष्ट होऊन लेखनार्थश्रवणतृप्तीनें चित्तानंद जाहला पत्रार्थ

स्वामिकरकमलसंजाताभिनवश्रीविद्यानृसिंहभारतीस्वामि-
कृतनारायणस्मरणानि

स्वस्ति श्रीमत्सकलगुणालंकरण वेदशास्त्रसंपन्न यजनादिषट्कर्म-निरत राजमानविराजमान राजश्री करहाटकक्षेत्रस्थसमस्तब्रह्मवृंदेषु तथा ज्योतिर्विदुपाध्यायेषु विशेषस्तु तुह्मीं प्रल्हादजोशीपाळिकरसमवेत पत्र पाठविलें प्रविष्ट होवून लेखनार्थ विदीत जालें तुह्मीं जें केलें असेल तें शास्त्रोक्त च केलें असेल येतद्विषयीं संशय आहे असा अर्थ नाहीं परंतु मठमर्यादा चालावें लागतें जेथें राजकीय सत्ता जाली तेथें मठिची व क्षेत्राची उभयमर्यादा कोठून राहिली ब्राह्मण्यास कारण दोनि अह्मी बहिष्कृतपत्र पाठविलें असतां त्या पत्राचा अपकर्ष केला तो अभिमान तुह्मांस असावा अह्मांस कारण मर्यादाउल्लंघन होवूं नये या स्तव सविशदें तुह्मांस लिहिलें असे अतिसुज्ञतरेषु किमधिकलेखने-नेत्यलम्

इत्य
लम्

लेखांक १५५

श्रीशंकर

आर्यस्वामी

श्रीमत्छंकराचार्यान्वयसंजाताभिनवश्रीविद्यानरसिंहभारती-
स्वामिकृतनारायणस्मरणानि

वेदमूर्ती राजश्री नारायणभट गिजरे भक्तोतम या प्रति विशेषस्तु तुमचे कल्याण इच्छित असो तदनंतर सप्तरुषी हून आपणास इनामतीचे लावणी विशई पत्र लिहिलें होते पावले असेल पहिला वाटेकरी मृत्यु पावला हाली सम्यसा वाटेकरी मिळऊन भुमींची लावणी करवणे ह्मणोन लिहिले होते त्या वर कांहीं वर्तमान कळले नाहीं प्रस्तुत

पुरी मठाचे इनाम आहे त्यास यंदाचा गला काय जाहला हे कळा- वेया करिता लिहिले असे तरी काय गला जाहाला तो लिहून पा- ठविणे ह्मणजे बैल पाठवून आणवू काय ते उत्तरी पाठविणे रा। कृ- ष्णाजी बावजी पाठविला आहे मुग्ता सांगतील त्या वरून कळेल बहुत काय लिहिणे राजेश्री आपाजीपंत देशपांडे कडील गला ८२ पावता करणे पा॥

इत्य लम्

लेखांक १५३]

श्रीशंकर

श्रीविद्यानरसिंहभारतीस्वामिकृतनारायणस्मरणानि

वेदमूर्ति राजश्री नारायणभट गिजरे भक्तोत्तम यांसि विशेषस्तु तुमचें कल्याण इच्छीत श्री पासी असों तदनंतर येथील कुशल जाणोन स्व- कीय लिहिणे या नंतर मठ नि॥ दोनी गांवीचे शेताचा इस्तावा भरिला या उपरि सदरहू शेतच्या भागांचा ऐवज जो काय असेल तो रा। आण्णाभटाचे घरी प्रविष्ट करविला पाहिजे ये विषयी आपणास अगत्य आहे तेथे विशेष काय लिहिणे रा। कृष्णभट कासीकर कासीस जात आहेत तरी रा॥ कृष्णाजी विठल हि जाताती यांसि त्यांस योग करून मार्गस्त करविले पाहिजे

इत्य लम्

लेखांक १५४] बाळबोध

श्रीविद्याशंकर

श्रीमत्परमहंसादियथोक्तबिरुदांकितशृंगेरीसिंहासनाधीश्वर- श्रीमत्छंकराचार्यान्वयसंजाताभिनवश्रीविद्याशंकरभारती-

लेखांक १५७]

श्रीविद्याशंकर

श्रीमच्छंकराच्यार्यान्वयसंजाताभिनवश्रीविद्यानरसिंहभारती-
स्वामिकृतनारायणस्मरणानि

श्रीमत्सकलगुणालंकरण हरिगुरुभक्तिपरायण राजमान्य राजश्री समस्त ब्रह्मवृंद व ग्रहस्त क्षेत्रकऱ्हाटक या प्रति विशेषस्तु तुमचे कल्याण इच्छीत करवीरक्षेत्रीं छात्रसभासमवेत श्रीनिकट राहिलों असों तदनंतर अत्रत्य कुशल जाणोन स्वकीय लिहीत जाणे या नंतर सांप्रत पुष्यशुध नवमीस श्रीची पुण्यतिथि ब्राह्मणसंतपर्ण उत्सव आहे या करिता लिहिले असे तरी आपण सहसमुदाय येऊन महोत्साव सांग केला पाहिजे आनमान न करणे बहुत काय लिहिणे

इत्य
लम्

लेखांक १५८

श्रीविद्याशंकर

श्रीमत्परमहंसादियथोक्तबिरुदांकितशृंगीरिसिंव्हासनाधीश्वर
श्रीमत्छंकराचार्योन्वयश्रीविद्याशंकरभारतीस्वामिकरकमलसं-
ज्याताभिनवश्रीविद्यानरसिंहभारतीस्वामिकृतनारायणस्मरणानि

श्रीमत्सकलगुणालंकरण हरिगुरुभक्तिपरायण राजमान्य राजश्री समस्त ब्रह्मवृंद व समस्त ग्रहस्त क्षेत्रकऱ्हाटक भक्तोत्तम यां प्रति विशेषस्तु तुमचे कल्याण ईछित करवीरक्षेत्रीं छात्रसभासमवेत श्रीनिकट असों तदनंतर सांप्रत पोष्यसीत नवमीस श्रीची पुण्यातिथि आहे या करितां लिहिले असे तरी आपण ब्राह्मणसमुदायसहित येऊन मोहत्साव सांग केला पाहिजे अनमान न करणे बहुत काय लिहिणे

२८ ऐ. मा.

लावणी जाहली किंवा काय सविस्तर लिहिणे लावणी विषई आळस न करणे साप्रत पुष्य शुद्ध नवमीस श्री ची पुण्यतिथी आहे तरी समुदायसहित येऊन मोहत्छत्र सांग संपादिला पाहिजे सुज्ञा प्रति विशेष लिहिणे नलगे सिके बदल कागद घेतला होता त्यास अद्याप सिका जाहला किंवा नाही हे कळले नाहीं अगर आह्मास प्रविष्ट हि ज़ाहला नाही दानपत्रास सिका जाहला असिला तरी समागमे घेऊन येणे जाणिजे.

इल्ल
लम्

लेखांक १५६] [बाळबोध

दिंदीरा श्रीशंकर

श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यवर्येणपरमश्रृंगेरीमठवरपदभ-
द्रसिंहासनाधीश्वरेण श्रीमच्छंकराचार्यगुरुवर्यसंप्रदायोत्प-
न्नेन यतिना विद्यानृसिंहाख्येन प्रयुक्तान्यनंतानि नारायणस्म-
रणानि

स्वस्ति श्रीमदगणितगुणगणमंडणमंडितोमारणचरणनलिनयुगलानवरतोपासनासाहितानेकशास्त्रविद्याकलापेषु करहाटकक्षेत्रग्रामस्थसमस्तब्रह्मवृंदेषु तथा यज्ञेश्वरभट्टेषु श्री अत्र वयं मार्गशीर्षमितानंगदिन पर्यंतम् श्रीमन्निवासक्षेत्रे सुःखतरं निवसाम् शमिहाव्याहतं वरीवर्त्यस्माकं भावत्कं कौशलमधिगंतुमीहामहेतराम विशेषोदंतस्तु पौषशुद्धनवम्यामस्मत्परमगुरूणाम् पुण्यातिथिः समागता वरिवर्ति तत्सांगताविधानार्थं भवाद्भिः सतम्यां समागंतव्यम् श्रीमत्देव्याश्च दर्शनमपि भविता भवदीयदर्शनापेक्षाप्यस्माकं वर्तते आगमने तदुभयमपि सिद्धं भविष्यति किम् बहु लेखनेन सुज्ञतरेष्विति दिक्

मोर्त
ब सुद

लेखांक १५९

श्रीशंकर

श्रीमत्छंकराचार्यान्वयसंजाताभिनवश्रीविद्यानरसिंहभारती-
स्वामिकृतनारायणस्मरणानि

सकळगुणालंकरण हरिभक्तिपरायण राजमान्य राजेश्री समस्त ब्रह्मवृंद व ज्योतिषी व उपाधे व समस्त राजकीय गृहस्त व देशमुख देशपांडे व समस्त ग्रामस्त गृहस्त वास्तव्य क्षेत्रकऱ्हाटक भक्तोत्तम या प्रति

विशेषस्तु तुमचे कल्याण ईछीत करवीरक्षेत्री छात्रसभासमवेत श्री पाशी राहिलो असो तदनंतर सांप्रत पुष्यशुद्ध नवमीस श्रीची पुण्यतिथि ब्राह्मणसंर्तपणउछव आहे तरी आपण ब्राह्मणसमुदायसहित येऊन मोहत्छाव सांग करून गेले पाहिजे उत्छव आपला आहे अनमान न करणे बहुत काय लिहिणे

इत्य
लम्

लेखांक १६०

श्रीशंकर

श्रीमछंकराच्यार्यान्वयश्रीविद्याशंकरभारतीस्वामिकरकमलसं-
जाताभिनवश्रीविद्यानरसिंहभारतीस्वामिकृतंनारायणस्मरणानि

हरिगुरुभाक्तिपरायण राजमान्य राजश्री समस्त ब्राह्मण वास्तव्य कराड या प्रती विशेषस्तु तुमचे कल्याण इछित करवीरक्षेत्री छयात्रसभासमवेत श्रीनिकट असो तदनंतर सांप्रत पौष्यसित नवमीस श्रीची पुण्यतिथी आहे तरी आपण सहसमुदाय येऊन महोच्छाव सांग केला पाहिजे बहुत काय लिहिणे

इत्य
लम्

लेखांक १६१

श्रीशंकर

आर्यस्वामी

श्रीमत्परमहंसादियथोक्तबिरुदांकितशृंगेरीसिंहासनाधीश्वर
श्रीमत्छंकराचार्यान्वयसंजाताभिनवश्रीविद्यानरसिंहभारती
स्वामिकृतनारायणस्मरणानि

सकलगुणालंकरण' हरिगुरुभक्तिपरायण राजमान्य राजश्री कृष्णाजी विठ्ठल सुभेदार प्रांतकऱ्हाड परमभक्तोत्तम यां प्रति विशेषस्तु तुमचें कल्याण इच्छित करवीरक्षेत्रीं छात्रसभासमवेत श्रीनिकट राहिलों असों तदनंतर येथील कुशल जाणोन आपलें क्षेमकल्याण लिहून आशिर्वाद संपादित आसिले पाहिजे या नंतर सांप्रत पुष्यशुध नवमीस श्रीची पुण्यतिथी आहे तरी आपण समुदायसहित येऊन महोच्छाव सांग संपादिला पाहिजे ये विषयीं अनमान न करितां आलें पाहिजे सुज्ञा प्रति विशेष लिहिणें नलगे

इत्य
लम्

लेखांक १६२

श्रीशंकर

श्रीमत्छंकराच्यार्यान्वयसंजाताभिनवश्रीविद्यानरसिंहभारती
स्वामिकृतनारायणस्मरणानि

सकलगुणालंकरण हरिगुरुभक्तिपरायण राजमान्य राजश्री समस्त ब्रह्मवृंद व जोतिषी व उपाध्ये. व आश्रित व राजकीय गृहस्थ व देशमुख व देशपांडे व समस्त गृहस्त वास्तव्य क्षेत्रकऱ्हाटक भक्तोत्तम यां प्रति विशेषस्तु तुमचे कल्याण इच्छीत करवीरक्षेत्रीं छात्रसभासमवेत श्रीनिकट राहिलों असों तदनंतर सांप्रत पुष्यशुद्ध नवमीस श्रीची पुण्यतिथी

आहे या करितां लिहिलें असे तरी आपण ब्राह्मणसमुदायसहित येऊन मोहत्सव सांग केला पाहिजे सुज्ञा प्रति विशेष काय लिहिणे

इत्य लम्

लेखांक १६३

श्रीशंकर

आर्यस्वामी

श्रीमत्परमहंसादियथोक्तविरुदांकितशृंगेरीसिंहासनाधीश्वर-
श्रीमत्छंकराचार्यान्वयसंजातअभिनवश्रीविद्यानरसिंव्हभा-
रतीस्वामिकृतनारायणस्मरणानि

सकलगुणालंकरण हरिगुरुभक्तिपरायण राजमान्य राजेश्री समस्त ब्रह्म-वृंद व ज्योतिषी ऊपाधें व देशपांडे व समस्त गृहस्त वास्तव्य क्षेत्र-कऱ्हाटक परमभक्तोत्तम या प्रति विशेषस्तु तुमचे कल्याण ईछीत करवीरक्षेत्री छात्रसभासमवेत श्रीनिकट राहिलो असों तदनंतर येथील कुशल जाणून आपले क्षेमकल्याण लिहून आशिर्वाद संपादित असणें या नंतर सांप्रत पुष्यशुद्ध नवमीस श्री चीं पुण्यतिथी आहे तरी आपण समुदायसहवर्तमान येऊन मोहोत्छाव सांग संपादून गेले पाहिजे ये विषई अनमान न कीजे सुज्ञा प्रती विशेष काय लिहीणे जाणिजे

इत्य लम्

लेखांक १६४

श्रीशंकर

श्रीविद्याशंकरभारतीस्वामिकृतनारायणस्मरणानि

राजमान्य राजेश्री सिताराम वेंकाजी चिपडे वा क्षेत्रकऱ्हाड भक्तोत्तम यां प्रती विशेषस्तु अत्रत्य कुशल जाणून स्वकीय लिहित असले पाहिजे

या नंतर तुह्मी विनंतिपत्र पाठविले ते आले क्षेत्रमजकूरकर समस्त ब्रह्मवृंदासी पूजाद्रव्य रुपये पावणाशे हे घेऊन तुम्हा कडे आले आहेत यास काये आज्ञा ह्मणून पत्री लिहिले अशास संस्थानचे आगमन क्षेत्रमजकुरास होऊन आजी येकोणीस दिवस जाहले परंतु क्षेत्रस्तास येणेस गाठ न पडली आणि मनस्वी वर्तणूक करून संस्थानासी अमर्यादा करावी असे त्यानी आरंभिले आहे तरी या गोष्टीचा विचार करून पुजाद्रव्य घेता येईल प्रस्तुत तुह्मां कडे आणिले आहेत न घेणे त्यास संस्थानसंबंधी कसाले प्रतीवर्षी पडू लागले तेंव्हा त्याणी कोठवर सोसावे काही स्वास्ता आथवा कार्यप्रयोजन· क्षेत्रात होत असावी तो हि प्रकार नाही दिवसेदिवस ब्राह्मणास काल कठीण चालला आहे याज करितां त्यास हरयेक विसी अनुकूलता न पडली ईश्वरइछानुरूप काल सानकूल होईल त्या समई ते घर प्रती मठास आणून देतील सदरहू प्रो येवज न घेणे बहुत काय लिहिणे रा। छ २१ माहे शाबान आज्ञेयमुलुसति

(इत्य
लम्)

लेखांक १६५] **[बाळबोध**

श्रीविद्याशंकर

श्रीमत्परमहंसादियथोक्तबिरुदांकितश्रृंगेरिसिंहासनाधीश्वर-
श्रीमच्छंकराचार्यान्वयसंजाताभिनवश्रीविद्यानृसिंहभारती-
स्वामिकरकंजोद्भवश्रीविद्याशंकरभारतीस्वामिकृतनारायण-
स्मरणानि

स्वस्ति श्रीमत्‌यजनादिषट्‌कर्मनिरत वेदमूर्ति राजश्री समस्त ब्रह्मवृंद व दिक्षित व नारायणभट्ट दिक्षित वास्तव्य क्षेत्रकराटक या प्रति विशेषस्तु तुमचे निरोप घेउन मठास आलो निरंतर स्वकिय कुशळपत्र पाठउन

मानस तोषवित असावे तदुपरि मसुरकरानि पुजाद्रव्याचे संकल्प तुमच्या विदमाने केले अहे तरि त्यास तुह्मि लेहुन पुजाद्रव्य आणउन अंताजि शिवदेव या समवेत पाठवणे या विशई आळष्य न करणे वरकड अर्थ याचे वाग्विलासे कळल बहुत लिहिणे नलगे तुमचे क्षेत्रि काय उरवरित असेल ते हि या पासि देउन पाठवणे

इत्य
लम्

लेखांक १६६]

श्रीशंकर

श्रीमत्छंकराचार्यान्वयसंज्याताभिनवश्रीविद्यानरसिंन्हभारतीस्वामिकरकंज्योद्भवश्रीविद्याशंकरभारतीस्वामिकृतनारायणस्मरणानि

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री त्रंबक दीक्षित वास्तव्य क्षेत्रकरहाटक या प्रति विशेषस्तु अत्रत्य कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित असावे या नंतर पौष्यसित नवमीस श्रींची पुण्यतिथी उत्छव आहे तरी तुह्मी सहपरिवारे एऊन माहोत्छह सांग केला पाहिजे ए विसी अनमान न करावा आगत्यरूप आले पाहिजे बहुत काय लिहिणे आज्ञेयमुल्लसति

इत्य
लम्

लेखांक १६७]

श्रीशंकर

श्रीमच्छंकराचार्यान्वयसंजाताभिनवश्रीविद्यानरसिंहभारतीस्वामिकरकंजोद्भवश्रीविद्याशंकरभारतीस्वामिकृतनारायणस्मरणानि

हरीगुरुभक्तिपरायण राजश्री कासिनाथ गोसावी वास्तव्य क्षेत्रकऱ्हाटक यां प्रति विशेषस्तु अत्रत्य कुशल जाणून स्वकीय लिहीत असावे तद-

नंतर पौष्यशुक्ल नवमीस श्रीची पुण्यतिथी वार्षिकी उत्साह आहे तर आपण सहपरिवारें येऊन महोत्साह सांग केला पाहिजे बहुत काय लिहिणे आज्ञेयमुल्लसति

(इत्यलम्)

लेखांक १६८]

श्रीविद्याशंकर

श्रीमतत्परमहंसादियथोक्तबिरुदांकितशृंगेरीसिंहासनाधीस्वर-
श्रीमत्छंकराच्यार्यान्वयश्रीविद्यानरसिंहभारतीस्वामिकरकमळ-
संजाताभिनवश्रीविद्याशंकरभारतीस्वामिकृतनारायणस्मरणानि

सकलगुणालंकरण हरिभक्तिपरायण राजमान्य राजश्री समस्त ब्रह्मवृंद व जोतिषी व उपाध्ये व समस्त गृहस्त वास्तव्य क्षेत्रकऱ्हाटक भक्तोत्तम या प्रति विशेषस्तु तुमचे कल्याण ईच्छित करवीरक्षेत्रीं श्रीनिकट राहिलों असों तदनंतर सांप्रत पुष्यशुद्ध नवमीस श्रीची पुण्यतिथी आहे या करीतां लिहिले असे तरी आपण ब्राह्मणसमुदायसहित येऊन मोहत्छाव सांग केला पाहिजे ये विषयीं अनमान न करणें सुज्ञा प्रति विशेष काय लिहिणें

(इत्यलम्)

लेखांक १६९]

श्रीशंकर

श्रीमच्छंकराचार्यान्वयसंजाताभिनवश्रीविद्यानरसिंव्हभारती-
स्वामिकरकंजोद्भवश्रीविद्याशंकरभारतीस्वामिकृतनारायण-
स्मरणानि

०॥ श्री ॥
अनेकशक्तिसं
घट्टप्रकाशलहरी
घनध्वांतध्वंसो वि
जयतेविद्याशके
र भारती ॥

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री समस्त ब्रह्मवृंद वास्तव्य क्षेत्रकरहाटक या प्रती विशेषस्तु अत्रत्य कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असावे या नंतर पौष्य सीत नवमीस श्रीचीं पुण्यतिथी उत्सव आहे तरी तुह्मी समस्ताही येऊन महोत्सव सांग संपादिला पाहिजे ये विसी अनमान न करावा अगत्यरूप आले पाहिजे बहुत काय लिहिणे आज्ञयेमुल्लसति

इत्य
लम्

लेखांक १७०]

श्रीशंकर

श्रीमच्छंकराचार्यान्वयसंजाताभिनवश्रीविद्यानरसिंव्हभारती-
स्वामिकंरकजोद्भवश्रीविद्याशंकरभारतीस्वामिकृतनारायण-
स्मरणानि-

० ॥ श्री ॥
अनेकशक्ति
संघट्टप्रकाशल
हरीघनःध्वांतध्वं
सो विजयते वि
द्याशंकरभा
रती ॥

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री समस्त ब्रह्मवृंद वाो क्षेत्रकरहाटक भक्तोत्तम या प्रती विशेषस्तु तुमचे कल्याण इछीत करवीरक्षेत्री श्रीनिकट असो अत्रत्य कुशल जाणून स्वकीये लेखन करीत असीले पाहिजे या नंतर श्रीकृष्णातीरी सीरगांवी वैशाख वद्य नवमीस श्री आर्य यांची पुण्यतिथी ब्राह्मणसंतर्पण वार्षीकी उत्सव आहे तुह्मी सर्वत्राही येऊन महोत्साव सांग संपादिला

पाहिजे ये विसी आनमान न करावा आगत्यरूप आले पाहिजे बहुत काय लिहिणे आज्ञेयमुलसति

इस लम्

लेखांक १७१]

श्रीशंकर

श्रीमत्परमहंसादियथोक्तबिदांरुकितश्रृंगेरीसिंव्हासनाधीश्वरश्रीमत्छंकराचार्यान्वयश्रीविद्याशंकरभारतीस्वामिकरकमलसंज्याताभिनवश्रीविद्यानरसिंव्हभारतीस्वामिकृतनारायणस्मरण

श्रीमत्छकलगुणालंकरण हरिगुरुभक्तिपरायण राजमान्य राजेश्री समस्त ब्रह्मवृंद व आच्यार्य व जोतिषी व उपाध्ये व धर्माधिकारी व राजमुद्राधारी व समस्त कारकून व देशमुख व देशपांडे व पाटिलकुलकर्णी व समस्त व्यवसाई गृहस्थ वास्तव्य क्षेत्रकराटक सत्सिष्यसिरोमणी या प्रति विशेषस्तु तुमचे कल्याण इच्छित करवीरक्षेत्री छात्रसभासमवेत श्रीनिकट राहिलो असो तदनंतर येथील कुशल जाणोन आपले कल्याण लिहून आशिर्वाद संपादित असणे या नंतर मागे आपणास आज्ञा केली होती कीं एक वेळा क्षेत्रमजकुरी च्यातुर्मास राहवे त्यास दोन वर्षे अवकाष घडून आला नाहीं प्रस्तुत टाकळी क्षेत्र मजकुरी दोनी मास चातुर्मा(स) राहून पुढे स्वस्थानास जावे हा हेतू चित्तात आणून तुम्हास पुर्वसुचना कळावी ह्या करिता लिहिले असे तरी तुह्मी सर्वांनी मिळोन राहवयास स्थलाची अनुकूलता करून ठेवणें वरकड साहित्य तो कराल च परंतु अगोदर स्थल योजून नीट करून ठेवणें ह्मणजे दोनी मास कृष्णातीरी वास करूं च्यातुर्मास अनुष्टान संपादू

सकलगुणालंकरण हरिभक्तिपरायण राजमान्य राजश्री नारायणभट गिजरे वास्तव्य क्षेत्रकऱ्हाटक भक्तोत्तम या प्रति विशेषस्तु तुमचें कल्याण इच्छित करवीरक्षेत्रीं छात्रसभासमवेत श्रीनिकट राहिलों असों तदनंतर येथील कुशल जाणोन आपले कल्याण लिहून आसिर्वाद संपादीत असणें या नंतर सांप्रत पुष्यशुध नवमीस श्रीची पुण्यतिथी आहे यां करितां लिहिलें असे तरी आपण सहसमुदाय येऊन मोहत्छाव सांग संपादिला पाहिजे बहुत लिहिणें नलगे राजश्री कृष्णाजीपंता कडील वर्षासन गोदूमभिक्षा आली पाहिजे त्यास आपणांस सांगितले च आहे ऐसियासि त्यांचा प्रसंग करून प्रात्तावस करवणार सुज्ञ असा सर्वत्रास यात्रे करितां लिहिले आहे पत्रें प्रविष्ट करणार सुज्ञ असां

(इत्य लम्)

लेखांक १७४]

श्रीविद्याशंकर

आर्यस्वामी

श्रीमत्परमहंसादियथोक्तबिरुदांकितशृंगेरीसिंव्हासनाधीश्वरश्रीमत्छंकराचार्यान्वयसंजाताभिनवश्रीविद्यानरसिंहभारतीस्वामिकृतनारायणस्मरणानि

स्वस्ति श्रीमत्छकलगुणालंकरण हरिगुरुभक्तिपरायण राजमान्य राजश्री कृष्णाजी विठ्ठल सुभेदार व समस्त ग्रहस्त व देशपांडे या प्रति

विशेषस्तु तुमचे कल्याण इच्छित करवीरक्षेत्री छयात्रसभासमवेत श्रीनिकट राहिलो असो तदनंतर अत्रत्य कुशल जाणोन स्वकीय सुखानुभव लेखनद्वारा चित्त प्रमोदवीत असिलें पाहिजे या नंतर सांप्रत पुष्यशुध नवमीस श्रीची पुण्यतिथी ब्राह्मणसंतर्पण उच्छव आहे या करितां

तेणे करता तुह्मास श्रेयस्कर आहे वरकड अर्थ राजेश्री भगवत सिवदेव मुा सांगतील त्या वरून कळेल बहुत काय लिहिणें

इत्य
लम्

लेखांक १७२

श्रीशंकर

स्वामी

श्रीमत्परमहंसादियथोक्तबिदांकितश्रृंगेरीसिंहासनाधीश्वर-
श्रीमत्छंकराच्यार्यान्वयसंजाताभिनवश्रीविद्यानरसिंव्हभार-
तीस्वामिकृतनारायणस्मरणानि

सकलगुणालंकरण हरिगुरुभक्तिपरायण राजमान्य राजश्री समस्त ब्रह्मवृंद व समस्त अग्निहोत्री व समस्त राजकीय गृहस्त व समस्त ग्रामस्त गृहस्त वास्तव्य क्षेत्रकरहाटक परमभक्तोत्तम या प्रति विशेषस्तु तुमचे कल्याण इछीत करवीरक्षेत्री छात्रसभासमवेत श्रीनिकट राहिलों असों तदनंतर सांप्रत पौष्यशुद्ध नवमीस श्रीची पुण्यतिथी ब्राह्मणसंतर्पण उच्छव आहे सांग होणे लागतो या करितां आसिर्वादपत्र लिहिले असे तरी तुह्मी समस्त विद्वज्जन सहसमुदायें येऊन मोहछाहा सांग संपादिला पाहिजे एतद् विषई अनमान न करणे बहुत काय लिहिणे

इत्य
लम्

लेखांक १७३]

श्रीविद्याशंकर

आर्यस्वामी

श्रीमत्छंकराच्यार्यान्वयसंजाताभिनवश्रीविद्यानरसिंहभारती-
स्वामिकृतनारायणस्मरणानि

आसीर्वादपत्र प्रेसिले असे तरी आपण सहसमुदाय येऊन मोहत्छव सांग संपादिला पाहिजे उत्छत्र आपला आहे येतद्विषयीं अनमान न करणें सुज्ञ प्रति बहुत काय लिहिणे

इत्य
लम्

लेखांक १७५]

श्रीविद्याशंकर

आर्यस्वामी

श्रीमत्परमहंसादियथोक्तबिरुदांकितशृंगेरीसिंव्हासनाधीश्वर-
श्रीमत्छंकराचार्यान्वयसंजाताभिनवश्रीविद्यानरसिंहभारती-
स्वामिकृतनारायणस्मरणानि

श्रीमत्सकलगुणालंकरण हरिगुरुभक्तिपरायण राजमान्य राजश्री समस्त ब्रह्मवृंद व समस्त गृहस्त वास्तव्य क्षेत्रकऱ्हाटक भक्तोत्तम या प्रति विशेषस्तु तुमचे कल्याण इच्छीत करवीरक्षेत्रीं श्रीनिकट असो तदनंतर सांप्रत पुष्यशुध नवमीस श्रीची पुण्यतिथी ब्राह्मणसंतर्पण उत्सव आहे या करितां लिहिलें असे तरी आपण सहसमुदाय येऊन मोहत्छव सांग केला पाहिजे अनमान न करणें बहुत काय लिहिण

इत्य
लम्

लेखांक १७६]

श्रीशंकर

श्रीमत्छंकराचार्यान्वयसंजाताभिनवश्रीविद्यानरसिंहभारती-
स्वामिकृतनारायणस्मरणानि

सकलगुणालंकरण हरिगुरुभक्तिपरायण राजमान्य राजश्री नारायणभट

गिजरे यासी विशेषस्तु तुमचे कल्याण इछित करवीरक्षेत्रीं छयात्र-सभासमवेत श्रीनिकट राहिलों असों तदनंतर येथील कुशल जाणोन आपले कल्याण लिहून आशिर्वाद संपादित जाणे या नंतर यंदा आपले क्षेत्री दोनी मास चातुर्मास क्रमोन पुढें संचारास जावें हा हेतु चित्तात आणोन समस्तास व आपणांस आशिर्वादपत्र पाठविले आहे स्थल राहाया पाहिजे या करितां स्थलाची अनकूलता करून ठेविले पाहिजे वरकड साहित्य तुमचे विचारे होणे ते होईल परंतु आपणास पुर्वसूचने स्तव लिहिले असे दोनी मास कृष्णास्नान चातुर्मास अनुष्ठान क्षेत्री जाहलिया श्रेयस्कर असे हे गोष्टीचे अगत्य आपणास आहे च बहुत काय लिहिणें वरकड अर्थ रा। भगवंत सिवदेव मुग्तां सांगतां कळेल बहुत काय लिहिणे

इत्य
लम्

लेखांक १७७]

श्रीवेंकटेशो जयति

॥ सत्याभिनवतीर्थश्रीपादस्वामी ॥
॥ श्रीमद्धरिगुरुभक्तिपरायण- ॥
॥ स्त्राद्यनेकगुणसंपन्न वेदशास्त्र- ॥
॥ अग्निहोत्रादिषट्कर्मनिरत विद्व- ॥
॥ द्वर्येषु श्रीमत्खट्वांगपुरस्था- ॥
॥ शेषब्राह्मणचरणारविंदेषु मं- ॥
॥ गळवेढस्थ कृष्ण कृतानेकसाष्टां- ॥
॥ गनमस्काराः लेख्यविशेषस्तु ॥

काळचे णवतासी श्रीगुरुविद्याशंकरभारतीस्वामी हे समाधिस्त जाहले
तुह्मास कळावे विशेष लिहिणे ते काय शके १७८९ प्रभवनामसंवत्सरे
जेष्ट वा। १३ महानुशासनं वरीवर्ति

(इत्य लम्)

लेखांक २०९] १५४३ माघ वद्य ७ [बाळबोध

श्री

नकल

क्षेत्रपाळायनमः

स्वस्ति श्रीमत्करहाटकक्षेत्रस्थ ब्रह्मवृंद समस्त मिळोन समापत्र केले जे
ज्या पुरातन दंडक जो चालत होता तो टाकून नवीन दंडक
करू लागला ह्मणऊन समस्ती मान्य करून नेम केला जो पुरातन त्याचे
आद्य जे चालिले असेल त्यास अधीक करू लागला तरि समस्ती मिळोन
निवारावे यास चुकल जो तो गोताचा अन्यायी हेच प्रमाण
पाथरेकर यानी समस्त ब्राह्मणाचा विद्यमाने लेहून दिल्ही ऐसे जे

---

१ या लेखांकापासून क्षेत्रमाहात्म्य संबंधीं पत्रांस सुरवात झाली आहे.

नारायणभट्ट व नरहरीभट्ट गिजरे व पोशभट्ट ढवळीकर वअमणभट्ट क्षीरसागर या चौघा मध्ये व अपणामध्ये प्रायश्चित्ता संबंधे बोली पडली अपण बोलीलो कीं तुह्मी चौघे पुढे होता का........हे काय अहे ऐसे बोलीलो कलह जाहला त्यास समस्त ब्राह्मण बोलिले की हे चौघे समस्ताचे मुतालीक या चौघाचा अनुमत्ते समस्तानी वर्तावे शंभरास बोलावयास गरज नाही त्याजवर अपण स्वस्ताक्षर लेहून दिल्हे असे यास जो कोंणी अन्यथा करील तो ब्राह्मणा निराळा...............................

नरहरीभट्ट गिजरे पत्रा प्रमाणें	पत्रा प्रमाणे सकंभट्ट ढवलीकर
विश्वनाथभट्ट क्षीरसागर मान्य	मान्य
शूभट्ट क्षीरसागर पत्रा प्रमाणे मान्य	हरभट्ट ढवलीकर मान्य
मुळभट पळसवडे पत्रा प्रमाणे मान्य	विडंभट्ट ढवलीकर मान्य
	नऱ्हेरभट्ट पटवर्धन
देमणभट्ट वळवडे	अमणभट्ट क्षीरसागर
पत्रा प्रमाणे हरभट्ट वैद्य मान्य	विश्वनाथभट्ट वळवडेकर
पत्रा प्रमाणे विनायकभट्ट अरणके मान्य	जाखभट्ट वळवडेकर मान्य
	विश्वनाथभट्ट वळवडेकर मान्य
पत्रा प्रमाणे शिवभट्ट वैद्य साक्ष	नरहरीभट्ट वळवडे मान्य
निळकंठभट्ट अग्निहोत्री साक्ष	धोंडि कृष्णभट्ट मान्य
विश्वनाथ पाठक जोशी कराड मान्य	विसभट्ट पावशे
	सुरेभट्ट पटवर्धन मान्य
शिवपाठक पत्रा प्रमाणे मान्य	आपाभट्ट गरुड मान्य
विश्वनाथभट्ट अग्निहोत्री	यमणभट्ट पाथरे मडपये मान्य
नारायणभट्ट गिजरे	टोणपे व घळसाशी व काळे
पोशभट्ट ढवळीकर मान्य	व....व रोटी व सवाशी पत्रा प्रमाणे मान्य
हरभट्ट धवलीकर मान्य	

शके १५४३ दुंदुभीनामसंवत्सरे माघ वा। ७ सर्वे समंतीय:

लेखांक २१०] १६१८ ते १६२६ [बाळबोध

श्री

राजश्री वीरेश्वरभट तथा नारायणभट गिजरे यां प्रति स्ने॥ श्रीकराचार्यें नमस्कार येथील कुशल जाणुन स्वकीय लिहिणें या उपरि रा॥ मोरेश्वरभटानीं तुह्मांस अंतर दिल्हे हें ऐकोन बहूत श्रमी झालो मोरेश्वरभट ह्मणजे अमचे स्वकीय त्या स्थळीं होते ईश्वरानें परम कठीणता केलीं बरें होणारास यत्न नाहीं तुह्मीं ही साक्षर भले आहा ईश्वर दया करील चिंता न करणें लोभ असों देणें हे नमस्कार

लेखांक २११] १६२९ ते १६४८

श्री

वेदमूर्ति राजश्री समस्त ब्राह्मण क्षेत्रकराड स्वामीचे सेवेसीं विद्यार्थी कृष्णाजी विठल साष्टांग नमस्कार विनंति उपरि मौजे सैदापूर पा॥ कराड हा गाऊं राजश्री छत्रपति स्वामींनीं इनाम दुतर्फा जलतरुपाषाणनिधिनिक्षेप कुलबाब कुलकानू दिल्हा आहे ऐसीयास सालमजकुरीं पर्जेन्याचें अवर्शण पडिलें या स्तव राजश्री पंतप्रतिनिधिस्वामींनीं पर्ज्येन्यसूक्ताचें अनुष्टान करवणें ह्मणून आज्ञा केली त्याज वरून समस्त ब्राह्मणांस विनंति केली कीं पर्ज्येन्यसूक्तअनुष्टान करावें ती संमंधें तुह्मी मौजेमजकुरास वेठी बेगारी राहदारीचा उपद्रव लागतो तो निवारण करावा ह्मणून आज्ञा केली ते कबूल केली स्वामींनीं अनुष्टान आरंभ केला श्री चे दयेनें पर्ज्येन्य बहुत समाधान जालें मौजे मजकुरास वेठी बेगारी राहदारी कुल मना केली असे कोणी उपद्रव करणार नाहींत राहदारीचे वोझें अगर वेटीबेगारी येकंदर मना केली असे कोणास राहदारीमाणूस व वेठीबेगारी न देणें जे येतील ते पुढील गांवीं जातील तुह्मांस उपद्रव नाहीं छ २४ रमजान सुा॥ इसन्ने अशरीन मया व अलफ (लेख नावधि)

लेखांक २१२] १६३८-४० [बाळबोध

श्रीमुद्गल

स्वस्ति श्री वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री नारायण दीक्षित या प्रति रावजी उपाध्ये साष्टांग नमस्कार विनंति उपरी येथील क्षेम जाणून अपलें क्षेम लिहीत गेलें पाहिजे विशेष राजश्री चिरंजीव गोपालभट्ट पंडितराव यांनीं क्षेत्रस्थास पत्र लिहिलें आहे तें पत्र आपण अवलोकन करून याचा शास्त्रार्थ मनास आणून विधि लिहून ग्रंथाचीं वाक्यें लिहाल त्या ग्रंथाचीं नांवें लिहून अंतोबा पाठविला आहे तरी त्या बरोबर पाठवून देणें सुज्ञा प्रति विशेष काय लिहिणें विज्ञापनेयं.

लेखांक २१३] १६३८ ते ४० [बाळबोध

श्री आई

वेदशास्त्रसंपन्न राजश्री नारायणभटजी गिजरे वास्तव्य कराड गोसावियांसि

विद्यार्थी कृष्णाजी परशुराम प्रतिनिधि साष्टांग नमस्कार विज्ञप्ती उपेरी येथील कुशल जाणऊन स्वकीय लेखन करणें विशेष वेदमूर्ति हरीपाठक येळगांवकर हे ब्राह्मण पुरातन अमचे आश्रीत आहेत येसें तुह्मांस ठावकें च आहे आजि पन्नास वर्षे कराडीं राहात आहेत यांचा योगक्षेम चालावयास आह्मीं व चिरंजीव रायानी यास येणपें दिले आजी परियंत राजश्री कृष्णाजीपंती ही चालविलें परंतु आतां त्यांनीं खेडे घरी हरयेक गोष्टीचा अतिशय करितात ह्मणून वेदमूर्ति कुटुंब घेऊन आह्मां कडे येतात तरि तुह्मी यां वर पूर्ण दया करीत असतां यांनीं यावेंसें काय आहे तुमची कृष्णाजीपंताची मैत्री आहे त्यांस पष्ट च्यार गोष्टी सांगून वेदमूर्तीस क्षेत्र न सुटे ते गोष्टी केले पाहिजे तुह्मी अनुमान कराल तरी तुह्मांस अमची आण असे विशेष तीर्थरूपाचा पक्ष त्रयोदशीस आहे आपण आलियाने आह्मांस परम संतोष होईल बहुत काय लिहिणें लोभ असों देणे येक वेळ भेटीस येणें हे विज्ञापना

लेखांक २१४] [१६३८-४०

श्रीआईआदिपुरुष

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री नारायणभट गिजरे स्वामी गोसावी यासी

विद्यार्थी कृष्णाजी परशराम प्रतिनिधि कृतानेक सा। नमस्कार विनंति उपरी तुह्मी समस्ताचें पत्र पाठविलें तें पावलें अभिप्राव कळों आला ऐसीयास तुह्मी असतां हरभट यास चिंता काय आहे तरी स्वामी सर्वशक्ती वेंचून हरभट कडेसी पडीत ते गोष्ट केलियानें आह्मांस संतोष आहे वेदमूर्तिचा व आमचा वियोग न होय तें गोष्टी केली पाहिजे वेदमूर्ती वर संकट आलें आहे तेणें करून आह्मांस श्रम होतात तरी स्वामींनीं आह्मां वरी दया करून हरभटा वरला शब्द चुकून तुह्मी सहवर्तमान हरभट असे उभयतां आमचे भेटीस येणें अनमान कराल तरी आमची शफत असे बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनंति क्षेत्राचा महिमा राही तो गोष्ट केली पाहिजे हे विनंति

लेखांक २१५] [१६५७ माघवा। ४

श्री

यादी जत्रा लक्षुमी गांवजत्रा का। कराड सु॥ सीत सलासीन मया व अलफ छ १६ रमजान माघमास वद्य पक्षी चतुर्थी मंगलवार तदिनीं जाली जत्रा ऐसि जे

लक्षुमी मातीची व तळीले अळीचे कुंभार त्याचे घरीं करावी कलम १
लागण कलमें बि॥
१ ईरड घोलविते गांवाभोवते फिरवावे
२ सुमारी
१ महाराची घागर पुढें
१ मांगाची घागर मागें

२
गांवा सभोवते फिरवावे
१ रेडा भंडार व माळ घालून गांवा भोंवते फिरवावे

४

ईरडे पुढें व घागरी व रेडा मागें गांवा सभोंवते फिरवून आणावी
कलम १

सुताराचे घरीं गाडा व राहाट साल करऊन घेऊन कुंभाराचे घरास वाजतगाजत जावें लक्षुमीस गाडिया वरी बैसऊन वाजत हणमंता मागें मांडव असतो तेथे घेऊन जावी मांडवांत बैसवून राहाट साल जवळ ठेवावे कलम १

लक्ष्मी मांडवांत सर्वत्रांनीं नेऊन बैसवावी लागते तेथील पूजा कुंभार करितो जें येईल तें कुंभार गुरव व गांवकर घेतात कलम १

रेडा आलिया वरी माहाराची पूजा त्यांणीं करावी जें येईल नैवेद विडे पान माहारांनीं मांगांनीं मिळोन वर्तावें कलम १

लक्षुमी पुढें रेडा आणून ते समई माहरांनीं थोडा गला सोडवावा उरला मांगांनीं सोडवावा कलम १

तीन दिवस मांडवांत पूजा करावी गांवचे लहान थोर यांणीं नैवेद्य नेहावे कलम १

सवासिणी माहारा च्यार ४ व मांगाची १ एणें प्रमाणें कलम १

लक्षुमी पुढील रेडियाचे डोचके वरील दीव आनऊन पाटीलकुलकर्णी यांचे सेताचे बांदास पुरावी
कलम १

चौथे दिवशीं सिवे वरी लक्षुमी नेऊन सोडावी मांडवास आगलावावी कलम १

लेखांक २१६] [१६६१ वैशाखवा. ५

श्रीयुवराज

नकल

राजश्री मलेगिरी हयग्रीव हेजीब व दादाजी अणाजी

हवालदार वर्तमान भावी प्रा हरपनंहल्ली गोसावियांसि

स्नो हिंदूराउ घोरपडे ममलकतमदार दंडवत सुा तिसा सलासीन मया अलफ वेदमूर्ति राजश्री नारायणभट बिन वीरेश्वरभट देवरातगोत्र आश्वलायनसूत्र वास्तव्य कराड यांसी श्री कृष्णेचे अभिषेक सांगोन प्रांतमजकूरच्या नेहमीं तहाच्या येवजपैकीं होन ५ पांच रास प्रतिवर्षी

पौ कार्तिकशुद्ध ११ रोज सौम्यवासरे शके १७१२ साधारणनामसंवत्सरे गुा येसू जाधव हुजरे मुा कराड

लेखांक २१८] १७१२ कार्तिकवा १२ [बाळबोध

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री बाजीदीक्षित गिजरे यां प्रती

येसजोशि बिन नानाजोशि सप्रे वा शेटेंतरप संवदळ नजीक राजापुर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐशि जे आह्मी आपल्यास तीर्थउपाध्यपण लिहोन दिल्हे असे आमचे वंशीचे कोणी तीर्थास येतील ते तुह्मास उपाध्यपण देतील पूर्वी आमचा वडिलानी लिहोन दिल्हे असल्यास हे पत्र रद असे बहुत काय लिहिणे कृपा लोभ करावा हे विज्ञापना मीती शके १७१२ साधारणनामसंवत्सरे कार्तिकवा १२ भृगुवार लक्ष्मीनृसिंह

लेखांक २१९] [१७१२ माघवद्य ११

श्री

श्रीमद्रमारमणचरणसपर्यापरायणांत:करण राजमान्य राजश्री देशाधिकारी व देशमुख व देशपांडे व राजकीय ग्रहस्त व ब्राह्मणसमुदाय वास्तव्य को खटाव व मौजे कुरुड व मौजे वडूज यांसि

स्नेहयुक्त समस्त ब्राह्मण क्षेत्रकरहाटक कृतानेकाशिष: संतु विशेष सखंभट बिन जिऊभट व मुरारभट बिन जिवभट जोतिषी व रत्नाकर त्रिमळ कुलकर्णी मौजे वडूज प्रांतमजकूर या त्रिवर्गास शुद्धपत्र देऊन तुह्मां कडे पाठविलें होतें त्यास मागाहून येका दोघांनीं पत्र पा कीं आह्मांस कळलें नाहीं ह्मणून जिवभट उभयता क्षेत्रास आले त्याज

करार करून दिल्हे असत तर तुह्मीं नवीन पत्राची अपेक्ष्या न करितां सदरहू पांच होन साल दरसाल बिला उजूर पावते करीत जाणे या पत्राची तालिक लेहून हें पत्र भोगवटियासी परतून देणें जाणिजे छ २० सफर शके १६६१ सिधार्थीनामसंवत्सरे वैशाखवदि ५ मी पा। हुजूर

लेखांक २१७] [१७१२ कार्तिकशुद्ध ११

श्रीशंकर

अनेकश
क्तिसंघट्टप्रका
शलहरिघनध्वां
तध्वंसो विजयते
विद्याशंकरभा
॥। रती ॥।

श्रीमच्छंकराचार्यान्वयसंजाताभिनवश्रीविद्यानरसिंहभार-
तीस्वामिकरकंजोद्भवश्रीविद्याशंकरभारतीस्वामिकृतनारा-
यणस्मरणानि

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री समस्त ब्रह्मवृंद वा। क्षेत्रकराड या प्रति विशेषस्तु अत्रत्य कुशल जाणून स्वकीय ल्याहावें या नंतर रा। बापू दत्तात्रय देशपांडे ता। वारुण यास निग्रहपत्र पाठविलें होतें त्या वरून ते येथें मठसंकेश्वरीं हुजूर येऊन निष्कृती विषयीं विनंति केली आणि महिन्या पंधरा दिवसांत येतों ऐसा करार करून तत्रस्थलीं आले आहेत आपणांस कळावें ह्मणून लि। असे कळलें पाहिजे बहुत काय लिहिणें आज्ञेयमुल्लसाति

इत्य
लम्

वरून पुनः ज्यांनीं पत्र लिहिलें होतें त्यांची एकवाक्यता करून तुह्मां कडे पत्र देऊन पाठविले आहेत तर पूर्वीं शुत्धपत्र दिल्हें आहे त्या प्रमाणें येकपंक्ति अन्नोदकव्यवहार करणें तेथें क्षेत्रस्थ ब्राह्मण येऊन अन्नोदकव्यवहार करण्या विषईं दिक्कत न करणें त्यांस येथें च पंक्तिपावन करून पाा आहेत तर मधील पत्राचा संशय न धरणें मिति शके १७१३ विरोधकृतनामसंवत्सरे माघवद्य ११ हे आशीर्वाद

लेखांक २२०] १७६६ आश्विनवद्य १२ [बाळबोध

श्री

क्षेत्रकऱ्हाड यास

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजेश्री अंणादीक्षित उंबराणि
व तथा गोविंददीक्षित भाउ गरुड व नागेशदीक्षित
ढवळिकर व रघुनाथदीक्षीत गिजरे परमाप्तवर्येषु

प्रीत्यभिलाषुक माधवाच्यार्य व पुरुषोत्तमाच्यार्ये कालग्रामकर कृतानेक विनंति विशेष अमचे बंधुवर्गातिल रावजि व्यास व अनंताच्यार्य हे उभयता ग्रामण्या विशि प्रमुख होऊन तुमचा क्षेत्रधर्माचा अवलंब करुन मसुरकर हरभट बुवकर यास सामिल घेउन गावच्यास व परगावच्यास रावजि भगवंत कुलकर्णि कवठेकर यांच्या पंक्ति संमंधे सांसर्गिक दोष ठेउन तीर्थ देउन शुत्धपत्र देतात ये विसि मजकुराचे पत्र पूर्वी वो राजेश्री बापु त्रिंबक याज बराबर पाठविले त्याज वरुन व बापुनि हि मुखजबानि मजकूर सांगीतला त्या वरुन अपण प्रांतास पत्र पाठविले ते मसूरकर ब्राह्मण यानी सर्वास कळउन अह्मा ही विदीत केले त्यास ब्राह्मण्यधर्मसंस्थापक आपण आहा त्या पेक्षां जे असे ग्रामणी आहेत याची पुरी चौकसी जाहाल्या सिवाय मुक्तपत्र होउ नये अनन्वित करणारास जी शिक्षा होणे ती असे आचर्ण पुनः न करीत असे घडावे आपले पत्र आले ते अह्मास मान्य नाहीं व कऱ्हाडक्षेत्रस्थाचा अह्मा वर अधिकार नाहीं अश्या अनेक प्रकारे आमचे बंधुवर्ग

भाषणे करीत अहेत या प्रमाणे मजकुर आहे आवरोध निवृत्त जाल्या नंतर अह्मी क्षेत्रास येणार अऱ्हो अल्या नंतर सर्व मजकूर कळेल सूज्ञा प्रति विशेष काय लिहावे हे विनंति मिति शके १७६६ अस्वीन-वद्य १२

लेखांक २२१] [१७६६ आश्विनवा। १३

श्री

रुजू पुरुषोत्तमाचार्य हस्ताक्षर खुद

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री समस्त ब्राह्मण क्षेत्र-कराड यांसी

प्रीतीपूर्वक समस्त आचार्य काळगावकर विशेष रो बापू त्रिंबक मसू-रकर याणे समस्त देहाय व भोरगाव यास क्षेत्राचे पत्र आणून लाविले त्यात मजकूर रो रो रावजी व्यास व अंताचार्य काळगावकर व हरभट बुधकर मसूरकर या त्रिवर्गाखेरीज करून पूर्ववत् प्रमाणे अन्नोदकव्यव-हार करीत जाणे ह्मणोन ता। तारगाव व ता। उंब्रज यास पत्र आणून लाविले त्याज वरून आह्मी समस्त आचार्य क्षेत्री आलों त्यास नारोपंत भगवंत कुळकर्णी यास स्थळसुध्यतीर्थ आह्मी दिले व पुढे मसुरात तंटा जोती भगवंता बा। जाहला त्याज वरून गुंडभट आला त्यास आह्मी तीर्थ मागितल्या वरून दिले क्षेत्रस्थाचे अधिकारसंबंधी अन्य गावांत तीर्थ दिले नाहीं अन्य गावांत दिले असे जाहल्यास तुह्मी सांगाल त्या प्रमाणें वागू कळावे बहुत काय लिहिणे ही विनंतो मित्ती आश्विनवा। १३ सके १७६६

रुजू आचार्य मंडळी

हस्त आक्षर बाबाजीचार्य बिन रा-वजी व्यास आचार्य

१ सितारामाचार्ये

१ अनंताचार्य बिन वासुदेवाचार्य

१ व्यंकटाचार्य बिन मधुसुदनाचार्य

१ दादाचार्य

१ रुजु अनंताचार्य हस्त अक्षर खुद

लेखांक २२२] [१७७४ माघवा १४

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री समस्त ब्राह्मण
क्षेत्रकराड स्वामीचे शेवेसीं

विद्यार्थी मोरभट बिन पांडुरंगभट जोशी काा काले साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत माघशुाा १३ आपले कृपें करून सुखरूप असों विशेष आमचे चुलते वेाा राजश्री हरभट जोशी कानेरे याचा मुलगा बाब्राजी हा अदमासें सोळा सत्रा वर्षे घरांत वेड लागून कोठें बाहेर गेला तो मृत्य पावला त्याचें क्रियाकर्मांतर हरभटजी करीत नाहींत असें वाटतें त्याचें कारण खालीं लिहिलें असे त्या वरून ध्यानास आणा तो पिशाच्च जाला आणि आमचे बहिणीचे आंगात येऊन त्याणें आपलें नांव सांगितलें आणि यानें क्रिया करावी ह्मणजे मी गती घेतों असे बोलला परंतु ते कांहीं च करीत नाहींत आमची बहीण त्या पिशाच्यानें मारली या स्तव हालीं मन कुंठित आहे तर भटजी याणें आपलें लेकाचें क्रियाकर्मांतर करीत नाहींत यास्तव याज वर बहिष्कार घालावा ह्मणजे ते क्रिया करतील आणि पिशाच गति घेईल हाली ते आह्मास उपद्रव करीत आहे या स्तव या वेळीं तजवीज फार जरूर जाहाली पाहिजे ही अर्जी लिाा सही तारीख १८ फेब्रुवारी १८५२ इसवी त्याज कडून क्रिया करविली पाहिजे ताा मार

सही मोरेश्वरभट जोशी दस्तूर खुद

साक्ष

१ गोपालभट बिन गोविंदभट जोशी कालेकर दस्तूर खुद
१ बाळकृष्णभट बिन नारायणभट येळगांवकर राहणार वस्ती मजकूर दस्तूर खुद
१ पांडुरंगभट बिन आत्मारामभट डोईफोडे चोरगांवकर हालीं वस्ती मौजे कालें
१ गोविंदशास्त्री चिवटे दस्तूर खुद

लेखांक २२३]

श्री

नकल बंद

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री कृष्णाजी
सदाशिव कुलकर्णी मारुलकर यांसी

समस्त ब्रह्मवृंद सातारकर अनेक आशीर्वाद वि॥ तुह्मीं सातारा मुक्कामी येऊन विदित केले जे भिमाबाई बारामतीकर इचे कन्येशीं शके १७७५ फाल्गुनशु॥ ८ चे दिवशीं मौजे वरठेमुक्कामीं भिमाबाई बारामतीकर इचे कन्येशीं मीं खुद विवाह केला नंतर शके १७७७ श्रावणमासीं भिमाबाई गारवडास आली तेथें तिच्या कुळाचा व तिच्या जातीचा व कन्या कोणा पासून झाली वगैरे सर्वांनीं अंदेशा घेतल्या नंतर विचार करितां भिमाबाईबरोबर हालीं एक वृद्ध पुरुष आहे त्याला भिमाबाई माझा पति असें ह्मणती परंतु सभेंत आणून उभयतांस विचारतां भिमाबाई पत्नी व हा भर्ता व आह्मी केली ही कन्या विवाहित पती पासून झाहली असा पुरावा त्यांज कडून आला नाहीं त्याज वरून आह्मीं त्या कन्येचा परित्याग करून सर्व शिष्टांस शरण आलों तरी सर्वांनीं कृपा करून विजातीय कन्येशीं विवाहसंसर्गदोष घडल्या पासोन प्रायश्चित्त देऊन मुक्त केलें पाहिजे ह्मणोन विदित करून लिहून दिल्हें त्याज वरून सर्व शिष्टांनीं तुमचा अनुताप व तुमची शक्ति पाहून श्रीलक्ष्मीनारायणाचे देवालयांत समस्त विद्वत्समाजें द्वन्द्वप्रायश्चित विधिपूर्वक देऊन + + + +

लेखांक २२४] [१७७८ श्रावणशु॥ १३

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री समस्त ब्रह्मवृंद
क्षेत्रकराड स्वामींचे सेवेसीं

सेवक सिताराम माणकेश्वर बोकील इनामदार मौजे उपळव का॥ मायणी

कृतानेकसिरसाष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना ताा श्रावणशुाा १३ पावे तों आशीर्वादें करून सुखरूप असों विाा आह्मी कराड मुकामीं आमांस येकपंक्ती अन्नोदकवेवार होऊन पावन केलें मौजे मजकुरीं आमचे घरीं वहिवाट कर्ण्या विषयींचा बंदोबस्ता विसीं नरसो अणा व पांडोबा तात्या ग्रामउपाध्ये या उभयेतांस पाा त्यांणीं गांवची वाहिवाट चाळू केली नाहीं सबब श्रावणी उभयतां पों पांडोबातात्या यांणीं करून नंतर जावें अशा करारा प्रों उलगडा करावा आणि गांवचे बंदोबस्ता विसीं आपल्यास कळवून वाहिवाट चाळू करावी असें ठरलें असून अन्न-पानावर बसावयाचे वेळेस ऐवज पदरांत घातल्या खेरीज तुमचे घरीं जेवणार नाहीं असें बोलल्या वरून आमची खातरी नसेल तर निशा सावकारी देतों अगर तुमचे बरोबर शिपाई देऊन बोलल्या प्रों उलगडेल असें बोललों असतां कोणती हि गोष्ट कबूल न करितां निघोन गेले त्यास मज कडून बोलल्या जाबांत व्यत्यय येणार नाहीं अशी खातरी श्रीस हि आहे व आपणास हि आहे असें असोन विटंबना कर्णें नीट नये माझा श्वीकार केला च आहे हा अभिमान वागविण्याचा असल्यास सर्व बंदोबस्त कर्णें आपल्या कडेस आहे मी बोलल्या प्रमाणें व्यत्यय आणीन तर श्रीची च शफत असे सर्वस्वी आधार आपला आहे जसा सांभाळ कर्णें असेल तसा लौकिक सौरक्षण करून करावा तात्या कमजाजती मजकूर सांगून माझे विसीं वित्यय आणितील त्यास वित्यय येऊं नये

सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना

लेखांक २२५] [१७७८ फाल्गुनशुाा ५

नकल

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री समस्त ब्रह्मवृंद श्रीक्षेत्रवैराज यांशि

प्रति समस्त ब्रह्मवृंद करहाटकक्षेत्र साष्टांग नमस्कार येथील क्षेम तागाईत फाल्गुन शुद्ध ५ मी पावे तों सर्व वृत्त यथास्थित असे विशेष वो नाना बिन कृष्णभट व सिताराम बिन कृष्णंभट उंबराणी पालकर व शिराळकर भिक्षुक व गृहस्त यांणीं क्षेत्राची अवज्ञा करून नवीन पदप्रायश्चित्त वगैरे करितात व मशारनिले यांणीं मठाधिपतीचें नवीन पत्र सांप्रदाय नसतां करून घेऊन आह्मी क्षेत्रस्थ ह्मणून घटाई करितात यास श्री क्षेत्र मजकूर येथून वर लिहिले असामीस अन्नोदकव्यवहारा विषी निर्बंधपत्रें गांवगन्ना गेलीं आहेत तरी आपणांस लिहिलें आहे त्यास आपण क्षेत्रीं व आपले प्रांतीं पालकर उभयतां असामी व शिराळकर भिक्षुक व ग्रहस्थ यास अन्नोदकव्यवहारा विषईं निर्बंध ठेवावा क्षेत्राचा अभिमान क्षेत्रांनीं ठेविला पाहिजे या पत्राचें उत्तर यावें सुज्ञा प्रति विशेष काय लिहिणें लोभाची वृद्धि असावी मिति फाल्गुन शुद्ध पंचमी शके १७७८ नळनामसंवत्सरे हे नमस्कार

संमत मुख्य असामींच्या

१ रघुनाथ दीक्षित गिजरे	१ अनंताचार्य घळसासि
१ रामकृष्ण दीक्षित गिजरे	१ बाबाचार्य काळे
१ जगंन्नाथ श्रौति ग्रामउपाध्ये	१ सिद्धेश्वर दीक्षित गरूड
१ नारायण भट वैद्य	१ मोर जोशी अंणा
१ बाळंभट अरणके	१ बाबू दीक्षित वळवडे
१ बाबा दीक्षित गिजरे	१ दादा दीक्षित उंबराणी
१ भाऊ दीक्षित ढवळीकर	१ नाना विदार
१ राघवाचार्य टोणपे	१ कृष्ण दीक्षित उंब्राणी
१ दादा दीक्षित अटकेकर	१ सखारामभट ढवळीकर
१ दादा दीक्षित गिजरे	१ भाऊ निळकंठ देशपांडे
१ भाऊ दीक्षित गिजरे	१ बाळंभट विदार
१ नारो आपाजी देशपांडे	१ उद्धव जोशी
१ मोर दीक्षित अयाचित	१ नारो पाध्ये

१ मौजे अतीत
१ मजरे तुकाईचीवाडी
१ मौजे चाफळ
१ संस्थान चाफळकर बवा
१ मौजे पाडली
१ मौजे निनाम
१ सासपड
१ मिरली व चोरे
१ चोरे काळगांव
१ सिरगांव
१ मोकदमास
१ बावाजी अराणके वालीत
१ बळवंत आपाजी शुभपत्र

सदर गांवांस पत्रें लिहिलीं त्यांतील हशील मजकूर वो रा नाना व सितारामभट बिन कृष्णभट उब्राणी वा। मजकूर यांणीं इकडील देशांतील पूर्वी पासून सांप्रदाय मठाधिपत्याचा नसून श्रीस्वामीजगद्गुरु यांज पासून मठाधिकाराचे आपले नांवें मशारनिलेनीं पत्र करून घेतलें त्यावेळेस पाली मुकामीं आमचे क्षेत्रा पैकीं मंडळी तेथें होती त्यांगीं श्र जगद्गुरूचे समक्ष मारनिलेस ताकीद केली नंतर ते समयीं पत्र राहिलें पुढें त्यांनीं आह्मांस न कलतां परभारें नेहलें हा मजकूर क्षेत्रीं श्रुत जाहल्या वरून तुह्मांस लिहिलें आहे त्यास पदप्रायश्चित्तआचारव्यवहार वगैरे जें करणें तें क्षेत्राहून होत आलें याची माहिती आपणा हि आहे असें असून क्षेत्राचा अधिकार आपण करावा ह्या दुर्बुद्धीनें पत्र करून घेतलें हा मजकूर क्षेत्रीं श्रुत जाहला या स्तव ते क्षेत्राचे द्रोही आहेत याज करितां आपणांस लिा। आहे तरी भटजी उब्राणी यासी व याचे घरीं येकांत्ती अन्नोदकव्यवहार न करणें असा निग्रह ठऊन पत्राचें उत्तर पाठवावें व पुनः त्याज विषीं स्वामींचें पत्र आलें असतां कोणीं मानूं नये कळावें बहूत काय लिहिणें हे नमस्कार व अनुक्रमें आशीर्वाद मिति शके १७७८ फाल्गुनशुद्ध ५ सदहू प्रों वर गांव लिहिले आहेत त्यास पत्रें लिहिलीं असेत.

१ गोविंद दीक्षित अटकेकर
१ रामदेव
१ विनायक दीक्षित गिजे
१ श्रीधरशास्त्री बहिरे
१ गणेशभट ग्रामउपाध्ये
१ गोपाळभट ढवळीकर
१ विष्णुशास्त्री सप्रे
१ कृष्णाचार्य कवटी
१ केशवभट राम पाटणकर
१ बाबू भट लाटकर
१ केशवभट रायपाटणकर

१ शिऊ पाठक
१ गोविंद चार्य घळसासि
१ वामनाचार्य टोणपे पुराणिक
१ बाळकाचार्य जंगी
१ दाजी दीक्षित उंब्राणि
१ तात्याचार्य घळसासि
१ बाळकोबा ढवळीकर
१ मार्तंड दीक्षित उंबराणि

लेखांक २२६] [१७७८ फाल्गुन शुा ५

बारनिशीपत्रक देहाय गांवगंना निबंधपत्रें पाठविलीं त्याचा तपशील

नाना व सिताराम भट उब्राणी पालकर यांणीं या देशांत सांप्रदाय नसून मठाधिपत्याचें पत्र श्री स्वामीं कडून करून घेतलें त्याज बद्दल निबंधपत्रें पाठविलीं तीं बीा

१ मौजे तारलें
१ मौजे पाल
१ मौजे इंदुली
१ मौजे उंब्रज
१ मौजे चरेगांव
२ मौजे कासीळ
१ बोरवन
१ मौजे तालुके तारगांव
१ मौजे वेणेगांव

आरलेस हरीपंत मोकासी याज बाा पत्रें गेलीं तीं बीा

१ मोकदमास
१ हरीपंतास
१ बापूनाईक
१ शामराव देशपांडे
१ आपा दाजी देशपांडे
१ राणूबाई मोकसीण
१ चरण मोकदमास
३ कुरलें पत्रें

प्रमाणें वहिवाट चालली हाली उभय उंब्राणी पालकर यांणीं श्रीजगद्गुरु-शंकराचार्यस्वामीचें पत्र आणिलें त्याची नकल अलाहिदा पाठविली आहे उंब्राणी याचे ह्मणे पत्रा प्रमाणें वहिवाट चालवावी नाहीं पेक्षां पत्र माघारीं घ्यावें सबब आपणांस लिहिलें आहे तर जगद्गुरुचें पत्र माघारीं देणें हें हि कठीण याज करितां उत्तर यावें बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

उत्तर

विशेष श्रीस्वामीजगद्गुरु यांचे पत्राची नकल व आपलें पत्र पा। तें पावलें लिहिला मजकूर कळला या प्रांतीं पूर्वीं पासून मठाधिकारीचा सांप्रदाय नाहीं हें आपणांस माहीत च आहे त्यास श्रीस्वामीजगद्गुरुचें पत्र आलें तें ठेऊन घेऊन पूर्वीं क्षेत्रा हून पत्र आपणास गेलें आहे त्या प्रमाणें वहिवाट ठेवावी सूज्ञा प्रति विशेष काय लिहिणें हे नमस्कार व अनुक्रमें आशीर्वाद मिति १७७९ वैशाख शुद्ध १०

लेखांक २२९] [१७७९ आषाढवा ५

नकल

श्रीशंकर

सिका

श्रीमच्छंकराचार्यान्वयसंजाताभिनवश्रीविद्याशंकरभारतीस्वामीकर-कंजोद्भवश्रीविद्यानरसिंहभारतीस्वामीकृतनारायणस्मरणानि

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री समस्त ब्रह्मवृंद व ज्योतिषी व राजकीय ग्रहस्त व देशमुख व देशपांडे व पाटील कुलकर्णी का। मा।र परमशिष्योत्तम यांसी आज्ञा केली ऐसी जे शके १७७८ नलनामसंवत्सरे संस्थानदेवतेचे स्वारीचें संचारउद्देशें सातारप्रांतीं आगमन जाहालें समईं गांवगनानीं पाहतां हिंदुलोकांत ज्ञातीधर्मास विरुद्ध वहिवाट होत असल्याचें दिसून आलें सबब ये विषयींचा विचार संस्थानांतून जाहला पाहिजे यांज करितां सदरहूच्या बंदोबस्तास संस्थानांतून मठाधिकारी-

लेखांक २२७] १७७८ फाल्गुनवद्य १३ [बाळबोध

श्री

वेदमूर्ति राजश्री समस्त ब्रह्मवृंद व देशमुख व देशपांडे व ज्योतिषी व कुळकर्णी व राजकीय ग्रहस्थ मौजे काशेगांव यासि

समस्तब्राह्मणक्षेत्रकरहाटकस्थकृत नमस्कार व अनुक्रमें अशिर्वाद विशेष पूर्वी पासून आचारव्यवहारपदप्रायश्चित्त कर्ण्याचा अधिकार क्षेत्राचा पूर्वापार असून त्या प्रमाणें वहिवाट चालत अस्ता पेशजी जगंनाथपंत हासबनिस याज वर काहि अरोप अला होता ते समयीं शिराळकर यानि क्षेत्राची अवज्ञा केली तेंव्हां क्षेत्रस्थमंडळी जाउन शिराळकर याचा कागद लेहून घेतला त्यांत हाशील कीं क्षेत्राचे अज्ञे प्रमाणें वागणूक करूं आणि पदप्रायश्चित्त पूर्वी पासून तुह्मी करित अला त्या प्रमाणें तुह्मी करावे असा अहे नंतर मशारनिले हासबनीस याज कडून प्रायश्चित करउन शुध केले असे असून हाली विनाकारणी शिराळकर दांडगाहि करतात या स्तव ते क्षेत्राचे द्रोही अहेत

त्यास शिराळकर व बिळासकर ज्योतिषि याचे घरीं कोणीं अन्नोदकव्यवहार येकपंक्ति करूं नये असा निर्बंध ठेवावा आणि श्रीस्वामिशंकराचार्य यांचे पत्र शिराळकर यानी आणिल्यास मान्य करूं नये अणि पत्राचे उत्तर यावे कळावे हा नमस्कार व अनुक्रमे अशिर्वाद शके १७७८ फाल्गुणवद्य १३

लेखांक २२८] [१७७९ वैशाखशुाा ८

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री समस्त ब्रह्मवृंद क्षेत्रकराड यांसि

समस्त ब्राह्मण कसबे उंब्रज साष्टांग नमस्कार विनंति विशेष तागाइत वैशाखशुाा ८ शके १७७९ पावे तों क्षेम असों विशेष पेशजी आपण पत्र उभयतां उब्राणीपाळकर यांज विषीं पाठविलें होतें त्या

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री नाना दीक्षित व सीताराम दीक्षित उमराणी मौजे पाल परमशिष्योत्तम यासी विशेषस्तु तुमचें कल्याण इच्छित श्री निकट असो अत्रत्य कुशल जाणून स्वकीय लेखनीं मानस संतोषवीत असलें पाहिजे तदनंतर तुह्मांस संस्थानांतून मठाधिपत्याची वहिवाटीची आज्ञा होऊन आज्ञापत्र दिल्हें त्यांत पाल वगैरे क्षेत्रकर-हाटक याचे हद्दींतील आहेत ती न पाहणेची आज्ञा व्हावी या प्रों क्षेत्रस्त ब्रह्मवृंद यांनीं समक्ष मठ संकेश्वर मुक्कामीं श्रुत केलें वरून हे आज्ञापत्र सादर जाहलें असे तरी पाल वगैरे गांव क्षेत्रकरहाटक याचे हद्दींतील गांव रहित केली असती तेथील मठाधिपत्य वगैरे तुह्मीं पाहू नये विशेष लिहिणें तें काय आषाढवा। ७ निशान मोर्तब

असल बरहुकूम नकल रामचंद्र बापूजी कारकून नि॥ श्री

शेरा

अजमितीचे पत्राबरोबर क्षेत्रकरहाटक येथील समस्त ब्रह्मवृंदा कडे रवाना मिति आषाढवा। ७ शके १७८१ सिध्धार्थीनामसंवत्सरे

गोविंद हणमंत कारभारी नि॥ श्री

संस्थान करवीर

बार अंक २५ सन १२६९ फसली

लेखांक २३१] [१७७९ आषाढवद्य ११

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री समस्त ब्राह्मण

क्षेत्रकराड यांसी

समस्त ब्राह्मण कसबे मसूर साष्टांग नमस्कार विनंति विशेष वेदमूर्ति राजश्री नानाभट बिन कृष्णदीक्षित व सीतारामभट बिन बाबादीक्षित उमराणी पालकर यांणीं या देशांतील सांप्रत मठाधिपत्याचा अधिकार क्षेत्रमजकूरचा असोन दुर्बुद्धीनें आपले नांवें संस्थानाकडून आज्ञापत्रें करून घेतलीं त्यास ते क्षेत्राचे द्रोही याज करितां त्याचे घरीं येकपंक्ती

पणाचे कामावर वो राजश्री नाना बिन कृष्ण दीा व सिताराम बिन बाबा दीा उंबराणीकर राहणार पाल यां उभयतांस नेमून आज्ञापत्रें दिल्हीं आणि ज्ञातिधर्मास विरुद्ध वागतील त्याज विसींचें संस्थानास कळऊन आज्ञे प्रमाणें बंदोबस्त ठेवीत जाणे अशी आज्ञा जाहली त्या प्रमाणें सदर उभयेतांनीं तजवीज ठेविली असून क्षेत्रकरहाटकस्थ ब्रह्मवृंद यांणीं मठाधिकारीपणाचे आज्ञापत्र घेतलें त्याज मुळें उभयतां बरोबर द्वेष करून निग्रहपत्र पालीकर ब्रह्मवृंद यास लिहिले त्याची नकल सदर उभयतांनीं आणून हुजर केली ती अवलोकनांत येऊन आज्ञापत्र तुह्मांस सादर जाहलें असे तरी सदर कराडकर यांणीं उंबराणीकर उभयता यांसी द्वेषबुद्धीनें निग्रहपत्र लिहिलें हें अयोग्य आहे मठाधिकारी वगैरे याची वहिवाट पाहून निग्रह टेवणें अगर शुद्ध करणें हा अधिकार संस्थान मठ करवीरकरचा कराडकर दरम्यान धांदल करून पत्र लिहिलें हें बरोबर नाहीं कराडकर हे परभारें धांदल करितात ये विसींचा बंदोबस्त संस्थानांतून होणें लौकर होईल तुह्मी सदर उभयतां मठाधिकारी उंबराणी राहणार पाल याचे घरीं व पंक्तीस अन्नोदकव्यवहार पूर्ववत् प्रों करीत जाणें आणि कराडकर यांणीं पत्र लिहितील तीं कोणी मानूं नयेत असा बंदोबस्त ठेवून विनंतिपत्र पाा देणें विशेष लिहिणें तें काय मिति फाल्गुनवाा ३ महानुशासनं वारेवर्ति मोर्तब असे पो आषाढवाा ५ शके १७७९ हस्ते सितारामभट उंबराणी पालकर

लेखांक २३०] [१७७९ आषाढवद्य ७

नकल

श्रीशंकर

सिका

श्रीमच्छंकराचार्यान्वयसंजाताभिनवश्रीविद्याशंकरभारतीस्वामीकरकंजोद्भवश्रीविद्यानरसिंहभारतीस्वामीकृतनारायणस्मरणानि

लेखांक २३३] १७८० अधिक ज्येष्ठ शुा १ [बाळबोध

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री समस्त ब्रह्मवृंद श्रीक्षेत्र-
कऱ्हाटक यांसि

प्रति समस्त ज्योतिषी क्षेत्र मजकूर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना लिहून दिल्हा कागद ऐसा जे मौजे मंद्रूळ मजरे जानुगडेची वाडी येथील जोशी यांस संभापूरकर बोटगा साळी याचे खटल्या बदल दाखल्याचें पत्र पाठविलें त्या पत्रा वर कृष्णककुद्मती करून पाठविले त्याज बद्दल तुह्मी आमचे वृत्तीस अटकाव केला परंतु कृष्णककुद्मती करून पत्र पाटविलें ही आमची चूक जाहली आहे इत:पर आह्मी परगांवास वाळीत अगर शुद्धपत्रा वर कृष्णककुद्मती करून पत्र लिहिणार नाहीं लिहिलें तर तुह्मी आज्ञा कराल त्या प्रमाणें वागूं हा कागद लेहून दिल्हा सही मिति शके १७८० कालयुक्तनामसंवत्सरे अधिकज्येष्ठ शुा १ भृगुवार दस्तुर वासुदेव जोशी बिन मोरजोशी क्षेत्र मजकूर

साक्षी करणार जोशीमंडळी

१ सही रामजोशी बिन व्यंकणजोशी क्षेत्र मार दस्तूर खुद
१ मोरजोशी बिन नारायणजोशी दस्तूर खुद
१ रंगजोशी बिन विठलजोशी दस्तूर खुद
१ गुंड जोशी दस्तूर खुद
१ गोविंदजोशी बिन यज्ञेश्वरजोशी दस्तूर खुद
१ काशिनाथ जोशी बिन कृष्णजोशी दस्तूर गोविंद जोशी बिन यज्ञेश्वर जोशी
१ सही बंडोबा बिन बाबा जोशी दस्तूर खुद
१ भाऊ बाळकृष्णजोशी दस्तूर खुद
१ सही वासुदेवजोशी बिन शामजोशी दस्तूर खुद
१ भिकु जोशी बिन सदाशिवजोशी कराटकर दस्तूर भाऊ बाळकृष्णजोशी

अन्नोदकव्येव्हार करूं नये असें क्षात्राहून पेशजी फाल्गुनशुा। १ शके १७७८ चे पत्र आलें त्याचें उत्तर पूर्वी आपा जोशी बिन बाळकृष्ण जोशी क्षेत्र मजकूर याज बरोबर फाल्गुनशुा। ११ शके मजकूरचे पाठविलें च आहे हल्लीं संस्थाना कडून श्रीस्वामीजगद्गुरु यांचें पत्र फाल्गुन वा। ३ शके मजकूरचें मितीचें आले तें आज आपास वा। ५ शके १७७९ दिवसी वा। सीतारामभट उमराणी याणीं दिल्हें त्याची नकल करून आपणां कडे पाठविली आहे मनन होऊन पत्राचें उत्तर जरूर यावें अनमान करूं नये कळावें बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंति मिति आषाढवा। ११ शके १७७९ पिंगळनामसंवत्सरे

लेखांक २३२] [१७८० वैशाखशुा। १ सुमार

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री समस्त ब्राह्मण क्षेत्र-
कराड स्वामी गोसावी यासी

मोकदमानी मौजे वार्डे पेटा पेठ ताो वाल्वें कृतानेक साष्टांग दंडवत विज्ञापना तागायत वैशाखवा। ६ पावे तों आशीर्वादें करून येथास्थित असे विशेष आपले कडून वैशाखशुा। १ शके १७८० चे मिा। चें पत्र आलें त्यांत लिा। कीं कुशा बोटका साळी संभापूरकर याजवर दोष आहे त्या सांसर्गी साळी तुमचे गांवांत नांदत आहे त्याचे घरीं लग्न वगैरे कांहीं जाहल्यास तुमचे जोशी याणें त्याचे कार्यास जाऊं नये ताकीद करावी ह्मणून त्याज वरून आमचे गांवचा चिंतामणभट बिन बापूभट जोसी यास ताकीद करून आपलें पत्र आलें तें हि वाचून दाखविलें परंतु त्यानें पत्राचा धिक्कार केला कीं हें पत्र समस्त ब्राह्मणांचें नव्हे मध्यें कोणी तरी तोतयाणें दिल्हें असेल असें ह्मणोन निघोन गेले आणि काल मिति वैशाखवा। ५ स संभापुरकर याचे संगतीचे साळी याचीं लग्नें लाविलीं पुढें मर्जीस येईल तसें करावें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना

लेखांक २३४] १७८० अधिक ज्येष्ठ शुा १० [बाळबोध

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजेश्री समस्त ब्रह्मवृंद क्षेत्रक-
ऱ्हाटकस्थ स्वामी यांसी

कागद बेशमी धोंडभट बिन चिंतामणभट जोतिषी मौजे वोडं प्रांत कऱ्हाड तालुके वाळवे कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना लिहून दिला कागद ऐसा जे क्षेत्रा हून बोटका साळी याचे खटल्या बदल मौजेमजकुरीं पत्र आलें त्या पत्रा प्रमाणें आह्मां कडून वहिवाट न झाल्या मुळें आपले निर्बंधपत्र आह्मांस आलें त्याज वरून आह्मीं क्षेत्रास आलों त्यास आपले पत्राचा अपमान केला ही चूक आमची आहे इत:पर असें करणार नाहीं आपले आज्ञे प्रमाणें वागेन हा कागद लिहून दिला सही मिति शके १७८० कालयुक्तनामसंवत्सरे मिति अधीक जेष्ठ शुक्ल दशमी हे विज्ञापना दस्तुर खुद धोंटभट बिन चिंतामणभट पाठक जोतिषी मौजेमजकूर

लेखांक २३५]

श्री पांडुरंग प्रसन्न श्रीसमुद्रेश्वराय कृष्णककुद्मतीप्रीति-
संगमो जयति ॥
वेदशास्त्रसंपन्न राजश्री समस्त क्षेत्र कऱ्हाड स्वामी
गोसावी यांसी

आज्ञाधारक भटंभट गोपीनंदन क्षेत्रश्रीपंढरपूर चरणा वरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशललेखन करीत असलें पाहिजे विशेष हणमंत वडिहे येथील कुळकर्णी यानें ब्रिशम मारिला त्यास वीस दिवस होऊन गेले आह्मांस न भेटतां तिमणभट नाहावीकर व वडिहेकर प्रायश्चित्ताचा धणी ऐसे उभयतां आह्मांस न कळतां क्षेत्रास येणार आहेत याचां स्वामींनीं आह्मांस पूर्वींपासून आज्ञा केली आहे जे घाटमाथां जें प्रायश्चित्त होईल तें आह्मीं येऊन स्वामींस निवदन करावें ऐसी आज्ञा आपली पूर्वी पासून आहे त्यास आह्मांस न कळतां येणार आहेत आणि आपण आह्मांस कागद

पण हि करून दिल्हा च आहे आमचा हि कागद स्वामीं पासी आहे पूर्वी वडिहेकराच्या प्रायश्चित्ता साठीं स्रम हि बहुत केले ते आपणांस विदित आहे तरी आतां प्रायश्चित्ताचे धणी आले आहेत यासी आह्मां-वाचून अभय न द्यावें आह्मी आ + + + + + + + + + + + + +

लेखांक २३६]

श्री

श्रीमद्वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री नागेश दीक्षित व रघुनाथ दीक्षित व अंणा दीक्षित व बाबा दीक्षित क्षेत्र श्रीकरहाटक यांशि

प्रीतिपूर्वक गोविंद दीक्षित गरुड क्षेत्र मजकूर मुकाम नेवरी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति ऐशी जे येथील मजकूर तरि श्रावण वद्य १४ बुधवार पावेतों आपुले कृपें करोन वर्तमान यथास्थित असे विशेष आह्मी कांहीं कार्योद्देशे ग्रामांतरास जावया करितां निघालों ते नेवरीं मुकामीस मार्गेकरोन आलों तेथें हरी सखाराम याची गांठ पडली त्यानें आपली निष्कृति होण्याचा विचार पुसला तेंव्हां आह्मी त्यास जो विचार सांगण्याचा होता तो क्षेत्रतरफेनें सांगोन त्यास दुराचार न घडण्याचा तोडी बहुत प्रकारें सांगितल्या परंतु तो परावृत्त निकालस-पणें होत नाहीं आणि परभारा बोलणें बोलतो कीं मी क्षेत्रास जावोन शुद्धपत्र हरतऱ्हेनें घेऊन येईन मजला वरकड तोडजोडीची गरज नाहीं ऐसा मजकूर ऐकण्यांत आला सबब आपणांस सूचनार्थ हें पत्र लिहिलें असे क्षेत्रांतील विचार सर्व आपुले ध्यानांत वागत च आहे अलीकडील अप्रौढमंडळींत फुट होऊन भलता विचार होईल याचा निर्बंध आपुल्याकडोन जरूर राखला पाहिजे ज्या दोषा वर बहिष्कारपत्र आपण पाठविले त्या कलमाची निकालसता बापभाऊ व भोवर गांवीं शरीरसंबंधी ज्ञातिवर्ग आहेत त्यांचे विचारास. येथील तैशी जाहली असतां च नीट नाहीं तरी केवळ द्रव्यव्यवहाराचा लोभ टेवोन कोणीं

केल्यास क्षेत्राचा वकूब जायील आणि आसमंतात मोठे मंडळीचा उपहास बहुत च होयील या सर्व गोष्टी आपुले लक्षांत वागत च आहेत केवळ आह्मीं लेहून कळवावें ऐसा प्रकार नाहीं

ताजाकलम—खटावकर कोणी ब्राह्मण येथें आठ चार दिवसा मागें आला होता तो हरीपंताशीं बोलिला कीं वरघाटी कराडकरांस पत्र पाठवावयास संबंध नाहीं दोष गैरदोष ह्मणण्याचा वरघाटी अधिकार आम्हां खटावकरांस च आहे हा हि मजकूर आपणांस श्रुत जाहला पाहिजे निरंतर लोभवृद्धि करीत जावी हे विनंति

लेखांक २३७]

श्री

वेदमूर्ति राजेश्री समस्त ब्राह्मण क्षेत्र कऱ्हाड
स्वामींचे सेवेसीं

विद्यार्थी भगवंतराव[1] सिवदेव सरदेशमुख प्रांत कराड दोन्ही कर जोडून साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करीत असलें पाहिजे वेदमूर्ति राजेश्री माणिकभट आपणां कडे आले आहे ते मुखवचनें वर्तमान सांगतां विदित होईल त्या वरून आपण कार्यसिद्धि केली पाहिजे गृहस्थ आमच्या व तुमच्या पदरीचा आहे याचें अगत्य धरून कार्यसिद्धि सत्वर केली पाहिजे बहुत ल्याहावें तरी आपण सुज्ञ आहां तेथें विशेषकाय ल्याहावें हे विनंति

लेखांक २३८]

स्वस्तिश्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यश्रीमच्छंकराचार्यपरात्परगुरुपादपंकजोपरिमधुपायमानमानसामानमानाहीनवरतमाहावाक्यस्फारतरविचारपारावारपारीणधुरंधरामदानंदसुधासिंधुनिमज्जमानभारतीकश्रीमद्विद्यानृसिंहभारतीसद्गुरुचरणारविंदं प्रति

---

1 भंद्रव्याचे बोधले घराण्यापैकीं पुरुष.

सच्छिष्यांतरगतेन कऱ्हाटकस्थेन अरणके इत्युपनामकेन बाळशर्मणा दीक्षितेनानेकवंदनपूर्वकं विज्ञापनाः समुल्लासंतु अत्रत्यं वृत्तं मार्गशीर्ष-कृष्ण द्वादशी पर्यंत सर्वत्र मंडळी श्रीकृपाकटाक्षेपेण शिष्याः कुशलिनः स्मः अपणा कडिल आज्ञापत्र आले ते पोचले त्यातील मजकुराचा विचार दाहा शिष्टमंडळी मिळोन त्याचा विचार पाहात आहेत पत्रा अन्वये ग्रंथ आधार सांपडेल असे आहे दोन चार दिवसांत या विषई साधन घेउन मंडळी घेउन निघोन येतो राघवाचार्य कालगांवकर यास आज्ञापत्र आले तें पोचते केले ते कऱ्हा(डा)स आले ह्मणजे निघोन येतो

बहुत काय लिहिणे हे वंदन
गणेशभट ग्रामोपाध्ये यांचे वंदन
जोति दिक्षित अरणके याचें वंदन
भाउ दिक्षीत उंब्राणि याचे वंदन
बापुभट फाटक याचे वंदन
नृसिंह दिक्षीत ग्रामोपाध्ये याचें वंदन

लेखांक २३९]

श्री

वेदशास्त्रसंपन्न समस्तब्रह्मवृंद क्षेत्रकराड स्वामीचे सेवेसी

विद्यार्थी भगवंत आपाजी साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील क्षेम जाणोन स्वकीय आसिर्वादलेख करून संतोश पाववीत असावें विशेष वेःमुहुर्तो व्यंकणभट व पुटभट जोतीश हुकेरी या उभयेतांस आपणा कडे जोतीशपणाचे निवाडे बदल पाठविले होतें त्यासी आपण निवाडा करून उभयेतांस पाठविले उभयेतां येथें आले उभयेतांस स्वामीचे आज्ञे प्रमाणें सांगितलें वो व्यंकणभट आपणांस हा निवाडा कलला नाहीं आपण स्वामी कडे जाईन ऐसे बोलले वो पुटभटास हि विचारिलें निवडले प्रों ऐकावयास हि रजावंद व्यंकणभटानें न ऐकलेस

स्वामी कडे जावयास हि रजावंद ऐसे बोलोन उभयेता स्वामी पासीं आले आहेत उभयतांस रजावंद करून उभयतांचीं पत्रें येकाची येकास करून देऊन पस्टपणें आज्ञा करावी तेणें प्रो वर्तणूक करू कृपा केली पाहिजे हे विनंति

लेखांक २४०]

श्री

तीर्थस्वरूप राजेश्री बाजीपंत पोतनित्रीस काका वडिलाचे
शेवेशी

अपत्या समान रावजीबावानें व बाबानें कृतानेक नमस्कार विनंती उपरी येथील वर्तमान भाद्रपदशुद्ध १२ पर्यंत श्रीकरहाटकक्षेत्र येथें समस्त सुखरूप असो विशेष आपली अज्ञा घेऊन निवालों तें श्रावणकृष्णसप्तमीस वरास सुखरूप पावलों आल्या तागाईत आपल्या कडील वर्तमान कांहीं कळत नाहीं तर ऐसे न करावें सदेव पत्रद्वारा परामर्ष करावा वर्कड वर्तमान आह्मा कडील व्यंकणभट्ट सांगतां निवेदन होईल बहुत काय लिहिणें आपण बोलिलें होते की सप्तशतीचे वरणीचा शोध करूं त्यास वरणी लागावयाची अशली तर शोध करून लिहून पाठवावें ह्मणजे येतो सर्व भरवसा आपला आहे कृपा निरंतर करावी हे विनंती इहेव सौभाग्यवती वज्रचूडेमंडित मातुश्री उमाबाई काकीस नमस्कार वडिलास लिहिले आहे त्यावरून सर्व मजकूर निवेदन होईल बहुत काय लिहिणें हे विनंती

सौभाग्यवती वज्रचूडेमंडित पांखराबायीस अशीर्वाद चित्तास खेद न करीत जावा बहुत काय लिहिणें लोभ असो देणें हे अशीर्वाद तीर्थस्वरूप राजेश्री देवबावास नमस्कार सांगणें

लेखांक २४१] [बाळबोध

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री मोरदीक्षित नाना अरणके यास
समस्त अष्टेकर व भिलवंडीकर सा। विनंति उपर अपलि अमचि उभयताचि

गांठ पडलि त्या समयी अपण बहुत च क्षेत्राचि प्रशंसा सांगून उमेद-वारीच्या गोष्टि बोलिला होता परंतु अपले क्षेत्रस्थ विसलांपुरास आले त्या मधे अपणा सारिखे मुख्य होते किंवा कैसे होते तेथे प्रकार जिनस्वार झाला ऐसे सुज्ञ कोणते होते आणि कैसे झाले हे सविस्तर लिहावे अह्मी अपले पत्राचे उत्तर यावे यदर्थि क्षेत्रास अपणास विनंति लिहिलि आहे तर समस्ताचे उत्तर पाठवा ये विषयी अपले यजमानाचि आज्ञा कि उत्तर आणिवणे तर अपण सत्वर उत्तर पाठवावे गडी रोजगारि आहे नवमीस सायंकाळ मर्यादा पोहचे ऐसे करणे सूज्ञा प्रति विशेष काय लिहिणे हे नमस्कार

लेखांक २४२] [बाळबोध

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजेश्री समस्त ब्राह्मण क्षेत्रकराड याशि

प्रति रावजीभट्ट रांगणे क्षेत्रमाहुली साष्टांग नमस्कार विनंति उपरि तुह्मी अंह्मास विचारिले जे चरणामध्ये राजेश्री बहिरोपंत कुळकर्णि याचे घरि गर्भाधान जाहले ते वेळेस ब्राह्मण अरळेकर व बापूभट्ट नेरलेकर आले होते त्यास काही कुंभध्वनि नाटवडेकर मोकाशियाचि निघाली होति त्यास जे त्याचे घरि ब्राह्मण नाटवड्यास गेले होते ते हि तेथे आले त्यास पंक्तिव्यवहार करावा ऐसा सरकारचा अग्रह नंतर गर्भाधान जाहले साहिंकाळ जाला मग अंह्मि बोलिलो की अंह्मास भोजनास घालणे तर घालावे नाही तर दुसरे घरि भोजन करु मग त्या नंतर अंह्मि व वेदमूर्ति बापूभट नेरले व राजेश्री सखोपंत वेळगावकर ऐसे त्रितर्गांनि भोजन वेगळे केले त्या नंतर असे इकीकडेस जेवले भोजन जाला वर अह्मास जुलुम केला ऐसे रामभट आणिखि येकदोघे बोली या प्रमाणें तेथील वर्तमान जाहाले ते अपणास निवेदन केले बहुत काय लिहिणे हा नमस्कार हस्त अक्षर खुद

लेखांक २४३]

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री बाजीदीक्षित दादा
गिजरे स्वामी वडिलांचे शेवेसीं

आपल्या समान बलवंतराव माहादेव कशेलकर साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता। जेष्ट वा। ७ पर्यंत आपले आसीर्वादें कुशल असे विशेष आपणां कडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं तरी सविस्तर ल्याहावें या नंतर आह्मी सकुटुंब चिरंजीव आनंदराव गंगाधर याचे कन्येच्या विवाहा करितां निदर्गीस माघमासीं गेलों होतों मुलीचें लग्न शापुरबेलगांवीं श्रीचिदंबर दीक्षित याचे आज्ञे वरून जाहालें त्या नंतर आह्मीं चैत्र वद्यपक्षीं तिकडून निघोन वैशाखमासीं इकडे आलों तिकडील मंडळी सर्व कुशलरूप आहे आपणांस कलावें दर्शनाची इच्छा फार आहे परंतु घरास आलों तों घराचा नाश फार जाहला दंग्यांत घर सोडिलें त्यास नऊ महिने जाहले याज मुळें लांकूडफाटें वगैरे फार गेलें त्याची दागदोजी पडीझडीची करीत आहें आणखीं मासपक्ष लागेल अद्यापि कुटुंब इकडे आणिलें नाहीं सडा आहें पंधरारोजांत कुटुंब आल्या नंतर मी आपले दर्शनास येईन या नंतर कराडकर समस्त ब्राह्मण यांची व वालवेकर यांचीं कटकट प्रायश्चिता बदल जाहली आहे ह्मणोन कललें त्यास रिकामें खटले कशा करितां ब्राह्मण माजिवतांत यांत लाभ काय हें कांहीं ध्यानांत येत नाहीं त्यांत येकादा प्रायश्चित्ति आला आणि आविधि त्यास प्रायश्चित दिल्हें आसें आसलें तरी मग ब्राह्मण्या करितां कटकट करणें प्राप्त तसें हि केवल वालवेकर अविध्युक्त करितील असें वाटत नाहीं तेथील ब्राह्मण चार बरे च जाणते विद्वान आहेत व पहिले पासून असे विषय त्या जाग्यास बहुत पडत आले त्याची निष्कृति हि करीत गेले परंतु आज पर्यंत खटला कोणीं क्षेत्रस्थानीं कोणता केला असें ऐकण्यांत नाहीं आलें असें असतां हालींच्या प्रायश्चित्तास श्रीशंकराचार्य सुद्धां संमतें करून केले

असें श्रवणांत आलें असतां क्षेत्रस्थांनीं फटकट करावयास कारण काय हें आपले ध्यानांत आलें असल्यास सविस्तर त्याहात्रयासी आज्ञा करावी आपणां कारणें भाजी पाा आहे घ्यावी बहुत काय लिहिणें सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

लेखांक २४४]

श्री

स्वस्ति श्रीमच्छांतादुर्गाचरण नलिनांतःकरणसारासारवि-
चारधुरीणेषु श्रीसद्विद्यादिसकळगुणगणविराजमानकृत-
राजसन्मानश्रीकल्पतरूपमानसरस्वतीराजहंसायमानस्वान्न-
दानसंतानसंतोषितविद्वज्जनजेगीयमानयशःपूरकर्पूरसंपूरि-
तदिक्नाकेषु श्रीमन्मंत्रिकुलावतंसश्रीश्रीभास्कररायप्रभुवर्येषु
आश्रितांतर्गतश्रीमन्निखिलवसुधातलक्षेत्रावतंसश्रीकरहाटकस्थसमस्तविद्वद्वृं-
दानामनेकाशीराशयः शर्मदा भूयासुः अत्रत्य कुशलं भव्यमव्याहतम-
नुदिनमेधमानमुस्मःविशेषस्तु

सुज्ञं प्रति विशेषः किमु लेखनीयमित्याशीःसहस्रमजस्रम् ।

लेखांक २४५] [बाळबोध

श्री

वेदशास्त्रसंपंन्य राजमान्य राजश्री तात्यादी(क्षी)त गिजरे
याशि

प्रति नागेशदीक्षित ढवळिकर साष्टांग नमस्कार विनंती उपारि अपला नीरोप घेउन अलो ते सोमवारि प्रहर दिवसास पोचलो येथिल वर्तमान बापू व गोळंभट्ट या उभयतास आणुन अपले विराडि बशिविले या उपरि राजश्री हरिपंत ठाणेदार नवनीत राा गोविंद वासुदेव याचा तरफेने अहेत त्याच कडुन बोलावणे अले त्या वरून वाड्यात गेलो त्याचे अमचे बोलणे बहुत जाहाले परंतु काहि ठरले नाहि त्यास ठाणेदार

याचे बोलणे वाळवेकर या पासोन कागद लिहुन घेतो: कि पूर्वापार कऱ्हाडकर या शिवाय पदप्रायश्चित करित आलो ऐेशि पूर्वणि करून देतो पूर्वणि॰न जाहल्यास सरका(रा)चे गुणेगार या प्रमाणें अह्मास पत्र मागतात हल्लि वाळते दोंवे वेउन यावे तर सरकारातुन चवक्या ठेविल्या अहेत अल्हि अणु लागिल्यास अमचा हातुन हिरावुन घेतात या विषि राजश्री अबाजी शंकर याचे पत्र वाळव्याचा ठाणेदारास तेथिल ब्राह्मण कऱ्हाडास पाठउन देणे ऐसे परभारा करावे येथे पत्र ठाणेदारास यावे या प्रमाणें रा॥ रामाजी वासुदेव याचे पत्र यावे येथे ग्रामस्त व वाळते वाळवेकर येणे प्रमाणे मंडळी सुधा चार माणसे देउन

लेखांक २७६]

|| श्रीविद्याशंकर ||

श्रीमत्परमहंसादियथोक्तबिरुदांकितशृंगेरीसिंहासनाधीश्वर-
श्रीमच्छंकराचार्यान्वयश्रीविद्याशंकरभारतीकिरकमलसंजाता-
भिनवश्रीविद्यानरसिंहभारतीस्वामिकृतनारायणस्मरणा नि

श्रीमत्सकलगुणालंकरण हरिगुरुभक्तिपरायण राजमान्य राजश्री रत्नाकर विठ्ठल परमभक्तोत्तम या प्रति विशेषस्तु तुमचें कल्याण इच्छित करवीर-क्षेत्रीं श्रीनिकट राहिलों असों तदनंतर येथील कुशल जाणून आपण पत्र पाठविलें पाऊन लिहिला भावार्थ अवगत जाहला तेथें अर्थ कीं केशव सामराज हे अपंक्त होते त्यास सांप्रत स्वामी कडे आले आहेत ते पावन करावे ह्मणून तरी केशवपंताचा विचार आपणास पहिले च सांगितलें च आहे त्या नंतर मठा कडील राजश्री अंताजीपंताचे विद्यमानें शत रुपये पावे तों बोली परंतु आपणा विरहित उरकूं नये ह्मणोन मान्य केलें नाहीं त्या हि वरी आपण लिहिलेस ते आले नाहींत समाधान वाटत नाहीं ह्मणोन क्षेत्रस्थांनीं लिहिलेया वरून आपण विचार मनास आणावा मुख्य आह्मांस आपलें अगत्य जाणोन

शुद्धपत्र देऊन पाठविलें आहे या वरून जो विचार करणें तो केला पाहिजे बोली कराल ती निर्गमा नंतर पत्र द्यावें सुज्ञ प्रति विशेष लिहिणे नलगे

इत्य लम्

लेखांक २४७]

श्री

याद ब्राह्मणभोजन

१ नागेशदीक्षित असामी १
१ बाला ढवलेकर १
१ बाबा गिजरे ४
१ गोपाळभट गिजरे २
१ रामभट प्रियंगू १
१ देदप्पा गिजरे १
१ गणेशदेव १
१ धोंडू वैद्य १
१ कृष्णदेव १
१ भिकंभट ग्रामउपाध्ये १
१ मोरूअण्णा ग्रामउ० १
१ धोंडभट गिजरे २
१ नरसिंहभट गिजरे १
१ कोंडभट गिजरे १
१ नरसू ढवळेकर १
१ गोविंदाचार्य काळे २
१ भाऊ उंब्राणी १
१ राजंभट आराणके ४
१ भाऊ जांबळे १

१ धोंडू पारकर १
१ भाऊ टोपणा १
१ पांडू शास्त्री १
१ अंतोबा लाटकर १
१ भटंभट लाटकर २
१ बालकोबा जोशी १
१ उद्धव जोशी १
१ गोविंद गरुड ४
१ आण्णा उंब्राणी १
१ बाळंभट दुबे १
१ माणिकभट वरुणकर १
१ ताराचंद गोपाला १
१ बापू लाटकर १
१ रामचंद्र बहेकर १
१ नाना वाटेगावकर १
१ जोतभट ग्रामउपाध्ये १
१ बाबाजी घाटे १
१ नरसिपूरकर असाम्या १
१ हरभट जोशी कडेगांवकर १

१ भाऊ उंब्राणी धाकटा १
१ सखंभट ईगीन १
१ बाबा वलवडे १
१ बाळकोबा वलवडे २
१ माणकू जोसी १
१ सांगवडे २
१ रुद्रापा अयाचित १
१ कासीनाथ दीक्षीत १
अयाचित
१ येळगावकर २
१ आबा नेरलेकर १
१ बावा जोसी १
१ रावोबा जोसी १
१ भाऊ कडू १
१ बाळ जोशी १
१ रामकृष्ण जोसी २
१ मोर जोसी १
१ बाबू ढवळेकर १
१ सिनूकाका १
१ तात्या टोणपा १
१ बहेकर आजरभट ४
१ गुंडाचार्य घळसासी १
१ सिव पाटक ६
१ सखोबा आटकेकर १
१ बापू आटकेकर १
१ दादा वारुंजीकर १
१ हणंमत उंब्रांणी १
१ बापू विदार मूल लंग १
१ बाबा विदार १
१ भाऊ अयाचित १
१ भैरालभाऊ १
१ कृष्णंभट विदार १
१ हरभट मोघे १
१ केशवभट गुर्जर १
१ रामजोसी बेलवडेकर १
१ यानी घरमंडळी सुद्धा
१ बाबाजी जोसी वडगावकर १
१ पुरणपोळे १
१ भाऊ-धोंडी १
१ सखंभट कारवेकर २
१ विठ्ठलाचार्य घळसासी १
१ नारायणभट नासीककर १

रुपये काढून आणिले त्याची नावनिसी परंतु घेतले नाहींत.

१ रघुनाथ दीक्षित गिजरे
१ रामनाना गिजरे
१ दाजी दीक्षित गिजरे
१ बाबाचार्य घळसासी
१ अंतोबा दादा घळसासी
१ आपा दीक्षित ढवळेकर

लेखांक २४८]

श्री

श्रीकृष्णककुद्मतीप्रीतिसंगमो जयति

स्वस्ति श्री समस्तवेदपरायणब्राह्मण क्षेत्रकराड यानि याविराजित राज॰ मान्य राजश्री हिरोजी पा॥ व रुद्राजी पाटील व समस्त मौजे अतीत ता॥ उंब्रज आशीर्वाद उपरी तुह्मीं पत्र पाठविलें तें पावलें व तकरीरा पाठविल्या ते पावले लिहिला अभिप्राय अवगत जाहला धनाजी पा॥ व नथू कांब्रे याचा करीना कैसा आहे तो सत्य स्मरून लेहून पाठ॰ विणें ह्मणऊन लिहिलें तरी पुरतुलाखान कडेगांवास आले मुलकांत धामधूम जाली तमाम गांव जाऊन कौल घेऊन आले ते समयीं सैदा॰ पुरास हि रोखा आला त्यास धनाजी रोखा घेऊन आह्मां कडे आला आपण कौलास जावें कीं काय ह्मणऊन आह्मांस विचारिलें त्यास आह्मीं सांगितलें जे टाणे जवळीक गांव आहे येकायेकीं भेटायास येत नाहीं आह्मा वरी शब्द येईल तुह्मी भेटों नका वसंतगडास जाणें मग पुढें कैसा विचार होईल तो मनास अणून त्या सारखी वर्तणूक करणें ह्मणऊन त्यास सांगितलें त्यास तो निरोप घेऊन गांवास गेला गांवीं अवघे आपले भाऊबंद बैसोन विचार केला कीं मुलूक अवघा जाऊन भेटला आह्मी पळालियानें पुरें पडत नाहीं जाऊन भेटावें ऐसा विचार केला मग भेटीस जावें ऐसें जाहलें मग वेदमूर्ति वासुदेव

लेखांक २४९]

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री समस्त ब्रह्मवृंद क्षेत्र-
श्रीकरहाटक यासी

प्रति बाळंभट बीन रामचंद्रभट व बाळंभट बिन भाऊभट ज्योतिषी को॥ बिलासी पो॥ सिराळें कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील क्षेम ता॥ पौष वा॥ ३० पावे तों यथास्थित असे विशेष काल चतोर्दशी मंदवार रोजीं सिराळें येथें श्रीजगद्गुरु स्वामी यांणीं आह्मांस बोलावणें

केलें त्याज वरून आह्मी तेथें गेलों नंतर सिरालकर यांणीं बोलणें स्वामी पाशीं काढलें कीं बिलासकर हे कराडकर याचे अनुमतें वागतात व आह्मांस क्षेत्र असें ह्मणत नाहींत. त्या पेक्षां याचें आमचें ठरऊन दिल्हें पाहिजे बिळासकर यांणीं आह्मांस सदर दोन्ही मार्ग चालणार नाहीं असें लिहून द्यावें असें श्री पाशीं त्याचें ह्मणणें पडले वरून आह्मीं विनंति केली कीं हें वर्तमान कराडकर यास कळवूं नंतर त्याचें उत्तर येईल तसें करूं असें ह्मणून हें पत्र तुह्मांस लिहिलें आहे तर आपण उदईक श्री ची स्वारी असेल तेथें येऊन पोचावें अनमान होऊं नये स्वारी सिरालेंत च आहे न येणें जाहलेस पत्राचें उत्तर पाठवावें नंतर आह्मीं तें सांगतील तसें ऐकूं कळावें हे विनंति

सह्या

१ सही बाळंभट बिन रामचंद्रभट बिळासीस्कर जोशी

१ सही बाळंभट बिन भाऊभट जोशी

लेखांक २५०]

श्री

नकल

स्वस्ति श्रीमत्सकलसौभाग्यनिदानभूतमहालक्ष्म्याराधि-
तचरणासु पतिव्रताधूरिणासु देवब्राह्मणप्रतिपालकसंधासु
मातुश्रीलक्ष्मीबाईल्याभिधासु प्रतिनिधिषु

आश्रित तात्या दीक्षित गिजरे वास्तव्य क्षेत्रकरहाटक कृतानेकाशिषः समुल्लसंतु विनंति येथील वर्तमान ता। ज्येष्ठ वा। १२ पर्यंत यथास्थित असे विशेष दर्शनास बहुत दिवस जाहले येण्याचा मानस परंतु प्रस्तुत पर्जन्या मुळें घडलें नाहीं येथें श्री पाशीं प्रार्थना करीत आहों आपले मनोदयानरूप श्री करील चिरंजीव अनंतभट पंगु याचे चालविण्या विसीं श्रीमंत यजमान स्वामी याज पाशीं मसूरचे मुकामीं विनंति केली त्याज वरून कृपाळु होऊन मौजे भुरभुसी हा गांव पडीक शंभर रुप-

यांचे आकाराचा इनाम करून दिल्हा आहे त्याचे लावणीची खटपट हालीं करीत आहे त्यास वो राजश्री सखंभट वैद्य यांज पाशीं त्या गांवचें पत्र श्रीमंत कैलासवासी कृष्णाजी परशराम याचे नांवचे ऐसीं नवद वर्षाचें आहे ह्मणोन ऐकितों त्यास श्रीमंत कैलासवासी थोरले रावसाहेब यांज पासून गुदस्त पावे तों सुभा कडे वसुली तो गांव यजमान स्वामींनीं पंगूस दिल्हा आहे त्या पेक्षां चालविणार धनी समर्थ अहेत आपणास मजकूर श्रुत असावा यदर्थी लिहावयाचें कारण सारांश पंगू याचे स्थापनेचा उच्छेद नसावा श्रीमंत साहेब यांणीं वृक्ष लाविला आहे यास च कृपोदकसेचन करून वृक्षाची वृद्धि असावी आपले सत्कीर्तिगुणानुवादश्रवणें करून निरंतर संतोश आहों बहुत काय ल्याहावें लोभ केला पाहिजे हे विनंति

लेखांक २५१]

श्रीसांबसदाशिवो जयति

श्रीमदुमारमणचरणपरायणांत:करणनिखिळगुणगणभूषण-
महाराजशाहूभूपतिचक्रवर्तीप्रतिनिधिमूर्तिश्रीश्रीपतिरावसं-
म्राटस्थपतिवाजपेयीप्रभुवर्योत्तमेषु

आश्रितांतर्गतश्रीकरहाटकक्षेत्रस्थसमस्तब्राह्मणकृतानेकअशिर्वाद उपरि येथील कुशळ कार्तिककृष्ण पंचमी जाणोन स्वीय कुशळलेखनाज्ञा केली पाहिजे विशेष अमचे क्षेत्रस्थ ब्राह्मण तेथे सदैव यजमान गृही राहताति ते सांप्रत अपल्या दर्शनास येउन समस्त ब्राह्मण अमचा द्वेष करिताति या स्तव क्षेत्र वियोग करूं आह्मास जे स्थळ याल तेथे राहू ऐसे बोलताति हे वर्तमान ऐकिले ह्मणून हे पत्र लिहिले समस्त ब्राह्मणाचे प्रतिपाळक महाराज अपण राजसदश कर्मज्येष्ठ ब्राह्मणोत्तम आहेत समस्तानी त्यांचा व्यतिक्रम काय काय केला तो त्यास पुसोन अह्मास जे आज्ञा करणे ते करावी समस्त मान्य करूं त्यांचा अमचा सप्तपुरुष कळह नाही सांप्रत चारी मास ते भिन्न स्तोम करून समस्तांचा द्वेष

करिताति ते च समस्तांचा अपवाद सांगताति हा परिहार पत्रे करून होत नाही राजश्री अंण्णा सर्वज्ञ आहेत ते अपण एकत्र बसोन अह्मास बुद्धिवाद सांगोन जे करणे ते कळह निवारण करून केले पाहिजे हे ऐकून अम्हि च यावे परंतु अपली आज्ञा होईल तेंव्हा यावे त्यांचा अमचा कळहाचे कांहीं निमित्त नाही कळह बाबादीक्षिताचा ते गेले आतां पूर्ववत् अपल्या गृही सत्कर्माचरण करून राहावे हे शिष्टास श्रेयस्कर आहे बहुत काय लिहिणे परंपरा जे चालते तसे त्याणीं अम्ही चालावे म्हणजे कळह होणार नाही क्षीरनीरविभाग करणार राजहंस प्रभु विवेकी असतां अन्याये वर्तेल तो तें च सुख पात्रेल कृपावर्धमान करणे हा अशिर्वाद श्रीः श्रीः श्रीः श्रीः श्रीः

लेखांक २५२]

श्री

वो राजश्री तात्या दीक्षित गिजरे यांसी

प्रति अनंतभट वारुणकर साष्टांग नमस्कार विनंति उपरि श्री स्वामी कडील व्राळितपत्र मौजे नाटवडे येथे आलें त्यास त्याचे घरीं अन्नोदकवेव्हार न करणें ह्मणोन ताकीद जाहली परंतु क्षेत्रांतील असामी बि॥

१ तात्या अयाचित असामी २	१ प्रलादबोवा गोसावी सेरकर
१ बाबदेवभट वारुणकर	३ तेरीज
१ जिवाजी खंडो जोसी मौजेमजकूर	—
	४
—	
४	

येणें प्रमाणें क्षेत्रांतील असामी यांणीं भोजन केलें आणखी कोणी येतील त्यास न येणें विसी ताकीद करावी आणि आमचे गोटांतील असामी २ दोन सर्वांस टाकून भोजनास गेले त्यास पेशजी आपण ताकीदपत्र पाठविलें परंतु मानीत नाहींत तर त्यास मसाला करून घेऊन जावें उभयतांस आमंत्रण न करणें विसीं देशमूखदेशपांडे व समस्त ब्राह्मणांस पत्र पाठवावें राजश्री जगन्नाथपंत आबानीं अभू विसीं पाठविलें

आहे त्यास वो। राजश्री बालकंभट पुणेंहून आले असल्यास त्यांचे विच्यारे करार करून ल्याहवें अगर आपण संविस्तर ल्याहवें बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंति

पेशजी बहिरो आपाजी याचे घरीं सांवसर्गिक दोष घडला ह्मणोन पत्र आलें त्याची इतिकर्तव्येता काय ती लिहून पाठवावें त्याज प्रा वर्तणूक केली जाईल हे विनंति

लेखांक २५३]

श्रीअंबा प्रा

तीर्थरूप मातोश्री बाई व राजश्री नाना स्वामी वडिलांचे सेवेसी

बालके आनंद रामाने चरणा वर मस्तक ठेऊन सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ २४ माहे मोहरम सुकुरवार पर्यंत मुकाम वडगाव पर्यंत वडिलाचे आसीर्वादे करून सुखरूप असो या नंतरी तुह्मा कडील वर्तमान कळत नव्हते तो चांदाच्या मुला बरोबर पत्र आले त्याज वरून कळले मूल गेलें हें वर्तमान ऐकून मनात खेद जाहाला ईश्वरसत्तेस उपाय नाही आह्मा कडील वर्तमान तारीख १७ रो। युद्ध झाले श्रीमंतास यश आले त्या कडील दोन चार से खासे जखमी जाहले से पनास ठार झाले दोन हात्ती जरीपटके सुद्धा व दोनसे घोडी पाडाव इकडी आली आता कूच करून पंचगंगे वर करवीरच्या रोखास जाणार काय घडेल पाहावे तुह्मा कडील वर्तमान वरचेवर लिहून पाठवित जावे दारा पुढील कुसू पाच हात उंची प्रमाणे घालवणे चार रुपये पडले तरी देणे गावकीचे लिहिणे बहुत चौकसीने करीत जावे महिना पंधरा दिवसी तट्टाचा ऐवज पाठेऊन देतो चिंता नाही घरी बहुत सावधपणे असावे सेताची मेहनत चाढ टेवणे बैलास पेंड सरकी खर्च करीत जाणे सोवळी दोन किंमत पा। पावणेतीन रुपयास करून पाठविली आहेत घेऊन परत कोणी येईल त्याज बरोबर उत्तर पाठविणे लक्ष्मण-

३८ ऐ. मा.

राव बाबा बरोबर आहो भिकाखानाची आसामी चालवितो + + +
+ + + +

लेखांक २५४]

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री रामजोशी आपा व
आबा व बापू व भास्करभट पंढरपुरे यांसी

प्रती राघोबा गिजरे व दाजीदिक्षीत गिजरे व बाबाचार्य घळसासी साष्टांग नमस्कार इकडील मजकूर तरी परशरामक्षेत्रास मंडळी लग्नास गेली होती त्यास तेथील वर्तमान इकडील मंडळीस सीमंतपूजनास व देवकप्रतिष्ठेस व लग्नसमयीं ऋक्चवास व भोजनास अगदीं बोलाविलें नाहीं व भुयसी दिली नाहीं नवऱ्या कडे ग्रहयज्ञ जाहला त्यास इकडील मंडळीस होमास लाविलें नाहीं ह्मणून ब्राह्मण तिकडील च होते येक दिवस बळें च भोजनास तिकडे येतो ह्मणोन गेले त्यास त्यांनीं निरनिराळी पंगत आमचे कडील वैदिक मंडळीची बसविली इकडील क्षेत्रांतील वर्तमान वर्षप्रतिपदेस सरकारांत सालाबाद प्रमाणें पंचांगश्रवण समस्त मंडळी जाऊन जाहले हुकूम सरकारचा कसा होता तो तुह्मांस माहीत आहे त्या प्रमाणें राजश्री चिंतोपंत आबानीं विठ्ठलपतांस सांगितला परंतु त्यांनीं तिकडील मंडळींचे मनोदयानुरूप केलें त्यास सरकारचें निकालपत्र बंदोबस्ता विशीं आल्यास नीट पडेल आणि आमची आबरू राहील ये विशीं पत्र अगत्य आलें पाहिजे पत्रा शिवाय भास्करभटास पाठवूं नये हे नमस्कार

लेखांक २५५]

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री समस्त ब्राह्मण क्षेत्र कराड

१ रघुनाथ दीक्षित गिजरे

१ नागेश दीक्षित काका ढवलीकर

१ अणादीक्षित उमराणी
१ गोविंद दीक्षित भाऊ गरूड

यासी प्रति कृष्णभट वैद्य व बाळदीक्षित अर्णिके याचा साष्टांग नमस्कार विनंति येथील क्षेम ता। श्रावण वा। १ पावे तों आपले कृपें करून मुकाम इसलामपुर येथें वर्तमान उत्तम असे विशेष येथील ब्राह्मण्यप्रकर्णी मा।र सविस्तर लिहून लाखोटा करून शु।। ११ एकादशीचे रोजीं पाठविला होता तो गडी श्रीमंत राजश्री मंत्री सरकारचा आपले कडे पोंहचून पत्र पावलें न पावलें अद्याप उत्तर आलें नाहीं त्या वरून काळजी लागली आहे त्याज करितां पुन्हां आणखी हें पत्र लिहून पा। आहे व मुजरत या च कार्या करितां गडी पाठविला आहे सारांश कुरळपकर कुळकर्णी याज वर मोठा च दोष असतां क्षेत्रास जाऊन शुद्ध व्हावें ते न करितां इसलांपूरकर ब्राह्मण यांणीं च कुळकर्णी यास शुद्ध केला क्षेत्राची आह्मांस गरज नाहीं आह्मी पुसलें असतां तुह्मी कोण पुसणार ह्मणतात व क्षेत्राची निंदा करितात हें ऐकवत नाहीं इसलामपूरकर ब्राह्मण यांनीं शुद्ध कसा केला हे संभवत नाहीं आसपास भोंवरगांवीं वगैरे मंडली व इसलामपूरचे राजकीय प्रहस्त कसे करावे ह्मणून आपआपले ठिकाणीं विचारांत च आहेत विना कराडकर यांनीं शुद्ध ह्मटल्या खेरीज ते हि पंक्तीव्यवहारास कोणी धजत नाहींत आपापले ठिकाणीं दबदबून आहेत या स्तव आपले येणेची मार्गप्रतीक्षा करीत आहों विना आपलें येणें जालें खेरीज बंदोबस्त होऊन खूळ मोडत नाहीं या करितां पत्रदर्शनीं सहस्र अडचणी असल्या तरी या समयीं त्या अडचणी ठेवून येणें प्राप्त आहे याज करितां कृपा करून पत्रदर्शनीं सत्वर निघोन यावें ह्मणजे सर्व बंदोबस्त होईल आपलें येणें जाले खेरीज कांहीं बंदोबस्त होत नाहीं विशेष क्षेत्राची निंदा करितात तो श्रवणें करून ऐकवत नाहीं त्या पेक्षां क्षेत्राचा अभिमान आपलेस असावा हें जाणोन इतकें विस्तारें लिहिलें आहे सहस्र वाटेनें

विशेषस्तु अह्मी स्वामीचा दर्शनास पूर्वी अलो होतो ते समई वर्षासना विषयि विज्ञप्ति केली होती परंतु अवकाश पडला नाहि अतः कारणात् सूचनार्थ पत्र लिहिले तर पितृदत्त वार्षिक स्वामींनी निरंतर चालवावे यदर्थी श्लोक । अपरं च ।

आशु विस्मरसि दत्तमर्थिने
विस्मरस्यपकृतं परेण यत् ॥
पितृदत्त मभिवर्धय राजन्
प्रार्थयामि हृदि तं न विस्मर ॥

अपरं च ।

पितृमात्रप्रजैर्दत्तं द्विजेभ्यो यच्च किंचन ॥
तच्चालयंति ये राजन्नमृतत्वं भजंति ते ॥
त्वत्कीर्तिमौक्तिकफलानि गुणैस्त्वदीयैः
संदर्भितुं विबुधवामदृशः प्रवृत्ताः ॥
नांतो गुणेषु न च कीर्तिषु रंध्रलेशो
हारो न जात इति ताश्च मिथो हसंति ॥
अभिमतफलदाता त्वं च कल्पद्रुमश्च
प्रकटमिह विशेषं कं च नोदाहरामः ॥
कथमिव मधुरोक्तिप्रेमसंमानमिश्रं
तुलयति सुरशाखीदेवदानं त्वदीयं ॥ इति ॥
नित्यं ब्रह्म यथा स्मरंति मुनयो हंसा यथा मानसम्
सारंगा जलदागमं वनगजा ध्यायंति रेवां यथा ॥
युष्मद्दर्शनलालसा प्रतिदिनं युष्मन्स्मरामो वयम्
धन्यः कोपि स वासरोत्र भविता यत्रावयोः संगमः ॥

श्रीमत्सु विशेषः किमुल्लेखनीय इत्यलं पल्लवितेन ।

आपलें येणें व्हावें हें चांगलें च न च जालेस निग्रहाचें पत्र इसलामपुरास येक व नुरठाणेस येक देऊन ग्रामस्थ जोशी यास पत्रदर्शनीं पाा द्यावें ह्मणजे थोडेसें खूळ मोडेल या स्तव पत्रदर्शनीं ग्रामस्थ जोशी यास पुढें पाा देऊन आपण मागाहून येणेचें करावें बहुधा आपण च आले खेरीज निर्वाह नाहीं सदरहू नुरठाणेचे ब्राह्मणाचें प्रकर्ण येक व दुसरा चिंतोबा ह्मणोन ब्राह्मण येक आहे त्याचें हि येक प्रकर्णीं तदन्वयें च आहे तो मजकूर पूर्वपत्रीं लिहिला च आहे त्या वरून कळेल त्यास आपलें येणें जालें खेरीज बंदोबस्त होत नाहीं त्यास सहस्र अडचणी ठेऊन या बंदोबस्ता विषयीं आलें च पाहिजे आपले येण्यास अवधि लागलेस पुढें ग्रामस्थ जोशी यास निग्रहाचें पत्र देऊन पाठवावा या पत्राचें उत्तर पुढें पाठवावें बहुत काय लिहिणें हे नमस्कार

लेखांक २५६]

श्रीक्षेत्रपाळो जयति

स्वस्ति श्रीमत्संपूर्णजलधिवेलावलयतिलकायमाननिखिलभूपालमौलिमालामिलन्मुकुटमणिमरीचिमंजरीपिंजरितमंजुपादांबुजेषु विलसदनेकगद्यपद्यविद्याविनोदद्योतिकृद्विद्यापतिविद्याधरप्रमुखमुखोदीर्यमाणकीर्त्तिप्रवाहेषु स्वदानसंतानसंतोषितविद्वज्जनजेगीयमानयशःपूरकर्पूरसंपूरितदिङ्गकेषु श्रीमन्महाराजाधिराजश्रीछत्रपतीषु

श्रीमदीयकृपावलोकननिरातंकसमासादितश्रीकरहाटकक्षेत्रस्थतीर्थपुरोहितगिजेरइत्युपनामकविश्वेश्वरदीक्षितकृतानेकाशिषः शर्मदा भूयासुः । अनंतरं मधुबहुळद्वादश्यवधि भवदीयराज्यस्य क्षेम चिंतयन् श्रीसन्निधौ वसामि ।

अनुदिनमनुगांगं शैवमभ्यर्च्य लिंगं
भवदुदयपतंगं तुंगमभ्यर्थयामि ॥
मम सकलपुमर्थानंदसंदोहकर्त्ता
स जयति भगवान्वा दैत्यहर्त्ता भवान्वा ॥

लेखांक २५७]

श्री

यादी समस्त ब्राह्मण क्षेत्रकराड याचे व सिराळकर याचे वागणुकी आचारव्यवहारपदप्रायश्चिता बद्दल खटले होऊन ग्रामण्य तंटा जाहला सिराळकर याचे पंक्तीस कोणी भोजन करुं नये आपल्या घरीं सिराळकर आले असतां त्यास पंक्तीस घेऊ नये जो कोणी घेईल त्यास पंक्ती बाहेर राहावे असा निर्बंध ठरला आहे तर याविसि संमते

लेखांक २५८] [बाळबोध

श्रीशंकर

स्वस्ति श्रीमांन्निखिल वसुधामूर्धावतंसआदिमहासंस्थानद-
क्षिणवाराणसी क्षेत्रकरहाटकस्थ वेदशास्त्रसंपन्न राजमान्य
राजश्रि समस्त ब्रह्मवृंद

याशि प्रति समस्त ब्राह्मण अष्टेकर व तथा समस्त ब्राह्मण क्षेत्रभिलवडी अनेक साष्टांग नमस्कार विनंति उपर येथील वृत्त आषाढवद्य ८ पर्यंत समस्त सुखरूप असो विशेष अपली क्षेत्रस्थाची पत्रे आलि होति कि विसलांपुरा मध्ये गोळंभट व पुसाळकर आहेत या उभयताचि निर्गत क्षेत्रास येवुन शुध होय तावत्कालपर्यंत त्यास व त्याचे सांसर्गिक आहेत त्याचे घरि दिखिल अंनव्यवहार न करणे या अन्वये अपली पत्रे आलि ती मान्य करून पत्रान्वय व्यवहार करीत आलो प्रस्तुत वैपरीत्य ऐकिले कि विसलांपुरास क्षेत्र आले होते जि गोष्ट न वडायाचि ती कैसि घडलि परंतु न कळे यदर्थि अह्मास संशय झाला आहे अपण थोर आहेत वचनाचे प्रमाण अह्मास वो। मोरदीक्षित अरणके हे बोलिले होते तुह्मि अमचे पत्राप्रमाणे वर्तणुक करणे जे वेळस विसलांपुरकराची शुध्रता होईल ती तुमचे विचारे होईल अरणके याचे व अमचे झाले अपण जे केले ते समजोन च केले असेल विशेष लिहावया शक्ति नाही सुज्ञा प्रति विशेष काय लिहिणे हे नमस्कार १०००० वचन १

लेखांक २५९] [बालबोध

गिजरे याचि वंशावळि

मूळपुरूष रामेश्वरभट्टांस पुत्र तीघ ३

१ नरहारभट्ट

२ कृष्णभट्ट

३ अपदे भट्ट व सोनभट्ट त्यांस शंभुभट्ट०

४ अंतभट्ट

५ नरहरि भट्टांस पुत्र तीघ ३

१ विश्वनाथ भट्टांस ३ दोघ मोरेश्वर भैरव विरेश्वर

२ रुद्र भट्टांस चौघ लक्ष्मण काशीनाथ गदाधर गोपाळ ४

३ अपदे भट्टांस २ नृसिंह्य माहादेव

मूळपु रामेश्वरभट्टास पुत्र तीघ ३ वाईकर

१ रंगभट्ट

१ शंकरभट्टांस पुत्र दोघ २

२ रुद्रभट्ट भानभट्ट २ भानभट्टांस पुत्र ३ कासीभट्ट १ भिकंभट्ट २ अणभट्ट ३

रुद्रभट्टांस पुत्र पांच ५

१ विश्वनाथभट्टास ४

२ गोविंदभट्टास १ गंगाधरास १ विरेश्वर २

३ हरिभट्टास १ भैरवास १ तुकंभट्ट १

४ नृसिंहभट्टास ३ चिंतामणि मेरू राम

५ शंकरभट्टास १ कृष्णभट्टांस १ अनंदभट्ट १

विश्वनाथभट्टांस पुत ४

१ माहादेवभट्टांस २

२ रामभट्टांस १ बाळंभट्ट १

३ विनायक भट्ट०

४ रंगभट्टांस २ हारी

कागदाची मागील बाजू

दुशेरेकराची वंशावळि

मूळपुरुष रामेश्वरभट्टांस पुत्र तीघ

१ गोविंद भट्ट त्यांस पुत्र दोघे

१ शंभुभट्ट पिळंभट्ट १

२ तिमण भट्ट भानभट्ट २

३ नरशिभट्ट रघंभट्ट ३

पुढें नकल ० त्यास पुत्र दोघे

० नारायणभट्ट १०

भास्करभट्ट १

त्यास पुत्र ६

१ गोपाळभट्ट

२ रघूभट्ट

३ कृष्णभट्ट

४ भैरवभट्ट

५ तिमणभट्ट

६ नारायणभट्ट

लेखांक २६०] [बालबोध

श्री

वेदमूर्ती राजेश्री समस्त ब्रह्मवृंद व देशमुख व देशपांडे व जोतिषी व कुलकर्णी व राजकीय गृहस्थ मौजे काळे यांशि

समस्त ब्राह्मण क्षेत्रकरहाटकस्थ कृत नमस्कार व अनुक्रमें आशिर्वाद विशेष पूर्वी पासून आचारव्यवहारपदप्रायश्चित करण्याचा हा अधिकार क्षेत्राचा पूर्वापार असून त्या प्रमाणें वहिवाट चालत असतां पेशजीं जगन्नाथपंत हासबनीस यांज वर कांहीं आरोप आला होता ते समई शिराळकर याणीं क्षेत्राची अवज्ञा केली तेव्हां क्षेत्रस्थ मंडळी जाऊन

शिराळकर यांचा कागद लिहून घेतला त्यांत हाशील कीं क्षेत्राचे आज्ञे प्रमाणें वागणूक करूं आणि पदप्रायश्चित्त पूर्वी पासून तुह्मी करीत आलां त्या प्रमाणें करावें असा आहे नंतर मशारनिल्हे हासबनीस यांज कडून प्रायश्चित्त करऊन शुद्ध केलें असें असून हालीं विनाकारण शिराळकर दांडगाई करितात या स्तव ते क्षेत्राचे द्रोही आहेत त्यास शिराळकर व बिळासक ज्योतिषी यांसी व यांचे घरीं अन्नोदकव्यवहार येकपंक्ती कोणीं करूं नये असा निर्बंध ठेवावा आणि श्री स्वामी शंकराचार्य यांचें पत्र शिराळकर यानीं आणिलें असतां मान्य करूं नये पत्राचें उत्तर यावें.

लेखांक २६१] [बाळबोध

श्री

श्रीमंत राजेश्री बाबासाहेब व रावसाहेब व भावुसाहेब
मंत्री मजरे तुकाईचि वाडी

याशि शुभचिंतक समस्त ब्रह्मवृंद क्षेत्रकऱ्हाटकस्थ अशिर्वाद विशेष नाना व शितारामभट बिन कृष्णभट उंबराणि पालकर यानि अमचे देशातिल पूर्विपासून सांप्रदाय मठाधिपत्याचा नसून श्री स्वामि जगद्गुरु याज पासून मठाधिकाराचे अपले नावे मशारनिले यानि पत्र करून घेतले परंतु पदप्रायश्चित्त वगैरे अचारव्यवहार जे कर्णे ते क्षेत्राहुन होत अले त्याचि माहिति अपणास हि आहे असे असोन हा क्षेत्राचा अधिकार अपण करावा या दुरबुध्धिने पत्र करून घेतले हा मजकूर क्षेत्री श्रुत जाहला या स्तव ते क्षेत्राचे द्रोहि आहेत याज करिता अपणास लिहिलें आहे तर भडजि उंब्रराणि याशि व याचे घरि अन्नोदकव्यवहार कोणि करू नये असा निग्रह ठेवुन पत्राचे उत्तर यावे कळावे बहुत काय लिहिणे लोभ करावा हा अशिर्वाद मिति फालगुन शुध्ध ५

क्षपणा केला आह्मी वेगळे होत नाहीं ह्मणो लागले तेंव्हां दिवाण माणूस लाऊन वेघळे घातलें ते समई आपण बोलिलों जे चवथा प्रमाणें माझ्या मुलाचें लग्न करून देणें तेंव्हां विभाग घेऊं ह्मणोन वांटणीस द्वाही दिली मग तिन्हाइतांनीं लग्न करून द्यावें ह्मणोन सांगितलें असतां त्याची वांट कांहीं च नाहीं बळें च वांटा घेणें ह्मणोन तसती करूं लागले मग आपण उसालिखाहून पूर्वीं त्रिवर्ग बंधू क्षेत्रकऱ्हाडास आले होते सबब आपण क्षेत्रमजकुरास येऊन उभयेतां बंधूस क्षेत्राचें पत्र पाठविलें मग आणिलें आणि आह्मांस आज्ञा केली जे तुझें बोलणें काय तें लेहून देणें त्यास माझ्या मुलाचें लग्न साऱ्यांनीं करून द्यावें मग चवथा हिसा जरा व जरा कागद व पोथी पुस्तक भांडीं वगैरे वित्तविशय द्यावा येणें प्रमाणें बोलणें आहे सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना शके १७०८ पराभवनामसंवत्सरे माघशुद्ध द्वितीया

तपसीलवार कलम

१ वस्त सोनें व रुपें
१ भांडीं देखील + + पर्यंत
१ कापड नवें जुनें
१ हात्यारें
१ कागदकतबे
१ दाणे हरजिनस
१ लस्कराहून मनोहर व सखाराम यांन काय मेळवून आणलें त्याचा विभाग द्यावा
१ हिसेब घरचा आह्मांस समजाऊन द्यावा कलम १
१ मुलाचें लग्न करून द्यावें
१ दुसेरीयाची गांवकी जोसीक पतकरिलें त्या वरून उठवून आह्मांस पळविलें त्याचा मुशाहिरा द्यावा

१०

१ इनामाचा वांटा द्यावा
१ वतनाचा विभागाचा हिसा द्यावा
१ गुरें व घोडीं
१ कुणगा झाड पिछाडी करून द्यावी
३ कर्ज वाम
  १ देणें लोकांचें
  १ व घेणें लोकां कडील उगवलेंवर घ्यावें
  १ बूड काय जाहली

१७

लेखांक २६२] [बाळबोध

श्रीराम

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री समस्त ब्राह्मण क्षेत्रक-
राड या प्रति

स्नेहपूर्वक समस्त ब्राह्मण कसबे चाफळ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहित असावें या नंतर वो रा हरभट आठल्ये याचे घरीं कांहीं आरोप आला आहे त्यांस येथील ग्रामस्तां पैकीं कोणीं भोजन न करावें ऐसें ठरावलें नंतर भटजी मजकूर यास सांगावयास गेलों त्यास त्याचे जामात वो राजश्री यज्ञेश्वरभट तांबे क्षेत्रमाहुली हे येथें आहेत त्यांणीं हरभट याचा पक्ष धरून अह्मी पावन करितों नंतर अह्मीं उत्तर केलें कीं अह्मांस श्रेष्ठ श्रीकराड तुह्मी हि गोष्टीचा अभिमान धरू न ये तें न ऐकितां आह्मांस शब्द लावितात आणि अभीमान धरून हरभट याचे पंक्तीस भोजन करितात त्यास आपणांस पत्र लिहिलें आहे तर आमचें पत्र जमेस न धरितां परभारें श्रवण जाहालें आहे तर तुह्मीं याची चौकशी होई तों पर्यंत भोजनास तुह्मीं न जाणें या प्रमाणें एक पत्र हरिभक्तपरायण राजश्री बावास व एक पत्र ग्रामस्तांस ऐशीं दोन पत्रें सायंकाळ पावेतों येऊन पोहोंचेत ऐशीं केलीं पाहिजेत मिति भाद्रपदशुद्ध १३ बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंति

लेखांक २६३[1]] [१७०८ माघशुा २

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री समस्त ब्राह्मण क्षेत्रकराड
स्वामीचे सेवेसीं

करीणा वो कृष्णाजी बल्लाळ सुा सबा समानीन मया अलफ तीर्थस्वरूप भिमाजीबावा याचे पुत्र उभयतां लस्कराहून घरास येऊन विभ-

---

१ लेखांक २६३ पासून वाटणीपत्रांस व दत्तकासंबंधींच्या कागदपत्रांस सुरवात झाली आहे.

सदरहू धाकटे भाऊ सदाशिव गोसावी याचा विभाग वांटणीस येईल त्या प्रमाणें आपण विभाग घेऊन समजोन राहूं यासी नवदीगर करूं तर देवाचे अन्याई

लेखांक २६४] [१७०८ माघबा। ५

श्री

करीना भिवाजी गोसावी सुा सबा समानीन मया व अलफ लेहून दिल्हा करीना ऐसा जे आह्मी सारे एकत्र होतों घरांत बनेनासें जाहलें सा। वेगळें निघावेसें जाहलें तेव्हां अवघे बंधू मिळोन त्यांचीं नांवें वडील बाजीपंत त्याहून धाकटे जोतीपंत ते मृत्य पावले त्याचे पुत्र सखारामपंत तिसरे आह्मी भिमाजी गोसावी चवथे कृष्णाजीपंत पांचवे सदाशिव गोसावी ऐसे मिळोन तिन्हाइता कडे हरिपंत याचे वाड्यांत गेलों कीं आपले आपल्यांत समजावें तेव्हां तेथें खटखट जाहली तेथून मग पंचाईत नांवनिसी राजश्री विटलपंत कुलकर्णी व हरीपंत व वेदमूर्ति श्रीपादभट नि।। घोरपडे व जिबाजी पाटील ह्मणों लागले कीं तुह्मी आपलेल्यांत कजिया करितां त्यास तुह्मी जामीन अवघे जण निराळे निराळे देणें त्या वरून अवघ्यांनीं जामीन सदरहू पंचाईता जवळ दिल्हे मग त्यांनीं विभाग करून दिल्हे तीर्थस्वरूप बाजीपंत यांचे व अवघ्यांचे विद्यमानें करून दिल्हे त्या प्रमाणें ज्याचा विभाग त्यांनीं घेतला आणि आपलेले घरास गेले नंतर कांहीं येक दिवस गेले तेव्हां कर्जदार विठल रघुनाथ कुलकर्णी याचें कर्ज आह्मां कडे वारावें ह्मणों लागले ते पैका मागूं लागले त्यास वाटे केले ते समई सोनें बूड चोरांनीं नेलें ५ व आमच्या सासऱ्यानें भक्षिलें ५ येकूण तोळे सुमारें १० दहा ते आमच्या विभागांत धरिले व बाजीपंत याज कडेस ३ व सखाराम याज कडेस तोळे ५ व कृष्णाजीपंत याज कडे २ तोळे व सदाशिव बावा याज कडे० येकूण तोळे २० वीस हे विभागानरूप सर्वत्रांनीं मोड सोसावी ते न करितां आह्मा येकट्या वर दाहा तोळे सोनें चोरांनीं नेलें

व सोइऱ्यांनीं भक्षिलें तें आह्मां वर घातलें त्याचा फडशा करून देणें ह्मणोन आह्मां कडे कर्ज घातलें आहे त्याचें मन मनाऊ ऐसी कटकट सदाशिव गोसावी व आह्मी करूं लागलों तेव्हां कर्जदार यांनीं सदाशिव गोसावी यासी निकड केली कीं आमचा कर्जाचा निकाल करून देणें त्याज वर कर्जदारास काय सांगितलें न कळे आणि सदाशिव गोसावी दिवाणांत राजश्री मालोजी घोरपडे यांचा कारभारी याज कडे गेले आणि अह्मां वर पांच रुा मसाला करून आमच्या पाठी मागें माणसें लावून बेअब्रू करूं लागले संध्याकाळपर्यंत उपोषण जाहलें तेव्हां संध्याकाळीं च्यार पंचाईत व हकीम म्हणों लागले कीं कर्जदाराचे मन मनावणें मग तुमचा फडशा सोन्यावानेचा करून देऊं त्या नंतर आम्हांस रात्रौ भोजनास निरोप दिल्हा नंतर कर्जदार याचें आम्हीं मन मनाविलें आणि पंचाइता कडे गेलों कीं सावकाराचें मन आम्हीं मनाविलें पुढें आमचें मनास आणून दिल्हे लावणें ऐसें करितां कांहीं येक दिवस गेले तों आणखी आपल्या आपले मधें कटकट होऊन बाजीपंत व आम्ही क्षेत्रास कऱ्हाडास साल गुा आलों बाजीपंत निघोन देवास रत्नागिरीस गेले उपरांतिक सदाशिव गोसावी हि कराडास आले तेव्हां बाजीपंत येथें नाहींत तेव्हां कटकट होईल याज करितां आम्हीं वेदमूर्ति वेंकणजोसी यांसीं विचारिलें कीं बाजीपंत देवास गेले सदाशिव गोसावी येथें आले तेव्हां व्यंकणजोसी बोलिले कीं बाजीपंत गेले तुह्मीं आपले घरास जाणें त्या वरून आह्मी घरास गेलों मागाहून सदाशिव गोसावी याणीं क्षेत्राहून समस्तांचें पत्र व मसाला रुा २ दोन करून आह्मांस पाठविले त्याज वर आह्मी घरीं न होतों आमचा पुत्र मनोहर व जोतीपंताचा पुत्र सखाराम ऐसे येथें कराडास आले मसाला केला होता तो माणसास दिल्हा येथें क्षेत्रस्तांनीं करार केला कीं तुह्मी अवघे जण गांवास जाऊन गांवीं समजणें येथें खटला करूं नये ऐसें सांगितलें त्या वरून निघोन त्रिवर्ग गांवास आले आह्मांस चिरंजीव मनोहर यानें वर्तमान या प्रमाणें सांगितलें नंतर मध्यें कांहीं येक दि-

वस गेले मग आणखी आह्मी गांवकर यांज कडे गेलों त्यास आमचा कजिया तोडणें त्यांनीं सदाशिवबावा यास कितेके प्रकारें सोन्याचा फडशा विभागास असेल तैसा करावा ऐसें सांगत होते परंतु हे ऐकेनात नित्य याचा आमचा कलह याज मुळें गांवांत ह्मणों लागले कीं येथें तुह्मास सांगितल्यानें तुह्मी कोणी ऐकत नाहीं त्या पक्षीं थळ नेमून देतों स्थळास जाणें ऐसे बोलणें जाहलें ते दिवशीं दीडप्रहररात्रपर्यंत उपोषण जाहलें तेंव्हां गांवकर सारे मिळोन स्थळास जावें ऐसें सदाशिवबावा यास व आह्मांस सांगितलें नंतर स्थळास राजी होऊन नेमोत्तरें लिहून दिल्हीं स्थळ मौजे चिमणगांव हा गांव नेमिला नेमास जावें त्यास सदाशिवबावा स्थलास येईना तेंव्हां ते दिवशीं आणखी गांवकरा कडे गेलों संध्याकालपर्यंत उपोषण जाहलें तेंव्हां सदाशिवबावा यांनीं गांवकरासीं करार केला कीं मी दसरा करून स्थळास जातों व गांवकर यांनीं आह्मांस हि सांगितलें कीं दसरियांत कजिया न करणें दसरा जाहलिया वर स्थळ नेमून दिल्हें आहे तेथें जाऊन फडशा करून घेणें दसरा जाहलिया वर आह्मीं स्थळचिटी घेतली आणि सदाशिवबावा यास स्थळास चला ह्मणून बोलिलों परंतु आले नाहींत आह्मी स्थळास जाऊन स्थळचिटी दिल्ही स्थळकरी यांनीं सदाशिवबावा यांस पत्र पाठविलें तें मान्य न केलें आणि स्थळास आले नाहींत आह्मी स्थळीं महिना भर बसलों उपरांत स्थळकरी यांची चिटी घेऊन गांवास आलों गांवकरास स्थळचें पत्र दिल्हें तेंव्हां पुढें गांवीं पंचाईतांत व हकीमांत आह्मां उभयतांचा कजिया पडला कीं तुह्मीं आह्मां पासोन कर्ज वारविलें आणि सोन्याचा फडशा सदाशिवबावा करून देत नाहींत व स्थळास येत नाहींत तेंव्हां माझी वाट काय ह्मणोन बैसलों तेंव्हां सदाशिव गोसावी यास व कृष्णाजीपंत यास बोलाऊन निकड केली संध्याकाळ पावे तों आह्मां चौघां जणांस बैसविलें तेंव्हां ते दिवशीं सदाशिवबावा बोलले कीं आपण स्थळास जात नाहीं तुह्मी चौघे सांगाल त्यास मान्य ऐसा

करार जाहला मग आह्मां सर्वत्रांस निरोप दिल्हा बाजीपंत आषाढ• मासीं मृत्य पावले आह्मी चौघे जण आपलेले घरास गेलों उपरांत गांवकरा कडे जाऊन फडशा करून ध्यावा तें न करतां कुसाजीपंत निघोन माहुलीस गेले तेथून पत्र आह्मांस पाठविलें आह्मी माहुलीस गेलों नाहीं तेथून कृष्णाजीपंत आपले कडे क्षेत्रास येऊन आह्मांस पत्र क्षेत्रींचें पाठविलें त्या वरून आह्मी क्षेत्रास आलों करीना लेहून देणें ह्मणोन आज्ञा त्यावरून जाहला करीना लेहून दिल्हा असे तरीख छ १८ सुा सबा समानीन माहे रबिलाखर शके १७०८ पराभवनामसंवत्सरे

बिकलम विठल नारायण कुलकर्णी

कसबे कराड

लेखांक २६५] [१७०८ माघवा ७

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री समस्त ब्राह्मण क्षेत्रकराड स्वामीचे सेवेसी करीना बो सदाशिव बल्लाळ मुा मौजे कुमटे संा कोरेगांव प्रा वाई सुा सबा समानीन मया व अलफ कारणें लेहून दिल्हा करीना यैसा जे आमचे चुलते तीर्थस्वरूप माहादेवबावा ब्रह्म-च्यारी नैष्टिक त्यांचे बंधु तीर्थरुप बाळाजीपंत आमचे तीर्थरुप त्यांचें लग्न बावांनीं केलें पालग्रहण केलें त्यांचे पोटीं पांच पुत्र वडील बाजी-पंत दुसरे जोतीपंत तिसरे भिमाजी गोसावी चवथे कृष्णाजीपंत पांचवे कनिष्ट आम्ही ऐसे पांच पुत्र त्यांच्या मुंजी वृतबंध बावांनीं करविलें आणि तिघांचीं लग्नें बावांनीं केलीं उपरांतीक बावाचा काळ शके १६७७ युवानामसंवत्सरे मार्गशीर्षमासीं जाहला त्याचें उत्तरकार्य बाजी-पंत यांनीं केलें आमचे तीर्थरूप अगोदर च काळ जाहला होता उपरांतिक बावाचा काल जाहला आमचें व कृष्णाजीपंताचें लग्न बाजीपंतीं केलें ऐसें एकत्र असतां जोतीपंताचा काल जाहला त्याचे पोटी पुत्रसंतान नाहीं बाजीपंतास पुत्र येक जोती-

पंताचे नकल जाहलें भिमाजी गोसावी यांसी पुत्र पांच कृष्णाजीपंतास पुत्र दोघे व आपणांस दोघे पुत्र येणें प्रमाणें चौघांचे पोटीं पुत्रसंतान जाहलें जोतीपंताचें नकल जाहलें तेव्हां बाजीपंत बोलिले जे जोतीपंताचे पोटीं पुत्र नाहीं त्याचा काल जाहला तेव्हां त्याचे स्त्रीस येक पुत्र द्यावा तेव्हां तिघां जणाच्या व ब्राह्मणाच्या चित्तांत द्यावा ऐसें जाहलें तेव्हां बाजीपंताचा आग्रह जे तिजला पुत्र द्यावा तिचे चित्तांत हि नव्हतें घेतला नाहीं परंतु बाजीपंतांनीं ध्यावासा केला भिमाजी गोसावी यांणीं वृतबंध केला तदनंतर जोतीपंताची स्त्री काशीयात्रेस गेली तेथें तिचा काळ जाहला तिचें उत्तरकार्य तेथें धर्मपुत्र घाळून केलें येथें कळल्या नंतर तिजला पुत्र दिला असतां तरी तिचें उत्तरकार्य करून श्राद्धपक्ष जोतीपंताचे व त्याचे स्त्रीचे पुत्रानें करावें तें न केलें बाजीपंत करीत आले आणि तीर्थरूप यांचें व बावाचें हि श्राद्धपक्ष आजपर्यंत करीत आले चौघे बंधू येक विचारें येकत्र चालिले गुदस्ता शके १७०७ विश्वावसुनामसंवत्सरे पौषशुद्धपौर्णिमेस घरांत कलह होऊन विभक्त जाहले तेव्हां पांच विभाग करूं लागले तेव्हां कृष्णाजीपंत बोलिला जे पांच विभाग कां करिता एकाचें नकल जाहलें ऐसें असतां च्यार विभाग करावे ते पांच विभाग कां करिता माझ्या पुत्राचें लग्न जाहलें नाहीं वरकड भावाचीं पाच च्यार एकएकाची जालीं आमचे मुलाचें लग्न नाहीं तेव्हां विभक्त होतां येत नाहीं ह्मणोन पंचाइतास द्वाही दिल्ही असतां पांचांनीं पांच विभाग केले राजी नसतां ऐसें असोन चौघाचें ऐकोन आपण व कृष्णाजीपंत पाचास मान दिल्हा कर्जवाम व भांडेंकुंडें व दाणा जबरदस्ती आमचे पदरीं घातले परंतु घेतलें नाहीं तैसें च पडलें आहे ऐसें असोन भिमाजी गोसावी यानें व बाजीपंतांनीं पांच विभाग करून घेतलें तुम्हीं विभागा प्रा घेणें ह्मणोन पांचानीं सांगितलें त्या वरून मान्य जाहलों कृष्णाजीपंताचे मुलाचे पांचा जणांनीं लग्न करून द्यावें ऐसें जाहलें असतां हाली भिमाजी गोसावी चौघाचें व पंचाईताचें

मोडून दुसरें च काढलें जे माहादेवबात्राचा हिसा मजला निमे देणें ह्मणून खटका करून क्षेत्रास आला येणेंप्रमाणें जाहलें वर्तमान निवेदन केलें या खेरीज आपलें बोलणें कांहीं राहिलें नाहीं हा करीना लेहून दिल्हा सही छ १९ रबिलाखर माघ वा। ७ शके १७०८

लेखांक २६६] [१७०८ फाल्गुन वा। १३

श्री

ताजाकलम करीना जबानी भिमाजी माहादेव गोसावी लेहून दिल्हा करीना ऐसा जे आपला मूळपुरुष मुधोपंत १ यास पुत्र २ दोघे

वडील माहादेव गोसावी १ मार निलेस पुत्र नाहीं सबब भिवाजीबावा कराडीं मुंज आपले मांडीवर करून वोव्यांत घेतला	धाकटे बाळाजीपंत १ यासी पुत्र ५ १ बाजीपंत १ जोतीपंत १ भिवजी बावा १ कृष्णाजीपंत १ सदाशिवपंत ५

बाळाजीपंत यासी पुत्र च्यार जोतीपंत यासी पुत्र नाहीं सबब भिवाजी गोसावी याचा पुत्र जोतीपंताच्या वोव्यांत घातला येणें प्रमाणें वांटणीचा विभाग आहे हे करीना लिहून दिल्हा सही याज खेरीज आपलें बोलणें नाहीं जर करितां बोललो तरी वाद सांगतो हा खोटा तेरीख छ २६ जमादिलावल शके १७०८ पराभवनामसंवत्सरे फाल्गुनवद्य १३ त्रयोदशी

हस्ताक्षर मनोहर भिवाजी

लेखांक २६७] [शके १७०९ ज्येष्ठ वा। ३०

श्री

वो। समस्त ब्राह्मण क्षेत्र पंचाईत कराडकर स्वा।।

वि।। सदाशिव बल्लाळ नमस्कार तुह्मीं विचारिलें ऐसे जे म्हाजरांत भी-

माजीपंताचें नांव लिहून जागा पुढें टाकली याची पुरवणी करून देणें त्यास आपल्याच्यानें पुरवणी होत नाहीं ये विषईं आपल्या पासीं कागदपत्र हि नाहीं तुम्ही सांगाल त्यास मान्य असो हा कागद लेहून दिल्हा सही शके १७०९ जेष्ट वद्य अखेरि

बी॥ ७०

लेखांक २६८]

श्री

तकरीर सदाशिवबावा यास कलमझाडा विचारिला महादेवबावा ब्रह्मचारी असतां तुमचे पांच बंधू यांचे व्रतबंध त्यांनीं करविले ते तुमचे तीर्थरूप असतां व्रतबंध करविले किंवा मृत्य पावल्या वरी व्रतबंध करविले ते व कोण कोणाचे व्रतबंध कोणाचे मांडी वरी करविले तें सांगावें महादेव बावा ब्रह्मचारी असतां करावयास कारण काय हें सांगावें कलम १

याचें उत्तर बावांनीं व्रतबंध केले ते धर्मार्थ आमचे तीर्थरूप असतां बाजीपंत व जोतीपंत यांचा व्रतबंध जाहला तीर्थरूप निवर्तल्या वरी भिमाजी बावाचा कऱ्हाडीं व्रतबंध महादेवबावांनीं केला कुणाचा मांडी वरी केला हें आपल्यास ठावूक नाहीं कृष्णाजीपंताचा व्रतबंध कुमठ्यांत जाहला कुणाचा मांडी वरी जाहला हें ठावूक नाहीं आमचा व्रतबंध बाजीपंताचा मांडी वरी जाहला येणें प्रमाणें लिहिलें सही

लेखांक २६९] [१७०९ ज्येष्ठ वा॥ ३०

श्री

वेदशास्त्र समस्त ब्राह्मण क्षेत्र का॥ कराड यांसी भिमाजी गोसावी मु॥ कुमटें

विनंति विज्ञापना ऐसी जे आपण आज्ञा केली ऐसी जे महजर याची पुरवणी करून देणें त्यास जो जागा टाकिला आहे तो भिवाजी माही-

देव किंवा भिमाजी बलाल ह्मणाव त्यास आपण जो स्तापतील त्या प्रमाणें मान्य असो ज्या उपरि आपणा पाशीं पत्रे नाहींत हें खरें सदरहू महजर याच्या जाग्या टाकिला आहे त्याची पुरवणी आपणां कडून होत नाहीं हें लिा खरे शके १७०९ प्लवंगनाम संवत्सरे सुा समान समानीन मया अलफ छ २८ माहे साबान

सदरहू आह्मीं कारकून व्हावे असी अपेक्षा हवी ती कांहीं आपली नाहीं तुह्मी जे सांगाल त्यास मान्य असो

लेखांक २७०] [१७०९ आषाढकृष्ण १३

श्रीमत्कृष्णाककुद्मतीप्रीतिसंगमो जयति

स्वस्ति श्रीमदिंदिराकरकमलोपरिष्ठिताष्टादशशक्तिपीठांतस्थितशक्तिपीठमहा संस्थानदक्षणवाराणसीश्रीकरहाटकक्षेत्रस्थविद्वज्जनसमूह यानी लेहून दिल्हे निर्णयपत्र ऐसे जे बापूजी रघुनाथ व भिमाजी बल्लाळ व कृष्णाजी बल्लाळ व सदाशिव बल्लाळ वास्तव्य कुमठे संमत कोरेगांव प्रांत वांई चतुर्वेर्गा मध्यें दत्तकविशई कलह होवोनि क्षेत्रमजकुरास आले सदाशिव बल्लाळ यानी विनंती केली की भिमाजी बल्लाळ यांत व आह्मात कलह होउन आह्मि आपणा पासि अलो त्या वरून भीमाजी बल्लाळ यास बोलाउन आंणिले या उभयता पासि राजिनामे व जामिनकतबे व तक्रिरा घेउन मनास आणिता दत्तकाचि चौकशी वर ठरले त्यास भिमाजी बल्लाळ बोलिले कि अपण महादेव गोसावि ब्रह्मचारी याचे पुत्र अपण ऐसे दत्त घेतलें ऐसे साक्षी निशि व भूक्ति निशि व पत्रा निशि पुरवणि करून देउ त्याचि चौकशी पाहाता भुक्ति पुरवलि नाही मग साक्षिदार अणुन विचारिले कि तुह्मी सत्यपूर्वक काय असल ते सांगणे त्या वर साक्षीदारानि ब्रह्मसभेस येउन सांगीतले कि दत्तविधान जाहले नाहीं आणि पुत्र घेतला नाही कागदपत्रा निशी पुरवणी जाहली नाहि आणि माहादेव बावा बोलिलें कि अह्मि ब्रह्मचारी अह्मास कशास पुत्र पाहिजे ऐसे साक्षीदारानी सांगितले अणि आज पर्यंत पुत्रधर्माचें

अचरण किमपि घडले नाहि त्याज वरून बाळाजीपंत यास पुत्र चौवे वडील रघुनाथ बल्लाळ त्याचे पुत्र बापुजी रघुनाथ व भिमाजी बल्लाळ व कृष्णाजी बल्लाळ व सदाशिव बल्लाळ ऐसे चतुर्वर्ग बंधु त्यास भिमाजी बल्लाळ यानी अपले बंधु जोतिपंत याचि स्त्रीस अपला पुत्र सखाराम दिल्हा ऐसे बोलत होते त्याचि चौकशी पाहता भिमाजि बल्लाळ याचे मुखे पुरवणी जाहलि नाहि आणि पुत्रधर्म आजि पर्यंत कांहि च घडले नाहि व माहाजरात सखाराम भिमाजी स्पष्ट ऐसा उत्धार अहे त्या वरून सखाराम पुत्र नव्हे ऐसे दोन्हि दत्तकाचि पुरवणी जाहली नाहीं ह्मणउन निवाडपत्र दिल्हे असे चौघा बंधुनि यथाविभागे च्यार वाटण्या अपल्याल्या करून स्वस्तिक्षेम आसावे कोणि कोणासी परस्परे कळ करू नये हे निर्णयपत्र असे मिति शके १७०९ प्लवंगनाम संवत्सरे आषाढकृष्ण १३ त्रयोदशी एवं निर्णयपत्रस्यपंक्तय:

लेखांक २७१] [१७०८—१७०९

श्री

तालिक

१ जबानी गोपाळ जोसी भिमाजी गोसावी याची मुंज माहादेव गोसावी याच्या मांडी वरी केली या उपरांतिक आह्मांस कांहीं ठावकें नाहीं

१ जबानी माणिक दीक्षित पंढरपुरे भिमाजी गोसावी याची मुंज कोणाच्या मांडी वर केली ठाऊकी नाहीं त्या समई सईबाई हिनें विचारिलें कीं या मुलास ब्रह्मच्यारी करिता किंवा गृहस्ताश्रमी करिता त्यास महादेव गोसावी बोलिला कीं ब्रह्मच्यारी यास पुत्र कशास पाहिजे त्यास तो गृहस्ताश्रमी होईल या पेक्षां आह्मांस ठाऊक नाहीं

१ येणें प्रमाणें रघुनाथभट गिजरे

१ येणें प्रमाणें भाऊ देशपांडे

साक्षी निशी पुरवणी करून देऊ ह्मणोन लिहिलें ते साक्षीदार कोण आहेत त्यें सांगणें

१ गोपाळ जोशी	१ विठलभट पंढरपुर
१ माणिकभट पंढरपुरे	१ भाऊ देशपांडे
१ रघुनाथभट गिजरे	१ गोविंदपंत

लेखांक २७२] [१७०८–१७०९

श्री.

तालिक

माहादेव गोसावी यांनीं क्षेत्र करहाड येथें भिमाजी गोसावी यांसि पुत्र करून मांडीवर घेतला हें पत्रा निशिं व साक्षी निशीं पुरवून देऊं हें लिहलें खरें दत्तविधान करून घेतला इतकी पुर्वणी करून देऊं न देऊं तर वादास खोटें

लेखांक २७३] [१७०८—१७०९

श्री

जबानी सइ जगनाथ कुमटेकर भिमाजी गोसावी याचा मार विचारिला त्यास महादेवबावांनीं मुंजी केली ये विशीं आपणांस टाऊक आहे दत्तविधान जाहलें न जाहलें ऐसें कांहीं स्मरण नाहीं

लेखांक २७४] [१७०८—१७०९

श्री भैरवप्रसन्न

श्रीकरहाटकक्षेत्रस्थविद्वज्जनसमूह यांनीं लेहून दिल्हें निर्णयपत्र ऐसे जे भीमाजी बल्लाळ व कृष्णाजी बल्लाळ व सदाशिव बल्लाळ वास्तव्य कुमटें संमत कोरेगांव प्रांत वाई या त्रिवर्गा मध्यें दत्तक विषईं कलह होऊन क्षेत्रमजकुरास कृष्णाजी बल्लाळ यांनीं येऊन विनंति केली त्याज वरून भिमाजी बल्लाळ यास व सदाशिव बल्लाळ या उभयतास बोलाऊन आणून कृष्णाजी बल्लाळ याचा कन्या बा। पुरसीस केली त्यास

त्यांणीं पंचाईतमुखें न्याय होईल त्याज प्रों मान्य असो म्हणोन विनंति केली त्याज वरून त्रिवर्ग राजी होऊन राजीनामे लेहून दिल्हे बि॥

भिमाजी बल्लाळ	१	कृष्णाजी बल्लाळ	१
सदाशिव बल्लाळ	१	लंग	०

या प्रों राजीनामे घेऊन त्रिवर्गास जामीन पंचाईतमुखें न्याय होईल त्याज प्रो वर्तावयास जामीन आणावयास आज्ञा केली त्याज वरून जामीनकतबे बि॥

१ भिमाजी बल्लाळ यास जामीन मौजे सैदापूर
१ कृष्णाजी बल्लाळ मौजे वार्डे
१ सदाशिव बल्लाळ मौजे उपलवें

या प्रमाणें राजीनामे व जामीनकतबे घेऊन त्रिवर्ग वादे यास तकरीरा करीणे लेहून द्यावयास आज्ञा केली त्याज वरून तकरीरा करीणे लेहून दिल्हे बितां

२ पुरवणी कलमझाड

पंचाईता जवळ जामीन भिमाजीबोवाने देऊन विभाग अवघे-यांचे विद्यमानें केले ह्मणोन लिहिले त्यास घरांतील जराबाजरा व देणें घेणें व इनाम व वृत्ति व सर्व अवघा भाऊपणा किती ठाई विभाग करून दिल्हा कांहीं पदार्थ वांटावयाचा राहिला आहे किंवा नाहीं हें सांगावें कलम १

भांडीं मात्र वांटिलीं त्यांत दिकत राहिली वरकट वांटा कांहीं भरून पावलों नाहीं वांटे व्हावयाचे आहेत भांडीं पांच ठिकाणीं दिल्हीं

त्याचा विभाग त्यांनीं घेऊन आपले घरास गेले ह्मणोन लिहिलें त्यास पुरसीस करितां तुह्मीं बोलिलां कीं कोणीं घेतला कोणीं घेतला नाहीं त्यास घेतला ते कोण न घेतला ते कोण न घ्यांवयास कारण काय तें सांगावें कलम १

त्यांचीं नांवें बाजीपंत यांणीं चौघे जण यांच्या घरांत भांडीं नेणें

ह्मणोन सांगितलें त्यास कृष्णाजीपंत हे घरांत नव्हते व सदाशिवबोवा याचे घरांत नेऊन ठेवणें ह्मणोन बाजीपंतांनीं सांगितलें त्याज वरून ठेविलीं ते नंतर बाहेर गेले ॥ १

विठल रघुनाथ कुळकर्णी याच्या देण्याचा मजकूर व सोन्याचा मजकूर तकरीर यांत लिहिला त्यास पुरसीस करितां तुह्मी बोलिलां कीं वांटणी जाहली नाहीं व या प्रमाणें लिहून हि दिल्हें ऐसें असतां हा मजकूर ल्याहावयास कारण काय हें सांगावें कलम १

विठल रघुनाथ याचें देणें हाकीमाची जबरदस्ती करून आमचे मागें लावलें सोनियाची वांटणी आह्मां वर बूड घातली ह्मणून आह्मी वांटणी करवून दिल्ही नाहीं आपल्या आपल्यांत कटकट होऊन क्षेत्रास आले ती कटकट कोण कोणांत जाहली व बाजीपंत क्षेत्राहून देवास गेले असतां तुह्मी वेंकण जोशी यास विचारून माघारें गेलां तें कारण काय हें सांगावें आणि कटकट कोणत्या कारणाची हें सांगावें कलम १

बाजीपंत यांसि व आह्मांसी कटकट व्हावयास कारण काय ह्मणऊन लिहिलें त्यास बाजीपंत यासी आपण बोलिलों कीं आमचा महादेव गोसावी याचा निमे वांटा देणें ऐसें बोलतां त्यास ते वांटा नाहीं ऐसें ह्मणाले ह्मणौन आह्मी बोलिलों कीं श्रीस्वामीचे पादुका वरील तुळसी काढून देणे ते ह्मणाले कीं तुळशी देऊन आपला निर्वंश करून घेणार नाहीं ऐसें बोलून क्षेत्रास चला त्यास ते व आह्मी उभयतां क्षेत्रास आलों ते कांहीं येथे राहिले नाहींत ते देवास गेले मग आह्मी येथें राहणें किमर्थ उभयतां वादे येथें आलों ते गेले ह्मणऊन आपण व्यंकण जोसी यास विचारून गेलों

बंद ३ पुरवणी

कलमझाडा

भीमाजीबावा क्षेत्राहून गांवास गेला कीं गांवीं समजावें तेथें गेल्या वर गांवकरानीं सदाशिव गोसावी यास सोन्याच्या वांटणी विषईं कितेक प्रकारें सांगितलें कीं जैसी वांटणी बैसेल तैसी करावी

ती वांटणी किती ठाईं करावी कैसे सांगत होते ते व चिमणगांवास जाऊन फडशा करून घेणें ह्मणोन थळ घेतलें ते कोणत्या कलमाचा फडशा ते सांगावे कलम १

गांवकरी यांणीं सांगितलें कीं सोनें व रुपें यांची बूड आहे ती पांच ठिकाणीं घेणें व आहे तैसी त्यांनीं घ्यावी ये विषईं येथें न समजतां तर मौजे चिमणगांवांस जाऊन समजणें त्यास आह्मी थळास गेलों येक महिना राहिलों तेथून आलों.

थळाहून गांवास येऊन पंचाईता पासिं बोलिलो कीं हाकीमापाशी आह्मांकडून तुह्मीं कर्ज वारविलें तें कर्ज कितवा विभाग वारिला त्याचीं नांवें काय कोणत्यास कर्ज दिल्हें तें व बाजीपंत विद्यमानी असतां सदाशिव बावा यासी व कजिया करावयाशि कारण काय हें सांगावें याचें उत्तर कर्जाचा विभाग दोन हिसे रुपये १९०॥ व तीन हिसे राहिले ते त्रिवर्गांनीं कैसे समजतें ठाऊक नाहीं आषाढमासीं बाजीपंत मृत्य पावले विद्यमानी नव्हत कर्जदारांची नांवनिसी याद अलाहिदा पंचाईता पाशीं आहे माघून तकरीर लेहून दिल्ही त्यांत लिहिलें कीं मूळपुरुष दोघे वडील महादेव गोसावी व धाकटे बाळाजीपंत त्यास माहादेवबावा यास पुत्र नाहीं याज करितां त्यांनीं पुत्र भीमाजीबावास घेऊन कन्हाडीं आपल्या मांडी वरी मुंजी केली त्यास पुरसीस करितां माहादेवबावा हे ब्रह्मचारी ऐसे असतां त्यांनीं पुत्र घेऊन मुंज केली ते वारणे समई बाळाजीपंत विद्यमानीं होते किंवा मृत्य पावले हे व मुंज केल्यापासून आज पावे तों पुत्रधर्म अवघें चालत आले किंवा लोप होत आला तें व पुत्र घेतला तो दत्तविधान करून घेतला किंवा उगी च मुंज केली तें सांगावें कलम १

बाळाजीपंत असतांना माहादेव गोसावी व बाळाजीपंत यांचे विद्यमानें बाजीपंत व जोतीपंत या दोघांची मुंजी केली मग बाळाजीपंत मृत्य पावले मग भिमाजी बावा याची मुंजी माहादेवबावांनीं केली व कृष्णाजीपंत व सदाशिवबावा याची मुंजी बाजीपंत याणीं केली माहादेवबावा ब्रह्मच्यारी

यांनीं आपले सौंस्तानास अधिकारी पाहिजे ह्मणून घेतला हा काळ पर्यंत कर्म करूं दिल्हें नाहीं चौघे बंधू याणीं पुत्रत्वाचे धर्म चालले नाहींत दत्तविधान करून पुत्र घेऊन मुंजी केली ॥

लेखांक २७६] [१७०८—१७०९

श्री

करीन्यांतील कलमें भिवाजी गोसावी यास विचारलीं जोतीपंताचा पुत्र सखाराम हे औरस किंवा दत्तक किंवा मानस हें सांगावें कलम १

याचें उत्तर जोतीपंत याचे मृत्य समईं आमची मातोश्री व बंधू बाजीपंत या उभयतांनीं त्यास सांगितलें कीं हें मूल तुला दिल्हे पुढें त्या मुलाच्या वृतबंधसमईं जोतीपंत यांचें बायकोचे मांडी वर बसऊन गुळ-पान वांटिलें पांढरीचे विद्यमानें जालें मुंज्य जालिया वरी ते च दिवसीं

या उपर पांच जणांनीं मिळोन तिऱ्हाईत हरीपंत याचे वाडियांत गेला कीं आपल्या आपल्यांत समजावें त्यास हरीपंत हे हाकीम किंवा ईत-लागी ग्रहस्त किंवा वतनदार आपल्यांत समजावें ऐसें असतां तेथें कटकट होवयास कारण काय हें सांगावें कलम १

याचें उत्तर हरीपंत हे सुखवस्तु ग्रहस्त यांच्या वाड्यांत आह्मी बोलिलों कीं विभाग दोन करावे एक माहादेवबावा व एक बाजीपंत ऐसे दोन करावे याज वरून हरीपंत बोलिले कीं तुह्मीं दोन वाटे क्षेत्रकराड येथें जाऊन करून घेणें सांप्रत आतां भांडें व सोनें व रुपें पांच ठिकाणी करून घेणें याज मुळें कटकट झाली

पंचाईत तुह्मीं मेळविल्हे किंवा हरीपंत यांनीं नेमून दिल्हे हें सांगावें १ पंचाईत मेळवणे ह्मणाल त्या वरून आपण पंचाईत मिळविले उभयतांनीं पंचाईतांचीं नांवें वेदमूर्ति चिटकंभट आफळे व श्रीपतभट नि॥ घोरपड व वीठलपंत कुलकर्णी व निंबाजी पाटील व हरीपंत

लेखांक २७७] [१७०८-१७०९

श्री

करीण्यांतील कलमें भिमाजी गोसावी याची पुरसीस केली

१ महादेव गोसावी यांनीं क्षेत्रकराड येथें भिमाजी गोसावी यास पुत्र करून मांडी वर घेतला हें पत्रानिशीं व साक्षीनिशीं पुरऊन देऊं हे लिा खरें दतविधान करून घेतला इतकी पुरवणी करून देऊं न देऊं तर वादास खोटें

याचें उत्तर

१ पत्रानिशीं व भुक्तिनिसीं पुरवणी जाहली नाहीं मग साक्षीनिसीं पुरवणी करून देऊं ह्मणोन लिा ते साक्षीदार कोण आहेत ते सांगणें त्याज वरून साक्षीदार नांवनिशीवार

१ गोपाळ जोसी	१ माणिकभट पंढरपुरे
१ रघुनाथभट गिजरे	१ विटलभट पंढरपुरे
१ भाऊ देशपांडे	१ बाबूराव जगंनाथ

३

जबान्या साक्षीदारांच्या

जबानी गोपाळ जोसी भिमाजी गोसावी यांची मुंज माहादेव गोसावी याच्या मांडी वर केली या उपरांतिक आह्मांस कांहीं ठावकें नाहीं

कलम १

जबानी माणिक दीक्षित पंढरपुरे भिमाजी गोसावी यांची मुंज्य कोणाचे मांडी वर केली ठाऊक नाहीं त्या समई सईबाईनें विचारलें कीं या मुलास ब्रह्मचारी करितां किंवा ग्रहस्ताश्रमी करितां त्यास महादेव बावा बोलिला कीं ब्रह्मचारियास पुत्र कशास पाहिजे त्यास तो ग्रहस्ताश्रमी होईल या पेक्षां आह्मांस कांहीं ठाऊक नाहीं कलम १

जबानी रघुनाथभट गिजरे यांस विचारिलें त्यांनीं माणिकभट पंढरपुरे यांणीं सांगितल्या प्रमाणें त्यांनीं हि जबानी सांगितलें येणें प्रा कलम १

जबानी भाऊ देशपांडे यांनीं उभयतांनीं सांगितल्या प्रमाणें देशपांडे यांनीं सांगितलें ज्याजती कांहीं टाऊक नाहीं कलम १

येणें प्रां जबानी विठलभट पंढरपुरे या प्रमाणें आपणास विदित आहे ज्याजती ठाऊक नाहीं कलम १

जबानी बाबू जगंनाथ कुमठेकर भिवाजी गोसावी याचा मजकूर विचारला त्यास माहादेवबावा यांनीं मुंज केली ऐसी आपणांस ठाऊक नाहीं दत्तविधान जाहलें न जाहलें ऐसें स्मरण नाहीं १ येणें प्रमाणें दत्तकाची चौकशी पाहतां साक्षी निशीं व भुक्ती निशीं व कागदपत्रा निशीं पुरवणी जाहली नाहीं मग साक्षीदार आणून विचारलें कीं तुह्मीं सत्यपूर्वक काय आसेल तें सांगावें त्या वर साक्षीदारांनीं ब्रह्मसभेस येऊन सांगितलें कीं दत्तविधान जाहलें नाहीं आणि माहादेवबावा बोलिले कीं आह्मी ब्रह्मचारी आह्मांस कशास पुत्र पाहिजे ऐसें साक्षीदारांनीं सांगितलें आणि आजपर्यंत पुत्रधर्माचें आचरण पाहतां किमपि घडलें नाहीं त्याज वरून माहादेवबावा यांनीं भिवाजी गोसावी पुत्र कांहीं घेतला नाहीं आणि पुरवणी लिहिल्या प्रमाणें जाहली नाहीं याज वरून पुत्र नव्हे ऐसें ठरलें

महजरांत जागा टाकिला आहे तो भिमाजी माहादेव किंवा भिमाजी बल्लाळ म्हणावें त्यास सांगणें त्यास महजरांत जागा टाकिला आहे त्याची पुरवणी आपणां कडून होत नाहीं ऐसें स्पष्ट लिहून दिल्हें आहे चौकशी पाहतां ब्रह्मचारी यास पुत्र घ्यावयास अधिकार नाहीं ऐसें शास्त्रा संमत व लौकिकांत हि नाहीं त्याज वरून भिमाजी बल्लाळ असें ठरलें

भिमाजी गोसावी यांचा करीन्यांतील कलमें

१ जोतीपंत याचा पुत्र सखाराम हे औरस किंवा दत्तक किंवा मानसिक हें सांगावें कलम १

जोतीपंताचे मृत्यसमई आमची मातुश्री व बंधू बाजीपंत या उभयतांनीं त्यास सांगितलें कीं हा मूल तुला दिल्हा पुढें त्या मुलाच्या व्रतबंधसमई जोतीपंताचे स्त्रीचे मांडी वर बैसऊन गुळपान वांटिलें पांढरीचे विद्यमानें जाहलें मुंज्य जाहल्या वर ते च दिवशीं या उपर आपणांस कांहीं च ठाऊक नाहीं कलम १

१ जोतीपंताची स्त्री काशीयात्रेस गेली तिथें च तिचा काल जाहला तिचें उत्तरकार्य तेथें धर्मपुत्र घालून केलें येथें कळल्या नंतर तिजला पुत्र दिल्हा असतां आणि श्राधपक्ष आजपर्यंत जोतीपंताचे व त्याचे स्त्रीचें केलें नाहीं आणि बाजीपंत करीत आले आणि तीर्थरूपाचें व बावाचें हि श्रात्धपक्ष आजपर्यंत बाजीपंत करीत आले

याची चौकशी पाहतां भिमाजी बल्लाळ याचे मुखें पुरवणी जाहली नाहीं आणि पुत्रधर्म आजपर्यंत पाहतां किमपि घडला नाहीं व महजरांत सखाराम भिमाजी स्पष्ट ऐसा उत्धार आहे आणि स्त्रीस पुत्र घ्यावयाचा अधिकार नाहीं त्याज वरून पुत्र घेतला नाहीं ऐसें जाहलें या प्रमाणें चौकशी पाहून सखाराम भिमाजी टरलें येणें प्रमाणें दोन्ही दत्तकाची चौकशी भिमाजी बल्लाळ याच्या वस्तू पुरवणी जाहली नाहीं याज वरून दोन्ही दत्तक ठरलीं नाहींत सबब

१ भिमाजी बल्लाळ १ सखाराम भिमाजी

मातुश्रीचे मरणवार्ताश्रवणा नंतर क्षौरपूर्वक दशांत अशौच धारण करून तदंतीं सपिंडी करून श्राध करावें हा पुत्रधर्म घडला नाहीं.

१ कृष्णाजी बल्लाळ याच्या करीण्यांतील कलम आपले कनिष्ट बंधू सदाशिव गोसावी याचा विभाग वांटणीस येईल त्या प्रमाणें आपण विभाग घेऊन समजोन राहूं यास हि येणें प्रमाणें लेहून दिल्हें आहे.

जोती बल्लाळ याचे नकल	रघुनाथ बाजी याचे नकल
भिमाजी बल्लाळ याचें सोनें चोरांनीं नेहलें तें मशारनिले वर पांच तोळे	बापूजी रघुनाथ याची स्त्री आहे तीस अन्नवस्त्र त्रिवर्गांनीं द्यावें १

घातलें तें त्रिवर्गांनीं मशारनिलेचें सोनें द्यावें १	गांवगन्ना इनाम जमीनी व वर्षासनें असतील तीं त्रिवर्गांनीं यथाविभाग भक्षावीं १
कालांतरी उगवल्यास यथाविभागें त्रिवर्गांनीं घ्यावें.	इमारती असतील ती सदरहू प्रमाणें

येणें प्रमाणें दोन्ही दत्तकाची पुरवणी जाहली नाहीं ह्मणून निवाडपत्र दिल्हें असे त्रिवर्गबंधुंनीं यथाविभागें आपलाला विभाग घेऊन स्वस्तिक्षेम असावें

लेखांक २७८] [१७१० आषाढशुा ८

नकल

श्रीकृष्णककुद्मतीप्रीतिसंगमो विजयति

राजश्री समस्त ब्राह्मण क्षेत्रकरहाटक ताा मोकदमानि मौजे कुमटें संाा कोरेगांव प्रांत वांई यास आज्ञा केली ऐसी जे भीमाजी बल्लाळ प्रभृति बंधू वास्तव्य मौजे मार याचे आपण पांच विभाग केले म्हणोन सांगतात तुम्हीं करून दिल्हें असतां गैरमान्य होऊन दत्तकाची चौकशी करितां भिमाजी बल्लाळ यांज कडून पुरवणी जाहली नाहीं म्हणून दत्तक ठरला नाहीं याज वरून निवाडपत्र करून दिल्हें तें अलादा आहे च्यार विभाग करावे त्यांत बाजीपंत मृत्य पावले ऐसे सांगतात त्या वरून मारनिले पाा आहेत आणि भिमाजी बल्लाळ याचे ऐवज चोरांनीं नेहलें व श्वशुराकडे राहिले ऐसे मशारनिल्हे तुम्हांस सांगत असतां तुह्मी एका भावा वर सोनें घालावें हें ठीक च केलें नाहीं ह्मणून तुह्मांस पत्र पाा तर दाहा जण बसून धर्मता न्याय करून विभाग करून देणें मिति कीलकसंवत्सरे आषाढशुाा अष्टमीस पत्र सादर असे

लेखांक २७९] [१७१० आषाढशुा १०

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री समस्त ब्राह्मण क्षेत्र-
कऱ्हाड स्वामीचे सेवेसीं

विद्यार्थी भिमाजी बल्लाळ मुा मौजे कुमठें सा कोरेगांव सिरसाष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना ऐसी जे लिहून दिल्हें कुंठितपत्र येसे जे चिरंजीव राज" श्री कृष्णाजी बल्लाळ व सदाशिव बल्लाळ यांत व आपणांत दत्तकविषयीं कजिया लागोन क्षेत्रमजकुरास आलों त्यास श्रीमाहादेव बावा नैष्टिक ब्रह्मचारी यांणीं आपणांस पुत्र करून घेतलें ह्मणून लेहून दिल्हें त्याची पुरवणी पत्रा निशीं व भुक्ति निशीं व साक्षी निशीं पुरवणी करून देऊं ह्मणोन लेहून दिल्हें त्याची चौकशी करितां पत्रा निशीं व भुक्ती निशीं व साक्षी निशीं पुरवणी जाहली नाहीं येणें प्रों सखाराम जोशी म्हणोन वाद सांगत होता त्यास येथें न्याय पाहतां त्यास हि पुत्रत्वास अधिकार नाही आणि पुत्रधर्म हि घडला नाहीं सबब सखाराम भिमाजी ऐसें ठरलें येणें प्रों दोन्ही दत्तकें असंबंध जाहलीं हे कुंटितपत्र लिा सही शके १७१० कीलकनामसंवत्सरे आषाढशुा ७ सप्तमी सुा तिसा समानीन मया व अलफ मनोहर भिमाजी वली १६ सोळा

साक्ष

३ मौजे भोसरें प्रांत खटाव

१ जिवाजी यशवंत दाा रामराव गुजर पाटील मौजे मजकूर

१ यादोजी बिन वणगोजी आवतडे पाटील मौजे मजकूर

१ आनंदराव नारायण कुलकर्णी मौजे मजकूर

३

लेखांक २८०] [१७२१ ज्येष्ठशुा १

श्री

वेदमूर्ति राजश्री समस्त ब्राह्मण क्षेत्रकराड स्वामी गो-
सावियांसि

सेवक परशराम श्रीनिवास प्रतिनिधि नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणें विशेष मैनाबाई कोम राघो कृष्ण पराडकर यास पुत्रसंतान नाहीं या करितां श्रीकृष्णातीरीं जाऊन दत्तपुत्र-विधान करून घेया विसी मशारनिले या स्त्रीस सांगितलें होतें त्याज वरून बाई यांणीं वो राजश्री भास्करभट पराडकर याचा पुत्र घ्याव-याचा निश्चय करून श्रीक्षेत्रास बाई भटजी सुद्धां मुलास घेऊन विधान करावया करितां आली आहेत यास्तव तीा मातुश्री बाई यास व रा मोरो अनंत यास पत्रें देऊन हें पत्र तुह्मास लिहिलें असे तरी तुह्मी समस्त मिळोन दत्तविधान करवणें ताा छ २१ जिल्हेज सुाा मया तैन व अलफ बहुत काय लिहिणे हे विनंति

लेखांक २८१] [१७४१ चैत्र शुाा १

नकल

श्री

जबानी डोंगरो कासी कुलकर्णी मौजे चितळी काा निबसोड सुाा अश-रीन मया तैन व अलफ लेहून दिल्ही जबानी ऐसी जे हरिपंत व कृष्णाजीपंत व सिवरामपंत ऐसे आह्मांस त्रिवर्ग पुत्र त्यास कृष्णाजी-पंत याचे पोटीं पुत्रसंतान नाहीं त्यास सिवरामपंत यांनीं व त्याचे बायकूनें मूल उपजले ते वेळेस वचने करून दिल्हें कृष्णाजीपंत व त्याचे बायकूस दिल्हें आहे हालीं त्या मुलाचा वृतबंध गुलपान व्हावयाचें आहे त्यास माझे मांहातारपण वृधापकाल जाहला आहे आणि माझी आस्ता राहती ये विसी साहेबास विनंति करून आज्ञा घ्यावयास आलों त्या वरून साहेबी समजून घेऊन मुलाचे गुलपान वृतबंध करावयाची आज्ञा करावी हें लेहून दिल्ही जबानी सही तेरीख छ २९ जमादिला-खर चैत्रशुध १

हस्त अक्षर खुद[1]

---

1 हस्ताक्षर खाशांचें.

लेखांक २८२] [१७४१ चैत्रशुद्ध १

नकल

श्री

अज सुभा राजश्री पांडुरंग वासुदेव मामलेदार पेटा खानापूर ता। मोकदमानि मौजे चितळी का। निंबसोड सु॥ अशरीन मया तैन व अलफ मौजे मजकूर येथील डोंगरोपंत कुलकर्णी यांनीं येऊन समजाविलें कीं आपणांस पुत्र तिघेजण हरीपंत कृष्णाजीपंत सिवरामपंत त्यास कृष्णाजीपंत याच्या वोट्यांत घालावा असा हेत आहे या करितां गांवकरी यांस ताकीद व्हावी ह्मणोन त्या वरून ताकिद सादर केली असे डोंगरोपंत याचा हेत आहे त्या पेक्षां मूल कृष्णाजीपंत याच्या वोट्यांत सिवरामपंत याचा घालणें जाणिजे छ २९ माहे जमादिलाखर

लेखांक २८३] [१७४१ चैत्रशु॥ १

नकल

श्री

जबानी सिवराम डोंगरो कुलकर्णी मौजे चितळी का। निंबसोड सु॥ अशरीन मया तैन व अलफ लेहून दिल्हीं जबानी ऐसी जे वडील हरीपंत व दुसरे कृष्णाजीपंत तिसरे आह्मी ऐसे त्रिवर्ग भाऊ त्यास कृष्णाजीपंत याचे पोटीं पुत्रसंतान नाहीं त्यास आह्मीं आपला मुलगा जाहला ते समईं आह्मीं व आमचे बायकूनें कृष्णाजीपंतास व त्याचे बायकूस वचनें करून दिल्हा आहे हालीं त्या मुलाचा वृतबंध गुलपान व्हावयाचें आहे ये विसीं साहेबा कडे आलों त्यास गुलपान वृतबंध करावयाची आज्ञा साहेबाची व्हावी ही जबानी लेहून दिल्ही सही तेरीख छ २९ जमादिलाखर ऊर्फ चैत्रशुध १

हस्तअक्षर खुद

लेखांक २८४] [वाळबोध

श्री

याद्दि येसूबाई कोम भीमदीक्षीत गिंजरे इनें संतती करिता पुत्र घेतला त्याच वर्तमान संक्षिप्त समजण्या करिता

राजेश्री चिमणाजीपंत निा येसूबाई याच्या भावाने पत्र पाठविले कि भिमदीक्षीत याचा मनोदय पुत्र घ्यावा त्याचा मजकूर काय केला याज वरून चिमणाजीपंत व वो बापुभट निा येसूबाई या उभयतानि वो दादंभट गिजरे व तात्यादीक्षीत गिजरे या उभयतास सांगितलें कि येसूबाईस पुत्र घावयाचा मजकूर करावा आणि कोटांत हि जाऊन राजेश्री अंताजीपंत फडनीस व भगवंतराव ढवळे निा सुभा यास हि मजकूर समजाविला मग तात्यादीक्षीत गिजरे यास बोलाउन नेउन अवघ वर्तमान बोलून घनशांभटाचा मुल घ्यावा हा मनोदय बाईचा अहे याज वरून तात्यादीक्षीत गिजरे यानि वो बाजीभटाच्या मुला विषई रुकार मागून सांगीतले कि वरकड काय करणे ते दादंभट व अमचे बाजीदीक्षीत याच्या विचारे जे करणे ते करावे दादंभटास हि बोलाउन अणिल्या नंतर तात्यादीक्षीत घरास गेले नंतर दादंभटाच व त्याच बोलणें होउन घनःशांभटाच्या मुला विषई दादंभटाचा रुकार पडला नाहि बाजीभटाच्या मुला विषई पडला पुढे दादंभटानीं अपल्या घरि पांच सात ब्राह्मण मेळवून बापूभट व चिमणाजीपंतास अणोन ह्या उभयताच व ब्राह्मणाच बोलणें होउन ब्राह्मणातील दोन च्यार असामी रदबदली करू लागले कि लग्न जाहले अहे तो मूल घ्यावा या विषई सर्वप्रकारे साहित्य व धाकटा न घेण्या विषई दूषणे याज वरून चिमणाजीपंत व बापूभट यानि उत्तर केले कि बाईचा मनोदय घनःशांभटाचा घ्यावा तुमचा सर्वांचा मनोदय बाजीभटाचा घ्यावा लग्न जाहले नाहि तो घ्यावा ऐस बोलोन अपल्या घरास गेले नंतर दोनचार असामी ब्राह्मणांचि बाजीभटाचे घरास गेले कि हि गोष्ट ठिक करावि ह्मणोन त्यास बाजीभटाच्या घरच्या माणसानि काहि

ध्यावा असें बापूभट व चिमणाजीपंत बोलले तेव्हां ब्राह्मणांनीं पुसलें कीं भीमदीक्षिताची आज्ञा स्त्रीस आहे कीं काय तेव्हां आहे असें सांगितलें नंतर ब्राह्मणांतील येक दोन असामी बोलों लागले कीं लग्न जालें आहे तो मूल ध्यावा धाकटा न घेणेंविषईं दूषणें त्याज वरून उभयतां बोलिले कीं बाईचा मनोदय घनश्यामभटाचा ध्यावा तुमचा सर्वांचा मनोदय बाजीभटाचा मूल लग्न जालें नाहीं तो ध्यावा असें बोलोन आपले बिराडास उभयतां गेले नंतर दोन च्यार असामी ब्राह्मण बाजीभट याचे घरास पुत्र मागावयास गेले तेव्हां बाजीभट याचे जेष्ठ पुत्र बाबदेवभट बोलिले कीं आमच्या घरचा कारभार तुह्मी कोण करणार आमचे तीर्थरूप घरीं नाहींत आह्मी देत नाहीं तें भाशण ऐकोन ब्राह्मण उठोन आपलाले घरास आले नंतर दादभट गिजरे श्रीभैरवास आले ते समईं तात्या दीक्षित गिजरे व बापूभट उभयतां आपले दरवाज्यांत बसले होते त्यांनीं दादंभटास विचारिलें तुह्मी गेलां होतां तें काम करून आलां कीं काय त्यांनीं उत्तर केलें कीं ती गोष्ट राहिली ऐसें बोलोन आपले घरास गेले तेव्हां बापूभट यांनीं तात्यास विचारिलें कीं पुढें कसें करावें तेव्हां तात्यांनीं उत्तर केलें कीं तुह्मी स्वस्थ असावें नंतर दुसरे दिवशीं तात्या गिजरे बाजीभटाचे घरास जाऊन त्याचे मातुश्रीस चार गोष्टी पुत्र द्यावया विसीं सांगितल्या व तिणें उत्तर केलें कीं बरें आहे मी उदेक येसूबाई कडे जाऊन दोन गोष्टी बोलून येईन मग सांगेन त्याज वरी ती जाऊन बोलून येऊन मूल देतें ह्मणोन सांगितलें त्याज वरून समस्त ब्राह्मण भीमदीक्षित याचे घरीं मिळाले आणि बाजीभट याचे जेष्ठ पुत्र बाबदेवभट यास बोलाऊन आणिलें आणि समस्तांनीं येसूबाईस पुसावयास सांगितलें कीं पुत्र कोणता ध्यावयाचा तेव्हां दादंभट गिजरे व तात्या गिजरे हे घरांत जाऊन बाईस विचारिलें तेथें भीमदीक्षित याची मावशी होती तिचा आग्रह बाजीभटाचा मूल न ध्यावा घनशामभटाचा ध्यावा न पुसतां उठोन दोन घटका या च विचारास लागल्या नंतर बाजी-

ठिक उत्तर केल नाहि ब्राह्मण अपले घरास गेले त्या ब्राह्मणा मधील दादंभट गिजरे श्रीभैरवास अले ते समई तात्यादीक्षीत गिजरे अपल्या दारा पुढें बैसले होते व बापुभट हि होते ते समई तात्यादीक्षीतानि दादंभटास विचारिले कि तुम्ही गेला होता ते काय करून अला त्यानि सागीतले कि प्रस्तुत ती गोष्ट राहिलि पुढे सावकाश का होईना ऐस बोलून घरास गेले तेंव्हा बापूभट घाबरे जाहले पुढे काय करावे ते समई तात्या दीक्षीतानि सागीतले कि मी ठिक करून येईन तुम्ही स्वस्थ असा नंतर दुसरे दिवसी तात्यादीक्षीत बाजीभटाच्या घरास जाउन त्याच्या मातोश्रीसि बोलोन ठिक करुन अपल्या घरास अले येणे प्रमाणे समस्तानि वर्तमान ऐकिल अहे इतके हि समक्ष अहेत अकरावे दिवसी समस्त ब्राह्मण मेळविले ब्राह्मणानि येसूबाईस विचारावे कि मुल कोणता घेता म्हणोन बापूभटास सागीतले ते व दादंभट गिजरे घरात गेले तेथे येसूबाईचि मावसी होती तिचा अग्रह कि बाजीभटाचा मुल न घ्यावा घनःशांभटाचा घ्यावा ब्राह्मणाच्या विचारे बाजीभटाचा घ्यावा म्हणोन करार करून अले इतके वर्तमान समस्तानि ऐकिलें अहे कलम १

मुल पाहावा म्हणोन बाजीभट त्याच्या घरास रा। भगवंतराव ढवळे व चिमणाजीपंत व बापुभट गेले तो मुल सोप्यांत होता तो रोगी पाहिला मुलाचि मातोश्री घरांतून बाहेर अलि तीस यानि विचारिले मूल असा का दिसतो तीने सागीतले कि मंडूर तोळा दोन तोळा घेतला अहे अद्यापि पथ्य करीत अहे यानि सागीतले कि अणखी तोळा दोन तोळे द्यावा ईतके सागोन अपल्या घरास गेले मग रात्रौ अस्तमानी

\+ + + .

लेखांक २८५]

श्री।

१ ले व चिमणाजीपंत यांस बोलावून आणिलें आणि ब्राह्मणांनीं विचारिलें कीं पुत्र कोणता घ्यायाचा बाजीभटाचा कनिष्ठ

जीभट याचे मातुश्रीने चिमणाजीपंत यास बोलाऊं पाठविलें नंतर गेले त्यास बाजीभट याचे मातुश्रीनें विचारिलें कीं आमचा मूल घेत होतां तो काल कां घेतला नाहीं त्यांनीं उत्तर केलें कीं बाबदेवभट यांनीं गैरमान्य होऊन न पुसतां उठोन गेले याज मुळें येसूबाईचा मनोभंग जाला परम श्रमी जाली आतां तुमचा पुत्र घेत नाहींत असें उतर केलें नंतर दादंभट गिजरे रात्रौ सुभ्या कडे जाऊन सांगितलें कीं बाजीभटाची मातुश्री उपोषण करिती त्याज वरून तात्या गिजरे यांस सुभ्याचें बोलावणें आलें तेव्हां ते गेले सुभानें सांगितलें मातुश्री उपोषण करिती तेव्हां तात्या बोलिले कीं उपोषण करावयाचें कारण काय तेव्हां दादंभट बोलले कीं काल त्यिचा मूल घ्यावयाचा केला होता तो न घेतला म्हणोन उपोषण करितात तेव्हां तात्यास सुभा व दादंभट यांणीं सांगितलें कीं तुम्हीं जाऊन येसूबाईस सांगा कीं काल जो पुत्र करार केला तो च घ्यावा तेव्हां तात्यांनीं उत्तर केलें कीं आम्ही जात नाहीं बाईनीं घेतला तर बरें नाहीं तरी तुम्हीं च नाश केला म्हणाल तेव्हां जा च म्हणोन बहुत आग्रह करूं लागले तेव्हां तात्यांनीं उत्तर केलें कीं आम्ही येकटे जाणार नाहीं जाणें च तर दादंभट व आम्ही मिळोन जाऊं दादंभट आम्ही येत नाहीं बोलले तेव्हां आम्ही हि जात नाहीं असें तात्यांनीं उत्तर केलें तेव्हां सुभ्यानीं सांगितलें कीं तुम्ही उभयतां जावें चिमणाजीपंत आहेत यास हि घेऊन जावें तेव्हां त्रिवर्ग मिळोन येसूबाई कडे गेले नंतर घनःशामभट हि तेथें आले त्यांच्या संकोच्यामुळें उगेच बोलतां राहिलें आणि संध्येस जाऊं असें बोलून दादंभट व तात्या निघाले तितक्यांत बाईचा समाचार घेऊन जावा असें तात्या बोलिले दादंभट बोलिले कशास तेव्हां तात्या बोलिले कीं येथें आल्यास तिजला भेटून जावें ह्मणोन घरांत गेले बाईस पुसिलें कीं आपणांसी दोन गोष्टी बोलावयाच्या होत्या ह्मणून आलों होतों आतां संध्येस जातों बाईनीं उत्तर केलें कीं काल समस्त मिळोन काय केलें तें आज करावयाचे आहे माझे कपाळीं होतें तें जाहलें इतकें

"भटाचा कनिष्ट पुत्र मजला द्या असें सांगितलें तों बाबदेव गिजरे आपले घरास गेले दोन घटका त्याची वाट समस्तांनीं पाहिली संध्येचा समय जाहला याज मुळें ब्राह्मण आपळाले घरास जाऊं लागले तेव्हां तात्या गिजरे यांणीं समस्तांस सांगितलें कीं तुह्मीं उठोन जाऊं नका मी जाऊन बाबदेवभटास घेऊन येतों ऐसें सांगोन जाऊन बाबदेवभटास घेऊन आले नंतर बाजीभट याचे मातुश्रीकडे येक दोघे ब्राह्मण पाठविले कीं बाजीभटाचा पुत्र भीमदीक्षितास द्यावयाचा विचार कसा तेव्हां तिणें उत्तर केलें कीं तुह्मी ह्मणतां त्या पक्षीं देतों उत्तर ब्राह्मण सांगत आले नंतर माहादेव जोसी व आणखी दोनच्यार ब्राह्मण आले त्यास हि हें वर्तमान सांगितलें त्यांनीं उत्तर केलें कीं शास्त्रा संमतें करीत असला तर आह्मांसी दोन गोष्टी शास्त्रार्थाच्या बोलून करा नाहीं तर आमचें संमत नाहीं इतकें बोलून च्यार गोष्टी सांगितल्या कीं सपिंडी जाल्यावांचून करूं नये व दाता हि संनिध नाहीं पुण्यांत आहेत त्यांनीं उत्तर केलें जरी आमचा पुत्र तुह्मी देणार कोण मग त्यासीं कोण बोलतो याज करितां त्यास पत्र पाठवून उत्तर आणवून जें करणें तें करावें आणि रात्रौ हि करूं नये तेव्हां समस्तांनीं उत्तर केलें कीं आमचे सर्वांचे विचारास आलें आहे तुमचें संमत असावें तेव्हां ते आमचें संमत आहे ऐसें बोलले नंतर समस्तांनीं उपाध्यास श्नान करून संकल्पास प्रारंभ करावा ह्मणोन सांगितलें तों बाबदेवभट बोलिले कीं माहादेव जोसी ह्मणतात हें बरें आहे नंतर समस्तांनीं बाबदेवभटास दोन गोष्टी सांगितल्या आणि संकल्पास प्रारंभ करविला तों फिरोन बाबदेवभट बोलिले कीं आमचे दादा घरीं नाहींत तेव्हां आणखी दोन गोष्टी सांगितल्या आणि संकल्पास प्रारंभ करविला फिरोन बाबदेवभट बोलिले कीं माहादेव जोशी ह्मणताहेत हें बरें आहे इतकें बोलोन न पुसतां समस्तांतून उठोन गेले तेव्हां समस्तांनीं दोन घटका वाट पाहिली कोठें गेला ह्मणोन शोध केला तों आला नाहीं तेव्हां समस्त आपळाले घरास गेले नंतर दुसरा दिवस बारावा सपिंडीच्या समई बा-

पाहाण्यास गेले मूल अशक्तसा पाहिला तेव्हां त्या मुलाचे मातुश्रींशीं बोलिले कीं हा. मूल असा कां दिसतो

लेखांक २८६]

श्री

वेदशास्त्रसंपन्न समस्त ब्राह्मण क्षेत्र का। कराड स्वा-
मीचे सेवेसी

आज्ञाधारक यमाजी पाटील मौजे अतीत चरणावरी मस्तक ठेवून साष्टांग दंडवत विनंति उपरि येथील कुशल जाणोन स्वामीनीं आपले सामराज्यवैभवलेखनाज्ञा करून सेवकाचा सांभाळ करीत असिले पाहिजे विशेष पूर्वी येक ग्रहस्त गोसावी ब्रह्मचारी असतां दत्तपुत्र आपल्या वोट्यांत घेत होता त्यास कोणी ब्राह्मणांनीं सांगितलें कीं लग्न जाहलें नसतां पुत्र घ्यावा हा कोणी शास्त्री आधार नाहीं ह्मणोन सांगितलें त्या वरून घटितार्थ जाहला होता तो पाहिला त्या अलीकडे आणखी पुत्र घ्यावया अनुक्रम आरंभिला आहे अद्यापि त्या ग्रहस्ताचें लग्न न जाहालें असतां पुत्र वोट्यांत घेईन ह्मणतो तरी ब्रह्मचारी यानें पुत्र घ्यावा हें कोणते शास्त्राधार आहे हें वर्तमान लेहून पाठविणें त्या सारखी त्या ग्रहस्तास आज्ञा दिली जाईल तरी स्वामींनीं अनाथा वरी कृपा करून घ्यारी ब्राह्मण थोर थोर बसून या गोष्टीचा शोध मनास आणून शास्त्र पाहून आज्ञा करावी येथील वर्तमान नारोबा सांगतां सेवशीं विदित होईल कळलें पाहिजे कृपा निरंतर सेवका वरी असो दिजे हे विनंति स्वामी ह्मणतील कीं कोणते उद्देशास पुत्र घेतो देहसार्थकास किंवा द्रव्यास किंवा काय ह्मणतील तरी वृत्ती साठीं घेतो आहे स्वामींस कळावें ह्मणून लिहिलें आहे हे विनंति

श्रवण करून उभयतां आंगणांत आले ते समई दादंभट चिमणाजीपंतासीं बोलले कीं मी चहूं घटकांनीं येईन मग काय बोलणें तें बोलेन आणि निघोन आले नंतर संकेता प्रमाणें दादंभट गेले त्यांनीं येसूबाईस सांगितलें कीं तो मूल रोगी आहे ज्याचें लग्न जालें आहे तो तूं घे ती बोलली कीं मजला दोघे हि घ्यावयाचे नाहींत असें उत्तर केलें तेव्हां दादंभट बोलले कीं तुझ्या विचारास येईल तो तूं घे असें बोलोन आपले घरास गेले भीमदीक्षित याचें उत्तरकार्य प्रथम दिवसा पासून अकरा दिवस घनःशामभट यांणीं च केलें बारावे दिवशीं सपिंडी व श्राद्धें करावयाचीं त्यास पुत्र घेऊन करावीं हा हेत येसूबाईचा त्यास अकरावे दिवशीं रात्रौ समस्तांनीं उद्योग केला परंतु घडला नाहीं सपिंडी बारावे दिवशीं घनःशामभटानें केली तेरावे दिवशीं समस्त ब्राह्मण मिळोन विचार केला कीं बाबदेवभट यांणी समई अनमान केला येसूबाईचा मनोभंग जाला याज मुळें ती घनःशामभटाचा च मूल घेईन ह्मणते तो च दत्तविधान पूर्वक तिजला देऊन त्याचे हातून मासिकश्राद्धें करवावीं असा निश्चय समस्तांनीं करून दत्तविधान केलें ते समई बाजीभटाचा दुसरा पुत्र नानाभट समस्तां बराबर बोलावावा ह्मणोन बोलाविला तो आला याज्ञिक समाप्तीस दादंभट हि आले त्यांनीं नानाभटास उठवून नेलें घनःशामभट याचा पुत्र घेऊन याज्ञिकसमाप्तीस गेले नंतर बाबदेवभट येऊन व्यंगोक्त भाशणें करून गेले या प्रमाणें वर्तमान आहे

+ + + + + + + + + + + + असें जाणून येसूबाईस च विचारिलें जे तुझें मानस कोणाचा पुत्र घ्यावयाचें तिणें उत्तर केलें घनःशामभटाचा तेव्हां समस्तांनीं सांगितलें बाजीभट याचा कनिष्ट घ्यावा तेव्हां तिणें उत्तर केलें कीं त्याचें माझें रहस्य कोठें आहे घनःशामभट सालस सारख्यासें सारखें त्याचा घ्यावा हें मजला बरें दिसतें तेव्हां फिरोन समस्तांनीं बाईस सांगितलें कीं आह्मी सांगतों हा घ्यावा तेव्हां ती बरें ह्मणोन बोलली या प्रमाणें जाल्या वर बाजीभट याचे घरास भगवंतराव ढवळे व चिमाणाजीपंत नांदवहळकर व बापूभट आफळे मूल

लेखांक २८७]

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री समस्त ब्राह्मण क्षेत्र-
कराड यांसी

प्रति सदाशिवभट साने वा। मौजे मा।र ता। पाटण साष्टांग नमस्कार विनंति विशेष चिरंजीव मुलांस बहुत समाधान नाहीं यास्तव दत्तपुत्र मुलास घ्यावा ऐशी योजना आहे त्यास आमचे चुलतबंधु कृष्णभट साने याचा पुत्र आपले मुलाचा चुलतबंधु ह्याचें उपनयन जालें आहे हा दत्तपुत्र परिग्रहास उपयोगी असल्यास उत्तर पाठवावें त्या अन्वयें करावयास येईल आमचे तीर्थरूप वडील व कृष्णभट याचे तीर्थ कनिष्ट या प्रमाणें आहे त्यास ये विषयींचे आपले समस्तांचें उत्तर येईल त्या प्रमाणें होईल दत्तपुत्रविधानास दिनसुधि हि चांगली लिहून पाठवावी बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंति

लेखांक २८८] [शके १६६४

श्री

वेदशास्त्रसंपन्न वेदमुर्ती राजश्री समस्त ब्राह्मण क्षेत्र-
कराड स्वामीचे सेवेसी

सेवक जगज्जीवन परशराम साष्टांगनमस्कार विनंती सुा सलास अर्बैन मया व अलफ बो महादेवभट एलगाउकर व मल्हारभट याणी हरभट एलगावकर मृत्य पावले हे त्यांचे गोत्रपुरुष त्याचे सुतक धरिले नाहीं कर्माचा लोप होतो ह्मणऊन ब्राह्मणांहीं पुसिलें त्यास पूर्वी ए विसी आपणास पत्र दिल्हे आहे त्यास महादेवभट गरीब ब्राह्मण कालक्षेप चालिला पाहिजे याज करितां हाली स्वामी कडे पाठविले आहेत दोषा प्रमाणें यथाविध प्रायश्चित्त देऊन शुद्धता करून उत्तर पाठविले पाहिजे बहुत काय लिहिणे हे विनंती

लेखना
वधि

लेखांक २८९] [शके १७१४ माघ शुा १०

श्रीशंकर

श्रीमतशंकराच्यार्यान्वयसंजाताभिनवश्रीविद्याशंकरभारती-
स्वामिकरकंजोद्भववश्रीविद्यानरसिंहभारतीस्वामिकृतनारा-
यणस्मरणानि

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री समस्त ब्रह्मवृंद व राजकीय प्रहस्त क्षेत्रकरहाटक परमभक्तोत्तम यांसि विशेषस्तु अत्रत्य कुशल जाणून स्वानंदलेखन करणें तदनंतर विठ्ठल शामजी कुलकर्णी मौजे शेरें व दुसेरें व कोडोली व वडगांव प्रांत कऱ्हाड याचा दायाद त्र्यंकाजी सुळजो देवाज्ञा जाहाले त्याचे आशौच न धरितां स्नानसंध्यानैवेद्यवैश्व-देव इत्यादि कर्मे होतात ह्मणून संस्थानीं श्रुत जाहालें त्याज वरून

१ या लेखांकापासून अशौचनिर्णयासंबंधीं पत्रें सुरू झालीं आहेत.

हें तुह्मां समस्तांस हें पत्र लिहिलें असे तरी विठ्ठल शामजी व आंदो बाळाजी व रामाजी जनार्दन व पांडुरंग बाबाजी हे संस्थानीं शरण येऊन दोषा पासून मुक्त होऊन संस्थानींचें सुधपत्र घेऊन येतील तो पर्यंत तुह्मी समस्तांही या चौघांसीं अन्नोदकपंक्तिव्यहार न करणे महानुशासनं वरीवर्ति

इत्य
लम्

लेखांक २९०] १७२० सुमार [बाळबोध

श्री

यादि बाबा श्रीधर नरसिंपुरकर याज कडे बोलण्याचा
फडशा विषई कलमे

१ आरे दशाहक्षयबुद्धि धरितात बाबाच बोलणे त्याच व अमच त्रिरात्र कलम १

१ बाबाचें तीर्थरुप व चुलते श्रीधरभट व चुलते पांडुरंगभट व नरसिंभट यानि रंगाचार्यें याच्या वडिलास भाउ ह्मणोन पत्र दिल्हे अहे त्यास पन्नाससाठ वर्षे जाहली अहेत

१ हुजूर मामलेदार याच्या विद्यमाने शांभट बिन दादंभट यासि बाबानी सत्तावीसावा विग भाउपणाचा देउन पत्र दिल्हे अहे त्यास वर्षे पंधरावीस अहेत

१ आदिमालिका वंशावळीच्चि यादि बाबा पाशि येऊन अठदहा वर्षे जाहली या तागाईत आजपर्यंत वृद्धिक्षय धरीत अले अहेत

लेखांक २९१] [शके १७२०

श्रीनिशान

विशेष पुरवणी आपले पिते श्रीधरभट व जिवाजीव्यंकटेशप्रभृति समस्त भाऊ यांणीं रंभभट बिन दादंभट याचे वडलास कर्नाटकांतून घेऊन

आले त्याचे वृद्धिक्षय अशौच ग्रामस्त याचे विद्यमानें धरीत आलों हालीं आह्मांस शंका प्राप्त जाहाली शके १७२० त्याज वरून वृद्धिक्षय अशौच रंगभट याचें सोडिलें सबब ग्रामस्तांनीं आह्मांस अपंक्त केलें नंतर क्षेत्रमाहीं आलों तेथें तुह्मी चौकशी करितां बाळाजी शामजी व रामाजी मुकुंद प्रभृति निमेचे भाऊ बाळाजी शामजी यानीं वंशावळ तिचें नांव आदिमालिका लेहून दिल्ही ती खोटी ह्मणोन समक्ष भाऊ यांच्या साक्षी घालून लिहून दिल्हें त्याज वरून तुह्मी आह्मांस वृद्धि क्षय अशौच पूर्ववत् प्रमाणें धरावें ह्मणोन सांगितलें त्यास आह्मी धटाईकरून अनादर केला सबब क्षेत्रस्थांनीं सरकारसंमतें आह्मांस साहा घरास बहिष्कार घातला बिा

१ बजंभट	१ ————
१ ————	१ ————
१ ————	१ ————

येणें प्रमाणें बहिष्कार आठ नऊ वर्षें असतां आह्मांस पश्चात्ताप जाहला सबब रा सिवाजीपंत देशपांडे वाळवेकर व समस्त ग्रामस्त नरसींपूरकर याज कडे गेलों त्याज वरून त्यांणीं कागदपत्र मनास आणोन आह्मांस सांगितलें जे बाळाजी शामजी यांनीं वंशावळ आदिमालिका दिल्ही ती खोटी सबब आह्मी रंगभट याचें वृद्धि क्षय अशौच टाकिलें या मुळें आह्मीं संकर केला याचें प्रायश्चित्त निबंधोक्त आह्मांस देऊन पंक्तिपावन करावें इतःपर रंगभट आमचा वंशज अमुक पुरुष याचे आमचे वडिलांनीं व आह्मीं अशौच धरीत आलों त्या प्रमाणें आह्मी व आमचे पुत्रादिक व रंगभट यांनीं परस्परें धरीत जावें इतःपर खटला अशौच्या विषयीं होणार नाहीं यास शपथ श्रीलक्ष्मीनृसिंह व समस्त ब्राह्मण ग्रामस्त याची शफथ असे

यास साक्षी

बिा पंचाइत तपशीलवार नामें लेहून द्यावीं

निमेचे भाऊ तपशीलवार अरे त- ६ सहा घरभाऊंची मान्यता करून

पसीलवार ध्यात्री

आदिमालिकेची याद क्षेत्रस्थाचे विा फाडून टाकावी कलम १

मिति बिकलम

लेखांक २९२] १७२१ श्रावण शुा १४ [बाळबोध

श्रीनरहारिप्रसन्न तालिक

जबानी भाउ जिवाजी व रामाजी मुकुंद जोशि नरसिंपुरकर लिहुन दिल्हे जबानी ऐशि जे रंगाचार्यबिन्न दादंभट जोशि याचि स्त्रि निवर्तली तीच्या सुतकाचा गर्गशा पडोन बजंभट व त्याचे बंधु तुह्मापासि क्षेत्र कऱ्हाडास अले याज वरून अपण क्षेत्राहून साताचा नावाच बाळाजी मुकुंद व भाउ जिवाजी व अमचे बंधु यास पत्र अले याज वरून अह्मी क्षेत्रास अलो त्यास अपण विचारिले कि बजंभट याच्या दशाहतील बंधु कोणी सुतकी बैसले अहेत किंवा नाहि हें सांगावे त्यास अंतोबा अरे व दोबा अरे व गोविंदभट अरे प्रभृति त्याचे बंधु जोशि दशाह-सूतकी बैसले आहेत हे खरे करून देउ मिति शके १७०२१ श्रावण शुद्ध १४ हे लिहिले सहि हास्ताक्षर भाउ जिवाजी

पत्र प्रमाणे रामाजी मुकुंद

लेखांक २९३] १७२१ श्रावण शुा १४ [बाळबोध

श्री तालिक

जबानी बजंभट जोशि बापाजी जोशि व अमचे बंधु नरसिंपुरकर लिहुन दिल्हि जबानी ऐसि जे रंगभट बिन दादंभट याचि स्त्री निवर्तली तीच सुतक निमेचे बंधु यानि धरिले बाळाजी मुकुंद प्रभृति धरले म्हणोन तुम्हा पासी क्षेत्रकऱ्हाडास अलो त्याजवरून अपण पत्र पाठविले साताच्या नावाचे त्यापैकि येक मामाच अले त्यास त्याच बोलणे

अमच्या दशा हा बंधु अंतोबा अरे व दादोबा अरे व गोविंद अरे प्रभृति त्याचे बंधु जोशि दशाहसुतकी ले अहेत त्यास परंतु त्याचे दशाहातील होत किंवा नव्होत अम्हास ठाउक नाहि गोविंदभटाचे अमचे त्रिरात्र अम्ही हे खरे करून देउ मिति शके १७२१ श्रावण शुध्ध १४ पत्र लिहिले सहि हस्ताक्षर बापाजी जोशि

पत्र प्रमान्य बजंभट

लेखांक २९४] १७२१ श्रावण शुा १४ [बाळबोध

श्रीनरहरिप्रा तालीक

जबानी भाउ जीवाजी व रामाजी मुकुंद जोशि नरसिंगपुरकर लेहून दिल्ही जबानी एशी जे रंगाचार्य बिन्न दादंभट जोशि याची स्त्री निवर्तेली तीच्या सुतकाचा गगशा पडोन बजंभट व त्याचे बंधू तुह्मा पाशी क्षेत्र कराडास अले याज वरून आपण क्षेत्राहुन साताच्या नांवाचे बाळाजी मुकुंद व भाऊ जिवाजी व आमचे बंधू यांस पत्र आले याज वरोन अह्मी क्षेत्रांत अलो त्यांस आपण विचारिले कि बजंभट याच्या दशाहातील बंधू कोण्ही सूतकी बसले आहेत किंवा नाहि हे सांगावे त्यास अंतोबा अरे व दादोबा अरे व गोविंदभट अरे प्रभृति त्याचे बंधु जोशि दशाह सूतकी बैसले अहेत हे खरें करोन देऊं मित्ति शके १७२१ श्रावणशु १४ हे लिहिले सहि हस्ताक्षर भाउ जीवाजी पत्र प्रमाणें रामाजी मुकुंद

लेखांक २९५] १७२१ श्रावणशुा १४ [बाळबोध

श्री तालीक

जबानी बजंभट जोशि व बाजी जोशि व अमचे बंधु नरसिंपुरकर लेहून दिल्ही जबानी ऐशी जे रंगभट बिन्न दादंभट याची स्त्री निवर्तली तिचे सुतक निमेचे बंधु यानि धरिले बाळाजी मुकुंद प्रभृती धरिले ह्मणोन तुह्मा पासि क्षेत्रकराडास अलो त्याज वरोन आपण पत्र पाठ-

विले साताच्या नावाचे त्या पैकि मात्र अले त्यास त्याचे बोलणे अमच्या दशाहातील बंधु अंतोबा अरे व दादोबा अरे व गोविंदभट अरे प्रमृती त्याचे बंधु जोशि दशाह सूतकी बैसले आहेत त्यास परंतु त्याचे दशाहातील होयत किंवा नव्हेत अह्मास ठाऊक नाहिं गोविंद-भटाचे अमच त्रीरात्र अशी हे खरे करून देउ मिति शके १७२१ श्रावणशुत्ध १४ हे लिहिले सही हस्ताक्षर बापाजी जोशि पत्र प्रमान्य बजंभट

लेखांक २९१] [१७२१ श्रावण वा। ८

श्री ताळीक

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री समस्त ब्राह्मण क्षेत्र-कराड स्वामींचे सेवेसीं

सेवक बाळाजी शामजी साष्टांग नमस्कार लिहून दिल्हा कागद ऐसा जे पेशजी सन सलास तिसैनांत तासगांवीं होतों त्या समई बाबा श्री-धर तेथें आले त्या समई आह्मी कांहीं कागदपत्र पाहात होतों त्या वेळेस ही वंशावलीची याद सांपडली ती भटजीस आह्मी बोललों कीं ही याद काय आहे ती पाहणें ह्मणून त्याचे आंगा वर टाकली त्यांनीं नेहली तासगावचे मुकामची याद बाबाश्रीधर याज पाशीं दिल्ही ती वंशावल ह्मणून बाबाश्रीधर शामभट बिन दादंभट याचे सुतकनिवृत्ति करूं लागले ते समई यादीची चौकशी केली परंतु आमच्या सर्वा भावांच्या मतें जे जिवाजी व्यंकटेश यांनीं याद जवळ असतां सुतक शामभट बिन दादंभट याचे सुतकनिवृत्ति केली नाहीं सबब याद वंवशावलीची खोटी तेरीख छ २१ रावल सन मया तैन व अलफ हें लिहिलें सही हस्त अक्षर बाळाजी शामजी

१ भाऊभट बिन जिऊभट जोशी क्षेत्रनरसिंपुर पत्रा प्रमाणें मान्य
१ बाळंभट बिन मुकुंदभटपत्रा प्रमाणें मान्य
१ आपाभट बिन मुकुंदभट जोशी क्षेत्र माार

१ भाऊ नारायणभट क्षेत्रनरसिंपुर पत्रा प्रमाणें मान्य
१ नारायणभट बिन अण्णंभट क्षेत्रनरसिंपुरकर

लेखांक २९७] [१७२१ श्रावण वा १३

श्री

यादी बाबा श्रीधर नरसीपुरकर यास पुरशीस सु॥ मया
तैन अलफ छ २७ रावल अजमासे
१ रंगाचार्य याची स्त्री निवर्तली तिच्या सुतकाचा गर्गेशा पडोन क्षेत्रास आला त्यास रंगाचार्य यांचे वडील गांवांत होते किंवा देशांतरास गेले ऐसे असल्यास गेला त्या पुरुषाचें नांव काय बाहेर किती वर्षे होते गांवांत आला तो पुरुष कोण त्याचें नांव काय येऊन किती वर्षें जाहलीं आल्या तागाईत आजपर्यंत जाताशौच व मृताशौच याची वहिवाट कसी करीत आला हें सांगावें

लेखांक २९८] १७२१ भाद्रपद वा १३ [बाळबोध

॥ श्रीकृष्ण ॥

बजंभट्ट बिन मनभट्ट व बापा श्रीधर यानी क्षेत्रास येउन विदित केले जे रंगभट्ट बिन दादंभट्ट याची स्त्री निवर्तली तीचे आशौच अह्मी धरिले नसता अमचे अर्धेलीचे भाउ यानी धरीले ह्मणोन त्यास आणोन चौकशी करावी त्याज वरून बाळाजी मुकुंद प्रभृति त्याचे भाउ क्षेत्रास आणोन विचारिले जे बाबा श्रीधर व त्याचे अर्धेलीचे घरबंधु याणी आशौच धरले नसता तुह्मी अशौच धरले त्याचे कारण काय त्याज वरून त्यानि उत्तर केले जे पूर्वी पासोन अशौच धरीत अलो व हलि वहिवट ही आशौच धरावयाची चालत आहे ह्मणोन अम्ही व बाबा श्रीधर याचे घरभाउ गोविंदभट्ट अरे व अनंतभट्ट अरे यानी आशौच धरिले व बाळाजी शामजी याज पाशी आदिमाळिका होती ती बाबा श्रीधर याज पाशी देऊन आठ दहा वर्षे जाहलि असता बाबा श्रीधर प्राभृति समस्त आशौच आजपर्यंत धरीत आले ह्मणोन अह्मीं धरिले

हल्लि बाळाजी शामजी याणि आदिमाळिकेची याद खोटी ह्मणोन अपले भावाबंदाचा साक्षी घालून पत्र लिहून दिल्हे त्याज वरून बाबा श्रीधर यासी विचारिले जे तुह्मी रंगभट्ट बिन दादंभट्ट याचे वृद्धिक्षय वडिला पासोन आजपर्यंत धरिले व हल्लि सोडिलें या दोहिचे कारण काय ते लेहून देणे त्याचे उत्तर न करीता व निष्कृति न करीता क्षेत्रा हून निघोन गांवास गेले तर मारानिल्हे क्षेत्रास येऊन कृतकर्माचि निष्कृति करीत तो पर्यंत त्याचे भाउ जितक्यानी सूतक धरिले नाही त्याचे येकपंक्ति अन्नोदकव्यवहार न करणे व भोंवर गांवास हि या प्रमाणे सांगणे शके १७२१ भाद्रपद वा। १३ बहुत काय लिहिणे हे नमस्कार

वेदमूर्ति राजमान्य राजश्री समस्त ब्राह्मण व राजकीय ग्रहस्त-समुदाय वास्तव्य नरसिंपुर यांस श्रीमतकऱ्हाटकक्षेत्रस्थ समस्त ब्राह्मण कृतानेक नमस्कार व आसीर्वाद उपरी

लेखांक २९९] [१७२१ भाद्रपद वा। १३

श्री नकल

वेदमुर्त्ति राजमान्य राजश्री समस्त ब्राह्मण व राजकीयग्रहस्तसमुदाय वा। नरसिंपुर यांस श्रीमत्करहाटकक्षेत्रस्त समस्तब्राह्मणकृतानेकनमस्कार व आशीर्वाद उपरि बाळंभटबीन मनभट व बापा श्रीधर वा। मार यांणीं क्षेत्रास येऊन विदित केलें जे रंगभट बीन दादंभट याची स्त्री निवर्तली तिचें अशौच आह्मीं धरिलें नसतां आमचे अर्धलीचे भाऊ यांणीं धरिलें ह्मणोन त्यास आणून चौकशी करावी त्याज वरून बाळाजी मुकुंद प्रभृति समस्त त्याचे भाऊ क्षेत्रास आणून विचारिलें जे बाबा श्रीधर व त्याचे घरबंधु यांणीं अशौच धरिलें नसतां तुह्मी अशौच धरिलें त्याचें कारण काय त्याज वरून त्यांणीं उत्तर केलें जे पूर्वी पासून अशौच पर-स्परें धरीत आलों व हालीं वैहिवाट हि चालते अशौच धरावयाची आहे ह्मणोन आह्मीं व बाबा श्रीधर याचे घरभाऊ गोविंदभट अरे व अनंत भट अरे यांणीं अशौच धरिलें व बाळाजी शामजी या पासीं

आदिमालिका होती ती बाबा श्रीधर यांज पासीं देऊन आठ दाहा वर्षें जाहलीं असतां बाबा श्रीधर प्रभृति समस्त अशौच आज पर्यंत परस्पर धरीत आले हालीं बाळाजी शामजी यांणीं आदिमालिकेची याद खोटी ह्मणोन आपले भावाच्या साक्षी घालून पत्र लेहून दिलें त्याज वरून बाबा श्रीधर यांस विचारिलें जे तुह्मीं रंगभट बिन दादंभट याचे वृधी-क्षय वडिला पासून आजपर्यंत धरिलें व हालीं सोडिलें या दोहीचें का-रण काय तें लिहून देणें त्याचें उत्तर न करितां व निष्कृति न करितां क्षेत्राहून निघोन गांवास गेले तरी मशारनिले क्षेत्रास येऊन कृतकर्मा-ची निष्कृति करीत तों पर्यंत त्याचे भाऊ जितक्यांनीं सुतक धरिलें नाहीं त्याचे येके पंक्ति अन्नोदकव्यवहार न करणें व भोवर गांवास हि या प्रमाणें सांगणें शके १७२१ भाद्रपदवा १३ बहुत काय लिहिणें हे नमस्कार

लेखांक ३००] [१७२१

श्री

यादी बाबा श्रीधर नरसिंपुरकर याचे तीर्थरूपांनीं आपला भाऊ देशां-तरास गेला होता तो आणिला त्यास विभाग देऊन परस्परें जनना-शौच मृताशौच धरीत आले याज विसीं पत्र रंगभट याज पाशीं आहे हालीं रंगभट याची स्त्री निवर्तली तिचें अशौच न धरीत ह्मणोन नर-सिंपुरीं खटला पडला सबब बाबा श्रीधर यांणीं क्षेत्रास येऊन विनंति केली कीं आमची वंशावळ पाहून शास्त्रार्थ आह्मांस सांगावा ऐसें बोलिले त्याज वरून वंशावळीची चौकशी करितां ज्याणें वंशावळ दिली त्याणें च वंशावळ खोटी ह्मणोन लेहून दिल्हें त्याज वरून पूर्ववत् अशौच धरावें असें सांगितलें असतां अशौच घटाई करून धरीत नाहींत सबब सरकरसंमत बहिष्कारपत्रें लिहिली त्याप्रमाणें चालत आलें हालीं परस्परें समजोन अन्नोदकव्यवहार करूं लागले ते समईं आह्मी आक्षेप केला जे रंगनाथभट हा तुमचा गोत्रज होय अथवा न होय हें लेहून

देशीं अनंतर प्रायश्चित्त करोन अन्नोदकव्यवहार करणें हे न ऐकतां परस्परें घटाई करोन व्यव्हार करितात याचा बंदोबस्त करावा

लेखांक ३०१] [१७२१

श्रीकृष्णाककुद्मतीप्रीतिसंगमो जयति

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजेश्री समस्त ब्राह्मण ज्योतिषी कुळकर्णी व ग्रामाधिकारी व राजकीय ग्रहस्थसमुदाय देहाय क्षेत्रे व ग्राम बितपशील

१ करवीरक्षेत्र	१ कुरुंदवाड
१ संगम माहुली उभय तीरस्थक्षेत्र	१ हरीपूर
१ किले मचंद्रगड	१ वैराग्यक्षेत्र
१ मालखेड	१ कोळेनर्शिपूर
१ काले	१ मिरज
१ काशेगाव	१ अष्टे
१ नेर्ले	१ वाळवे
१ कापूसखेड	१ भिलवडि
१ पेठ	१ तासगांव
१ रेटरेबुद्रुक	१ इसलामपूर
१ रेटरेखुर्द	१ उरूण
१ रेटरे धरणाचे	१ बाहे
१ शेरे	१ बोरगांव
१ अटके	१ शिराळेठाणे
१ टेंभू	१ ब्रह्मनाळ
१ मसूर	१ वांगीकर्यात
१ अउंध	१ कालगांव
१ कडेगाव	१ सातारा
१ तारगाव	१ राहिमतपुर
१ कोरेगांव	१ पाल

१ उंब्रज	१ कुरुली
१ मायणी	१ ह्मसवड
१ पंढरपुर	१ वडगाव
१ शिर्टे	१ बिचूद
१ येडे	१ रेटरे
१ शेणोलि	१ शूर्पालय
१ पलूस वगैरे	१ वाडे सांगडि
१ खटांव	

यांशि प्रति

श्रीमत्करहाटकक्षेत्रस्थसमस्तब्राह्मणकृतानेकनमस्कार व अनुक्रमे आशीर्वाद उपरि वेदमूर्ति रंगभट्ट बिन्न दादंभट्ट ज्योतिषी नर्शिपूरकर यांची स्त्री प्रसूत होऊन मृत्यु पावली तीचे वृध्दिक्षयाशौच न धरिता वाो बाबा श्रीधर ज्योतिषी नर्शिपूरकर क्षेत्रास येऊन विदित केले जे आपले निमेचे भाउ बाळाजी मुकुंद प्रभृति यानी रंगभट्टाचे स्त्रीचे आशौच धरिले त्यांस क्षेत्रास बोलाऊन विचारावे त्याज वरून बाळाजी मुकुंद प्रभृति आणविले त्याची चौकशी करीता बाळाजी शामजी यानी बाळाजी श्रीधर या पाशी पेशजी आदिमाळिकेची याद दिल्ही होती ती बाळाजी शामजी यानी खोटी ह्मणोन आपले भाउ बाळाजी मुकुंद प्रभृतिच्या साक्षी घालून पत्र लेहून दिल्हे त्याज वरून बाबा श्रीधरास विचारिले जे तुह्मी रंगभट्ट यांचे स्त्रीचे आशौच न धरीले त्याचे कारण काय त्याचे उत्तर न करिता क्षेत्राहून निघोन गेले सबब बाबा श्रीधर यांचे भाउ साहा असामी बितपशील

१ बाळंभट्ट बिन्न नर्शिभट्ट	१ बजंभट्ट बिन्न मनभट्ट
१ शामभट्ट बिन्न पाडुरंगभट्ट	१ बाजीभट्ट बिन्न वासुदेवभट्ट
१ अपाभट्ट बिन्न जनार्दनभट्ट	१ बाबा व बाप्पा बिन्न श्रीधरभट्ट

या सहा असामी यानी आशौच धरिले नाहीं त्यास बहिष्कारपत्र पूर्वी पाठविले आहे ते पहाता सर्वार्थ ध्यानात येयील या नंतर बाबा

श्रीधर यानी मिरजेचे पत्र आणोन क्षेत्रस्थास शुत्धपत्र मागु लागले त्यास शुत्धपत्र न द्यावयाचे कारण बाबा श्रीधर याचे 'वडील व हेहि खुद आजपर्यंत रंगभट्टाचे घरिचे आशौच धरीत आले हाल्हि बाबा श्रीधर याचे घरभाउ गोविंदभट्ट अरे व अनंतभट्ट अरे व निमेचे भाउ बाळाजी शामजी व बाळाजी मुकुंद प्रभृति यानी आशौच धरिले असता बाबा श्रीधर घरभाउ असामी सहा यानी आशौच धरिले नाही ह्मणोन शुत्धपत्र दिल्हे नाही त्याज वरून बाबा श्रीधर श्रीक्षेत्र-पालाचे देवालयी उपोषण करू लागले ते समयी त्याचे निमेचे भाउ रामाजी मुकुंद व घरभाउ गोविदभट्ट अरे समुदायसुत्धा येऊन बाबा श्रीधरास विचारिले जे मिरजे मध्ये समस्त ब्राह्मण यानी रंगभट्ट याचे घरचे आशौच धरावे कि न धरावे हा टराव करून पत्र आणिले ते अह्मास न समजाविता क्षेत्रा मध्ये उपोषणे करावयाचे कारण काय मिरजेत अह्मि विद्यमानी नसता जो ठराव जाहला तो समस्त क्षेत्रस्थाचे व नर्शिपुरकर समस्त ब्राह्मण यांचे विद्यमाने अह्मास समजाऊन द्यावा ऐसे ह्मणत असता बाबा श्रीधर यानी त्याचे उत्तर न करीता त्यासी मारामार करून घरा मध्ये येका दोघा जणा पासून शुत्धपत्र गुप्त घेऊन गेले अणि नर्शिपुरी व भोवरगांवी एकपंक्ति अन्नोदकव्यवहार करावयास प्रवृत्त जाहले ह्मणोन ऐकितो त्याज वरून हे पत्र तुह्मास सादर केले असे तर बाबा श्रीधर घरभाउ असामी साहा यानी आशौच न धरिले त्याची निष्कृती क्षेत्रा मध्यें नर्शिपुरकर समस्त ब्राह्मण यांचे विद्यमाने होय तोपर्यंत बहिष्कृत असे

लेखांक २०२] १७२१ सुमार [बाळबोध

त्यास विचारिले जे तुह्मी मिरजेस जाऊन सिद्धांत काय केला तो अ-ह्मास क्षेत्रस्थाचे विद्यमाने समजाऊन द्यावा अह्मी हि क्षेत्रस्थ सांगतील त्या प्रा। करू ऐसे ह्मणत असतां सर्वास न समजता एकदोघा पासोन घरात शुद्धपत्र घेऊन समस्तास न विचारता वाद्याशी मारामारी करून

परभारा पळोन गेले नंतर अरे प्रभृति सरकारात जाऊन अपले वृत्त निवेदन करून ते शुद्धपत्र दाखवून भोवरगावी वगैरे कोठे एक पंक्ति अन्नोदकव्यवहार करावा ह्मणोन खटला करितात ह्मणून ऐकतो त्याज वरून हे पत्र लिहिले असे तरि बाबा श्रीधर याणी घरा मध्ये एका दोघा पासोन शुद्धपत्र नेले ते खोटे तरि त्यांशी अन्नोदकव्यवहार न करणे त्यास योग्य चतुर्वर्ग बंधु नीमेचे व घरबंधु येकत्र होउन ग्रामस्थाचे विद्यमाने वंशावळ खरी करून मग आशौच सोडावें हे काही मिरज-कर यानी न करिता पत्रे करून दिल्ही ते सर्वास मान्य होत नाही यां स्तव चौघे बंधु येकचित्तें करून परस्परे वंशावळ समजोन घेत तावत्काल पर्यंत हे साहा जणा सर्वकर्मबहिष्कृत असेत ज्या ग्रामी ज्यांस भेटतील त्याणी साहा आसामीच्या घरच्यांस स्पर्श आदिकरून कोणताही व्यवहार करूं नये साहा घरचे शरीरसंबंधाचे अगत्यवादा-स्तव यांशीं चोरून व्यवहार केल्यास त्यास क्षेत्रा हून बहिष्कार पडेल हें स्पष्ट समजोन वर्तणूक करणे

लेखांक ३०२] [१७२१ सुमार

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री रघुनाथ भट मिरगुंडे ज्योतिषी सोन-किरे यां प्रति समस्त ब्राह्मण क्षेत्रकरहाटक नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशळ लिहीत जावें विशेष बाबा श्रीधर व त्याचे भाऊ असामी सहा व रंगभट बिन दादंभट या उभयतांचा वृद्धिक्षयाचा खटला होऊन बाबा श्रीधर क्षेत्रास आले क्षेत्रस्थांनीं बाबा श्रीधर यास विचारिलें जे रंगभट याचे घरची वृद्धिक्षय तुह्मी वडिलां पासून धरीत आला असतां हालीं कां धरीत नाहीं याचें कारण काय त्यास बाबा श्रीधरानें उत्तर केलें जे बाळा शामजी याज पाशीं वंशा-वळीची याद होती ती आह्मांस दिल्ही त्या वरून क्षयवृद्धि करीत नाहीं त्यास वंशावळीची समस्त क्षेत्रस्थांनीं न धरितां गांवा मध्यें व्यवहार

समस्त ब्राह्मण क्षेत्रकरहाटक आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशळ लिहीत जावें विशेष अपण पत्र पाठविले ते पाले लिहिला अर्थ ध्यानास आणिला त्यास बाबा श्रीधर व त्यांचे बंधु असामी साहा यांचा व रंगभट् बिन दादंभट् या उभयताचा वृद्धिक्षयाचा खटला पडोन उभयता क्षेत्रास आले त्यास उभयताचे मनास आणितां बाबा श्रीधर यांचे हतून वंशावळीची पुरवणी जाली नाही सबब पूर्वी पासोन वृद्धिक्षय धरीत आले असतां हली रंगभट् याची स्त्री मृत्यु पावली तीचे सूतक चौकशी पाहता ठिकाण काही लागत नाहि त्या वरून रंगभट् बिन दादंभट् यानी समस्ता पाशी सांगीतले जे वंशावळीच्या पत्राचा विचार अवघा तुह्मास ठाउक अहे त्या वरून हे पत्र तुह्मास लिहिलें अहे तुह्मी प्राचीन पुरुष माहित अहांत हे वंशावळीचे पत्र बाबा श्रीधरापाशी अहे ते कोठे जाहले हे सत्यपूर्वक उत्तर लेहून पाठवावे ये विषयी श्रीकृष्णवेणीची व ब्राह्मण्याची तुह्मास शफत असे ब्राह्मण्याचा विषय अहे उभयताची भीड न धरिता सत्य असेल ते च लिहावें त्या प्रमाणे केले जायील

लेखांक ३०६] [१७२१।१७२२

श्री

यादी नरसींपूरकर याचे

१ प्रथम बापाजी श्रीधर व ++ + उभयतां आले ते बापूचार्य घळसासी यांनीं सखाराम दीा ढवळीकराचे घरास घेऊन आले ते समयीं रामभट विदार व तमणजोशी बैसलों होतो त्यांनीं वर्तमान सांगितलें कीं आमचे बाप भाऊ सुतक धरितात त्यास आमचे ह्मणे

१ दुसरे दिवशीं आह्मां कडे आले कीं सात जण अर्धेलीचे भाऊबंद यांस पत्र पां आणावें ह्मणून बापू घळसासी यांनीं सांगितलें त्या वरून पत्र सदहूचे नांवचे लिा।

१ बाबाचार्य घळसासी याचे समाचारास गेलों होतों ते समयीं रामाजी-

करूं लागले या करितां पंचाईतमुखें व गोतमुखें उभयतांचा निवाडा होय तों पर्यंत बाबा श्रीधर व त्याचे भाऊ असामी सहा यांसि अपंक्त केलें असे त्यास पूर्वीं बहिष्कारपत्रें क्षेत्रस्थांचीं व श्रीमंत पंतप्रतिनिधीचीं गेलीं आहेत आपणांस कळावें या उपरी आपण व आपले ग्रामस्थ सुद्धां बाबा श्रीधर व त्याचे भाऊ असामी सहा यांचे पंक्तीस अन्नोदक-व्यवहार करूं नये

लेखांक ३०४] [१७२१ सुमार

श्री

यादी बाबा श्रीधर नरसिंपूरकर याचे तीर्थरूपांनीं आपला भाऊ देशांत-रांस गेला होता तो आणिला त्यास विभाग देऊन परस्परें जनना-शौच मृताशौच धरीत आले याज विसी पत्र रंगभट याज पासी आहे हालीं रंगभट याची स्त्री निवर्तली तिचे आशोच न धरीत ह्मणोन नर-सिंपुरी खटला पडला सा। बापा श्रीधर याणे क्षेत्रास येऊन विनंती केली की आमची वंशावळ पाहून शास्त्रार्थ आह्मास सांगावा असे बोलिले त्याज वरून वंशावलीची चौकशी करितां ज्याणी वंशावल दिल्ही त्याणी च वंशावळ खोटी ह्मणोन लेहून दिल्हे त्याज वरून पूर्व-वत् अशोच धरावें असे सांगितलें असतां अशोच घटाई करोन धरीत नाही सा। सरकारसंमत बहिष्कारपत्रे लिहिलीं त्या प्रमाणे चालत आलें हालीं परस्परे समजोन अन्नोदकव्यव्हार करो लागले ते समयीं आह्मी आक्षेप केला जे रंगभट हा तुमचा गोत्रज होय अथवा न होय हे लेहून देणें अनंतर प्रायश्चित्त करून अन्नोदक व्यव्हार करणे हे न ऐकता परस्परें घटाई करून व्यव्हार करितात याचा बंदोबस्त करावा

लेखांक ३०५] १७२१ सुमार [बाळबोध

श्री

वास्तव्य

राजश्रीया विराजीत राजमान्य राजश्री विठलराव अबा सोनकिरे यांसि

मुकुंद आले त्यांनीं सांगितलें कीं बाबा श्रीधर मुतश्री आहेत एक-पंक्ती बसणार नाहीं याचें प्रमाण काय लेहून देणें उभयतांनीं लिहून दिल्हें त्याज वर रामाचार्य बोलिले बाबा श्रीधर यास तुह्मी अशौची आमचे घरास येऊं नये त्या समयीं तात्या जोशी व बाळंभट गिजरे व वासुदेवाचार्य विदार असामी दोन होत्या या प्रमाणें बाबाचार्य हि ह्मणाले राहूं नये

१ बाबाचे घरीं बिऱ्हाड होते ते समयीं त्या समस्तांनीं सांगून पा। जे नरसीं-पूरकर यास जेवायास न बोलावणें त्याज वरून त्यांणीं सांगितलें जें वेघळे जेवतात

१ व्यंकटाचार्य टोणपे याचे घरीं समाराधना जाहली ते समयीं टोणपे घळसासी यांनीं उभयतांस पंक्तींतून काढिलें

१ समस्त वादे मिळाले पंचाइतीस प्रारंभ जाहला ते समयीं बाळाजी शामजी आणविला आणि वंशावळ खोटी ह्मणून लि। दिल्हें आहे त्या वरून आमचे पंचाईतपैकीं कांहीं जण मिळोन त्यास पत्र करून दिल्हें ह्मणोन खटला पडला

समस्त पैकीं पंचाइतीस हजर

१ बाजी भिकाजी
१ गोपाळ दी।
१ गोपाळ दीक्षित उंब्राणे
१ नागोबा अण्णा
१ नरसोबा नाना
१ बाळंभट गिजरे
१ चिमणा जोशी
१ शंकरभट गिजरे
१ माहादेव जोशी
१ अण्णा दीक्षित
१ रामभट विदार
१ सिनापा घळसासी
१ नागोबा ढवळीकर
१ तात्या जोशी
१ रामचार्ये घळसासी

लेखांक ३०७] [१७२१।२२ सुमार

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री माणिक दीक्षित उंब-
राणी व तात्या दीक्षित गिजरे स्वामीचे सेवेसीं

विद्यार्थी सदाशिवभट नंदा साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसी जे रेटरे बुाा येथें राजश्री बाळाजी वेंकाजी कुलकर्णी याचे घरीं मुंज पंचमीची आहे व बाळाजी जिवाजी याचे घरीं गर्भादान आहे ते दिवशीं नरसिंपुरचे ब्राह्मणश्रेष्ठ येऊन दंगा करणार तेऱ्हां प्रहस्त खर्चाचे पेचांत येतात त्यास सरकारांतून रोखा होऊन बंदोबस्त करावा पंचमीचे आंत काय करणें तें करावें नाहीं तरी ते आपले कार्य सिद्धी करून जातील मी निघोन आपणां कडे येईन याप्रों वो बाबा श्रीधर याचे निरोप आले मुलाबाळाचें बोलणें नाहीं मुख्यामुख्याचें च आहे याज करितां विनंति. लिहिली आहे बहुत काय लिहिणें कृपा करावी हे विज्ञापना पत्राचें उत्तर सत्वर पाठवावें त्याचे मारामारी पर्यंत वेव्हार होणार माझे पारपत्य होऊन आपल्यास अपेश येईल कळावें हे विज्ञापना

लेखांक ३०८] [१७२२ वैशाख शुाा ३

श्री

यादी शके १७२२ रौद्रनामसंवछरे वैशाख शुाा ३ रविवार तदिनी बाबा श्रीधर वगैरे साहा असामी यांस बहिष्कार पूर्वी असतां बाबा श्रीधर याणी चोरून मिरजेत लग्न केले त्या लग्नास मिरजेस ब्राह्मण कराडकर व नरसिंपूर गेले नांवनिसीवार

१ नागेशभट गिजरे
१ व्यंकणभट अयाचित
१ समुद्रभट बनवडीकर
१ नागेशभट ढवळीकर
१ सिदभट ढवळीकर

१ वासुदेवाचार्य घळसासी
१ गोपाळाचार्य घळसासी
१ व्यंकाजी बापू घळसासी
१ गोविंदभट ढवळीकर
१ रामभट कडू बनवडीकर

१ व्यंकणभट आवकीर १ काशिनाथ अयाचित

१ शामावैद्य १ रामभट विदार

२ नरसिंपूरकर

१ रंगाच्यार्य घळसासी

१ आपाजी गोविंद घळसासी

येणें प्रमाणें असामी यांचे बिऱ्हाड त्रिंबकराव सुभेदार कसबे तेरदाल शरीरसंबंध तिमण्णा नाईक कपली याच्या पुत्राची मुंज सोडली नव्हती त्यास सूर्योदया पूर्वी समावर्तन करून नंतर दोन घटिकाने देवकप्रतिष्ठा केली दोन प्रहरा नंतर लागली च लग्न केले तिथी ३ रविवार

लेखांक ३०९] १७२२ वैशाख वा १० [बाळबोध

श्री

यादि जमानी रंगभट्ट बिन्न अनंतभट्ट उपनाम घळसासी व आंपाभट्ट बिन गोविंदभट्ट उपनाम घळसासी नरसिंपूरकर बाबा श्रीधर साहा असामी पूर्वी क्षेत्रस्थानी बाहिष्कृत होते त्यास त्याचे घरचे लग्न त्यानीं मिरजस जाउन केले तेथे अह्मी उभयता होतो त्यास लग्न करून अह्मी नरशिंपूरास आलो त्या नंतर अह्मी उभयता मिळोन क्षेत्रास येऊन तीर्थ घेऊन मुक्त जाहालो हि जमानी लिहुन दिल्हि सहि मिति शके १७२२ रौद्रनामसंवत्सरे वैशाखवद्य १०

हस्ताक्षर अपाजी गोविंद

रंगाचार्य मान्य

लेखांक ३१०] [१७२२ वैशाखवा ३०

श्री

यादी बाबा श्रीधर रंगाचार्य जोशी नरसींपूरकर या उभयतांचा वृद्धि-क्षया मुळें खटला पडला सबब क्षेत्रकराड येथें आले उभयतांचे मनास आणितां बाबा श्रीधर यानें सुतक धरलें नाहीं सबब बहिष्कारपत्रें पाठ-

विळीं त्याज वर गुप्त शुद्धपत्रें नेहलीं ह्मणून पुन्हां क्षेत्रस्थांचीं व सरकारचीं बहिस्कारपत्रें सादर गांवगन्ना जाहलीं याज मुळें बाबा श्रीधर यांनीं मिरजेस जाऊन मुलीचें लग्न केलें तेथें आमचे कराडकर क्षेत्रस्थ असाम्या जाऊन लग्न करून आले व नंतर सरकारांत समजलें

चौतळकराचे घरीं मुंज वैाशुा १० स जाहली शुा १२ स ब्राह्मण जेवावयास सांगितले तें मिरजेस गेले व आणखी हि सांगितले त्याज वरून सरकारचा कारकून भगवंत जिवाजी अवकरे येऊन त्यानें मिरजेस गेलेले ब्राह्मण आा १४ वोढून काढिले मग वसंतपूजेस व भोजनास कोणी सांगनातसे जाहले वेळींत चौदा असाम्यास पडलें ते समई गर्गशा सरकारांत पडला त्यांनीं निक्षून सांगितलें कीं मिरजेस जाण्याचें कारण काय समस्तांचें बहिस्कारपत्र व सरकारचीं पत्रें ऐसें असतां सुतकीयाचे घरीं लग्नांत जाऊन भोजन केलें सबब प्रायश्चित्त घेतल्या वांचून पंक्तीस अन्नोदकव्यवहार करूं नये ऐसें ठरल्या वर सदरहू मिरजेस चौदा असाम्या गेली होती त्यांनीं उपोषण वैाशुा १२ पासून वाो गोविंदजोशी वाडानजीकसरकार येथें प्रारंभ केला उपोषणास त्यास तीन उपोषणे जाहलीं मग श्रीमंत मातुश्री काशीबाई यांनीं वेाा तात्या गिजरे व चिमण जोशी व रामभट गोंवारकर यास पुसिलें जे क्षेत्रांत कलह पडला आहे हा तोडून टाकावा त्यास मिरजेस आा १४ गेली त्यांनीं श्रीसंगमीं स्नान करून पंचगव्य घेऊन तुह्मी समस्त व ते एकभावें असावें कळह करूं नये त्याज वरून चौदा आा १४ त्यास धणी रामभट गोंवरेकर व क्षेत्रस्थ दोनशें चौदा आा यास धणी तात्या गिजरे येणें प्रमाणें याद ठरवावी ह्मणोन राजश्री बापूरुद्र व विष्णुपंत व धोंडोपंत व मोरो अनंत भागवत यास सांगितलें त्याज वरून कचेरीस येऊन याद ठरली ती धोंडोपंत यांनीं पाहून विवाद बोलूं लागले कीं रंगभट यास बहिष्कार असावा बाबा श्रीधर यास आहे ह्मणोन त्यास असावा त्याज वरून श्रीमंत बाई यांणीं आज्ञा केली जे नरसींपूरकर समस्त ब्राह्मण ज्यास पंक्तीस घेतील त्यास तुह्मी घ्यावें येणें प्रमाणें मान्य सर्व-

पुण्यास येणें या कामास माहादजी कोंडे व सिवाजी जगताप असामी दोन पाठविले आहेत यांस मसाला रुपये १०० शंभर आदा करून निघोन येणें रवाना छ १६ मोहरम सुा इहिदे मया तैन व अलफ बहुत काय लिहिणें हे विनंति

छ २१ मोहरम ज्येष्ठवा ८

लेखांक ३१२] १७२२ आषाढ वा ८ [बाळबोध

श्री

वेदशास्त्रसंपन राजमान्य राजश्री समस्त ब्राह्मण क्षेत्र-कऱ्हाड यासि

बापूचार्ये बिंन रघुनाथाचार्ये घळसासी क्षेत्रमजकुर विनंती ऐसि जे अंह्मी नरसिंपुरास गेलो होतो जाउन बाबा श्रीधर यास वाळित असता जाउन त्याचे घरि भोजन केले मणुन सरकारचे रोखे अमचे शेता वर जाहले अहेत याज मुळे अंह्मी तुंम्हा पासि अलो याज वरून अपण विचारिले जे तुम्ही जावयास कारण काय व तेथे जाउन काय करून अला हे सांगावे त्यास अंम्ही अपल्या बहिणीस औषध घेउन जात होतो व नागेशभट बिंन बाजीभट ढवलीकर देवास जात होते त्यास हे बोलिले कि बाबा श्रीधर यास वाळित अहे दुसरे घरि राहिल्यास अंम्ही बोलिलो जे त्याचे घरिं अंम्ही येक दोन वेळा जाउन भोजन करुन अक्षद लाउन अलो परंतु अंम्हास कोणि विचारिले नाहि याज वरुन अंम्हीं व नागेशभट मिळोन बाबा श्रीधर याचे घरि जाउन भोजन केले हे वर्तमान गावात ब्राम्हणास समजले याज वरुन अंम्हास धरून बसविले अणि रेटऱ्यास अणिले रेटरेकर यानी त्यास माघार लाउन दिले अंम्हास कराडास लाउन दिल्हे हे वर्तमान खर सांप्रत तुम्ही जे सांगाल ते मान्य करुन पुढे त्याचे साहा घरास अंम्ही जाणार नाहीं व ते येथ अले तर स्थळ देणार नाहीं अणि अमचे मुली त्याचें घरि

त्राचे विचारें याद करून मान्यता घालोन याद विष्णुपंतीं ठेविली आहे मग सरकारचा कारकून त्रिंबक मलेगिरी यास समागमें देऊन श्रीचे देवालयें पंचगव्य वैावा ३० चे दिवशीं दिल्हें पंचगव्य करून वो हरभटबाबा यांनीं द्यावें या प्रमाणें ठरोन सदरहू असामी यांनीं पंचगव्यें घेतली ती याद त्रिंबकपंत याज पाशीं आहे मिति शके १७२२ वैावा ३० पंचगव्य प्राशन केलें सर्वत्रांनीं बाबा श्रीधर सुतकी असतां याचे लग्नास मिरजेस चौदा असाम्या गेल्या सबब पंचगव्य घेणें प्राप्त

लेखांक ३११] [१७२२ ज्येष्ठ वा। ३

श्री

नकल

वाो राजश्री बाळंभट बिन नरसिंहभट व बाबाभट बिन श्रीधरभट अध्यापक प्रभृति भाऊ साहा जोतिषी क्षेत्र-नरसिंपूर यांसि

प्रति बाळशास्त्री विनंति उपरि वाो राजश्री शामभट बिन दादंभट अध्यापक जोतिषी क्षेत्रनरसिंपूर यांनीं विदित केलें कीं नरसिंपूर येथील जोतिषाचा व अग्रहरसंमंधें बाळंभट व बाबाभट याचा व आमचा पेशजी कजिया लागोन विषय जप्त होऊन मनसुबी सरकारांत पडली त्यांचा फडशा जाहला नाहीं परंतु परस्परें वृधिक्षय धरीत आहों सालगुा रंगभट बिन दादंभट याची स्त्री प्रसूत होऊन मृत्यु पावली तिचा वृधिक्षय धरिला नाहीं सबब हें वर्तमान उभयतांनीं क्षेत्रकराड येथील ब्राह्मणांस सांगितलें तें त्यांनीं समजोन घेऊन बाळंभट व बाबाभट प्रभृति भाऊ साहा यांस बहिष्कार घातला असतां कोठें कोठें ब्राह्मणांस अन्नव्यवहार करितात त्यास आणोन मनसुबीचा फडशा करावा। ह्मणोन त्याज वरून हें पत्र तुह्मांस लिहिलें आहे तरी कराडकर यांणीं तुह्मांस बहिष्कार घातला आहे त्या प्रमाणें बहिष्कृत राहून मनसुबीस

चार्ये घलसासी हे उभयतां बाबा श्रीधर नरसींपूरकर यांस बहिष्कार असतां त्याचे घरीं जाऊन भोजन करून आले नंतर श्रीपांडुरंग येथें आषाढीची समाराधना जाहली तेथें सरकारांतून सांगितलें जे या उभयतांस भोजनांस सांगूं नये त्या वरून क्षेत्रस्था कडे येऊन जबानी जालें वृत्त लेहून दिल्हें नंतर सरकारचे जप्तीचे रोखे इनामा वर जाहले पुढें याचे प्रकरण प्रायश्चित्त घ्यावें ऐसें ठरलें नंतर आमचे ग्रामस्थ कोणी बोलूं लागले कीं पंचगव्य द्यावें सरकारचें बोलणें जे शास्त्रार्थे निघेल ते प्रायश्चित्त करावें या खालीं पंधरा दिवस लोटले मग हे उभयतां मान्य जाहले कीं सरकार व शास्त्रार्थ जैसा असेल तैसें करूं त्याज वरून श्रावणशुा १० स राजश्री भाऊ यांज कडे ब्राह्मण नांवनिशीवार गेले कीं प्रायश्चित्ताची परवानगी द्यावी ते समयीं हजर ब्राह्मण बितपशील

१ बाळकृष्णभट गिजरे	१ चिमण जोशी
१ नागेशभट बिन सखारामभट दीा ढवळीकर	१ तात्याजोशी
१ तात्या गिजरे	१ नागेश बाजी ढवळीकर
३	१ बापूजी रघुनाथ घलसासी
	४

येणें प्रमाणें परवानगी मागितली त्यांनीं उत्तर केलें जे सरकारवाड्यांत जाऊन कारभारी यास विचारून देऊं मग बाळकृष्णभट गिजरे बोलिले जे आज त्यांचे घरीं कुलधर्म आहे त्यास जोशी व ग्रामोपाध्ये समागमें घेऊन जावें आणि वाड्यांतून परवानगी द्यावी त्या वरून बालकोबा यांनीं बहिरंभट ग्रामउपाध्ये परंतु कारभारी यांची गांठ पडली नाहीं मग तो माघारा आला त्यास हि पांच दिवस जाहले मग श्रावणवा १ मंगळवारीं ब्राह्मणमंडळी मिळोन परवानगी मागावयास सरकारांत गेले त्यांचीं नांवनिशी बितपशील

अहेत त्या हि त्याचि निस्कृती होय तो पर्यंत अंणार नाहीं हे पत्र लिहिले सत्य मिती शके १७२२ अषाढ वद्य ८ हस्ताक्षर ॐ

लेखांक ३१३] १७२२ आषाढवा ८ [बाळबोध

श्रीलक्ष्मीनृसिंहप्रसन्

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री समस्त ब्राम्हण क्षेत्र-करहाड याशी

नागेशभट्ट बिन बाजीभट ढवळीकर सााा विनंती उपरि ऐशी जे अह्मी नरसींपुरास गेलो होतो जाऊन बाबा श्रीधर यास वाळीत असता जाऊन त्याचे घरी भोजन केले ह्मणू सर्वाचे रोखे आमच्या शेता वर जाले अहेत याज मुळे अह्मी तुह्मा पाशी अलो यांज वरून अपण विच्यारिले जे तुह्मी जावयास कारण काय व तेथे जाउन काय करून अला हे सांगावे त्यास बापूच्यार्य बिन रघूनाथाच्यार्य घळसाशी हे अपल्या बहिणीस हिवाचे औषध घेऊन जात होते व अह्मी देवास जात होतो त्यास बाबा श्रीधर यास वाळीत अहे दुसऱ्या घरी राहवू ऐस बापूच्यार्य यास बोलिलो त्यास बापूने उत्तर केले जे अह्मी दोन चार वेळा बाबा श्रीधर याचे घरी जाऊन भोजन करून अक्षत लाऊन अलो परंतु अह्मास कोणी विचारिले नाही त्याज वरून बापूच्या सोबतीने अह्मी जाऊन त्याचे घरी भोजन केल्या नंतर देवदर्शनास जावे तो गावांत ब्राह्मणानी अह्मी भोजन केले ह्मणून गजबज केली याज मुळे देवदर्शन जाले नाही इत:पर त्याचे सहा घरात जाणार नाहीं सांप्रत तुह्मी जे सांगाल तें ऐकू यास अंतर होणार नाही हा कागद लेहून दिला सत्य मित्ती शके १७२२ रौद्रनामसंवत्सरे अषाढवद्य ८ हस्ताक्षर ॐ

लेखांक ३१४] [१७२२ श्रावण वा १

श्री

दी नागेशभट बिन बाजीभट ढ्वलीकर व बापूचार्य बिन रघुनाथा-

१ बावादीा वळवडे	१ चिमण जोशी
१ तात्या जोशी	१ माणिकदीा उंब्राणी
१ नरसिंहाचार्य टोणपे	१ रामाचार्य शर्मिष्ठा
१ आपादीा क्षीरसागर	१ बाळंभट गिजरे
१ बाळंभट वैद्य	१ मोरभट ग्रामउपाध्ये
१ महिपतभट गिजरे	१ विठ्ठल महिपत जोशी
१ नारायणभट टोणपे	२ प्रायश्चित्ताचे
१ तात्या गिजरे	१ नागो ढवळीकर
——	
१४	१ बापू घळसासी
२	——
——	२
१६	

येणें प्रमाणें सरकारचे कचेरीस जाऊन राजश्री मोरोपंतभाऊ व सदाशिवपंत फडणीस व लक्ष्मणपंत व बापूरुद्र आणखी मंडळी होती त्यांनीं सांगितलें जे पांचसात जण एकी कडे त्याज वरून वितपशील

१ बाबा वलवडे	१ चिमणजोशी
१ नरसिंहाचार्य टोणपे	१ आपा दीक्षित
१ मोरभट ग्रामउपाध्ये	१ विठ्ठल महीपत जोशी
१ रामाचार्य घळसासी	१ तात्या गिजरे

येणें प्रमाणें जाऊन त्यांचीं आमचीं बोलणीं बहुत जाहलीं पंचगव्य द्यावें त्याचें बोलणें शास्त्रार्थ जो निघेल त्या प्रमाणें करणे मग दर असामीस एक एक कृछ्र सांगितलें मग जोशी व ग्रामउपाध्ये यास सांगितलें त्यांणीं क्षौर करून पंचगव्य दिल्हें मिति शके १७२२ श्रावणकृष्ण १ मंगळवार

Digitized with financial assistance from
Dr. Devangana J. Desai
on 14 February, 2019